१६६८

१७५५

REFBK-0016609

# अभ्यास कसा करावा ?

लेखक

डॉ. माधवराव गोविंदराव दाभाडे,
एम्.ए.,पीएच्.डी.
मराठी विभाग प्रमुख,
माधव महाविद्यालय, उज्जैन, (मध्य-प्रदेश)

સંગ્રહિ
૪૮૪૬૨
૨૩/૮/૫૮
૧૯૫૯

# अभ्यास कसा करावा ?

लेखक


डॉ. माधवराव गोविंदराव दाभाडे,
एम्.ए.,पीएच्.डी.
मराठी विभाग प्रमुख,
माधव महाविद्यालय, उज्जैन, (मध्य-प्रदेश)



दा. क्र. १६६०८


प्रस्तावना लेखक


[illegible] खैर
[illegible] पीएच्. डी.



REFBK-0016609



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथक्रमांक ४९४६२ वि: निबंध
नों: दि: २३/६/६८
१५५५



शके १८८९ ] किंमत रुपये ५.५० [ सन १९६८

प्रकाशक :

दिलीप माधवराव दाभाडे
१३ आदर्श नगर,
माणिकबाग रोड,
इन्दौर (मध्य-प्रदेश)

© सौ. कमला माधवराव दाभाडे

मुद्रक :
दि. दा. गांगल, एम्.एस्सी.,
लोकसंग्रह मुद्रणालय,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २.

# अर्पणपत्रिका

भारतातल्या सर्व प्रांतांत, जगातल्या सगळ्या राष्ट्रांत आणि विश्वातल्या कोठल्याही ग्रहात राहणाऱ्या मुलांमुलींना प्राथमिक शाळेपासून तो विश्वविद्यालयापर्यंत मिळणारं सर्व प्रकारचं शिक्षण, सर्व सुखसोयींनी युक्त पण सर्वस्वी मोफत ज्या दिवशी दिलं जाईल, तो दिवस विश्वाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल.

असा सोन्याचा दिवस लौकरात लौकर उगवावा म्हणून सहकार्य करण्याची शक्ती, युक्ती आणि बुद्धी आपणा सर्वांना द्यावी अशी,

**स्वामी सद्‌गुरू संत तुकाराम महाराज**

यांच्या चरणी मी नम्र प्रार्थना करतो. आणि हे लहानसं साहित्यपुष्प त्यांच्या चरणावर अत्यंत भक्तिभावानं अर्पण करतो.

लेखक

# प्रस्तावना

डॉ. ग. श्री. खैर

एम.ए.,पीएच.डी.

## जीवनाचा अभ्यास–असा करावा

डॉ. माधवराव दाभाडे यांनी प्रस्तुत पुस्तक लिहून साहित्यक्षेत्रातील एका वादग्रस्त प्रश्नाला त्यांच्या दृष्टीने स्पष्ट उत्तर दिले आहे. साहित्यातील ललित कलाकृती ही केवळ कलेकरिता कला असावी, का तिच्यात थोडीशी अक्कलही असावी या गोष्टीचा तात्त्विक काथ्याकूट आधुनिक वाङमय-क्षेत्रात मधून मधून चालू असतो. सौंदर्य आणि संदेश; कला आणि उपदेश; लालित्य आणि हेतू–या गोष्टींचा विरोध नसून त्यांच्यांत समन्वय घालता येतो, हे प्रा. दाभाडे यांनी आपल्या कृतीने सिद्ध करून दाखविले आहे. "अभ्यास कसा करावा" हा त्यांचा ग्रंथ एक उच्च प्रकारची ललितकलाकृतीच आहे. तिच्यात लालित्य आहे, त्याचबरोबर एक प्रखर ध्येयवाद आहे. लघुकथा वाङमयाचे सर्व साहित्यगुण त्यात उतरले आहेत. भाषाशैलीचे सौंदर्य, कथानकाचा चटकदारपणा, औचित्यपूर्ण घटना, स्वभावचित्रे, मनाचे विश्लेषण—अशा सर्व प्रकारच्या गोष्टी यात आहेत. परन्तु त्या सर्वांचा उद्देश तरुण पिढीच्या मनावर काही योग्य संस्कार करावेत असा आहे.

ललित कलाकृतीत हेतू असावा की नाही या वादाला माझे उत्तर असे आहे की, लेखकाजवळ काही ध्येयवाद असेल तर तोच त्याच्या साहित्याचा हेतू नकळत होतो. त्याला मुद्दाम ओढाताण करावी लागत नाही. कृत्रिमताही आणावी लागत नाही. त्याच्या मनातले संस्कार लेखणीच्या मार्गाने कागदावर व तेथून वाचकांच्या मनात संक्रमित होतात. वाचकांना देण्यासारखे, कळकळीने त्यांना सांगण्यासारखे, त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासारखे, असे विचार लेखकाजवळ असले तर त्याच्या लेखनात हेतुपूर्णताही येणारच. कलेकरिता कला या गोष्टीचे समर्थन करणारांच्या मनातही लेखकाच्या स्वातंत्र्याचा व त्याच्या व्यक्तिमत्वाचा प्रखर ध्येयवाद असतो आणि तो त्यांच्या लेखनात उतरतो. तोच त्याचा संदेश व हेतू. परंतु ज्या लेखकांचे अंतःकरण व डोके रिकामे असते, वाचकांना देण्यासारख्या भावना व विचार ज्यांच्याजवळ नसतात, त्यांचे साहित्य मात्र हेतुशून्य असे राहील. भाषाशैली, शब्दसंपत्ती आणि कल्पना यांची खैरात करून ते

घटकाभर मनोरंजन करू शकतील, परंतु वाचकांच्या मनावर त्यांच्या जीवनाला उपयोगी असा खोल संस्कार ते करू शकणार नाहीत.

डॉ. माधवराव दाभाडे यांना तरुणांच्या हिताविषयी अलोट आस्था आहे. विद्यार्थ्यांनी महत्त्वाकांक्षी असावे, स्वावलंबी बनावे, संधीचा फायदा घ्यावा, अडचणींवर मात करावी, नियमबद्ध वागणूक ठेवावी, लोकसंग्रह करावा आणि खूप खूप शिकावे, असे त्यांना वाटते. विद्यार्थ्यांनी आदर्श, परिपूर्ण आणि संपन्न असे जीवन जगून विद्यार्थिदशा सार्थ करावी अशी तळमळ त्यांच्या ठिकाणी आहे. बहुजनसमाजातील तरुणतरुणींनी उपलब्ध अशा सर्व संधींचा फायदा घेऊन आपल्या समाजाची बौद्धिक पातळी वाढविल्याशिवाय देश पुढे येणार नाही अशी जाणीव लेखकाच्या ठिकाणी आहे. भारतात समताप्रधान असा समाजवाद लवकर आणण्याचे काम या तरुण पिढीला करावयाचे आहे. या समतावादाची स्फूर्ती पाश्चात्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानात नसून तुकाराम महाराजांच्या सामाजिक व अध्यात्मिक समतावादात आहे. या समाजवादाला आणि समतादृष्टीला, श्रीकृष्णाच्या भगवद्‌गीतेपासून, ज्ञानेश्वराच्या ज्ञानेश्वरीमधून, तुकाराम महाराजांच्या अभंगातून आलेली, अशी अडीच तीन हजार वर्षांची परंपरा आहे. त्याचे मूळ या देशात व या समाजातच आहे; तो बाहेरून चिकटविलेला नाही; एतद्देशीय आहे. जातिवंत आहे.

या ग्रंथात अनुभवाची संपन्नता आहे. ग्रंथात दिलेले प्रसंग केव्हाना केव्हातरी, कोठेना कोठेतरी घडलेले आहेत. या प्रसंगांच्या विविधतेत आणि संपन्नतेत लेखकाची सामाजिक निरीक्षणशक्ती, वेचक दृष्टी, आणि मनाची संवेदनक्षमता, हे गुण स्पष्टपणे दिसून येतात. हातात घेतलेल्या विषयाला योग्य असे भरपूर प्रसंग लेखकाने दिले आहेत. प्रत्येक सद्‌गुणाचे महत्त्व पटविण्याकरिता अनेक लघुकथा, लघुतरकथा आणि लघुत्तमकथा समाविष्ट केल्या आहेत. कथांची संपन्नता आणि त्यामुळे निर्माण होणारी मनोरंजकता, हा या ग्रंथाचा विशेष गुण आहे. डॉ. माधवरावांचे हे लेखन अत्यंत सुबोध झाले आहे. लहान मुलांना त्याचप्रमाणे प्रौढांना ते सहज समजेल व त्यात गोडी वाटेल. वाचताना वाचक कोठे अडणार नाही, कंटाळणार नाही, उलट कथानकामुळे कुतूहलप्रेरित होऊन ग्रंथाच्या प्रवाहाबरोबर सहज आणि विनासायास तरंगत जाईल. कथानक, वातावरण, व्यक्ती, स्थळे, प्रसंग या सर्वांत विविधता आलेली आहे. कधी घरात, कधी दवाखान्यात, कधी शाळेत, कधी आश्रमात प्रसंग घडतात आणि आपापल्या संस्कारांचा ठसा वाचकांच्या मनावर ठेवून जातात. लेखकाच्या दृष्टीने त्याने हे पुस्तक विद्यार्थ्यांकरिता लिहिले असले तरी विद्यार्थ्यांप्रमाणेच प्रौढांनाही ते वाचनीय वाटेल. या ग्रंथाला एक आकुंचित नाव देण्यात लेखकाने स्वतःच्या

अपत्यावर अन्याय केला आहे असे मला वाटते. कारण 'अभ्यास कसा करावा' या मर्यादित विषयाच्या बाहेरच्या कितीतरी व्यापक क्षेत्रात लेखकाने संचार केलेला आहे. ग्रंथाच्या नावामुळे वाचकाची फसगत होईल. शाळेतला अभ्यास गृहपाठ, परीक्षेची तयारी, पाठांतर, स्मरणशक्ती, वाचनगती, मनन, अक्षरसुधारणा इ. विषयांची अपेक्षा करीत वाचक अर्धाअधिक ग्रंथ वाचील आणि गोंधळात पडेल. व्यापक दृष्टीने विद्यार्थीच नव्हे, तर प्रौढ माणसाने देखील आदर्श जीवन कसे जगावे याचा आविष्कार या ग्रंथात आहे. "जीवनाचा अभ्यास कसा करावा" अशा तऱ्हेचे नाव अधिक समर्पक होईल असे मला वाटते. कारण लेखकाने तसा अभ्यास स्वतः केलेला आहे आणि तो जिवंत मूर्तिमंत स्वरूपात वाचकापुढे ठेवला आहे.

मराठी वाचकवर्ग आणि ग्रंथ परीक्षण करणारें समीक्षक या बृहन्महाराष्ट्रीय मराठी लेखकाच्या कलाकृतीचे सहर्ष स्वागत करतील असा मला विश्वास आहे.

दि. २७।११।१९६७
महात्मा फुले पुण्यतिथी

प्र.आ.रवे

# लेखकाचे निवेदन

प्रिय वाचक बंधुभगिनींनो ! कुठल्याही कार्यात यश मिळविण्यासाठी अनेकांचं सहाय्य घ्यावं लागतं. त्यातल्या काहींचा आपुलकीचा सल्ला, काहींचं प्रेमळ प्रोत्साहन आणि काहींचे उत्साह देणारे शब्द हे इतक्या मोलाचे असतात की, त्याबद्दल सर्वांचे आभार मानायचं म्हटलं तरी खऱ्या अर्थानं ते मानता येत नाहीत. कारण अशा प्रोत्साहनाचं मोल अमोल असतं. पंढरपूरला एकत्र झालेले सर्व संत जेव्हा पंढरपूर सोडून जाऊ लागले तेव्हा विठ्ठलाचं मन गहिवरून आलं. आणि तो विठ्ठल देवळाबाहेर येऊन संत नामदेवाला मिठी मारून म्हणाला " मला सोडून जाऊ नका ! " हे पाहून सर्व संतांच्या डोळ्यांना धारा लागल्या. तेव्हा सामान्य माणसांना उत्साह देणाऱ्या व्यक्तींचं महत्त्व किती वाटत असतं हे वेगळं सांगायला नकोच ! अशी खरोखर परिस्थिती असताना 'अमक्या अमक्यानं असं असं सहाय्य केलं' एवढं म्हटलं म्हणजे केलेल्या सहकार्याची भरपाई झाली, असं होत नाही. आता माझंच पहाना !

हे सांगता सांगता 'अभ्यास कसा करावा ?' या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी मला आलेल्या अडचणींचा पाढा आपल्यासमोर वाचावा, असा माझा विचार नाही. परंतु त्यातल्या काही अडचणींचा इथं मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. तो एवढ्यासाठी की पुढं येऊ इच्छिणाऱ्या नवीन होतकरू लेखकांना त्यावरूनही काही शिकता येईल. १९६० मध्ये माझं 'निबंध लेखन' हे पुस्तक प्रकाशित झालं. त्या पुस्तकाच्या अखेरच्या पृष्ठावर 'लौकरच प्रकाशित होणारं पुस्तक' म्हणून 'अभ्यास कसा करावा ?' या पुस्तकाची मी जाहिरात केलेली आहे. परंतु त्यानंतर हे पुस्तक प्रकाशित करायला मला सात वर्षं लागली. त्याची अनेक कारणं आहेत. त्यांपैकी मुख्य कारण हे की, हे पुस्तक प्रकाशित करायला कुणी प्रकाशकच मला मिळेना. म्हणून पुस्तक प्रकाशित होऊ शकत नाही आणि आता आपल्या मनातले विचार आपल्या मनातच राहून जाणार की काय याची आम्हाला फारच खंत वाटू लागली. गेल्या कित्येक वर्षांपासून आमची सांपत्तिक स्थिती यथातथाच असल्यानं पुस्तक कसं प्रकाशित करावं या विवंचनेत आम्ही होतो. शेवटी कर्ज काढायचा निश्चय आम्ही केला. कारण त्याशिवाय दुसरा मार्गच राहिला नाही. त्याप्रमाणं कर्ज काढून हे पुस्तक आम्ही प्रसिद्ध करीत आहोत. हे आमचं पुस्तक अशा परिस्थितीत का होईना पण

प्रकाशित होत आहे यामुळं आम्हाला जो आनंद झालेला आहे तो सांगून सांगता येण्यासारखा नाही.

कारण खेड्यापाड्यांत राहणाऱ्या आम जनतेत शिक्षणाचा प्रसार झपाट्यानं व्हावा असं आम्हाला फार फार वाटतं. यास्तव खेड्यापाड्यांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थिनींनी ज्ञान मिळवण्यासाठी कंबर बांधली पाहिजे. त्यांनी ज्ञानसंपन्न होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजे मग त्यांना सर्व अडचणींवर मात करता येईल. 'अहो ! काय करणार? आम्हाला परिस्थितीच अनुकूल नाही' असं म्हणणारे विद्यार्थी सर्वत्र आढळतात. त्या सर्वांना आम्ही अत्यंत आपुलकीनं आणि कळकळीनं सांगत आहोत की, तुम्ही परिस्थितीचा बाऊ करून घेऊ नका. स्वतःचा उद्धार स्वतःच करायचा संकल्प करा. तुम्ही दृढनिश्चय करून उद्योगाला लागलात तर तुमचं मनच तुमचं गुरू होऊन तुम्हाला मार्गदर्शन करील. म्हणूनच तुम्ही कोणत्याही परिस्थितीत असला तरी शिक्षणाची कास धरा. कोणत्या नि कोणत्या तरी ज्ञानाच्या शाखेत पदवीधर व्हायचा निश्चय करा त्यासाठी एस्. एस्. सी. परीक्षेत उत्तम यश मिळवायचं आहे असा दृढसंकल्प करा. तुम्ही कोणत्याही वर्गात शिकत असलात तरी मराठी भाषेचा अभ्यास मनापासून करा. कारण चांगले चांगले ग्रंथ वाचायची गोडी जर तुम्हाला लागली तर तुम्हालाही स्फूर्ती मिळाल्याशिवाय राहणार नाही. याच कारणास्तव विरोधी परिस्थितीची पर्वा न करता हे पुस्तक आम्ही आपल्याला सादर करीत आहोत. हे पुस्तक तुम्ही मनापासून पुन्हा पुन्हा वाचा. ज्ञानाची तलवार हातात घेऊन अज्ञानरूपी शत्रूचा तुम्ही नायनाट करा. कारण सर्व दुःखांवर ज्ञान हाच एक रामबाण उपाय आहे. ज्ञानासारखं पवित्र दुसरं काहीही या जगात नाही असं श्रीकृष्णानं अर्जुनाला गीतेत सांगितलं आहे. पण हे ज्ञान मिळवायचं तर शिक्षण हे घेतलंच पाहिजे. त्याशिवाय दुसरा मार्ग नाही.

आता या पुस्तकासाठी कुणाकुणाचं कसं कसं सहाय्य झालं ते थोडक्यात सांगतो. कोल्हापूर येथील सुप्रसिद्ध देशभक्त आणि साहित्यकार भाई माधवराव बागल यांच्या बहात्तराव्या वाढदिवसानिमित्तानं कोल्हापूरच्या केशवराव भोसले सभागृहात तारीख २८ मे १९६७ रोजी मोठ्या उत्साहानं आणि थाटात त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्या सभेचं अध्यक्षस्थान लोकसभेचे उपसभापती माननीय श्री. र. के. खाडीलकर यांनी सुशोभित केलं होतं. या समारंभाला उपस्थित राहण्यासाठी मी उज्जैनहून मुद्दाम कोल्हापूरला गेलो होतो. त्या दिवशी भाई माधवराव बागल यांची आणि माझी प्रथमच भेट झाली. त्या समारंभात माझंही छोटसं भाषण झालं त्यानंतर लागलीच मी उज्जैनला परत यायला निघालो. वाटेत पुण्यातल्या लोकसंग्रह छापखान्याचे व्यवस्थापक मित्रवर्य श्री. काशीनाथ

गंगाराम सोनार यांना भेटलो. 'अभ्यास कसा करावा ?' हे पुस्तक कसं प्रकाशित करावं या विवंचनेत मी होतो. आणि या बाबतच मी त्यांच्याशी बोललो. तेव्हा त्यांनी धीर देऊन पुस्तक प्रकाशनासाठी प्रोत्साहन दिलं. म्हणूनच हे पुस्तक आज प्रकाशित होत आहे असं म्हटलं तर बिलकूल अतिशयोक्ती होणार नाही. याबद्दल त्यांचे आभार कसे मानावेत ? मी खरोखरच त्यांचा आणि छापखान्यातल्या इतर सर्वांचा अत्यंत आभारी आहे.

गुरुवर्य डॉक्टर ग. श्री. खैर यांनी अनेक कामं असतानाही वेळात वेळ काढून या माझ्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली. म्हणून त्याचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. त्यांचं कृपाछत्र असंच असावं अशी त्यांना नम्र विनती करतो.

उज्जैन येथील माधव कॉलेजचे लोकप्रिय प्राचार्य कविवर्य डॉक्टर शिवमंगलसिह सुमन यांनी या पुस्तकासाठी मला प्रोत्साहन दिलं. माझे निबंध लेखन हे पुस्तक त्यांनी स्वतः वाचलं आणि "फार चांगलं लिहिलं आहे तुम्ही हे पुस्तक!" असं बोलून दाखवलं. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठीही त्यांनी मला वेळोवेळी धीर दिला. म्हणून मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

विलेपार्ले, मुंबई येथील श्री. दिलीपकुमार कारभारी, अंबरनाथ येथील श्री. महादेव केशव फाटक, नगर जिल्ह्यातल्या डोंगरगावचे श्री. निवृत्ती नारायण उगले, नागदा येथील श्री. पद्‌माकर चिंचोळे, जळगाव जिल्ह्यातल्या आंबिलहोळचे श्री. आशाराम देवराम पवार, उज्जैनचे श्री. रंगराव जाधव आणि माधव महाविद्यालयातील माझे सर्व विद्यार्थी यांचाही मी आभारी आहे.

माझ्या बहुतेक लेखांचे प्रथम वाचक माझी मुलंच होत. या पुस्तकातले सर्व लेख माझ्या मुलांमुलींनी वाचून माझ्याशी मनमोकळेपणानं चर्चा केली. तसंच प्रूफरीडींग करायलाही सहाय्य केलं. म्हणून आता पुस्तक पूर्ण झाल्यावर मागं वळून पाहताना माझ्या मुलांमुलींनी केलेली मदत ही मला मोलाची वाटते. म्हणून मी त्यांचेही आभार मानतो.

मी आतापर्यंत अनेक ग्रंथ वाचले. जो जो ग्रंथ आवडला तो तो वाचला. त्या आवडलेल्या पुस्तकातलं मर्म समजावून घेण्याचा अट्टाहासपूर्वक प्रयत्न केला. अशा या अगणित लेखकांचाही मी अत्यंत आभारी आहे. त्यांचं ऋण हे कधीही फिटण्यासारखं नाही. म्हणून त्यांच्या ऋणात राहण्यातच मी स्वतःला धन्य समजत आहे.

आता अखेरीस एक गोष्ट सांगून हे माझं निवेदन पुरं करतो. कारण माझं हे निवेदन मारुतीच्या शेपटीप्रमाणं वाढतंच चाललं आहे. ती गोष्ट अशी की, ज्या प्रमाणं अन्नात मीठ असल्याशिवाय अन्नाला रुची येत नाही, त्याप्रमाणं संसारात हरि-

भक्ती असल्याशिवाय संसार सुखाचा होऊ शकत नाही. विठ्ठलभक्ती करता करता प्रत्येकाला विठ्ठलरूप होता येईलच असं नाही. परंतु विठ्ठलरूप होता येत हे स्वामी, सद्‌गुरू, आणि संत तुकाराम महाराज यांनी स्वतःच सिद्ध करून दाखवलं आहे. हे विश्व इतक्या विविध छटांनी नटलेलं आहे की, ते पाहता पाहता या विश्वाचा कर्ता किती गोमटा असला पाहिजे असा विचार मनात उचंबळून येतो त्या परमेश्वराचं स्मरण करणं हे आपलं पवित्र कर्तव्य आहे. ते कर्तव्य आपण पार पाडीत नाही म्हणून आपण अधिकाधिक अविचारी, उद्धट आणि उद्दाम बनत आहोत. आणि म्हणूनच आपण आज माणुसकीला पारखे झालो आहोत आर्थिक दुर्दशा हे जसं आपल्या आजच्या दुःखाचं प्रमुख कारण आहे तसंच आपण हरिविन्मुख झालो आहोत हेही आपल्या अधोगतीचं कारण आहे.

आणि त्या राजराजेश्वराला बघायचं तर ' कुणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वरपूजनाचे ॥' हा सिद्धान्त आम्ही प्रत्यक्ष पाळला पाहिजे. म्हणूनच खऱ्या हरिभक्तीची ज्योत जास्तीत जास्त प्रज्वलित झाल्यास आपलं जीवन सुखी होईल असं आम्हाला वाटतं. जनसेवा हीच ईश्वरसेवा असं आपण प्रचाराच्या दृष्टीनं बोलतो. परंतु प्रत्यक्ष कृतीनं दुसऱ्याच्या नरडीला नख लागलं तरी बेहेत्तर पण आपलीच तुंबडी भरली पाहिजे असं वर्तन करतो. म्हणूनच 'देव भावाचा भुकेला' हा सतरावा लेख या पुस्तकासाठी आम्ही मुद्दाम लिहिला आहे. ' सत तुकाराम महाराज यांच्या गाथेतील निवडक अभंग ' हे पुस्तक लिहून प्रकाशित करायचा आमचा विचार आहे. परंतु असं पुस्तक प्रकाशित होईल तेव्हा खरं ! त्या पुस्तकात हरिभक्तिविषय सविस्तर बोलायचा आमचा मानस आहे. म्हणून तूर्त एवढंच पुरे !

समाजातल्या सगळ्या थरातले सर्वच्या सर्व लोक सुशिक्षित होऊन आपणा सर्वांच्या अंतःकरणात हरिभक्तीची भावना जागृत होवो अशी स्वामी, सद्‌गुरू आणि संत तुकाराम महाराज यांच्या चरणी नम्र प्रार्थना करून आणि त्यांचाच एक अभंग देऊन हे निवेदन पुरं करतो.

**एकमेका साह्य करू ।**
**अवघे धरू सुपंथ ॥ १ ॥**
**कोण जाणे कैशा परी ।**
**पुढे उरी ठेवता ॥ २ ॥**
**अवघे धन्य होऊ आता ।**
**स्मरविता स्मरण ॥ ३ ॥**
**तुका म्हणे अवघी जोड**
**ते आवडी चरणांची ॥ ४ ॥**

# अनुक्रमणिका


| क्रम | लेखाचं नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | माणसानं माणसासारखं जगावं ... ... ... ... ... | १ |
| २. | " निश्चयाचे ऐसे बळ। तुका म्हणे तेची फळ ॥ " ... ... | ८ |
| ३. | " यत्न तो देव जाणावा " ... ... ... ... ... | १७ |
| ४. | संधी मिळते, संधी मिळवावी लागते ... ... ... ... | २७ |
| ५. | संगत धरावी, तर ती चांगल्यांचीच ! ... .. ... .. | ३६ |
| ६. | जी वेळ गेली, ती गेली ... ... ... ... | ४५ |
| ७. | नियम म्हणजे नियम ... ... ... ... | ५५ |
| ८. | " मला अमुक अमुक व्हावसं वाटतं ! " ... ... ... | ६५ |
| ९. | इच्छा तिथे मार्ग ... ... . ... ... | ७७ |
| १०. | हिम्मत मर्दा तो मदत खुदा ... ... ... ... | ९१ |
| ११. | 'अहो ! अंगी नम्रता असायला पाहिजे !' ... ... | १०४ |
| १२. | कुरकुर करतो, तो करंटा ... ... ... ... | ११६ |
| १३. | गोष्ट साधी, पण फार महत्त्वाची ... ... ... | १२९ |
| १४. | आपला आपण मित्र ... ... ... ... | १४२ |
| १५. | आपला सर्वांत मोठा शत्रू ... ... ... ... | १५६ |
| १६. | चारित्र्याचं मोल अनमोल आहे ... ... ... | १७३ |
| १७. | देव भावाचा भुकेला ... ... ... ... | १८१ |
| १८. | अभ्यास कसा करावा ? ... ... ... ... | २०४ |

# अभ्यास कसा करावा ?

दा. क्र. १६६०८

१

# माणसानं माणसासारखं जगावं

विद्याप्रिय राजा भोज याचं नाव माहीत नाही असा मनुष्य सापडणं विरळा ! या लोकप्रिय राजाची राजधानी माळव्यातील धार या गावी होती. हे गाव इंदूरच्या पश्चिमेस पासष्ट किलोमीटर अंतरावर आहे. या धारपासून पश्चिमेस जवळ जवळ एकशेपाच किलोमीटरवर बाग हे एक लहानसं खेडेगाव आहे. तिथं कोरीव लेणी आहेत. महाराष्ट्रातील अजंठा आणि वेरूळ इथल्या लेण्याइतकी ही प्रसिद्ध नाहीत. तरीपण ती एकदा तरी पाहण्यासारखी आहेत, एवढं मात्र खरं. या बागच्या लेण्यात घडलेला प्रसंग सर्वांना मुद्दाम सांगण्यासारखा आहे.

माझं वास्तव्य धारला असताना ही बागची लेणी पाह्यचं मी ठरवलं आणि त्याप्रमाणं काही प्राध्यापक मित्रांच्याजवळ तसं बोलून दाखवलं. मित्रांनी या गोष्टीला होकार देताच एके दिवशी एस्. टी. ची एक स्पेशल मोटर करून तीन साडेतीन तासांच्या प्रवासानंतर आम्ही बागला जाऊन पोचलो. तेव्हा तिथं एक जर्मन चित्रकार ती लेणी पाहण्यात गर्क झालेला आम्हाला दिसला. त्या लेण्यांतल्या कोरीव कामाचं निरीक्षण करण्यात आणि आवडलेल्या चित्रांचं चित्रण करण्यात तो जर्मन चित्रकार इतका मग्न झाला होता की, गेल्या तीन-चार दिवसांपासून तो हेच काम करीत होता, तरीपण त्याची अजून तृप्ती झाली नव्हती. तो त्या ठिकाणी आणखी काही दिवस राहणार होता. या उलट ती बागची लेणी पाह्यला, गप्पागोष्टी करायला आणि आणलेलं फराळ करून मोकळं व्हायला आम्हांला फार तर अडीच तीन तास लागले असतील. तेव्हा या जर्मन चित्रकाराला मात्र इतके दिवस इथे का लागतात, अशा विचारानं उत्सुक होऊन आम्ही त्याची ओळख करून घ्यायचं ठरवलं.

इकडचं तिकडचं बोलणं झाल्यावर त्या चित्रकाराचा निरोप घेता घेता त्याची थोडी चेष्टा करण्याच्या उद्देशानं आमच्यापैकी एका प्रोफेसरानं त्याला म्हटलं,

" चित्रकार महाशय ! जरा स्पष्ट बोलतो याबद्दल राग येऊ देऊ नका. आपल्या वयोमानाकडे पाहून असं वाटतं की हे आपलं वय विश्रांती घ्यायचं

असताना, ती न घेता आपण उन्हातान्हात अशा निर्जन ठिकाणी चारचार पाच-पाच दिवस राहात आहात, हे योग्य नाही. त्यामुळं आपण केव्हा आजारी पडाल याचा नेम नाही. आणि ............"

"आणि मला मरण केव्हा येईल याचाही नेम नाही !" आमच्यापैकी बोलणाऱ्या प्राध्यापकाला मध्येच थांबवून त्या वृद्ध चित्रकारानं हसतहसत उत्तर दिलं. त्या वेळी त्याचे डोळे आनंदानं अधिकच चमकत होते, आणि त्याचा चेहरा त्या उतार वयातही मोठा चित्ताकर्षक दिसत होता. तो पुढं म्हणाला,

"तुम्ही काहीही बोललात तरी मला राग यायचा नाही. उलट तुम्ही माझ्याशी स्पष्टपणानं बोललात याबद्दल मी तुमचं अभिनंदन करतो. कारण आता तुमच्याशी मनमोकळेपणानं बोलायला मलाही संकोच वाटत नाही. अजंठा, वेरूळ, ही इथली बागची लेणी आणि इतर अनेक ठिकाणी कठिण अशा पर्वतांत सुबक कोरीव काम करून सुंदर चित्रं काढणाऱ्या भारतीयांचे तुम्ही वंशज आहात, याबद्दल मला जसा आनंद होतो तसाच खेदही होतो.

आनंद होतो तो अशासाठी की ही अप्रतिम चित्रं काढणाऱ्या थोर भारतीयांचे तुम्ही वंशज आहांत म्हणून, आणि दुःख अशासाठी की तुमच्या पूर्वजांनी ही जी चित्रं या ठिकाणी कोरलीत ती काढताना त्यांनी ऊन, पाऊस, थंडी किंवा दुसऱ्या कोणत्याही अडचणींची पर्वा केली असेल असं मला वाटत नाही. तसंच अमुक एक वय काम करायचं आणि अमुक वय विश्रांती घ्यायचं असं त्यांनी मानलं असेल असंही मला वाटत नाही. कारण आपल्या कामात रमून गेल्यानंतरच माणसाला खरीखुरी विश्रांती मिळते. नुसतं आंथरूणावर पडून राहिल्यानं विश्रांती मिळते असं समजणं व्यर्थ आहे. तसंच म्हातारपण हे निव्वळ आरामखुर्चीत पडून राह्यचं वय आहे अशी जर आपली समजूत असेल तर ती साफ चुकीची आहे. आपण मजबरोबर जसं स्पष्ट बोललात तसं मीही तुमच्याशी उघडउघड बोलत आहे, याबद्दल आपणांलाही आनंदच वाटेल अशी मला आशा वाटते.

आता आपला दुसरा मुद्दा असा की इकडे हिंदुस्थानात या चित्रांचा संग्रह करता करता मला स्वर्गवास घडला तर काय होईल ? पण त्याची चिंता आपण करू नका. या देशातल्या लेण्यांतली चित्रं स्वतः पाहण्याचा व त्यांतली मला जी आवडतील त्यांचा संग्रह करायचा माझा मानस आहे. परंतु तुम्ही म्हणता त्याप्रमाणं हे काम पूर्ण होण्यापूर्वीच मी गतप्राण झालो तरी हरकत नाही. कारण थोडीफार चित्रं जमा झाली, की लगेच मी त्यांना बर्लिन युनि-व्हर्सिटीत पाठवून देतो. तिथं त्यांचा संग्रह करण्यात येत आहे. या सर्व चित्रांचं अध्ययन करून त्यावर एक प्रबंध लिहायचा माझा विचार आहे. पण समजा मी

जगलो नाही तर दुसरा कुणीतरी चित्रकार या चित्रांचं अध्ययन करून प्रबंध लिहायचं काम पूर्ण करील अशी मला खात्री वाटते. ”

हे बोलत असताना त्या जर्मन चित्रकाराच्या निश्चयी आणि करारी चेहऱ्याकडे पाहून मला वाटलं की खरोखर वृद्ध तो की आम्ही !

आमच्यापैकी ज्या प्राध्यापकानं त्या चित्रकाराला असा खवचट प्रश्न विचारला होता, त्याला त्या चित्रकाराचं सडेतोड बोलणं बरंच झोंबलं. म्हणून त्या चित्रकाराचा आम्ही तावडतोब निरोप घेतला. आणि नंतर चालत चालत आम्ही आमच्या मोटारीत येऊन बसलो. थोड्याच वेळात मोटार धारानगरीच्या दिशेनं धावू लागली.

त्या जर्मन चित्रकाराच्या बोलण्याचा माझ्या मनावर तर फारच परिणाम झाला. माझ्या मनात आलं की खरोखर आम्ही आमच्या पूर्वजांच्या मोठेपणात भर घालीत आहोत की त्यांना कमीपणा आणीत आहोत ? मोटार भरधाव वेगानं पुढंपुढं जात होती आणि माझं मनही तितक्याच वेगानं विचारात गुंग झालं होतं. त्यामुळं अशाच तऱ्हेचे पूर्वी घडलेले प्रसंग मला पुन्हा पुन्हा आठवू लागले.

पुण्यातल्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना डेक्कन जिमखान्यावरील केसकरांच्या वैकुंठ बंगल्यात मी राहत असे. त्या बंगल्याशेजारीच राहणाऱ्या एका सेवानिवृत्त गृहस्थांनी उतार वयात संस्कृत शिकायला सुरुवात केली होती. तेव्हा त्यांची माझी ओळख असल्यानं एके दिवशी मी त्यांना विचारलं,

“ या वयात संस्कृत शिकून आपण काय करणार ? ”

तेव्हा ते गृहस्थ शांतचित्तानं म्हणाले,

“ हे पाहा दाभाडे ! तुम्ही कुतूहलानं विचारता म्हणून मन मोकळं करून सांगतो. कवी कुलगुरू कालिदासाचं शाकुंतल नाटक संस्कृतमधून मी स्वतः वाचावं आणि त्याचा रसास्वाद घ्यावा, अशी माझी तारुण्यातही फार इच्छा होती. परंतु कॉलेजमधे मला हा विषय घेता आला नाही. पुढे आयुष्यभर नोकरी करता-करता कधी वेळ मिळाला नाही. म्हणून आता उसंत मिळताच मी संस्कृत शिकायला सुरुवात केली आहे. तुमचा विचारायचा हेतू मी जाणतो. परंतु काही दुष्ट लोक मात्र कुचेष्टेनं मला म्हणतात, की माझी लाकडं स्मशानात गेली आहेत अन् मी आता संस्कृत काय शिकणार ? तेव्हा त्यांना मी काही उत्तर देत नाही; कारण त्यांना उत्तर देण्यात काही अर्थ नाही. आपल्या या देशात स्वतः काहीही चांगला उद्योग न करणारे पण इतरांनी काही करायचा प्रयत्न केला तर त्यांना नावं ठेवणारेच जास्त आहेत. शिवाय हेही काही खोटं नाही की मारणाराचा हात

धरता येतो पण बोलणाराचं तोंड धरता येत नाही; परंतु माझा संस्कृत शिकयचा निश्चय अगदी ठाम आहे. मला शाकुंतल नाटकाचा रसास्वाद मूळ ग्रंथावरून घेता आला की माझं समाधान होईल. आणि तेवढं संस्कृत मला येईलच असा माझा दृढ विश्वास आहे. म्हणून कुणी काही म्हटलं तरी मी खट्टू होत नाही. तुम्ही आपुलकीनं विचारलंत म्हणून मी एवढं बोललो ! ''

दोन तीन वर्षांच्या अवधीत ते सेवानिवृत्त गृहस्थ संस्कृत इतकं शिकले की त्यांना शाकुंतल नाटक स्वतः वाचता येऊ लागलं. एके दिवशी शाकुंतल नाटकातल्या चवथ्या अंकातला चवथा श्लोक किती मार्मिक आणि अंतःकरणाला ओढ लावणारा आहे, हे त्यांनीच मला मुद्दाम बोलावून सांगितलं.

त्या पुण्याच्या वृद्ध गृहस्थांनी संस्कृत शिकायची जबरदस्त इच्छा कशी पूर्ण करून घेतली हे आठवत असतानाच उज्जयिनी येथील माधव क्लबमध्ये दररोज नियमानं येणाऱ्या एका टेनिसपटूची मला आठवण झाली. या गृहस्थांचं वय पासष्ट वर्षांहून अधिक आहे. ते सध्या टेनिसचा खेळ खेळत नाहीत. परंतु दररोज क्लबमध्ये येतात ते मात्र टेनिसचा पोषाख करूनच.

त्यांना तारुण्यात टेनिस खेळायचा खूप षोक होता. टेनिसच्या चढाओढीत भाग घेऊन त्यांनी पुष्कळ पारितोषिकं मिळविली होती. त्या बक्षिसांनी आणि बिल्ल्यांनी त्यांच्या दिवाणखान्यातली दोन तीन कपाटं भरली होती. तेव्हा साहजिकच ते माधव क्लबमध्ये आले रे आले की सर्वजण उभं राहून 'साहेब नमस्कार!' असं म्हणतात. हे पाहून ते आपला उजवा हात वर करून सर्वांच्या अभिवादनाचा हसत हसत स्वीकार करतात. टेनिसचा खेळ साहेब दोन दोन तास मोठ्या तन्मयतेनं पाहतात. कधी हर्षभरानं टाळी वाजवतात तर कधी 'अरे अरे अरे, चक् चक् चक्' असं म्हणून आपली नापसंती व्यक्त करतात.

एकदा त्यांना एकानं विचारलं,

" साहेब ! आपण दररोज टेनिसचाच पोषाख करून का येता ? कारण सध्या तर आपण टेनिस खेळत नाही. "

• तेव्हा साहेबांनी ताबडतोब उत्तर दिलं,

" कोण म्हणतो मी टेनिस खेळत नाही म्हणून ? नाहीतर हा टेनिसचा शू घालून मी कशाला आलो असतो इथं ? "

हे त्यांचं बोलणं ऐकून तो प्रश्न विचारणारा जरा बुचकळ्यात पडला. कारण सध्या साहेब खरोखरच टेनिस खेळत नव्हते. मग 'कोण म्हणतो मी टेनिस खेळत नाही म्हणून ? नाहीतर हा टेनिसचा शू घालून मी कशाला आलो असतो इथं ?' असं साहेब का म्हणाले याचा त्याला उलगडा होईना. म्हणून 'आ' वासून तो साहेबांच्या तोंडाकडे आश्चर्यानं बघतच राहिला.

४९४६२ १७५५ निबंध ५ २३/८/६८

तेव्हा त्याचं कुतूहल लक्षात घेऊन साहेब त्याला म्हणाले,

"अरे, मी सध्या शरीरानं खेळत नाही हे खरं आहे. पण मी मनानं टेनिस खेळतो हे काही खोटं नाही. कारण इथं क्लबमध्ये आल्यावर तुम्हा खेळाडूंचा खेळ पाहतापाहता माझ्या पूर्वस्मृती जागृत होतात. त्यामुळं मला प्रत्यक्ष टेनिस खेळण्याइतकाच आनंद होतो. म्हणून मी अजूनही टेनिस खेळतो हे माझं म्हणणं बरोबर नाही का ?"

अशा तऱ्हेनं विचार करता करता माझ्या मनात आलं की त्या जर्मन चित्रकाराची उतारवयातही तरुणांना लाजवणारी तपश्चर्या, त्या पुण्याच्या पेन्शनराची संस्कृत शिकायची जिद्द आणि त्या उज्जयिनीच्या माधव क्लबमध्ये वृद्धावस्थेतही टेनिसचा पोषाख करून 'मनानं मी टेनिस खेळतोय' असं ठासून सांगणाऱ्या साहेबांची वृत्ती पाहून त्यांनी आपल्या जीवनाचं सार्थक केलं यात बिलकुल शंका नाही. म्हणून मला असं वाटतं की लहानपणापासून एखाद्या चांगल्या गोष्टीचा छंद ज्याला लागला त्याच्यासारखा भाग्यवान तोच. त्याच्या वाटचाला आलेलं सुख हे सर्वस्वी त्याचंच. हे सुख मिळविण्यासाठी त्यानं केलेली बहाद्दुरी, वेळप्रसंगी घेतलेली दक्षता अन् रात्रंदिवस अडचणींना चारी मुंड्या चीत करण्यासाठी केलेली झुंज ही सर्वस्वी त्याचीच ! अडचणींवर मात करून पुढे जाता जाता विजयश्रीनं त्याच्या गळ्यात जेव्हा माळ घातली तेव्हा त्याच्या अंतःकरणाला ज्या गुदगुल्या झाल्या त्याची सर दुसऱ्या कशाला तरी येण्यासारखी आहे का ? 'मला अमुक अमुक हवं आहे आणि ते मी मिळवणारच' अशा निश्चयानं उद्योगाला लागल्यावर, संकटांची तमा न बाळगता जेव्हा आपण आगेकूच करतो तेव्हा आपलं अंतःकरण अभिमानानं भरून येतं. मग विजयश्री जेव्हा अगदी ताज्याताज्या, टपोऱ्या अन् सुगंधित गुलाबमोगऱ्याच्या फुलांची माळ आपल्या गळ्यात घालते तेव्हा टाळ्यांचा जो कडकडाट होतो आणि जीवनाचं साफल्य झाल्याचा जो साक्षात्कार अगदी थोडा वेळ का होईना पण आपल्या अनुभवाला येतो, त्याची महती किती सांगावी. कारण विजयश्री म्हणजे विजयश्री ! तिची सर दुसऱ्या कशालाच नाही. अशासाठीच खरोखर माणसानं जगावं. अशा तऱ्हेनं जगणारालाच माणसाचं जीवन जगता येतं; हे काय सांगायला हवं !

याच्या उलट आयुष्यात ज्याला कोणत्याही चांगल्या गोष्टीचा छंद लागलेला नाही, त्याच्यासारखा कमनशिबी तोच. त्याला त्याग का करावा हे समजत नाही आणि त्याग करण्यात किती आनंद आहे, हे तर त्याला कधीही अनुभविता येत नाही. त्याचं मन कशासाठीही हळहळत नाही. त्याला कुठल्याही गोष्टीसाठी जिद्द करावीशी वाटत नाही. त्यामुळं त्याच्या अंतःकरणाला कधी पीळ पडत नाही. त्याला

अपयशाचीही खंत वाटत नाही. अशा माणसाबद्दल कुणालाही सहसा आपुलकी वाटत नाही. अहो ! एवढंच काय पण त्याचं मनही त्याला कधी दुवा देत नाही. असा मनुष्य म्हणजे निव्वळ भूमीला भार !

म्हणूनच मला असं पुन्हा पुन्हा वाटतं की एखाद्या चांगल्या गोष्टीचा छंद आपल्याला लहानपणापासूनच लागला पाहिजे. यासाठी आईवडील, बहीणभाऊ, शिक्षक किंवा ज्यांच्या ज्यांच्या सहवासात आपण येतो, त्यांनी त्यांनी आपल्याला प्रोत्साहन दिलं पाहिजे. असा उत्साह देणारे ज्यांना लाभले ते धन्य होत. त्यांचं विद्यार्थिदशेचं तारू तुफानी वाऱ्याची पर्वा न करता नियोजित मुक्कामावर जाऊन पोचेल यात तिळमात्र शंका नाही.

परंतु बहुसंख्य विद्यार्थ्यांची स्थिती अशी नसते. त्यातच आणखी म्हणजे आपल्या देशात शिक्षण घेणाऱ्यापेक्षा शिक्षण घेऊ न शकणाऱ्या मुलांमुलींचीच संख्या अधिक आहे. जे शिक्षण घेत आहेत त्यांना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळतंच असं नाही. त्यामुळं त्यांची उत्साही वृत्ती आणि शैक्षणिक प्रगती आपोआपच खुरटून जाते. पुष्कळांना खायला प्यायलाच न मिळाल्यामुळं त्यांना उपाशीपोटी राहावं लागतं. त्यामुळं 'अन्नासाठी दाही दिशा आम्हा फिरविशी जगदीशा' अशी त्यांची अवस्था होते. पुष्कळ विद्यार्थ्यांच्या घरी त्यांच्याकडे लक्ष द्यायला पालकांना बिलकुल वेळ मिळत नाही. नोकरी निमित्तानं ते आपल्या कामात इतके गुरफटलेले असतात की मुलांची जुजबी विचारपूस करण्यापलीकडे त्यांना काहीच करता येत नाही.

एवढं मात्र खरं की परीक्षेत आपल्याला प्रथमच श्रेणी मिळावी असं जवळ जवळ सर्वच विद्यार्थ्यांना वाटतं. परंतु परीक्षेचा निकाल जाहीर होताच दिसून येतं की, प्रथम श्रेणी प्राप्त झालेले विद्यार्थी फारच थोडे, दुसऱ्या श्रेणीत पास झालेले बरेच, पण तिसऱ्या श्रेणीत उत्तीर्ण झालेले मात्र खूप असतात. आणि नापास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या तर काही विचारूच नका !

असा निकाल लागल्यामुळं तृतीय श्रेणीत पास झालेल्या व नापास झालेल्या विद्यार्थ्यांना मोठी हळहळ वाटते. पण वेळ व संधी हातची निघून गेलेली असते. आता फक्त पस्तावा करण्यापलीकडे त्यांना काही करता येत नाही. याचा परिणाम मात्र असा होतो की एम. बी. बी. एस्. होऊन स्वतंत्र दवाखाना काढायची ज्यांची इच्छा होती त्यांना कंपाऊंडर म्हणून काम करावं लागतं. कायद्याचा अभ्यास करून वकील किंवा न्यायाधीश होण्याची हाव बाळगणाऱ्याला कोर्टात कारकून म्हणून खर्डेघाशी करावी लागते. इंजिनीअर होऊ इच्छिणाऱ्याला ओव्हरसिअरही होता येत नाही. मेजर किंवा कर्नल होऊन सैन्यात मर्दुमकी

गाजवू इच्छिणाऱ्याला शेवटी साधा पोलिस म्हणून राहावं लागतं. जिल्ह्याचा कलेक्टर होण्याचं स्वप्न पाहणाऱ्याला कचेरीत पट्टेवाल्याचं काम पत्करावं लागतं. तेव्हा सांगायचा मुद्दा असा की, शिक्षण घेण्याच्या बाबतीत एकदा मिळालेली संधी हुकली रे हुकली की जीवनात केवढा दुर्धर प्रसंग ओढवतो तो पाहा ! अशी हजारो उदाहरणं दाखविता येतील.

शिक्षण न घेताही ज्यांनी मोठा नावलौकिक मिळवला अशीही थोडीफार माणसं आढळतात. पण ती अपवाद म्हणून समजावीत. कारण खाणीतला हिरा कितीही मौल्यवान असला तरी त्याचं तेज फाकायला त्याला कोंदणातच बसवायला पाहिजे. तसंच माणसाचंही आहे. आपल्या अंगातल्या उपजत गुणांची संपूर्ण वाढ व्हायला शिक्षण हाच एक मार्ग आहे. कारण शिक्षणानं आपल्या अंतःकरणातल्या सुप्त भावना जागृत होऊन आपल्याला कर्तबगारी करून दाखविता येते. आपल्या आईवडिलांची, शेजाऱ्यापाजाऱ्यांची, समाजाची, मायभूमीची आणि एकूण मानवजातीची उन्नती करण्यात आपणही इवलासा हातभार लावला आहे, असं समाधान आपल्याला मिळावं अशी इच्छा असल्यास आणि अशी आकांक्षा तर असायलाच हवी, तर आपण शिक्षण घ्यायलाच पाहिजे. त्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही. ज्या शिक्षणानं आपल्या अंगी उद्योगाचं, स्वाभिमानाचं, शालीनतेचं आणि माणुसकीचं बीज पेरलं जाईल ते शिक्षण उत्तम, असं म्हणायला काही हरकत नाही.

तेव्हा अशा तऱ्हेचं शिक्षण घ्यायचं म्हणजे काय करायचं असा प्रश्न ओघानंच उपस्थित होण्यासारखा आहे. आणि या प्रश्नाचं उत्तर देणं काही सोपं नाही. तरी पण आदर्श अशी अभ्यासूवृत्ती अंगी बाणण्यासाठी विद्यार्थ्यांनी काय काय करायला हवं आणि काय काय करायला नको हे मात्र सांगता येण्यासारखं आहे. म्हणूनच 'अभ्यास कसा करावा ?' या विषयावर मी आपल्यासमोर बोलायचं ठरवलं आहे. माझं बोलणं आपल्याला आवडलं तर अर्थातच मला आनंद होईल.

अशा तऱ्हेच्या असंख्य विचारांत मी इतका गर्क झालो होतो की बागहून निघालेली आमची मोटर धार बस-स्टँडवर केव्हा येऊन पोचली हे माझ्या लक्षातही आलं नाही.

# २

## " निश्चयाचे ऐसे बळ ।
## तुका म्हणे तेची फळ ॥ "

जर्मन चित्रकाराचा कृतसंकल्प, पुण्यातल्या त्या वृद्ध गृहस्थाचा संस्कृत शिकायचा निश्चय आणि उज्जयिनीच्या माधव क्लबमध्ये दररोज अगदी नियमानं टेनिसचा पोषाख करून जाणाऱ्या साहेबांची गोष्ट मी आपल्याला सांगितली. आपण या तिघांच्या आयुष्याकडे जरा बारकाईनं पाहिलं, तर आपल्या लक्षात येईल की एकाला चित्रकलेचा, तर दुसऱ्याला संस्कृतचा आणि तिसऱ्याला टेनिसचा मोठा षौक आहे. यालाच हवं तर आपण छंद असं म्हणू या. असा एखाद्या चांगल्या गोष्टीचा छंद आपल्याला लागला पाहिजे. संगीतकला, नृत्यकला, चित्रकला, शिल्पकला, लेखनकला, वक्तृत्वकला, यंत्रकला, युद्धकला अशा असंख्य कला आहेत. आणि या निरनिराळ्या कलांच्या उपकलाही आहेत. यांपैकीं कोणत्या कलेची आपल्याला आवड आहे, याचा विचार आपण स्वतःही केला पाहिजे. या विषयी मोठ्यांनी लहानांना जाणीव करून द्यायला पाहिजे. सुधारलेल्या देशांत बालकांचा कल कशाकडे आहे हे तज्ज्ञ ठरवितात आणि त्याप्रमाणं बालकांना प्रोत्साहन देतात. या बाबतीत पाश्चिमात्य देशांत किती दक्षता घेतली जाते, हे पाहिलं की आपल्याला अजून पुष्कळच वाटचाल करायची आहे, याची प्रकर्षानं जाणीव होऊ लागते.

एक गोष्ट मात्र खरी की आपल्याला थोडं थोडं समजू लागल्यावर आपल्या मनाचा कल कोणत्या कामाकडे विशेष आहे हे आपणच ठरवावं; कारण आपलं मन या बाबतीत आपल्याला मार्गदर्शन करू शकतं. मग आपण आपल्या कामाविषयी निश्चय करून उद्योगाला लागलं पाहिजे. अशा तऱ्हेनं अगदी अंतःकरणापासून आपण काम करू लागलो की, आपल्याला आपल्या कामात गोडी वाटू लागते. म्हणूनच तर म्हणतात की 'ऐकावं जनाचं आणि करावं मनाचं.' कारण ज्या गोष्टीची आपल्याला गोडी वाटते त्याविषयी आपल्या मनात आस्था, आदर आणि आपुलकी आपोआपच निर्माण होते.

अशी एक आदर्श व्यक्ती आज मोठ्या उच्च पदावर आहे. या व्यक्तीचं विद्यार्थिजीवन किती खडतर होतं या विषयी जितकं बोलावं तितकं थोडंच! मी फक्त एवढंच म्हणतो की, ज्याला ज्याला विद्यार्थिदशेचं सार्थक करावसं वाटतं, त्यानं त्यानं त्या व्यक्तीचं आयुष्य कित्त्याप्रमाणं पुढं ठेवून वर्तन करावं. म्हणजे त्यांचं जीवनही सत्कारणी लागेल. आता या ठिकाणी त्या व्यक्तीच्या विद्यार्थिदशेतले काही प्रसंग त्यांच्याच शब्दांत आपल्यासमोर मांडतो.

" माझ्या लहानपणी मला असं फार वाटे की आपण एक दुर्दैवी विद्यार्थी आहोत. कारण असं नसतं तर माझे आईबाप लहानपणीच का निवर्तले असते? मला तर असंच वाटतं की ज्यांचे ज्यांचे आईबाप उतार वयातही हयात आहेत ते ते मोठे भाग्यवान होत. आईबापाचं कृपाछत्र नाहीसं झाल्यामुळं आणि जवळपासचे कुणी नातेवाईक नसल्यामुळं मला जीवन अगदी नकोसं वाटू लागलं. ही माझी असहाय अवस्था पाहून चौधरी नावाच्या शिक्षकांनी मला मोठा आधार दिला. एके दिवशी आपल्या घरी नेऊन चौधरी मास्तरांनी मला प्रेमानं पोटभर जेवू घातलं आणि म्हणाले,

" प्रताप! हे बघ, तू शिक्षण सोडू नकोस. तू विद्या मिळवशील तर मोठेपणी नाव काढशील. म्हणून मी म्हणतो की तू अध्ययन सोडू नकोस. आता तुझी खायची-प्यायची, कपडचालत्त्यांची आणि राहायची काहीच सोय नाही हे खरं आहे. परंतु हेही दिवस निघून जातील हे तू लक्षात ठेव. अन् तू असं कर की उद्यापासून तू इथं माझ्या घरीच रहायला ये. जोपर्यंत तुझी आणखी काही चांगली सोय होत नाही, तोपर्यंत तू इथंच राहा. काय, आलं का तुझ्या लक्षात! "

अशा तऱ्हेनं चौधरी मास्तरांनी मायेची फुंकर घालताच माझं मन थोडसं टवटवीत झालं. मला पुष्कळच धीर आला. कुणाचा नि कुणाचा आपल्याला आधार आहे असं वाटू लागलं. म्हणून मग मी चौधरी मास्तरांच्या घरी राहू लागलो.

मी मराठी चौथीत असताना प्राथमिक शाळेतल्या बारा वर्षांच्या आतील विद्यार्थ्यांसाठी गणपती उत्सवात भाषणाची चढाओढ ठेवण्यात आली होती. प्रत्येक प्राथमिक शाळेतून दोन दोन विद्यार्थी पाठविण्यात आले होते. आणि अशा तऱ्हेनं सहा शाळांनी भाग घेतल्यामुळं एकूण बारा विद्यार्थी बोलणार होते. भाषणाचा विषय होता ' शक्ती श्रेष्ठ की युक्ती श्रेष्ठ! ' प्रत्येक विद्यार्थ्याला पाच मिनिटांचा वेळ देण्यात आला होता. चार मुलांची भाषणं झाल्यावर माझा नंबर आला.

आता मी माझ्याचबद्दल बोलतोय, म्हणून तुम्ही म्हणाल की मी अतिशयोक्ती करतो. पण तसं बिलकुल नाही. त्या दिवशी बक्षीस आपणच मिळवणार याविषयी माझा दृढनिश्चय होता. काय बोलायचं याविषयी मी अगोदरच विचार केला होता. त्यामुळं मी बोलायला उठलो तेव्हापासून तर माझं बोलणं संपेपर्यंत सर्व श्रोते जणू काही मंत्रमुग्ध झाले होते. कारण शक्तीची तरफदारी करताना मी जी युक्ती योजिली होती, ती सर्वांना फार आवडली. त्यामुळं सर्व श्रोते मजवर खूष झाले. माझं भाषण संपलं तेव्हा टाळ्यांचा मोठा कडकडाट झाला. त्यानंतर बोलणाऱ्या विद्यार्थ्यांची भाषणं फारच फिकी पडली. त्यामुळं पहिलं पारितोषिक मलाच मिळालं. माझ्या शाळेचा मोठा गौरव झाला. अध्यक्षांनी मला बक्षीस दिलं आणि माझी पाठ थोपटली. ते म्हणाले " असंच आणखी यश मिळव ! "

अध्यक्षांनी बक्षीस दिलेला चांदीचा बिल्ला घेऊन चौधरी मास्तरांच्या घरी जाता जाता माझ्या अंगावर मूठभर मास चढल्यासारखं मला वाटत होतं. त्या दिवशी मला जसा आनंद झाला तसा पूर्वी कधीही झाला नव्हता.

त्या गणपती उत्सवात झालेलं माझं भाषण माझ्या शाळेतल्या मुख्याध्यापकांना तर इतकं आवडलं की त्यांनी शाळेतल्या सर्व विद्यार्थ्यांसमोर त्याच विषयावर मला पुन्हा बोलायला लावलं. त्याही वेळी माझं भाषण मोठं परिणामकारक झालं. माझ्या विद्यार्थी बांधवांनी हर्षभरानं टाळ्या वाजवल्या आणि सर्व शिक्षकांनी मला शाबासकी दिली.

त्यानंतर श्री. चौधरी व श्री. कुलकर्णी या दोन शिक्षकांनी विचारविनिमय करून माझं शिक्षण सुरळीत चालावं म्हणून माझे निरनिराळ्या सात लोकांच्या घरी वार लावून दिले. म्हणजे दररोज मी नवीन अन्नदात्याकडे जेवायला जात असे. आणि आठवड्यानंतर मग पुन्हा त्याच क्रमानं त्यांच्या घरी जेवायला जायचा माझा क्रम चालू होई.

अशा तऱ्हेनं माझी जेवायची सोय झाली हे खरं, परंतु त्याबरोबरच काही अडचणीही उपस्थित झाल्या. सौ. सुहासिनीबाईंच्या घरी वार असला आणि मी त्यांच्याकडे जेवायला गेलो की त्या एखाद्या वेळी म्हणायच्या,

" अरे प्रताप ! आज एवढं दळून आण बरं ! आणि तिकडून येता येता त्या वखारवाल्याला म्हणावं एक कोळशाचं पोतं घरी पोचव. समजा तो पाठवायला तयार असला तर तू त्याला ताबडतोब बरोबरच घेऊन ये. बाकी आज तुला वेळेवर जेवण मिळणं मुष्कील. पण हे बघ प्रताप ! मी तरी काय करू ? घरात पीठ नाही अन् कोळसे तर परवापासूनच संपले. तुला माहीत आहे का ? हो, पण

तुला तरी कसं ठाऊक असणार म्हणा, की ती भांडीवाली गेल्या दोन दिवसांपासून आलीच नाही. आता या भांडीवाल्याबाईला हे कसं समजत नाही की… "

सौ. रंजनाबाईकडे गेलो की त्या कधीकधी म्हणत,

" अरे प्रताप ! हा कारटा किरण आज काही केल्या शाळेत जात नाही. याला जरा बालवाडीत पोचवून ये बरं ! "

कधीकधी त्या सौ. वसुंधराबाई म्हणत,

" आज आपल्या अजयला बरं नाही रे प्रताप ! कालपासून तो तापानं फणफणतोय ! ते टूरवर गेले आहेत. तेव्हा त्या यादव डॉक्टरांना तू बोलवून आणतोस का ? आज तुला शाळेत जायला उशीर होईल एवढं खरं ! पण आता तूच सांग की मी तरी काय करू ? "

कुणी पाहुणे सौ. शुभांगिनीबाईंच्या घरी आलेले असले आणि त्यांना परत जायचं असलं की मला पाहताच त्या म्हणत,

" प्रताप ! बरं झालं तू आलास म्हणून ! मी तुझी वाटच पहात होते रे ! या आपल्या अंजलीबाईंना साडेबाराच्या जनता गाडीनं मुंबईला परत जायचं आहे. त्यांना जरा स्टेशनवर पोचवून गाडीत बसवून दे बरं बेटा ! अन् लक्षात ठेव बरं का ! अंजलीबाई काही द्यायलाबियला लागल्या तर काही घेऊ नकोस. अरे ! त्या काही परक्या का आहेत ? "

अशा तऱ्हेनं अनेक घरची अनेक कामं मला मुकाट्यानं करावी लागत. ही सर्व कामं काहीही तक्रार न करता मी मोठ्या चपळाईनं व हसऱ्या चेहऱ्यानं करीत असे. कारण माझ्या मनात एकच विचार यायचा की, या परोपकारी बाया आपल्याला जेवू तर घालतात हेच त्यांचे आपल्यावर किती उपकार आहेत. आपल्याला जेवायला मिळालं नाही तर आपण कसे शिकणार ? म्हणून निरनिराळी कामं करण्याबद्दल मला काहीही वाटत नसे. उलट त्या सर्व प्रेमळ मातांना मी मनातल्या मनात धन्यवादच देत असे.

पण एवढं मात्र खरं की या कामामुळं मला शाळेत जायला बहुधा उशिर होत असे. पहिला पिरीयड असायचा इंग्रजीचा अन् तो शिकवायचे मराठे मास्तर. ते मोठे खाष्ट होते पण शिकवायचे मात्र फार छान ! त्यांना वर्गात कुणी उशिरा आलेलं बिलकुल खपत नसे. म्हणून मी वर्गात पाऊल टाकलं रे टाकलं की ते म्हणायचे,

" अरे प्रताप ! तुझं नाव प्रताप असं कुणी ठेवलं रे ? कुणीकडे ते शत्रूशी लढणारे शूरमर्द राणा प्रताप अन् कुणीकडे तू प्रताप ! अरे वर्गात वेळेवर यायचाही प्रताप तुला गाजवता येत नाही; तर तू आयुष्यात कसला प्रताप करणार ? म्हणजे

एकंदरीत ' नाव सोनुबाई अन् हाती कथलाचा वाळा ' अशी जी म्हण पडलेली आहे ती काही खोटी नाही. अरे ! तुला शिकता येत नाही तर शिकतोस तरी कशाला ? शिक्षण घ्यायची कुणी सक्ती का केली आहे तुझ्यावर ? शाळेत वेळेवर येता येत नाही तर शिकू नकोस. असं उशिरा आलं की मागच्या बाजूस जाऊन उभं राहावं हे माहीत आहे ना तुला ? आणि लागोपाठ तीन दिवस उशिरा आल्यास पाठीमागे जाऊन कान धरून उभं राहावं हेही माहीत आहे ना तुला ? आजचा कितवा दिवस आहे रे तुझा ?"

मी खाली मान घालून हळूच म्हणत असे, " तिसरा ! "

" मग जा पाठीमागे अन् उभं राहून कान धर. आणि हे बघ निदान आता तरी लक्षात ठेव की शिकवताना मला असा डिस्टर्बन्स झालेला बिलकुल खपत नाही ! "

मला या इंग्लिशच्या पिरीयडला बहुधा उशीरच होई. त्यामुळं त्या तासाला मला बहुधा उभंच राहावं लागे. आणि दर तिसऱ्या दिवशी सबंध तासभर कानही धरावे लागत. आणि या बाबतीत काय करावं हेही मला समजेना. मधूनमधून माझ्या दुर्दैवी स्थितीबद्दल पस्तावा येऊन मला फार दुःख होई. मग गावाबाहेरील मारुतीच्या मंदिरात किंवा नदीच्या काठावर एकटाच बसून मी अश्रू ढाळीत असे.

परंतु असं असूनही मला वार्षिक परीक्षेत इंग्रजी विषयातही प्रथम श्रेणीचे गुण मिळाले. हे पाहून मराठे मास्तरांना तर प्रथम अचंबाच वाटला. पण प्रत्यक्ष उत्तरपत्रिका पाहिल्यावर त्यांची खात्री झाली. मग त्यांना मजबद्दल आपुलकी वाटू लागली. याचा परिणाम असा झाला की पुढच्याही वर्षी आम्हाला तेच सर इंग्रजी शिकवायला असल्यानं, मला पहिल्या पिरीयडला उशीर झाला, तरी ते पाठीमागं उभं राहायला न सांगता बाकावर बसू देत असत.

असं करता करता माझं प्राथमिक व दुय्यम शाळेतलं शिक्षण चालू राहिलं आणि मी अकरावीत जाऊन पोचलो. दहावीच्या वार्षिक परीक्षेत इतर विषयांच्या मानानं मला गणितात बरेच कमी गुण मिळाले. तेव्हा मी चौधरी मास्तरांना सांगितलं की सर मला जर कुणाकडून गणिताचं गायडन्स मिळेल तर बरं होईल.

माझं म्हणणं ऐकून घेतल्यावर त्यांनी दुसऱ्या दिवशी मला पुन्हा भेटायला सांगितलं. त्याप्रमाणं दुसऱ्या दिवशी मी त्यांना पुन्हा आठवण दिली. तेव्हा चौधरी मास्तर मला नारळीकर नावाच्या गणिताच्या प्रोफेसरांच्या घरी घेऊन गेले. त्यांचा आणि प्रोफेसर नारळीकरांचा चांगला परिचय होता. त्यांनी नारळीकरांना सांगितलं,

" हे पहा साहेब ! याला इंजिनीअर व्हायची फार इच्छा आहे. म्हणजे याला एस. एस. सी. परीक्षेत सर्व विषयांत प्रथम श्रेणीचे गुण मिळाले पाहिजेत. त्या शिवाय इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये याला प्रवेश मिळणं शक्य नाही. याला दहावीच्या वार्षिक परीक्षेत गणितात इतके कमी मार्क्स मिळाले आहेत की अकरावीत याला फर्स्ट क्लास येईल असं वाटत नाही. बरं गणिताचा विषय कुणाकडे शिकायला जाईल तर शिकवणीचे पैसे देणार कुठून ? याची घरची परिस्थिती तर मी कालच आपल्याला सांगितली. "

चौधरी मास्तरांचं म्हणणं शांतचित्तानं ऐकून घेतल्यावर नारळीकर म्हणाले, " ठीक आहे आपलं म्हणणं. मी या उन्हाळ्याच्या सुटीत इथंच राहणार आहे. याला गणिताची जी काय अडचण असेल, ती विचारण्यासाठी मजकडे दुपारी तीन ते चार या वेळात यानं यावं. ही शिकवणी नाही. मला मोबदला मुळीच नको. परंतु मी सांगितलेला अभ्यास यानं केला नाही, अन् माझा वेळ फुकट गेला असं मला एकदा जरी दिसून आलं, तरी याचं येणं मी ताबडतोब बंद करीन. ही अट याला मान्य असल्यास यानं आजपासूनच मजकडे यायला हरकत नाही. "

प्राध्यापक नारळीकरांनी चौधरी मास्तरांच्या म्हणण्याला रुकार दिला हे पाहून मला अत्यानंद झाला. त्याप्रमाणं मी अगदी त्याच दिवसापासून नारळीकरांच्याकडे गणित शिकायला जाऊ लागलो. आणि आता तुम्हांला सांगायला मला आनंद वाटतो की नंतर झालेल्या एस. एस सी. परीक्षेत सर्व विषयांत मिळून मला प्रथम श्रेणीचे गुण मिळाले. त्यामुळं इंजीनीअरिंग कॉलेजमध्ये मला प्रवेश मिळाला. मला शेकडा पासष्ठहूनही अधिक मार्क्स मिळाल्यामुळं शिष्यवृत्तीही मिळाली. त्यामुळं इंजीनीअर होण्याचा माझा मार्ग मोकळा झाला. "

एस. एस. सी. परीक्षेत प्रतापला भरघोस यश मिळाल्यामुळं त्याला शिष्यवृत्ती मिळाली हे वर्तमानपत्रात वाचून मला आनंद झाला. चौधरी मास्तरांनी प्रतापविषयी पूर्वीच सर्व माहिती मला सांगितली होती. म्हणून मी त्याला एके दिवशी मुद्दाम जेवायला बोलावलं. जेवणाचा बेत साधाच होता. वरणभात, भाजीपोळी अन् शिकरण केलं होतं. एवढंच काय ते ! परंतु उज्ज्वल यश संपादणाऱ्या प्रतापच्या सान्निध्यामुळं अन्नाला अधिकच गोडी आली होती. तेव्हा जेवताना आम्ही इकडच्या तिकडच्या खूपच गोष्टी केल्या. त्या ओघात मी विचारलं,

" का रे प्रताप ! तुला तर पूर्वी गणिताची भीती वाटायची. दहावीच्या वार्षिक परीक्षेत तर तुला जेमतेम पासापुरते मार्क्स मिळालेत. अन् एस्. एस्. सी. परीक्षेत मात्र तुला गणितातही डिस्टिंक्शन मिळालं. मग हे कसं काय ! "

तेव्हा प्रताप म्हणाला, " सर ! मी खरं सांगू का ? हे नारळीकर सर इतकं चांगलं शिकवतात की मठ्ठ मुलालाही गणितासारखा विषय तेव्हाच समजावा. त्यांची समजावून सांगायची पद्धत फारच चांगली आहे. म्हणून मला गणितात गोडी वाटू लागली. आणि पुढं पुढं तर हा विषयही मला अगदी सोपा वाटू लागला. माझ्या यशाचं सारं श्रेय खरोखर प्रोफेसर नारळीकर यांनाच आहे ! "

हे प्रतापचं बोलणं ऐकून मला आनंद झाला. कारण अमुक एक प्राध्यापक चांगलं शिकवतात असं विद्यार्थ्यांनी मोठ्या आदरानं आणि आपुलकीनं म्हणावं याहून कोणतं समाधान खऱ्या शिक्षकाला पाहिजे असतं ! तसा प्राध्यापक नारळीकरांचा आणि माझा परिचय होता. म्हणून दुसऱ्या दिवशी मी त्यांच्या घरी गेलो. ते नुकतेच कॉलेजमधून आले होते. मला पाहून म्हणाले,

" या या ! आपण आता बरोबरच चहा घेऊ ! "

तेव्हा चहा घेता घेता मी म्हटलं, " अहो ! त्या तुमच्या प्रतापनं तर चांगलाच प्रताप गाजवला. त्याला एकूण चार विषयांत डिस्टिंक्शन मिळालं. आणि विशेष म्हणजे ज्या गणित विषयाचा त्याला बाऊ वाटत होता, त्यातही त्याला विशेष योग्यता प्राप्त झाली. तो म्हणत होता की गणित विषय शिकवावा तर तो प्राध्यापक नारळीकरांनीच. त्याला मिळालेल्या यशाचं सर्व श्रेय आपल्यालाच आहे असं तो पुन्हापुन्हा सांगत होता. "

माझं बोलणं ऐकून प्रोफेसर नारळीकर म्हणाले, " अहो ! त्याला मिळालेल्या यशाचं श्रेय हे त्याचंच आहे. मी जरी चांगलं शिकवीत असलो तरी तो प्रताप फार मेहनत करीत होता, ही गोष्ट तितकीच खरी आहे. मी अगदी पहिल्याच दिवशी सांगितलं होतं की दररोज निदान पाच तरी उदाहरणं सोडवून आणीत जा. आणि उत्तर बरोबर असलं तर फेअर वहीत लिहू काढीत जा. तेव्हा त्यानं हा नियम इतक्या कसोशीनं पाळला की पाचंच उदाहरणं काय पण पुढंपुढं दहादहा उदाहरणही तो सोडवून आणू लागला. मग अशा विद्यार्थ्याला शिकवायला कुणाला उत्साह वाटणार नाही ? रोजच्या रोज अगदी ठरलेला अभ्यास करायचाच, या त्याच्या दृढनिश्चयामुळं माझ्या मनात त्याच्याबद्दल आपुलकी आपोआपच निर्माण झाली. ' हा मोठा होतकरू मुलगा आहे, हा पुढं नाव काढील ' असा विचार माझ्या मनात त्याला पाहताच येऊ लागला. म्हणून मी त्याला पुन्हापुन्हा प्रोत्साहन दिलं. त्यामुळं त्याला शिकवताना माझा वेळ सत्कारणी लागत आहे असंच मला वाटू लागलं. नाहीतरी ' आपणासी जे जे ठावे । ते ते दुसऱ्याशी शिकवावे । शहाणे करून सोडावे । सकल जन ।।' असं

रामदासांनी सांगूनच ठेवलं आहे. म्हणून त्याला शिकवताना मला आनंद वाटायचा. म्हणजे त्याच्या यशाचं सर्व श्रेय त्याचंच आहे असं म्हणायला काही हरकत नाही. मी नुसता निमित्तमात्र झालो !"

प्राध्यापक नारळीकरांच्या घरून येता येता माझ्या मनात विचार आला की हे प्रोफेसर नारळीकर म्हणतात की प्रतापच्या यशाचं श्रेय हे सर्वस्वी त्याचंच आहे आणि प्रताप म्हणतो की माझ्या यशाचं खरं श्रेय प्रोफेसर नारळीकरांनाच आहे. तेव्हा या दोघांच्याही बोलण्यात विनय आणि सत्यांश आहे यात काही शंका नाही.

आता तुमच्यापैंकी कुणी म्हणेल की गरिबीतही प्रतापनं यश मिळवून दाखवलं म्हणून मला गरिबीची तारीफ करायची आहे की काय ! तर छे छे ! तसं बिलकुल नाही. उलट माझं असं ठाम मत आहे की या जगात सगळ्यात भयंकर कोणता रोग असेल तर तो गरिबी हा होय. कारण गरिबीमुळं मनुष्य लाचार बनतो. त्याची मोठी हीनदीन अवस्था होते. त्याची बुद्धीही काम करू शकत नाही. त्याची महत्त्वाकांक्षा धुळीला मिळते. थोडक्यात म्हणजे गरिबीमुळं मनुष्य माणसाचं जीवन जगूच शकत नाही, असं माझं ठाम मत आहे. खडतर तपश्चर्या करून गरिबीतही ज्यांनी आपलं डोकं वर काढलं त्यांचं मी अंतःकरणापासून अभिनंदन करतो. परंतु गरिबीमुळं शंभरापैकी नव्याण्णव विद्यार्थ्यांचं जीवन मातीमोल होतं, ही गोष्ट अगदी खरी आहे. यास्तव आपण सर्वांनी मिळून जगातली गरिबी समूळ नष्ट केली पाहिजे. जगातल्या सर्व विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थीनींना प्राथमिक शाळेपासून तो विश्वविद्यालयीन शिक्षणापर्यन्त सर्व तऱ्हेचं शिक्षण सर्व सुखसोयींनी युक्त व सर्वस्वी मोफत ज्या दिवशी मिळेल तो दिवस जगाच्या इतिहासात खरोखर सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा लागेल. असो.

तेव्हा मला आपल्याला असं सांगायचं आहे की आपल्याला काय मिळवायचं आहे, याबद्दलचा आपला निश्चय अगदी पक्का असला पाहिजे. म्हणजे मग कोण काय म्हणतो यापेक्षा आपलं मन काय म्हणतं, इकडे आपण अधिक लक्ष देऊ. कारण पुष्कळदा असं होतं की लोक घोड्यावरही बसू देत नाहीत आणि पायीही चालू देत नाहीत. म्हणून आपण आपल्या दृढ संकल्पाला घट्ट कवटाळलं पाहिजे.

ज्या ज्या पुरुषांनी आणि स्त्रियांनी आयुष्यात यश मिळवलं, ते ते पुरुष आणि त्या त्या स्त्रिया आपल्या निश्चयाशी एकनिष्ठ होत्या असंच आपल्याला दिसून येईल. कारण लोक काय म्हणतात यापेक्षा आपलं अंतःकरण काय म्हणतं

इकडे त्यांनी अधिक लक्ष दिलं होतं. त्यामुळं त्यांचा दृढसंकल्प त्यांना सतत मार्गदर्शन करीत होता. सकाळी उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत त्यांचं मन त्यांना सल्ला देत होतं. आणि ते आपल्या मनाचंच ऐकत होते. म्हणून प्रात:काळी केव्हा उठावं आणि केव्हा उठू नये, काय खावं आणि काय खाऊ नये, कुणाची संगत धरावी आणि कुणाची धरू नये, कोणतं पुस्तक वाचावं आणि कोणतं वाचू नये, कोणता बोलपट पहावा आणि कोणता पाहू नये, रात्री केव्हा झोपावं आणि केव्हा झोपू नये, इत्यादी अनेक गोष्टींविषयी त्यांचे नियम जणू काही ठरलेले होते. हे नियम कदाचित त्यांनी वेळापत्रकाप्रमाणं टांगून ठेवले नसतील पण ते त्यांनी त्यांच्या हृत्पटलावर कोरून ठेवले होते आणि ते त्यांचं अगदी काटेकोरपणानं पालन करीत होते, असंच आपल्याला दिसून येईल.

आपलं ध्येय निश्चित न करता आणि त्यासाठी काहीही प्रयत्न न करता एखाद्याला आपोआप यश मिळालं असं एकही उदाहरण दाखवता येणार नाही. केवळ योगायोगानं प्रथम श्रेणीचे गुण मिळाले असा एकही हरीचा लाल असू शकणार नाही. निव्वळ नशिबाच्या जोरावर मोठेपणा मिळत नाही आणि मिळालेला टिकवून धरता येत नाही. म्हणून आपली निष्ठा अढळ असली पाहिजे. त्यापुढं कोणतंही सुख आपल्याला क:पदार्थ वाटलं पाहिजे. आपल्या ध्येयावर आपली जेवढी भक्ती असेल, तेवढा त्यासाठी आपण त्याग करू. आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी आपण काहीच उद्योग करीत नसू, तर आपलं ध्येय आपल्याला प्रिय नाही हे सूर्यप्रकाशाइतकं सत्य आहे. म्हणूनच त्याग आणि प्रेम या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असं म्हणतात.

संत तुकाराम महाराज म्हणतात की आपला निश्चय दृढ असल्यास आपणास मोठंच पाठबळ मिळतं. त्यांचा विठ्ठलावर केवढा अढळ विश्वास होता आणि परमेश्वराच्या प्राप्तीकरता व समाजाला सन्मार्ग दाखवण्याकरता त्यांनी रात्रंदिवस किती निदिध्यास धरला, केवढी तपश्चर्या केली आणि केवढा त्याग केला हे त्यांच्या अभंगांच्या अवलोकनावरून आपल्या लक्षात येईल. त्यांचे अंभग हे त्यांचे स्वानुभवाचे बोल आहेत. म्हणूनच तर ते म्हणतात :

" निश्चयाचे ऐसे बळ । तुका म्हणे तेची फळ ।।"

३

# "यत्न तो देव जाणावा"

आपल्याला जे पाहिजे ते साध्य करून घेण्यासाठी आपण प्रथम पक्का निश्चय केला पाहिजे हे आपण आताच पाहिलं. परंतु नुसता निश्चय केला आणि कष्ट मात्र केले नाहीत तर काहीही उपयोग होत नाही. आपल्या मनात मोठमोठ्या कल्पना आल्या पण प्रयत्नांची कास न धरल्यामुळं त्या सर्व कल्पना पाल्यापाचोळ्याप्रमाणं तेव्हाच हवेत उडून जातील. एकाला यश मिळालं आणि दुसऱ्याला अपयश आलं यातला फरक हाच की एकानं प्रयत्नांची पराकाष्ठा केली आणि दुसऱ्यानं काहीही मेहनत केली नाही.

एवढं मात्र खरं की कोणतंही काम करताना ते जेव्हा आपण अगदी मनापासून करतो तेव्हा त्या कामातल्या अडचणी आपल्याला दिसू लागतात. एक संशोधक बारा बारा तास काम करतो आणि तरीही त्याच्या कामाचा उत्साह सतत वाढतच असतो. उलट ज्याला आपल्या कामात गोडी वाटत नाही त्या माणसानं थोडसं जरी काम केलं तरी त्याला अगदी थकून गेल्यासारखं होतं. याचं कारण असं की त्यानं आपल्या आवडीचं काम अंगीकारलं नाही. यामुळं त्याला त्याच्या कामात गोडी वाटत नाही; आणि म्हणूनच तो ते काम अंतःकरणापासून करीत नाही.

ज्याचा सबंध दिवस आपल्या आवडीच्या उद्योगात गेला आहे त्याला रात्री चांगली झोप येते. त्याला अपचन होत नाही. सकाळी लौकर उठताना त्याला उत्साह वाटतो. 'आज आपण असंअसं काम केलं, उद्या अमुकअमुक काम करू या' असा विचार आपल्या मनात सतत घोळत असतो. ज्या विद्यार्थ्यानं आजचा अभ्यास आजच केला आहे त्याला 'आपण परीक्षेत पास होणार की नापास ?' असा विचार भेडसावीत नाही. यास्तव 'आज मला काय करता येईल ?' याचाच आपण अधिक विचार करायला हवा. अशा तऱ्हेनं 'काय' करायचं आणि 'कसं' करायचं हे पक्कं ठरवून आपण अंतःकरणापासून उद्योगाला लागावं. आपल्या कामाशी आपण इमान राखावं. कारण आपलं काम

आपण मनापासून करू लागलो की आपल्याला कामाचा बाऊ वाटत नाही. म्हणजे आपण हाती घेतलेलं काम अगदी चुटकीसरशी होतं असं नाही. परंतु त्या आजच्या कामातले बारकावे, तपशील आणि अडचणी इत्यादी सर्व गोष्टी आपल्याला स्पष्ट दिसू लागतात. त्यासाठी कुणाची नि केव्हा भेट घ्यावी म्हणजे आपल्याला आज जे समजलं नाही ते समजेल, हे आपलं आपणच ठरवू शकतो. यामुळं आज करायच्या कामातला भाग आज जरी पुरा झाला नाही, तरी दुसऱ्या दिवशी तो पूर्ण करून 'एक पाऊल पुढे' टाकायची आपल्याला उमेद वाटते. आपलं मन प्रसन्न राहून पुन्हा पुन्हा प्रयत्न करायला आपल्याला उत्साह वाटतो.

याच्याऐवजी एक दिवस जरी आपण आळसात घालवला तर काय होतं ते पाहा. आजचा अभ्यास आजच न केल्यामुळं दुसऱ्या दिवशी कालचा व आजचा मिळून अभ्यासाचा भाग वाढतो. आणि समजा काही कारणानं त्याही दिवशी आपण अभ्यास केला नाही, तर तो अधिकच वाढून तिसऱ्या दिवशी वर्गात शिक्षक जो धडा किंवा त्यातला काही भाग शिकवतात, त्याच्याशी आपण समरस होऊ शकत नाही. अशा तऱ्हेनं हीच तऱ्हा आणखी काही दिवस चालू राहिली म्हणजे मग 'हे काही आता आपल्याला येणार नाही' असा विचार आपल्या मनात आपल्याला न कळत घर करू लागतो. आणि असं पुन्हा पुन्हा झालं म्हणजे अभ्यास करण्यात किंवा शिकण्यात आपलं बिलकुल लक्ष लागत नाही.

मग साहजिकच वर्गात उशिरा जाणं, शेवटच्या बाकावर बसणं, शिकवणाऱ्या शिक्षकाच्या चुका काढणं, आणि जवळच्या विद्यार्थ्यांबरोबर टिवल्याबावल्या करणं अशा तऱ्हेनं आपण आपला वेळ घालवतो. म्हणजे 'नाचता येत नाही तर अंगण वाकडं' या म्हणीची आपण सार्थकता करून दाखवतो. कारण एखाद्या शिक्षकाची उभं रहायची तऱ्हा ठीक नसते, तर दुसरा शिक्षक बोलताना शब्द पाटीभर अन् अर्थ चिमूटभर असं बोलतो, तिसऱ्या एखाद्या शिक्षकानं गबाळा पोषाख केलेला असतो, चवथ्याला विषयाचं ज्ञानच नसतं पण तो कसातरी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करतो. असे एक ना दोन हजारो दोष आपल्याला दिसू लागतात. जसे प्रत्येक मनुष्यात काहीना काही दोष असतातच तसे ते शिक्षकातही असतात. कारण याला शिक्षक तरी कसे अपवाद असणार? परंतु पुष्कळ शिक्षकांत थोडेफार आदर्श असेही गुण असतात. पण ते मात्र नेमके आपल्याला दिसत नाहीत.

खरं म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने आहे या परिस्थितीतूनच मार्ग काढला पाहिजे. कारण आपण प्रत्येक शिक्षकाचे नुसते दोषच पाहत बसू तर आपल्या

वाटयाला शेवटी काहीच येणार नाही. उलट त्यांच्यापैकी काहींचे दोष आपल्याला चिकटल्याशिवाय राहणार नाहीत.

म्हणून आपण दुसऱ्यांचे दोष पाहू नयेत. उलट आजचं काम आजच करायचा संकल्प करावा. कारण आपण एका कामात आळस केला की स्नान, जेवण, अभ्यास आणि इतर सर्व दैनिक कामं विस्कळीत होतात. शिवाय आपल्या आळसामुळं घरातल्या इतर सर्वांची गैरसोय होते. एवढंच नव्हे, तर आपल्या बोलण्याचालण्यात, खाण्यापिण्यात आणि अभ्यासातही आपल्या हातून चुका होतात. अशा तऱ्हेनं आपली घसरगुंडी सुरू होते. जे करायला हवं ते न सुचणं, भूतकाळी घडलेला दुःखद प्रसंग पुन्हा पुन्हा आठवणं, एखाद्यानं केलेला अपमान आठवून आपला हिरमोड होणं, चेहऱ्यावर उदासीनतेची छाया पसरणं आणि आपला भविष्यकाळ अंधकारमय आहे असं वाटून त्याबद्दल आपण धास्ती खाणं या गोष्टी आपल्या हातून मग आपोआपच घडतात.

केवळ प्रयत्नांच्या जोरावर एका लहान मुलानं आपल्या घरातल्या अज्ञानाला कसं काढून टाकलं हे सांगितलं तर तुम्हाला अतिशयोक्ती वाटेल. परंतु ही गोष्ट अगदी सत्य आहे. ती हकीकत आता त्याच्याच तोंडून ऐका.

" माझे वडील वामनराव एका कापडाच्या गिरणीत नोकरीला होते. त्यांना महिना दीडशे ते पावणेदोनशे रुपये पगार मिळत होता. आईवडील आणि आम्ही पाच भावंडं मिळून आम्ही घरात सातजण होतो. एवढ्या कमी पगारातही कदाचित चटणीभाकर खाऊन आम्हाला जगता आलं असतं. परंतु वडिलांना दर रविवारी दारूची बाटली आणि मटणाचं किंवा मासळीचं चमचमीत जेवण पाहिजेच अशी सवय लागली होती. ही सवय वडिलांना त्यांच्या मित्रांच्या संगतीनं लागली असावी असं मला वाटतं. कारण पुष्कळदा वडील त्यांच्या मिलमधल्या दोनतीन मित्रांना रविवारी आमच्या घरी जेवायला बोलावीत; आणि कधीकधी तेही त्यांच्या घरी जेवायला जात. रविवारी रात्री वडील कुणाच्या घरी जेवायला गेले तर त्यांना रात्रीचे बाराएक सहज वाजत. कधीकधी वडील दारू इतके प्यायचे की त्यांना शुद्धही नसायची.

आणि तसं पाहिलं तर त्यांना एरव्ही तरी शुद्ध कुठे होती म्हणा! आम्हा सर्व भावंडांचे कपडे फाटलेले होते. आईच्या लुगड्याला ठिकठिकाणी ठिगळं लागली होती. आमच्या घरच्या पुढच्या आणि मागच्या बाजूला गरिबी अष्टौप्रहर धिंगाणा घालीत होती असंच का म्हणाना! आम्हाला मोठ्या मुष्कीलीनं दोन्ही वेळचं जेवण मिळतं होतं. कारण आई कुणाचं दळण दळून दे, तर कुणाच्या मिरच्या कुटून दे, नाहीतर कुणाची भाजणी भाजून दे अशी

आणखी कितीतरी किरकोळ कामं करीत असे. त्याबद्दल महिन्याकाठी तिला कसेबसे दहा पंधरा रुपये मिळत. अशा तऱ्हेनं घरसंसार चालवायला ती हातभार लावीत असे. सणावाराच्या दिवशी कुणाच्या घरून पंचपक्वान्नाचं ताट वाढून आलं तर आम्हा भावंडांना किती आनंद होत होता म्हणून सांगू !

पुढं पुढं वडिलांचं दारूचं व्यसन वाढतच गेलं. दर रविवारी दारूची बाटली व मटणाचं जेवण पाहिजेच असा त्यांचा जणू काही नियमच ठरून गेला. शिवाय मधेच कोणत्याही दिवशी त्यांना लहर लागली की दारूची बाटली व मटणाचं जेवण याविषयी ते आग्रह धरू लागले. त्यामुळं वडिलांचं व आईचं उठल्याबसल्य भांडण होऊ लागलं. कधीकधी तर वडील आमच्या समोर आईला मारायचे. त्यामुळं आईच्या डोळ्यातून अश्रू घळघळा ओघळू लागत. हे असं पुन्हा पुन्हा घडू लागल्यामुळं आम्हा सर्व भावंडांच्या अंतःकरणात भीतीचा धडका भरला. त्यामुळं काय करावं आणि काय नाही हे आम्हाला कळेनासं झालं.

त्या वेळी मी फारतर नऊदहा वर्षांचा असेन. माझ्यापेक्षा दोन बहिणी मोठ्या होत्या. त्या शिकत नव्हत्या आणि मीही शाळेत जात नव्हतो. लहानपण हे शाळेत जाण्यासाठी असतं असं आम्हाला मुळी वाटतंच नव्हतं. आणि जिथं खाण्यापिण्याची व कपड्यालत्त्यांचीच मारामार तिथं शिक्षणाकडे कोण धाव घेणार? तशातच आम्हाला शिकवण्याकडे वडिलांचं बिलकुल लक्ष नव्हतं. मुलं मोठी होतील आणि मोलमजुरी करून पोट भरतील, असं वडील नेहमी म्हणत असत.

माझ्या शेजारीच प्रमोद नावाचा माझा एक मित्र राहात असे. तो मोठ्या ऐटीत शाळेत जायचा. त्याचे कपडे पांढरेशुभ्र व इस्त्रीचे असत. कधीकधी त्याच्या वर्गातल्या मुलांच्याबरोबर तो सहलीला जात असे. तेव्हा प्रमोद स्टेनलेसस्टीलचा डबा बरोबर घेऊन जाई. त्या डब्यात पुऱ्या, बटाट्याची भाजी, खोबऱ्याची चटणी, आंब्याचं लोणचं आणि रव्याचे दोन लाडू इतके पदार्थ असत. हे पाहून मला त्याचा भारी हेवा वाटे. कधीकधी प्रमोद ' यस्, फेस्, व्हेरी गुड, थँक्स ' असं काहीतरी इंग्रजीत बोलत असे. तेव्हा मला माझ्या हीनदीन परिस्थितीची जाणीव होऊन, माझं मन आतल्या आत कुढायला लागे. ' आपण गरिबीत जन्माला आलो, हे आपलं केवढं दुर्दैव ' असं म्हणून मी कपाळाला हात मारून घेई आणि कधी-कधी आंथरुणातच अश्रू ढाळीत पडून राही.

अशा स्थितीत असताना एकेक दिवस उगवायचा आणि एकेक मावळायचा. सकाळी उठल्यापासून तर रात्री आंथरुणावर पडेपर्यंत ' आता काय करावं ?' याविषयी माझ्या मनात सारखे विचार घोळत असत. त्यामुळं माझं मन अधिकच दुःखी होई आणि मला माझाच जीव नकोसा होई.

एके दिवशी माझा मित्र प्रमोद पुण्याला जाणार होता. म्हणून मी एस. टी. च्या मोटर स्टँडपर्यंत त्याला पोचवायला गेलो होतो. शाळेला उन्हाळ्याची सुटी लागली म्हणून तो दोन महिने पुण्या-मुंबईतल्या त्याच्या नातेवाईकांकडे जाऊन राहणार होता. प्रमोदचे वडील वकील होते. त्यांची वकिली खूप चालत असे. त्यांच्या घरी शेतीवाडी होती, दूधदुभतं होतं आणि नोकरचाकर होते. म्हणजे प्रमोदच्या आणि माझ्या सांपत्तिक स्थितीत जमीन अस्मानाचं अंतर होतं.

प्रमोद ज्या बसमध्ये बसला होता ती मोटर स्टँडवरून सुटताच मला कसल्यातरी विचारांनी खूप भडभडून आलं. आणि माझ्या डोळ्यातून आपोआप अश्रू ओघळू लागले. तेव्हा माझ्याकडे कुणी पहात नाही असं समजून मी दुसऱ्या बाजूला तोंड फिरवलं आणि अश्रू पुसले.

इतक्यात असं झालं की दुसऱ्या गावाहून प्रवाशांना घेऊन आलेली बस मोटर स्टँडवर येऊन उभी राहिली. आलेल्या उतारूचं सामान डोक्यावरून घेऊन जायला आपल्याला मिळावं म्हणून अनेक मुलं त्या बसभोवती गोळा झाली. एक 'दादा' मुलगा मोटारीच्या छतावर चढून सुद्धा गेला. 'साहेब ! सामान आहे का ? बाईसाहेब सामान आहे का ?' असं ती मुलं प्रवाशांना विचारू लागली. हे पाहून माझ्या मनात एकाएकी काय विचार आला कुणास ठाऊक; पण मीही त्या डोक्यावरून सामान वाहून नेण्याची इच्छा बाळगणाऱ्या मुलांच्या घोळक्यात एकदम सामील झालो.

बसमधून आलेले लोक लौकरलौकर खाली उतरून आपापल्या रस्त्यानं जाऊ लागले. काही जण तांग्यातून गेले अन् काही प्रवासी पायी पायी जाऊ लागले. ज्यांचं सामान डोक्यावरून घेऊन जायचं होतं असे प्रवासी थोडेच होते. बसभोवती गोळा झालेली मुलं माझ्याहून मोठी असल्यानं माझ्या वाटचाला एकही ओझं आलं नाही. तशातच एकदोन मोठ्या मुलांनी 'चल हट् कशाला लुडबुडतोस मधेमधे ! एक झापट मारीन ' असं म्हणून माझ्या पाठीत एक जोराचा बुक्का मारला. त्यामुळं तर माझी दातखीळच बसली.

बाहेर गावाहून आलेली बस थांबून पाचसात मिनिटं झाली नाहीत तोच मोटर स्टँडवर शुकशुकाट झाला. सर्व प्रवासी आपापल्या घरी निघून गेले. माझ्या वाटचाला कोणतंच ओझं न आल्यानं मी हिरमुसल्या चेहऱ्यानं उभा राहिलो. अशा वेळी प्रमोदच्या वडिलांकडे येणारे एक वकीलसाहेब एका हातात उघडलेली छत्री व दुसऱ्या हातात एक लहानशी बॅग घेऊन पायीपायी जाताना मला दिसले. तेही आताच बस मधून उतरले होते. म्हणून मी त्यांच्या मागून चालता चालता मोठ्या केविलवाण्या स्वरात म्हटलं

"साहेब ! अहो साहेब ! काहीही दिलं तरी चालेल ! तुमच्या इच्छेला येईल ते दिलं तरी चालेल ! मी घेऊन चालतो तुमची बॅग !"

माझ्या हडकुळ्या शरिराकडे अन् माझ्या अंगातल्या फाटक्या कपड्यांकडे पाहून वकीलसाहेबांना माझी दया आली असावी. त्यांच्या हातातली कातड्याची बॅग माझ्या डोक्यावर ठेवताठेवता ते म्हणाले,

"नीट सांभाळ वर कारे ! नाहीतर पाडशील बिडशील !"

मी म्हटलं, "नाही साहेब ! बिलकुल पाडणार नाही !"

तेव्हा मी मनातल्या मनात म्हटलं खरोखरच परमेश्वर फार कनवाळू आहे. आजच्या आज आपल्याला कामसुद्धा मिळालं. खरोखर परमेश्वराचे हे केवढे उपकार !

ते दिवस उन्हाळ्याचे होते. तशातच भर दुपारची वेळ असल्यानं पायात काही घातल्याशिवाय चालणं मोठ्या मुष्किलीचं होतं. रस्त्यावरील तापलेल्या जमिनीमुळं माझ्या तळपायाची नुसती लाहीलाही होत होती. माझी ही हीनदीन अवस्था पाहून वकीलसाहेबांना काय वाटलं कुणास ठाऊक ! त्यांनी माझं नाव विचारलं आणि नंतर मला म्हणाले,

"अरे ! अशी ओझी वाहून नेण्यापेक्षा तू शाळेत का जात नाहीस ?"

त्यावर मी काय उत्तर देणार ?

वकीलसाहेबांच्या घरी बॅग पोचवून तेथून परत येताना मला मोठी खुषी झाली. वकीलसाहेबांनी माझ्यावर खूष होऊन मला जास्तच पैसे दिले. ते पैसे घरी जाताच मी माझ्या आईजवळ दिले. तेव्हा तिच्या डोळ्यांत अश्रू आले. तिनं मला जवळ घेऊन कुरवाळलं. तसंच माझ्या इतर बहीण भावंडांना जवळ बोलवून आईनं त्यांच्याकडे मोठ्या प्रेमानं पाहिलं आणि ती म्हणाली,

"बेटा ! तुमच्यापैकी कुणीतरी शिका रे ! शिकल्यासवरल्याशिवाय मनुष्य मोठा होत नाही. आता मन्याचं वय–माझं नाव मनोहर पण आई आणि इतर सर्वजण मला मन्याच म्हणायचे–शिकायचं राहिलं नाही. पण निदान या माणिकनं नि मुकुंदानं तरी शिकलं पाहिजे. कुणीतरी शिकलं पाहिजे. कुणीतरी——–'

असं म्हणून तिनं डोळ्यांना पदर लावला.

दुसऱ्या दिवसापासून मी नियमितपणानं बस स्टँडवर जाऊन, परगावाहून येणाऱ्या मोटारींची वाट पाहू लागलो. सामान वाहून नेणाऱ्या मुलांची मोठी झोंबाझोंबी व्हायची. पण तशातच एखाद्या उतारूला माझी दया आली, तर तो याचं सामान माझ्याच डोक्यावर द्यायचा. मी सकाळपासून तर संध्याकाळपर्यंत

मोटर स्टँडवर थांबून बसची सारखी वाट पाह्यचा. परंतु एवढं करूनही मला फार तर चारआठ आणे म्हणजे पंचवीस ते पन्नास पैसे मिळत. ते पैसे घेऊन घरी येतायेता आणि त्या पैशांना आईजवळ देतादेता मला जो आनंद होई, तो मी आपल्याला कसा सांगू !

मी नियमानं बस स्टँडवर जाऊ लागल्यामुळं माझी एका वर्तमानपत्रं विकणाऱ्या एजंटबरोबर ओळख झाली. त्याच्याकडे येणाऱ्या वर्तमानपत्रांचा गठ्ठा मोटर स्टँडवरून त्याच्या घरापर्यंत मी माझ्या डोक्यावरून घेऊन जाई. पुढं त्याची अधिक ओळख झाल्यावर वर्गणीदारांकडे वर्तमानपत्र वाटायचं काम त्यानं मलाच करायला सांगितलं. म्हणून मग मी त्याच्याकडे महिना पंधरा रुपये पगाराची नोकरी धरली. तेव्हा वर्तमानपत्र वाटण्याशिवाय त्याचं सायकलचं दुकान झाडणं, चक्कीवरून दळून आणणं, त्याच्या लहान मुलीला जवाहरलाल नेहरू उद्यानात फिरायला घेऊन जाणं, बाजारातून भाजीपाला आणणं अशी पुष्कळच कामं मला करावी लागत. दुपारी बारा ते एक मला जेवायची सुट्टी मिळे. मला त्याच्याकडं किती कामं करावी लागत यापेक्षा मला नोकरी मिळाली याचीच खुषी होत होती.

एके दिवशी वर्तमानपत्रांचा गठ्ठा बसस्टॅण्डवरून एजंटाच्या घरी आणायला-मला जाता आलं नाही. बरं, मी उशिरा येईन असं सांगितलंही नव्हतं. त्यामुळं तो गठ्ठा स्वत: एजंट महाशयांनाच जाऊन आणावा लागला. त्यामुळं ते गृहस्थ फार रागावले. मला पाहताच त्यांनी माझ्या तोंडात भडकावली. शिवाय मला नोकरीवरून काढून टाकायची धमकीही दिली. तेव्हा मी गयावया करून " साहेब! एकदा माफ करा. आता पुन्हा मला कधीही उशीर होणार नाही " असं म्हणालो. त्यानंतर पुन्हा कधीही उशिरा गेलो नाही.

माझा पहिल्या महिन्याचा पगार पंधरा रुपये मला मिळताच, मी पळतपळत जाऊन आईला मिठी मारली. तिच्या हातात एकेक रुपयांच्या पंधरा नोटा दिल्या; आणि तिच्या पायावर डोकं ठेवून तिला नमस्कार केला. त्या वेळी तिला जी खुशी झाली आणि तिनं मला जे प्रेमानं कुरवाळलं ते पाहून मला फारफार आनंद झाला. खरोखर आईचे पांग फेडता येत नाहीत असं जे म्हणतात ते काही खोटं नाही.

नंतर काही महिन्यांनी शाळा सुरू होण्यापूर्वी माझे धाकटे भाऊ माणिक व मुकुंद यांच्यासाठी एकेक सदरा व एकेक चड्डी मी विकत आणली. तसंच पाटी पेन्सीलही घेऊन आलो. नंतर एका सुमुहूर्तावर मी त्यांना शाळेत घेऊन गेलो आणि त्यांचं नाव दाखल केलं. ' मला नाही तर नाही पण निदान माझ्या भावांना

तरी शिक्षण मिळालं पाहिजे' या विचाराचा मला ध्यास लागला होता. अशा तऱ्हेनं काही वर्षांत माणिक व मुकुंद यांचं प्राथमिक शाळेतलं शिक्षण पूर्ण झालं हे पाहून मला फार बरं वाटलं.

त्या वर्तमानपत्र एजंटानं वर्तमानपत्र वाटण्यासाठी पुढं पुढं त्याची सायकल वापरायची मला परवानगी दिली. त्यामुळं मनातल्या मनात मी त्याचे फार आभार मानले. कारण सायकल शिकायची व चालवायची माझी हौस भागू लागली.

वर्तमानपत्रं वाटण्यासाठी मला जवळजवळ सर्व रस्त्यांतून व गल्लीबोळांतून जावं लागे. वर्तमानपत्र टाकता टाकता कुणाच्या घरात काय चाललंय याचा मला अंदाज लागत असे. शिवाय शितावरून भाताची परीक्षा याप्रमाणं मी त्यांच्या घरातल्या वातावरणाचं अनुमान काढीत असे. यामुळं शिक्षणाचं महत्त्व मला अधिकच पटू लागलं.

हे पाहा ! हे एका श्रीमंताचं घर आहे. लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनमध्ये हे मुख्य अधिकारी आहेत. यांच्या बंगल्यासमोर मोठी बाग आहे. बागेत गुलाब, मोगरा, जाईजुई, मधुमालती, जास्वंदी, सदाफुली आणि इतर अनेक रंगीबेरंगी फुलं फुललेली असतात. मी त्यांच्या घरी वर्तमानपत्र टाकलं रे टाकलं की थोड्याच वेळात नोकर मालकमालकिणीसाठी ट्रे मधून चहा घेऊन येतो. तो ट्रे फार सुरेख आहे. त्या ट्रेवर काढलेल्या गुलाबाच्या पानाफुलांची नक्षी फारच चित्ताकर्षक आहे. हे गृहस्थ चहा पितापिता वर्तमानपत्र वाचतात. एखादी महत्त्वाची बातमी असल्यास ती सौभाग्यवतीला मोठ्यानं वाचून दाखवतात. दर रविवारी किंवा सुटीच्या दिवशी घरातले सर्वजण बागेतल्या हिरवळीवर बसून गप्पागोष्टी आणि हास्यविनोद करताकरता चहा घेतात. त्यांच्या घरातल्या लहान मुलांचं जीवन मोठं सुखाचं आणि हेवा वाटण्यासारखं आहे. त्यांच्या घरातल्या सुग्रास अन्नाचा वास थेट रस्त्यापर्यंत येतो. तेव्हा 'हे परमेश्वरा ! असं सुग्रास भोजन माझ्या भावंडांना नि मला कधी तरी मिळेल का ? यांच्या घरातली मुलं जसं खुर्ची-टेबलावर बसून जेवण घेतात तसं आम्हाला कधी तरी मिळेल का ? या मुलांचा जसा ऐटबाज पोषाख असतो तसा आम्हाला कधी तरी घालायला मिळेल का ?' अशा तऱ्हेनं अनेक प्रकारचे विचार माझ्या मनात येत आणि माझं मन विषण्ण होऊन जाई.

हे या गल्लीतलं घर एका प्राथमिक शाळेतल्या एका शिक्षकाचं आहे. यांच्याही घरी मी दररोज वर्तमानपत्र टाकतो. यांचं घर अगदी साधं आहे. यांचा पगार बेताचा असावा. कारण यांच्या घरी खुर्ची टेबल नाही आणि

यांच्या घरातल्या दरवाजे खिडक्यांना पडदे नाहीत. परंतु यांच्या घरात टापटीप व व्यवस्थितपणा फार आहे. घरातल्या सर्वांना वाचायचं जणू काही वेडच आहे. कोणत्याही दिवशी पाहावं तर सर्वजण काहीना काही वाचताना दिसतात. जणू काही सर्वांना ज्ञानाची तहान लागली आहे. यांच्या घरातलं वातावरण मोठं प्रसन्न आणि समाधानी आहे.

आणखी हे एक घर पाहा ! यांच्या घरातला कर्ता पुरुष सैन्यात अधिकारी आहे. घरी आजोबा, आजी, नातवंडं व त्यांची आई इतके जण असतात. आजोबांना जरा कमी दिसतं. पण त्यांना वाचायचा फार षौक आहे. म्हणून ते आपल्या नातवंडांकडून पाळीपाळीनं वर्तमानपत्र वाचून घेतात. मी वर्तमानपत्र टाकलं रे टाकलं की ' आज कुणाची पाळी आहे रे वाचायची ?' असं म्हणून आजोबांनी हाक मारलीच म्हणून समजा.

अशा तऱ्हेनं अनेक घरं माझ्या लक्षात राहिली आहेत. काहीकाही घरातलं वातावरण मोठं शांत नि समाधानी असं आहे. पुष्कळांच्या घरी वडील निर्व्यसनी व कर्तव्यदक्ष असून मुलांच्या शिक्षणाकडे फार लक्ष देतात ; हे मी माझ्या डोळ्यांनी पाहिलं आहे. त्यांच्या घरी मुलांना शिकण्यासाठी मोठं प्रोत्साहन मिळतं. त्यांच्या घरी रडारड, गोंधळ किंवा भांडण चाललेलं मला कधी आढळलं नाही. म्हणून मला वाटू लागलं की आपली आई म्हणते ते काही खोटं नाही. शिक्षणानं मनुष्य मोठा होतो यात काही शंका नाही.

माझे धाकटे भाऊ माणिक व मुकुंद हळूहळू शिक्षणात प्रगती करीत होते हे पाहून मला हर्ष होई. आता माझं वय सतरा अठरा वर्षांचं झाल्यानं मला स्वतः शाळेत जाऊन शिकणं शक्य नव्हतं. शिवाय मी नोकरी करीत होतो. तरीपण मलाही लिहितावाचता यावं असं मला वाटे. कारण माझ्या मनात विचार यायचा की आपण सकाळी घरोघरी जाऊन वाटतो ते वर्तमानपत्र वाचायला लोक किती उत्सुक असतात. जरा उशीर झाला तर ' काय रे ! आज का उशीर झाला ?' असं वर्गणीदार विचारतात. मग आपल्यालाही लिहितावाचता का येऊ नये ? आता मला शिकायला उशीर लागेल हे खरं परंतु लिहितावाचता येणारच नाही, असं मात्र म्हणता येणार नाही.

असं मनोमनी ठरवून मी दररोज रात्री झोपण्यापूर्वी माणिक जवळून एकेक अक्षर शिकू लागलो. तो मला ' क ला काना का आणि क ला काना वर वेलांटी की' असं सांगायचा. मी एकेक अक्षर पाटीवर लिहून घोकायचा. असं होता होता कमळ, बदक, समई, गवत, आकाश, भारतमाता असे अनेक शब्द मला वाचता येऊ लागले.

काही दिवसांनी ज्यांच्या घरी मी वर्तमानपत्र टाकीत असे अशा प्राथमिक शाळेतल्या शिक्षकाकडे रात्री नियमानं शिकायला जाऊ लागलो. माझी हलाखीची परिस्थिती, माझ्या वडिलांचं दारूचं व्यसन आणि माझी शिकायची उत्सुकता पाहून त्यांनी मला मोफत शिकवायला सुरुवात केली. त्यामुळं एका वर्षाच्या आत मला हळूहळू वर्तमानपत्र वाचता येऊ लागलं. तेव्हा संध्याकाळी वर्तमानपत्र एजंटाच्या घरून त्या दिवसाचं वर्तमानपत्र आणून त्यातल्या काही बातम्या मी आईला वाचून दाखवी. मला आता लिहितावाचता येऊ लागल्यामुळं माझ्या मालकाच्या दुकानातला सर्व जमाखर्च मीच लिहू लागलो. त्यामुळं माझ्या पगारातही वाढ झाली.

आणि आता मला आपल्याला सांगायला आनंद वाटतो की माझा धाकटा भाऊ माणिक हा त्याच्या वर्गात पहिला आल्यामुळं त्याला शिष्यवृत्ती मिळाली आहे. यामुळं मी नाहीतर नाही पण माझे धाकटे भाऊ मोठे होऊन माझ्या आईचे पांग फेडतील असा मला विश्वास वाटतो. ''

तेव्हा माझ्या विद्यार्थी बंधुभगिनींनो ! आणि ज्यांना लिहितावाचता येत नाही अशा स्त्रीपुरुषांनो, आपण घटकाभर जरा शांत चित्तानं विचार करा. कारण मनोहर जे काही म्हणाला ते खरं आहे. आज मनोहरचे दोघेही भाऊ मोठ्या हुद्द्यावर आहेत. त्यांनी घरातलं दारिद्र्य नाहीसं केलं आहे. ते विद्येचे मोठे चाहते आहेत.

यास्तव मनोहर प्रमाणंच आपणही विद्येची कास धरावी हे जेवढं सांगावं तेवढं थोडंच आहे. कारण आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करू लागलो तर अपयशसुद्धा यशामध्ये बदलून टाकायची करामत आपल्याला सुचते. प्रयत्नांती परमेश्वर असं जे म्हणतात ते एवढ्यासाठीच.

प्रयत्नांचं महत्त्व स्वतः रामदासस्वामींनी आचरणात आणून दाखवलं. त्यांचा प्रयत्नावर फार भरवसा होता. म्हणूनच तर ते म्हणतात : '' यत्न तो देव जाणावा ! ''

## ४

# संधी मिळते,
# संधी मिळवावी लागते

नारायणराव सरनोबत सरकारी इंडस्ट्रीज डिपार्टमेंटमधे डायरेक्टर म्हणून नियुक्त झाल्यामुळे कार्यालयातल्या सर्व नोकरांना मोठी खुशी झाली. त्या सर्वांनी नारायणरावांच्या अभिनंदनाचा मोठा समारंभ घडवून आणला.

विविध रंगांच्या पताकांनी सजवलेल्या हॉलमधे नारायणराव त्यांच्या पत्नीसह येताच सर्वांनी उठून त्यांचं स्वागत केलं. स्वागत-समारंभाच्या अध्यक्षांनी ताजा गुलाबाच्या सुगंधित फुलांचे मोठे मोठे हार नारायणरावांना आणि त्यांच्या पत्नीला अर्पण करताच, टाळ्यांचा मोठा कडकडाट झाला. अनेक वक्त्यांनी नारायणरावांच्या सद्‌गुणांची मोठी प्रशंसा केली. सभा संपल्यावर बाहेर पडताना जो तो 'अभिनंदनाचा एवढ्या उत्साहानं साजरा झालेला समारंभ आम्ही पाहिला नव्हता' असं म्हणू लागला. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात नारायणरावांचा फोटो व समारंभाचं रसभरित वर्णन छापून आलं.

त्या समारंभाला मी हजर राहू शकलो नव्हतो. वास्तविक पाहता नारायणरावांचे व माझे इतके जवळचे संबंध होते की, त्यांच्या अभिनंदनाच्या समारंभाला मी मुद्दाम हजर राहिलो असतो आणि दोन शब्द बोललोही असतो. म्हणून गावाहून परत येताच नारायणरावांच्या घरी जाऊन त्यांचं अभिनंदन करायचं मी ठरवलं. त्या प्रमाणं दुसऱ्याच दिवशी सकाळी मी त्यांच्या घरी गेलो. मला पहाताच,

"या माधवराव या!" असं त्यांनी म्हणताच,

"Hearty Congratulations" असं म्हणून मी त्यांचं अभिनंदन केलं.

सुटीचा दिवस असल्यानं, बंगल्यासमोरील हिरवळीवर पत्नीच्या व मुलांच्याबरोबर चहाचा कार्यक्रम होत आहे, याची मला चाहूल लागताच मी म्हटलं,

"आता मी जातो. आपल्या चहापानाच्या कार्यक्रमात व्यत्यय नको."

"छे हो, कसला व्यत्यय नि कसलं काय! तुम्हाला चहा घेतल्याशिवाय आता जाऊ तरी कोण देणार ?"

लहानशा टुमदार बंगल्यासमोरील हिरवळीवर बसताच मला वाटलं की, काहीकाही माणसांना सौंदर्याची उपजतच आवड असते; याचा पुरावा म्हणजे नारायणरावांच्या बंगल्याभोवतालचा बगीचा होय. लालपिवळ्या रंगांच्या गुलाबाची मोठी सुगंधित फुलं, झेंडूच्या फुलांची रांगचरांग, जास्वंदीच्या भल्या मोठ्या फुलांचं उंचावून डोकावणं, किनाऱ्यावरील झुडुपातून कोरलेल्या कौशल्यपूर्ण मोराच्या आकृती आणि मऊ मऊ लुसलुशीत असा हिरवळीचा मधला गालिचा पाहून माझं मन फारच प्रसन्न झालं. तशातच नारायणराव, त्यांची पत्नी व मुलं यांच्या चेहऱ्यावरून जणू काही आनंद ओसंडत आहे असं मला वाटलं.

आम्ही सर्वजण लॉनवर बसताच नोकरानं चहाचा ट्रे आणून ठेवला. त्या कपबशीवरील व चहाच्या केटलीवरील गुलाबाच्या पानाफुलांची आकृती पुन्हापुन्हा पहावी इतकी चित्ताकर्षक होती.

चहाच्या कपात एकेक चमचा साखर टाकल्यावर केटलीमधून चहा ओतता ओतता नारायणराव म्हणाले,

"अहो ! कालच्या सत्कारसमारंभाला इतके लोक गोळा होतील असं मला वाटलं नव्हतं. सर्व हॉल अगदी गच्च भरून गेला होता !"

हे ऐकून नारायणरावांच्या पत्नी म्हणाल्या,

"काहीजण तर बाहेरही उभे राहिले होते. इतकी गर्दी झाली होती स्त्रीपुरुषांची !" तेव्हा मी म्हटलं,

"हे माझं केवढं दुर्भाग्य की, अशा सत्कार-समारंभाला मी येऊ शकलो नाही. मी असतो तर मलाही दोन शब्द बोलायला मिळाले असते."

तेव्हा नारायणराव म्हणाले,

"मग आता बोला की उभं राहून काय बोलायचं तर! आम्ही ऐकायला उत्सुक आहोत !"

त्यांचं हे बोलणं ऐकून सर्वजण हसले.

"बाकी तुम्ही आता बोलायचच म्हणता तर मी विचारतो की, तुमच्या एवढ्या यशाचं कारण काय ते तरी सांगा !"

चहाचा कप माझ्या हातात देतादेता नारायणराव म्हणाले, "हात्तिच्या एवढंच ! अहो, याचं कारण म्हणजे ही माझी पत्नी. या नंदिनीचा पायगुण इतका चांगला आहे की, ही घरात आल्यापासून सारखी उन्नतीच होत आहे !"

हे ऐकून नंदिनी वहिनींच्या मुखावरील स्वाभिमान शतपटीनं वाढला. त्यांचा मूळचाच लावण्ययुक्त चेहरा गुलाबाच्या नुकत्याच उमललेल्या पाकळ्या-प्रमाणं आरक्त आणि आकर्षक दिसू लागला.

म्हणून मी म्हटलं,

"नारायणराव ! अहो अशी पत्नी मिळायला पुण्य असावं लागतं पुण्य !"

"हां, एवढं मात्र खरं ! हिच्याशी लग्न झालं म्हणूनच माझी एवढी उन्नती झाली. नाहीतर मला नाही वाटत मी डायरेक्टर झालो असतो म्हणून !"

त्या दिवशी नारायणरावांच्या बरोबर मी बराच वेळ होतो, त्यामुळे मला पुष्कळच नवीन माहिती मिळाली. कारण मनुष्य आनंदी असला म्हणजे तो आपलं हृद्गत उघडं करून दाखवतो. म्हणूनच नारायणरावांनी त्यांच्या आयुष्यातल्या दुसऱ्या कुणालाही न सांगितलेल्या पुष्कळ गोष्टी त्या दिवशी मला सांगितल्या. त्यामुळे नारायणरावांचा निरोप घेऊन घरी येता येता त्यांच्या आयुष्यातला अद्‌भुतरम्य चित्रपट माझ्या डोळ्यापुढून सरकू लागला.

आज नारायणराव इंडस्ट्रीज डिपार्टमेंटचे डायरेक्टर झाले आहेत. त्यांचा स्वतःचा छानसा बंगला आहे. त्यांच्या बंगल्याभोवतालची बाग पुन्हा पुन्हा पहावी इतकी चित्ताकर्षक आहे. त्यांची स्वतःची मोटर आहे. त्यांची पत्नी त्या कारमधून इकडे तिकडे मिरवते. हे सगळं खरं आहे. तसंच आज नारायणरावांना महिना आठशे रुपये पगार मिळतो हेही खरं आहे. परंतु ....

परंतु अठरा वर्षांपूर्वी नारायणराव कामावर लागले ते एक टायपिस्ट म्हणून आणि त्यांना तेव्हा पगार मिळायचा फक्त ऐंशी रुपये ! त्या खात्यातला तेव्हाचा डायरेक्टर परदेशांतून शिक्षण घेऊन आलेला आणि मोठा हुशार मनुष्य होता. जरा काही टाईपिंगचं काम असलं की डायरेक्टरसाहेब नारायणरावांना बोलावून घेत. टायपिंगचं काम करायचं ते बिनचूक, सुबक आणि कमीतकमी वेळात. यामुळे नारायणरावावर साहेब फार खूष होते. साहेबांनी तोंडी सांगितलेला मजकूर लिहून घ्यायचा सराव नारायणरावांना इतका झाला होता की, साहेबांनी अमुक एका पत्राचा थोडासा मजकूर तोंडानं सांगितला की, पुढचा मजकूर असा असा असला पाहिजे, हे नारायणराव अदमासानं ओळखायचे; आणि त्यांचा तर्क बहुधा खरा ठरायचा. त्यांच्या कामातल्या प्रगतीची पुढची पायरी म्हणजे साहेब सुट्टीवर असले की आलेल्या पत्रांना द्यायची उत्तरं त्या त्या फाईली पाहून तयार करायची आणि ते टाईप केलेले कागद साहेब आल्यावर त्यांच्या टेबलावर ठेवायचे. नारायणरावांनी लिहिलेली उत्तरं वाचता वाचता साहेबांना वाटायचं की,

ही उत्तरं जणू काही आपणच लिहिली आहेत. इतकी ती सुसंबद्ध आणि मुद्देसूद असायची. नारायणरावांचं इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व पाहून तर साहेब फारच खूष व्हायचे. त्यामुळे डायरेक्टर साहेबांची नारायणरावावर मोठी मर्जी होती.

लौकरच साहेबांनी नारायणरावांना पर्सनल असिस्टंट म्हणून बढती दिली. त्यामुळे नारायणराव कामात अधिक लक्ष घालू लागले. ऑफिसमधला कुणी कारकून सुट्टीवर गेलेला असला आणि त्याचं काम साहेबांनी नारायणरावांना पाह्यला सांगितलं तर नारायणराव स्वतःच त्या सुट्टीवर गेलेल्या कारकुनाचं काम मोठ्या तत्परतेनं करीत असत. त्यामुळे थोड्याच वर्षांत नारायणरावांना त्यांच्या कार्यालयामधल्या सर्व खात्यांची पद्धतशीर माहिती झाली.

इंडस्ट्रीज डिपार्टमेंटच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून काही हुकूम आले की, त्यांचं बारकाईनं वाचन करणं, त्यातला महत्त्वाचा भाग लाल शाईनं खूण करून साहेबांच्या नजरेस आणून देणं, ऑफिसमधल्या सर्व खात्यांत एकसूत्रीपणा आणून कामाची गती वाढविण्यासाठी आणखी काय काय करायला हवं हे साहेबांना नम्रतेनं पण स्पष्ट सुचवणं इत्यादी कामामुळे डायरेक्टरसाहेब नारायणरावावर बेहद्द खूष होते. तशातच नारायणरावांची वागणूक सर्व कामगाराबरोबर न्यायाची आणि आपुलकीची असल्यानं त्या ऑफिसमधले सर्वजण त्यांच्यावर फार खूष होते.

नोकरीतून निवृत्त होण्यापूर्वी त्या डायरेक्टरांनी नारायणरावांना ऑफिस सुपरिटेंडेंटच्या जागेवर नेमलं. कारण त्या वेळी ती जागा रिकामी झाली होती. नारायणरावांची कामातली कुशलता, त्यांचा कामाचा उत्साह आणि त्यांना सर्व खात्यांची असलेली बारीकसारीक माहिती लक्षात घेता या जागेसाठी तेच पात्र होते. दुसऱ्या काही कारकुनांनी नारायणरावापेक्षा जास्त वर्षं नोकरी केली होती हे खरं, परंतु नारायणरावासारखा कामाचा उरक त्यांच्यात नव्हता. यामुळे त्या कारकुनांनी वरवर कुरकुर केली तरी ऑफिस सुपरिटेंडेंट म्हणून नारायणरावच पात्र आहेत हे मनोमनी त्यांनी मान्य केलं होतं.

आतापर्यंत केलेल्या कामाचं चीज झालं हे पाहून नारायणरावांना आनंद झाला. ऑफिसमधलं कुठलंही अडलेलं काम त्या त्या विभागाच्या कारकुनानं नारायणरावांच्या जवळ नेलं की त्यांनी काहीतरी मार्ग काढलाच म्हणून समजा. पण असं करण्यात नारायणराव घाई करीत नसत. अशा अडलेल्या फाइली ते सायंकाळी दप्तरात बांधून नोकराकडून घरी मागवून घेत असत. त्या फाइलीमधल्या कागदांचं वाचन नारायणराव सकाळी पाच ते सात या वेळात करीत असत. ऑफिसमधलं घरी आणलेलं काम करायची त्यांची सकाळची पाच ते सात ही वेळ अगदी ठरून गेली होती.

सकाळी लौकर उठून नारायणराव ऑफिसचं काम करू लागले की नंदिनी म्हणायची,

"अहो ! एवढी ढोर मेहनत करून काय मिळणार ? माणसानं कसं आपलं काम करावं आणि गप्प बसावं. पण यांना सारखी दुसऱ्याच्या कामाची खाज. पगाराचे पैसे घेणार मेले ते दुसरे कारकून आणि त्यांचं अवघड काम घरी आणून करणारे हे ! ही नसती उठाठेव सांगितली कुणी ? पण यांना दुसऱ्याची खरकटी काढायची सवयच झाली आहे ना ! आता त्याला काय करावं ! तुम्ही मरमर मरेपर्यंत काम करा, काय उपयोग होणार आहे त्याचा ? म्हणून मी म्हणते की उगीच त्रास करून घेऊ नका. पण यांचा हा असा मेणघुण्या स्वभाव त्याला काय उपाय ? नवरासुद्धा चांगला मिळणं हे भाग्यावर अवलंबून असतं, असं म्हणतात ते काही खोटं नाही ! नाहीतर हे यांच्यासारखे दुसऱ्यासाठी खर्डेघाशी करणारे! "

हे बायकोचं बोलणं नारायणरावांच्या इतकं पाठ झालं होतं की नंदिनी आता वेळेवर जेवण तयार करणार नाही, म्हणून जेवण न करताच ऑफिसला जायला पाहिजे हे नारायणरावांच्या अगदी अंगवळणी पडलं होतं.

एके दिवशी नारायणरावांचा व नंदिनीचा असाच खटका उडाला होता. नारायणराव उपाशीतापाशी ऑफिसला जात होते. कालचा प्रसंग पुन्हा पुन्हा ते आठवत होते. 'संध्याकाळच्या साडेसहाच्या सिनेमाला मी तुला घेऊन जाईन' असं त्यांनी नंदिनीला कबूल केलं होतं. पण नारायणराव घरी परत आले ते आठला. तेव्हा नंदिनी म्हणाली,

"तुम्हाला घरी यायला उशीर का झाला ?" हे ऐकून नारायणराव म्हणाले,

"अग ! अंगातले कपडे तर काढू देशील ! आणि तुला खरं सांगू का ? अर्जंट कामाचं उत्तर आजच पाठवायचं होतं म्हणून !"

"दररोज सकाळी लौकर उठून ऑफिसच्या कामाची हमाली करता ती बस नाही झाली वाटतं !"

"अग, ते खरं. पण असं महत्त्वाचं काम लांबणीवर टाकता येत नाही !"

"ऑफिसमधले बाकीचे लोक तर लौकर आले आणि तुम्ही -- "

"हे पहा ! ज्याच्या फाइलीमधलं काम आडलं होतं तो, मी आणि साहेब एवढे आम्ही थांबलो होतो."

"म्हणे तो, मी अन् साहेब एवढे आम्ही थांबलो होतो. अहो ! साहेबाची एवढी गुलामी करून काय मिळणार आहे तुम्हाला ? "

" आता हे बघ नंदिनी ! याचं काय उत्तर द्यावं तुला ?"

" बस, असं म्हटलं म्हणजे संपलं ! पण मी म्हणते की, मी तुला सिनेमाला घेऊन जाईन असं तुम्ही कशाला म्हणाला होता ?"

माझ्या मनात आलं होतं की, उत्तर द्यावं झक मारायला ! पण तसं बोलणं म्हणजे आगीत तेल ओतण्यासारखं होतं. म्हणून मी स्वतःला आवरून धरलं, आणि फक्त एवढंच म्हणालो,

" ऑफिसमधलं असं अर्जंट काम आजच येईल असं काय मला स्वप्न पडलं होतं?"

" बरोबरच आहे. मी तुम्हाला लग्न झाल्यापासून चांगली ओळखते ! नाहीतरी मी आवडत असेल तर ना तुम्हाला ! बायकोसाठी निदान एक दिवस-तरी घरी लौकर यायला तिच्यावर खूप प्रेम असावं लागतं. तुमचं लग्न माझ्याशी थोडंच झालं आहे ! तुमचं लग्न तर त्या फाइलीशी झालं आहे ! ऑफिसमधे बाराबारा तास फाइलीत डोकं खुपसून बसता आणि घरी आल्यावर पुन्हां तेच डोकं खुपसणं. असा नवरा तरी काय कामाचा ? — — — — पण मेलं माझंच चुकलं ! तुम्ही माझे लागता तरी कोण ? मी तुमच्यावर एवढा हक्क काय म्हणून गाजवावा ?" असं म्हणून नंदिनीनं रडून रडून मोठा आकांत केला.

तेव्हा नारायणरावांच्या मनात पुन्हा पुन्हा विचार येत होता की, या नंदिनीला कसं सांगावं ! म्हणून नारायणराव मनातल्यामनात सारखे बोलत होते. ' अग नंदिनी ! मला या खात्यात उन्नती करून घ्यायची असेल तर ऑफिसचं प्रत्येक काम मी व्यवस्थितपणानं आणि चपळाईनं करायला हवं ! त्याशिवाय दुसरा मार्गच नाही. या खात्यात माझी ना ओळखपाळख, ना वशिला. अशा वेळी अक्कलहुशारीनं मनापासून काम करून, इतरांच्याहून मी जास्त लायक आहे हे सिद्ध करणं हा एकच मार्ग आहे उन्नतीचा ! आणि हे बघ नंदिनी ! समजा इतर कारकुनांच्या कामाची माहिती मला झाली तर ती गोष्ट माझ्या आणि तुझ्या हिताचीच नाही का ? सध्या मी ऑफिस सुपरिटेंडेंट आहे पण पुढेमागे डेप्युटी डायरेक्टरची जागा रिकामी होण्याची शक्यता आहे. समजा ती जागा मला मिळवायची तर तिच्यासाठी प्रथमपासूनच माझी योग्यता असायला नको का ? नाहीतर ही संधी निघून गेल्यावर मग काय उपयोग ? पण हे सगळं तुला कसं सांगावं ! तू तर उठल्यासुठल्या ' नवरासुद्धा चांगला मिळणं नशिबावर अवलंबून असतं ! नाहीतर यांच्यासारखे खर्डेघाशी करणारे !' असं म्हणून माझा उपहास करतेस.

पण हे बघ नंदिनी ! तरीही मी तुला दोष देत नाही. कारण तुला ऑफिसच्या कामाची काहीच कल्पना नाही. अग ! ऑफिसमध्येही पुष्कळजण हेवेदेवे करणारे असतात. पण त्यांच्यावरही ताण करायची तर कर्तृत्व दाखविल्याशिवाय मार्ग नाही. आणि कर्तृत्व करून दाखवावयाचं तर मेहनत ही करायलाच हवी !

आता तूच विचार कर नंदिनी! की बारा नि बारा चोवीस तास माझी बायको आणि माझं घर एवढाच मी विचार करीत राहिलो तर मला माझी उन्नती करून घेता येईल का ? दीर्घोद्योगोशिवाय दुसरा मार्ग निदान मला तरी माहीत नाही. एस्. एस्. सी. परीक्षेत मला प्रथम श्रेणीचे मार्कस् मिळाले होते ते याच मार्गाचं मी अवलंबन केलं होतं म्हणून ! आणि सध्याही मी याच मार्गानं जात आहे. ही गोष्ट मी तुला हजारदा सांगितली पण तुला ती पटत नाही. आता याला काय करावं ? खरं म्हणजे पत्नीनं आपल्या पतीला प्रोत्साहन द्यायला हवं. पण ते तर लांबच राहिलं आणि उठल्याबसल्या 'खर्डेघाशी करणारे ! खर्डेघाशी करणारे !' असं म्हणून तू माझा पाणउतारा करतेस !

अशा विचारांचं चक्र माझ्या मनात सुरू होताच माझ्या दुसऱ्या मनानं मला सुचवलं,

' अरे ! तू नंदिनीला पुन्हा पुन्हा समजावून सांगितलं पाहिजे. '

तेव्हा माझं पहिलं मन सांगू लागलं, ' आतापर्यंत हजारदा समजावून सांगितलं तर त्याचा काय उपयोग झाला ? तिला प्रत्यक्ष ऑफिसमध्ये नेऊन कामाचा व्याप दाखवला तरी तिची खात्री होणार नाही. बाकी बायकोचा स्वभाव बदलणं ब्रह्मदेवालाही शक्य नाही असं म्हणतात ते काही खोटं नाही. '

' मग असा उपाशीतापाशी किती दिवस जाणार ऑफिसला ?'

' इंग्रजीत म्हणतात ना की What cannot be cured must be endured. म्हणजे जे बरं करता येत नाही ते सहन करावं, हेच खरं. कारण नंदिनीचा स्वभाव बदलणं बिलकूल शक्य नाही. नवऱ्याला ऑफिसला जायला निदान ताजंताजं जेवू तरी घालू या, एवढंही जिला समजत नाही ती पत्नी काय कामाची ? उलट तिची आपली सारखी टुरटुर की ऑफिसचे बाकीचे लोक लौकर घरी येतात आणि मला मात्र उशीर होतो. आणि शिवाय घरीही मी

फाइलीत डोकं खुपसून बसतो. अशी जिची कायमची समजूत झालेली आहे. तिला काय सांगणार कपाळ!'

'बरं! या नंदिनीच्या बडबडण्यावर काही उपाय?'

'त्यावरही काही उपाय नाही. बाकी एवढं खरं की तिला अशी बडबड करायची सवय असली तरी ती फार प्रेमळ आहे. तिची लहर लागली की ती असं काही सुग्रास भोजन करते की, त्याची सर दुसऱ्या कशालाच यायची नाही. म्हणून तिची बडबड म्हणजे पारिजातकाच्या फुलांचा वर्षाव आहे असं समजावं आणि उद्योगाला लागावं. असं आपण जे वागत आहोत तेच बरोबर आहे. कारण माझ्या मेहनतीचं फळ आज ना उद्या मिळेल असा मला भरवसा वाटतो.'

अशा विचारांच्या भोवऱ्यात नारायणराव नेहमी अडकायचे, पण ऑफिस-मधे पोहचताच टेबलावरील शेकडो फाइलीतल्या कागदपत्रांचं वाचन करता करता घरची चिंता विसरायचा ते प्रयत्न करायचे.

ऑफिस सुपरिंटेंडेंटचं काम नारायणरावांनी इतक्या उत्कृष्ट रीतीनं केलं की, त्यांची पाच वर्षांत डेप्युटी डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली. नारायणरावांना ही वरची जागा मिळाल्याबद्दल मीही त्यांच्या घरी जाऊन त्यांचं अभिनंदन केलं होतं. तेव्हाही नंदिनी वहिनींच्या बोलण्यावरून त्या खूष होत्या असं दिसलं. म्हणून मी सहज म्हटलं होतं,

"वहिनी! नारायणराव वरच्या पदावर चढले याबद्दल तुमचं अभिनंदन करायला पाहिजे." हे ऐकून त्यांनी उत्तर दिलं होतं,

"अहो भाऊजी! डेप्युटी डायरेक्टर म्हणजे काही डायरेक्टर तर नाही ना! कितीही झालं तरी डेप्युटी ते डेप्युटीच!" तेव्हा मी म्हणालो होतो,

"पण वहिनी! तुम्ही हे विसरता की पूर्वी सुरुवातीला नारायणराव फक्त टाइपिस्ट होते. आणि आता डेप्युटी डायरेक्टर झाले आहेत. तेव्हा पुढे लौकरच डायरेक्टरही होणार नाहीत कशावरून?"

"अहो! होतील तेव्हा होतील! पण आज तर नाहीत ना!"

आणि आता प्रत्यक्ष नारायणरावांची डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली होती. ऑफिसमधल्या सर्वांनी त्यांचं स्वयंस्फूर्तीनं अभिनंदन केलं होतं. त्या बद्दल मीही त्यांचं आज अभिनंदन केलं होतं. तेव्हा नारायणरावांच्या बंगल्यावरून निघता-निघता मी मुद्दाम माजघरात जाऊन नंदिनी वहिनींना म्हणालो,

" वहिनी पाच वर्षांपूर्वी तर तुम्ही म्हणाला होता की, डेप्युटी — — "
तेव्हा त्या चटकन बोलल्या,

" आता कशाला आठवायचं ते पूर्वीचं बोलणं भाऊजी ! हे घ्या पेढे !" असं म्हणून त्यांनी पेढ्यांची बशी माझ्या हातात दिली.

त्या स्वादिष्ट पेढ्यांची गोडी चाखता चाखता नारायणरावांनी मघाशी उच्चारलेलं वाक्य मला पुन्हा आठवलं की ज्याला काही करामत करून दाखवायची असेल त्यानं मान सांगावा जनांत अन् अपमान सांगावा मनात !

# ५

# संगत धरावी, तर ती चांगल्यांचीच !

"आज कोजागिरी पौर्णिमा आहे. सर्वदूर चंद्राचा शीतल प्रकाश पसरला आहे. भूतलावरील सर्व प्राणिमात्रांना सुखवणारा चंद्र मला मात्र उल्हासित करू शकत नाही. कारण माझ्या मनात काळाकुट्ट अंधार पसरला आहे. मला पाच वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली आहे, आणि म्हणूनच या येरवडा तुरुंगात एका खोलीत मी जमिनीवर पडलो आहे. रात्रीचे अकरा वाजले आहेत पण माझा डोळ्याला डोळा लागत नाही. माझं मन फार भडभडून आलं आहे. नर करणी करे तो नरका नारायण बन जाय असं म्हणतात पण मनुष्य वाईट करणी करू लागला तर तो सैतान बनतो याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे मी !

या शरद पौर्णिमेच्या माझ्या आयुष्यातल्या आठवणी पुन्हा पुन्हा आठवल्यानं माझ्या डोळ्यांत आपोआपच अश्रू गोळा झाले आहेत अन् ते गालांवरून ओघळू लागले आहेत. आज दुपारी एका गोष्टीवरून माझ्या मर्मी घाव बसला. याच खोलीतल्या एका कैद्याबरोबर माझी बोलाचाली होताच त्यानं मला मारलं. पण मला त्याचं काही करता आलं नाही. कारण बाकीचे कैदी त्याचीच बाजू घेणारे आहेत. त्यामुळं दुपारपासून माझ्या जिवाची सारखी लाहीलाही होत आहे. त्या दुःखाचा परिणाम म्हणूनच की काय अंथरुणावर पडल्यापासून मला झोप आली नाही. उलट आलेल्या अश्रूंचा ओघ मला अजूनही आवरता आला नाही. दुःख, संताप आणि पश्चात्ताप यामुळं माझं अंतःकरण अगदी दुभंगून गेलं आहे. आणि त्यामुळं काय करावं अन् काय नाही असं मला झालं आहे.

त्या दुसऱ्या कैद्यानं माझ्या कानशिलात मारलं, पण मी त्याचा प्रतिकारही करू शकलो नाही. तेव्हा गालावरून हात फिरविता फिरविता असाच पूर्वी घडलेला एक प्रसंग मला पुन्हा पुन्हा आठवत आहे.

आमचं जयहिंद नावाचं गेस्ट हाऊस दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर होतं. आणि खालच्या बाजूस चहाचं आणि फराळाचं दुकान होतं. काही कामानिमित्त वडील दुसरीकडे गेले तर मी गल्ल्यावर बसत असे. तेव्हा दोनतीन

रुपये चोरून बाजूला काढून ठेवले तर कुणालाही त्याचा पत्ता लागत नसे. असे घरचे चोरलेले पैसे घेऊन मी मथुरावाले यांच्या मिठाईच्या दुकानात जाऊन बर्फी, पेढे, बासुंदी किंवा श्रीखंड असे काहीना काही पदार्थ खात असें. या गोड पदार्थांची मला इतकी चटक लागली होती की मजजवळ पैसे नसले तर मथुरावाले शेठजी मला उधारीने पाहिजे तो गोड पदार्थ खाऊ घालीत. जयहिंद गेस्ट हाऊसच्या मालकाचा मी मुलगा आहे एवढी त्या शेठजींना माहिती होती. त्यामुळं महिन्याकाठी पंचवीस तीस रुपयांची उधारी म्हणजे काहीच नाही असं मला वाटू लागलं. आणि या माझ्या वागण्याला त्या शेठजींनी प्रोत्साहनच दिलं. यामुळं वडील गेस्ट हाऊसमधून केव्हां बाहेर पडतात आणि गल्ल्यावर मला केव्हा बसायला सांगतात याची मी सतत वाट पहात असे.

एके दिवशी मला काऊंटरवर बसवून वडील बाहेर गेले. गेस्ट हाऊसमधून जाऊन त्यांना एकदोनच मिनिटं झाली असतील, तेवढ्यात ते परत आले. त्या वेळी गल्ल्यातल्या काही नोटा मी माझ्या खिशाच्या आतल्या बाजूस ठेवीत होतो. ही माझी चोरी वडिलांनी मुद्देमालासकट पकडली आणि त्यांची तळपायाची आग मस्तकाला गेली.

" कारट्या ! " असं म्हणून त्यांनी जोरानं माझ्या कानशिलात मारलं आणि माझ्या खिशातले सर्व पैसे काढून घेतले. तेव्हा मी रडत रडत आणि गालावरून हात चोळीतचोळीत आईकडे धावलो. आईनं माझी बाजू घेतली आणि ती वडिलांना नाही नाही ते बोलली. तेव्हा वडील अधिकच संतापले आणि म्हणाले,

" हे बघ, मी जनार्दनला मारलं ते त्याच्या भल्यासाठीच. त्यानं एकदोन रुपये घेतले तर आपल्या गेस्ट हाऊसचं फारसं नुकसान होणार नाही हे खरं. परंतु त्याच्या आयुष्याचं मात्र मातेरं होईल हे नीट लक्षात ठेव. एकदा ही चोरीची संवय लागली, की कायमची लागली. आणि यानं न विचारता पैसे घ्यावेतच कशाला ? अशा तऱ्हेनं चोरून पैसे घ्यायचे, चोरून खायचं, चोरून प्यायचं अशी संवय या वयात लागली तर हा कारटा तुझ्या तोंडाला काळं न फाशील, तर माझं नाव बदलून ठेव ! आज याच्याबरोबर सिनेमाला जा, अन् त्याच्याबरोबर नाटकाला जा, असं हरघडी घडू लागलं तर हा मुलगा आवरता येणार नाही. आता तू इतकं आकांडतांडव केलंस की जणू काही मी याला मारलं ही माझी चूक झाली असं तुला वाटतं. पण आता याद राख. मी याच्या अंगाला इत:पर हात लावणार नाही. परंतु जर हा बिघडला तर त्याला मात्र तूच जबाबदार ठरशील ! "

तो तेव्हाचा प्रसंग आठवला की वाटतं, वडिलांच्या म्हणण्याप्रमाणं मी वागायला हवं होतं. त्या पैसे चोरण्याच्या संवयीनेच माझा पुरता घात झाला आहे. आणि आज मी या अंधाऱ्या कोठडीत खिचपत पडलो आहे. माझ्या या अनुभवावरून वाटतं की वडील म्हणत होते तेच बरोबर होतं. मुलाचे लाड आई-वडिलांनी जरूर करावेत, पण त्यालाही काही मर्यादा असावी. त्या शिवाय मुलाला शिस्त लागत नाही. आता माझंच पहाना.

त्या दिवशी माझी आई माझ्या वडिलांना नाही नाही ते बोलल्यामुळं वडील मजकडे पूर्णपणानं दुर्लक्ष करू लागले. मी जवळजवळ दररोज मित्रांच्या बरोबर सिनेमाला जाऊ लागलो. गेस्ट हाऊसच्या कामामुळं वडिलांना फुरसत मिळत नसे हे खरं, परंतु मजकडे दुर्लक्ष करायचं असाच त्यांच्या मनाचा कल झाला होता. आणि माझ्या आईला सैपाकघरातल्या देखरेखीपलीकडे काही समजत नव्हतं. त्यामुळं मी मन मानेल तसं वागू लागलो.

मित्रांच्या संगतीमुळं पुन्हा पुन्हा सिनेमाला जाणं, सिगरेट ओढणं, आचकट-विचकट बोलणं याबरोबरच पत्ते खेळायचाही मला नाद लागला. हा पत्ते खेळायचा नाद मला फारच आवडू लागला. आमच्या एका मित्राच्या घरी आमच्या पत्त्यांचा अड्डा दररोज जमू लागला. प्रथम सुरुवातीला एकदोन रुपयांपेक्षा आम्ही जास्त पैसे लावीत नसू. त्यामुळं हरलो तरी दोनतीन रुपयांहून जास्त पैसे गमवावे लागत नसत. पण म्हणतात ना चटक मोठी वाईट ! कारण पुढंपुढं पाचपाच दहादहा रुपयांपर्यंतही आम्ही पैसे लावू लागलो. माझे सर्व मित्र धनवंतांचे बेटे होते. एकाचा बाप कापडाचा मोठा व्यापारी होता. दुसऱ्याचा बाप आफ्रिकेत लाकडांचा व्यापार करीत होता. त्यानं मुलाला त्याच्या मामाकडे शिकायला ठेवलं होतं. तिसऱ्या मुलाचे वडील रेल्वेचे कॉन्ट्रॅक्टर होते. म्हणजे त्यांच्यापैकी कुणालाही पैशांची ददात नव्हती.

पत्त्यांचा डाव असाच आहे; पैसे येऊ लागले की आणखी आणखी येऊ लागतात आणि जाऊ लागले की भर्रकन उडून जातात. रोजच्या रोज पाचपन्नास रुपयांची हारजीत होऊ लागल्यामुळं मी आईच्या पेटीतून एकेक दागिना चोरून नेऊ लागलो. हे दागिने मी मित्रांच्या सहाय्यानं मोडीत असे. म्हणजे मला प्रत्यक्ष सोन्याचांदीच्या दुकानावर जावं लागत नसे. मित्रच सर्व काही करीत. पण त्या दागिने विकण्यातही मित्रांचे वाटे जणू काही अगोदरच ठरलेले असत. पाचशे रुप-यांच्या आईच्या सोन्याच्या बांगड्या अवघ्या अडीचशे रुपयांस विकल्या गेल्या आणि माझ्या हातात मित्रांनी अवघे दोनशेच रुपये दिले.

ही माझी दुष्ट खोड एवढ्यावरच थांबली असती तर बरं झालं असतं. परंतु जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही हेच खरं ! कारण आईच्या

पेटीतले पाचसहा दागिने लांबवले आणि ते सर्व विकून त्या पैशांवर पत्ते खेळलो. ते सर्व पैसे हरलो हे सांगायला नकोच. आईच्या पेटीतून मी गुपचूप दागिने नेले हे तिला तिळसंक्रातीच्या दिवशी कळलं. आमच्या एका मानलेल्या मामाकडे आईला हळदीकुंकवाला जायचं होतं. म्हणून तिनं दागिने घालून जायचं ठरवलं आणि तिची पेटी तिनं उघडली मात्र ! तिच्या सर्वांगाचा नुसता भडका उडाला. कसचा सण नि कसचं काय ! सबंध दिवसभर तिच्या डोळ्यांतलं पाणी थांबलं नाही. संताप, दुःख आणि माझा दुर्व्यवहार यामुळं काय करावं आणि काय नाही असं तिला झालं. वडिलांना मात्र माझाच संशय आला. त्यांनी मला खूप मारलं आणि दटावलं की बऱ्या बोलानं कबूल हो नाहीतर तुला पोलिसांच्या ताब्यात देतो. त्यावरून आईचं आणि वडिलांचं खूपच मांडण झालं. माझ्या वडिलांचं अगदी ठाम मत झालं होतं की मला पोलिसांच्या ताब्यात दिल्याशिवाय आणि दागिने कुठे गहाण ठेवले किंवा विकले याचा सुगावा लागून मला काहीतरी शिक्षा झाल्याशिवाय मी वठणीवर येणार नाही.

वडील पोलिसाला वर्दी दिल्याशिवाय राहणार नाहीत याची खात्री होताच मी घराबाहेर पळून गेलो. या गावाहून त्या गावाला आणि त्या गावाहून आणखी दुसऱ्या गावाला अशा तऱ्हेनं पंधरावीस दिवस मी सारखा भटकत होतो. शेवटी आईनं वडिलांना वर्तमानपत्रात जाहिरात द्यायला भाग पाडलं. वडिलांनी त्या जाहिरातीत लिहिलं होतं :--

" जनार्दन ! तू जिथे असशील तिथून ताबडतोब घरी परत ये. तुला कुणीही काही बोलणार नाही. तुला पैशांची अडचण असल्यास तसं पत्रानं कळव. तू गेल्यापासून तुझ्या आईनं अन्न वर्ज्य केलं आहे. तुझी आई आजारी पडली आहे. झालं गेलं ते विसरून जा. आम्ही सर्वजण तुझी सारखी वाट पहात आहोत. तू घरी परत यावेस अशी सर्वांचीच इच्छा आहे.

-- तुझा भास्करराव "

ही पडत्या फळाची आज्ञा मान्य करून मी घरी परत आलो. पुन्हा चोरी करू नकोस असं सांगून आईनं माझी समजूत घातली. परंतु वडिलांनी अगदी स्पष्ट सांगितलं की हा मुलगा आता अगदीच बेताल झाला आहे. असा चोऱ्यामाऱ्या करणारा कारटा जन्माला आला नसता तर बरं झालं असतं. आता हा काय करील अन् काय नाही हे सांगवत नाही. याचा आता काहीच भरवसा नाही. आणि वडिलांचं हे सगळं बोलणं खरं ठरलं. कारण माझ्या वागणुकीत काहीच बदल झाला नाही. पैसा फुकट मिळत गेल्यानं त्याची किंमत मला कळली नाही. मी माझ्या मित्रांच्या घरी पुन्हा पुन्हा जावयेव करू लागलो. पैसे खेळण्यासाठी मित्रांनीच पैसे उधार दिल्यामुळं मी पुन्हा तीन पत्त्यांच्या डावात गर्क झालो.

आणि याचा आता अतिशय वाईट परिणाम झाला. कारण आता घरातले दागिने चोरता येण्यासारखे नव्हते. आणि वडील मला गल्लचावर बसू देत नसत. कारण त्यांचा माझ्यावर बिलकूल विश्वास नव्हता. शिवाय आता मित्रांचं देणं पाचशे रुपयांहून अधिक झालं होतं. बरं पत्ते खेळायला जावं तर पंचाईत आणि न जावं तर त्याहूनही मोठी पंचाईत अशी माझी अवस्था झाली होती. कारण मित्रांनी पैशांसाठी माझ्या पाठीशी तगादा लावला होता. अशा वेळी माझ्या सुपीक डोक्यात एक कल्पना आली.

त्या दिवशी वडील गावाला गेले होते. आणि रात्री साडेबाराच्या एक्स-प्रेसनं परत येणार होते. काऊंटरवर वडिलांनी त्यांच्या विश्वासू नोकराला बसवलं होतं. त्यामुळं त्या नोकराचं गेस्ट हाऊसमध्ये उतरलेल्या लोकांच्याकडे विशेष लक्ष नव्हतं. तेव्हा त्या रात्री गेस्ट हाऊसमध्ये उतरलेल्या व्यापाऱ्याची पेटी लांबवावी असा मला विचार सुचला. तो विचार मी माझ्या मित्रांच्याजवळ बोलून दाखविला. आणि मित्रांनी व मी मिळून तो विचार ताबडतोब अमलातही आणला.

दुसऱ्या दिवशी त्या व्यापाऱ्यानं त्याची पेटी चोरीला गेल्याची तक्रार केली. पोलिस इन्स्पेक्टरला वर्दी देताच माझ्या वडिलांचं धाबं दणाणलं. वडिलांना माझा संशय आला. आता आपल्या अब्रूचे अधिक धिंडवडे निघू नयेत म्हणून वडिलांनी त्या व्यापाऱ्याला नुकसान भरपाई म्हणून पाचशे रुपये आणि पोलिस इन्स्पेक्टरला दोनशे रुपये देऊन ते चोरीचं प्रकरण तसंच दाबून टाकलं. पण त्यामुळं मी मात्र अधिकच मोकाट सुटलो. आणि त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला.

कारण पुढच्या आठवड्यातच मी गेस्ट हाऊसमध्ये दुसरी चोरी केली. एक मोठा व्यापारी मुंबईहून आला होता. त्याच्या मनगटावरचं भारी किंमतीचं घड्याळ, त्याला असलेली सोन्याची साखळी आणि त्या व्यापाऱ्याचा श्रीमंती थाटाचा पोशाख पाहताच माझ्या तोंडाला पाणी सुटलं. त्याचं घड्याळ लांबवायचं असा मी मनोमनी निश्चय केला. या बाबतीत मित्राबित्रांचं सहाय्य न घेता, एकट्यानंच हे काम पार पाडायचं असा माझा बेत होता. म्हणून तो व्यापारी गेस्टहाऊसमध्ये आल्यापासून मी त्याच्यावर पाळत ठेवली. आणि तो व्यापारी बाथरूममध्ये जाताच मी मोठ्या शिताफीनं त्याच्या खोलीमध्ये शिरून एक हजार रुपयांची रोकड व ते सोन्याच्या साखळीचं भारी किंमतीचं घड्याळ लांबवलं.

पण तो व्यापारी काही लेचापेचा नव्हता. त्याची थेट मिनिस्टरपर्यंत ओळख असल्यानं सर्व अधिकारी त्याच्या परिचयाचे होते. त्यानं फोनवरून

मुंबईच्या मोठ्या अधिकाऱ्यांना खडसावताच पोलीस अधिकाऱ्यांची पाचावर धारण बसली. खुद्द पोलिस सुपरिंटेंडेंट पोलिसांच्या जीपमधून अनेक पोलिसांना घेऊन आला आणि त्यानं आमच्या पत्ते खेळायच्या अडड्यालाच गराडा घातला. त्यावेळी मी दारूच्या नशेत गुंग झालो होतो. पत्त्याचा डाव रंगात आला होता. माझा खिसा इतका गरम झाला होता की, मी स्वतःला कुणीतरी भलताच मोठा मनुष्य समजू लागलो होतो.

त्या दिवशी पत्ते खेळणाऱ्या अड्ड्यावरच्या सर्व मित्रांना माझ्यातर्फे मी मिठाई खायला दिली होती. एवढंच नव्हे तर पत्ते खेळून झाल्यावर गुड्लक हॉटेलमध्ये पार्टी द्यायचंही कबूल केलं होतं.

पण हाय ! हाय ! माझे सर्व बेत तसेच राहिले. पोलिस सुपरिन्टेंडेंटनं त्या पत्त्यांच्या अड्ड्यावरच आम्हा सर्वांना अटक केली. मला मुद्देमालासकट पकडून माझ्या हातात तिथल्यातिथं त्या अधिकाऱ्यानं बेड्या घातल्या. रात्री दहा साडेदहाच्या सुमाराला भररस्त्यातून मला पायीपायी फरफटत नेण्यात आलं. मला गेस्ट हाऊसमध्ये नेल्यावर त्या नोटावरचे नंबर त्या व्यापाऱ्यानं त्याच्या डायरीत लिहिलेल्या नंबराशी ताडून पाहिले. त्या नोटा त्याच्याच होत्या. त्याचं भारी किमतीचं घड्याळ व ती सोन्याची चेन पाहून तो खूष झाला. मी गेस्ट हाऊसच्या मालकाचा मुलगा असल्याचं त्याला समजताच मला सोडून देण्यात यावं असं त्यानं बोलून दाखवलं. त्या वेळी माझी खात्री झाली की, त्या व्यापाऱ्याला जी दयाबुद्धी सुचली ती माझ्या ऐवजी माझ्या वडिलांच्या चांगल्या वर्तणुकीची जाणीव झाल्यामुळेच. कारण तो व्यापारी आमच्या गेस्ट हाऊसमधे बऱ्याच वर्षांपासून येत होता. परंतु पोलिस सुपरिन्टेंडेंटनं त्या व्यापाऱ्याचं म्हणणं ऐकलं नाही. मला पोलिस स्टेशनवर नेऊन कोठडीत बंद करण्यात आलं.

मला पोलिसांनी पकडून आणि हातांत बेड्या घालून भर रस्त्यातून फरफटत नेल्यामुळं आमच्या घरात मोठाच हाहाक्कार उडाला. माझ्या आईच्या डोळ्यांना धारा लागल्या. ‘माझ्या मुलाला वाचवा ! माझ्या जनार्दनला वाचवा !’ असं म्हणून ती धाय मोकलून रडू लागली.

परंतु माझ्या वडिलांनी माझ्या आईला सांगितलं की तू एवढा आकांड-तांडव करू नकोस. त्याला सक्त मजुरीची शिक्षा झाल्याशिवाय तो वठणीवर येणार नाही. तो किती वाह्यात झाला आहे हे तुला माहीत नाही. त्यानं आपल्या तोंडाला एवढं काळं फासलं हे बस्स झालं. आता त्याला शिक्षा झालीच पाहिजे. रोग फार वाढला की ऑपरेशन करायलाच पाहिजे. आता त्याला जामिनावर सोडण्यात किंवा त्याचा बचाव करण्यात काही अर्थ नाही. त्यानं आपल्या अब्रूचे धिंडवडे

काढले तेवढे पुरे झालेत. लोक तर म्हणत आहेत की मीच त्याला चोरी करायला सांगितली असली पाहिजे. म्हणजे पचली तर पचली नाहीतर, झाली तर झाली थोडी फार शिक्षा ! म्हणून मी तर म्हणतो की त्याला थोडे दिवस तुरुंगाची हवा खाऊ दे. म्हणजे तो वठणीवर आला तर येईल.

हे वडिलांचं बोलणं आईला फारच झोंबलं. तिला अधिकच भडभडून आलं. ती माझ्या वडिलांना वाटेल तशी बोलली. ती रडता रडता म्हणाली,

" आग लावा तुमच्या पैशाला ! तुम्हाला तर पैसाच प्यारा आहे. लोक मुलासाठी नवस करतात आणि तुम्ही खुशाल म्हणता की माझा नि मुलाचा काही संबंध नाही असं मी पोलिसात लिहून देणार म्हणून ! "

शेवटी माझ्या आईपुढं माझ्या वडिलांचं काही चाललं नाही. आईनं मला जामिनावर सोडवून आणायला वडिलांना भाग पाडलं. आणि ---- आणि मला असं वाटतं की आईनं माझ्या जीवनाचा पुरता घात केला. कारण ---

कारण लहानपणीही आईनं माझं असंच अहित केलं. शाळेत जायचं वय असताना मी पाटीदप्तर घेऊन खुशाल मित्रांच्याबरोबर नदीवर हिंडत असे. दिवसभर नदीवर पोहायचं, नंतर कुणाच्या तरी मळचात जाऊन बोरं, चिंचा किंवा जे मिळेल ते चोरून खायचं आणि नंतर शाळा सुटण्याच्या सुमाराला चुपचाप घरी परत यायचं ! हा माझा दिनक्रम अगदी ठरून गेला होता. मी परीक्षेत नापास झाल्यामुळं वडिलांना कळलं की, मी शाळेत न जाता नदीवर हिंडत असतो. म्हणून वडिलांनी मला खूप चोप दिला. शिवाय शाळेत जाऊन शिक्षकांना सांगितलं की, जनार्दन शाळेत आला नाही तर त्याला खूप शिक्षा करा. त्याचं मांस तुमचं आणि हाडं आमची असं समजा !

पण त्याही वेळी आईनं माझीच बाजू घेतली. " जनार्दन शिकला तर शिकला अन् नाहीतर नाही ! कुठं त्याला कारकुनी करायची आहे ? नुसतं गेस्ट हाऊस सांभाळलं तरी बस् झालं. " असं पुन्हा पुन्हा बोलून आईनं मला बेतालपणानं वागायला अप्रत्यक्षपणानं फूसच दिली. लहान मुलांना मारू नये हे खरं ! परंतु कधी कधी अपरिहार्य परिस्थितीत लहान मुलांनासुद्धा मार देण्याची आवश्यकता असते. आईची फूस मिळाल्यामुळं मी शाळेत जाणं सोडून दिलं. एकाच वर्गात लागोपाठ दोन वर्षं नापास झाल्यामुळं मराठीची चार पुस्तकं कशीबशी शिकल्यावर शाळेला मी जो रामराम ठोकला तो कायमचाच. त्यामुळं धड शिक्षण नाही, धड चांगलं वळण नाही आणि चांगल्यांची संगत नाही यामुळं मी अधिकच बेताल बनलो. नदीचं पाणी नेईल तिकडे शेवाळ जसं वहात जातं, तसं वाईट व्यसनामुळं बेताल झालेले मित्र जिकडे नेतील तिकडे मी वाहवत चाललो. माझ्या या

अशा वागणुकीनं नुसता मीच दुःखी आहे असं नव्हं तर मी माझ्या आईवडिलां-नाही दुःखाच्या खाईत लोटून दिलं आहे.

पण मला आता असं पुन्हा पुन्हा वाटतं की, आईनं निदान त्या दिवशी तरी वडिलांना गळ घालून मला जामिनावर सोडवून आणायला नको होतं. कारण त्यामुळं मी अधिकच वाईट वर्तन करू लागलो. माझं पत्ते खेळायचं व्यसन पुन्हा सुरू झालं. आता मी निरनिराळ्या ओळखीच्या लोकांकडून पैसे व्याजानं घेऊ लागलो. आणि तसं सरकारी स्टँपवर खुशाल लिहून देऊ लागलो. बरं हे तर हे पण मी त्यावेळी इतका मूर्ख बनलो होतो की सांगता सोय नाही. मी पत्त्यांच्या खेळात लागोपाठ हारत होतो. तरीपण माझं व्यसन सुटेना. आणि पत्ते खेळताना बाकीचे तिघेजण एकमेकांना खुणा करून मला फसवीत होते हे दिसत असूनही मी त्यांच्या डावात अधिकाधिक अडकला जात होतो. बुडत्याचा पाय खोलात असं जे म्हणतात ते काही खोटं नाही.

पत्ते खेळण्यापायी मला हजार बाराशे रुपये कर्ज झालं. तेव्हा कर्ज देणारे लोक माझा पिच्छा करू लागले. मला वाटेल तशी धमकी देऊ लागले. एका व्यापाऱ्यानं तर मला दमदाटी देण्यासाठी माझ्या पाठीशी एक गुंड लावला होता. तो मला रात्री बेरात्री भेटून धमकी देऊ लागला. ' मी जीवंत मारून टाकीन' असंही तो म्हणू लागला. त्यामुळं मी भितीनं गांगरून गेलो. म्हणून मागचा पुढचा विचार न करता गेस्ट हाऊसच्या शेजारीच राहणाऱ्या गृहस्थाच्या घरी चोरी करायचं मी ठरवलं. त्याचं कापडाचं दुकान असल्यानं तो मोठा धनवान मनुष्य होता. त्या रात्री तो झोपलेला आहे असं पाहून आम्ही त्याच्या घरात प्रवेश केला. त्या मालकाला अंथरुणातच आम्ही बेदम मारलं. तेव्हा त्यानं मुकाट्यानं तिजोरीच्या किल्ल्या आम्हाला दाखवल्या. आम्ही तिजोरीतले दागिने व रोकड लांबवली. परंतु पोलिसांनी तिसऱ्याच दिवशी मुद्देमालासकट आम्हाला पकडलं.

त्या व्यापाऱ्याला ठार मारण्याचा आमचा इरादा होता हे कोर्टात सिद्ध झालं. तो व्यापारी सहा महिने हॉस्पिटलमध्ये पडून होता. या व इतर आरोपांवरून मला पाच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. त्यातले अजून पुरते पाच महिनेही लोटले नाहीत. आता हे राहिलेले दिवस केव्हा सरतील कुणास ठाऊक !

माझा मोठा भाऊ थोडंफार शिकलेला आहे. तो वडिलांना त्यांच्या धंद्यात मदत करतो. तो मला तुरुंगात कधीही भेटायला येत नाही. तो म्हणतो की करावं तसं भरावं. वडिलांनी सरकारांत लिहून दिलं आहे की, माझा जनार्दन

नावाचा मुलगा बावीस वर्षांहून मोठा आहे. मलंबुरं समजायला त्याचा तो समर्थ आहे. त्याचा माझा यापुढं काहीही संबंध उरलेला नाही. यापुढं कुणीही त्याला कर्ज वगैरे दिल्यास त्याची जबाबदारी मजवर नाही.

असा मजकूर वडिलांनी वर्तमानपत्रातूनही प्रकाशित केला आहे. त्यामुळं मला पुन्हा पुन्हा वाटतं की मला आता कुणी नाही ! मला आता कुणीही नाही !"

असा विचार येताच जनार्दनचे डोळे अधिकच भरून आले. आता रात्रीचे जवळजवळ दोन वाजले होते. चंद्राचा शीतल प्रकाश सर्वांना सुखवीत होता. कित्येक घरांच्या गच्चीवर घोळक्या घोळक्यानं एकत्र जमलेले लोक चंद्रप्रकाशात आटवलेलं गोडगोड दूध पिण्यात मग्न झाले होते. परंतु जनार्दन मात्र पश्चात्तापामुळं जास्त जास्त दु:खी होत होता. त्याच्या खोलीत अंधार पसरला होता आणि त्याच्या अंत:करणात विचारांचं काहूर उठलं होतं. तो मनातल्या मनात म्हणत होता,

"आईनं मला इतक्या लाडात वाढवलं नसतं तर ! आईनं मला शिक्षण घ्यायला भाग पाडलं असतं तर ! आईनं मला चांगल्याची संगत लावली असती तर ! !"

या विचारांमुळं त्याच्या डोळ्यांतल्या अश्रूंचा ओघ त्याला काही केल्या आवरता येईना !

६

# जी वेळ गेली, ती गेली

मी पुण्याला शिकत असताना आम्ही काही मित्रांनी एक जॉली क्लब स्थापन केला होता. दर रविवारी पाळीपाळीनं एकेका सभासदाच्या घरी सर्वांनी जमायचं आणि हास्यविनोदात वेळ घालवायचा हा आमच्या जॉली क्लबचा मुख्य उद्देश होता. विशेषतः पोहे, केळी, बिस्किटं यांच्यावर ताव मारून शेवटी चहा किंवा कॉफी घ्यायची असा आमचा परिपाठ होता. यात किती वेळ जात असे त्याला सीमा नव्हती. कारण त्या दिवशी वेळेचं बंधन नसावं असा आमचा कटाक्ष होता.

पुढं पुढं आमच्या जॉली क्लबतर्फे आम्ही निरनिराळी प्रेक्षणीय स्थळं पाहायला जाऊ लागलो. अशा तऱ्हेनं कार्ल्याची लेणी आणि भाजाची लेणी आम्ही पाहिली. शिवनेरीचा किल्ला व सिंहगडचा सुप्रसिद्ध किल्लाही आम्ही पाहिला. पुढं आम्ही माथेरान व महाबळेश्वरलाही जाऊन आलो. कधी कधी आमच्या जॉली क्लबतर्फे कुणाचं सतारवादन तर कुणाच्या नकलांचा कार्यक्रम किंवा कुणाचं अनौपचारिक संभाषण असाही कार्यक्रम आम्ही घडवून आणीत असू. आमचा हा जॉली क्लब पुढं बराच लोकप्रिय झाला. याची नक्कल म्हणून कुणी 'न्यू जॉली क्लब' तर कुणी 'सोशल जॉली क्लब' स्थापन केले. परंतु आमच्या जॉली क्लबला जी लोकप्रियता लाभली ती दुसऱ्याच्या वाटचाला आली नाही. एखाद्या वेळी एखाद्या नामवंत साहित्यिकाला किंवा शिक्षणतज्ज्ञाला बोलवून त्याचं भाषणही आम्ही घडवून आणीत असू. मात्र हा असला भाषणाचा कार्यक्रम दोनचार महिन्यांतून मोठ्या मुष्किलीनं एखाद्या वेळी घडत असे. कारण भाषणं ऐकायचा आम्हांला मनापासून कंटाळा होता. हास्यविनोदात सुटीचा वेळ घालवणं हा आमचा सिद्धांत असल्यानं आम्ही त्यालाच जास्त महत्त्व देत असू.

या जॉली क्लबमध्ये गेलेला वेळ सत्कारणी लागला असं मला आजही वाटतं. चारचौघांच्या सहवासात आपला आनंद द्विगुणित होतो आणि आपलं दुःख आपोआपच विभागलं जातं असा माझा अनुभव आहे. या आमच्या जॉली

क्लबतर्फे झालेलं एका विद्वानाचं भाषण आज वीस वर्षांनंतरही माझ्या मनात जसंच्या तसं कोरलं गेलं आहे. यावरून ते किती महत्त्वपूर्ण असेल याची कल्पना येईल. माझ्या प्रमाणंच ते भाषण आपणांसही तितकंच मोलाचं वाटेल असा मला भरवसा वाटतो.

एकदा आमच्या जॉली क्लबमध्ये अशी टूम निघाली की 'माझं जीवन-विषयक तत्त्वज्ञान' या विषयावर बोलायला काही विद्वानांना सांगावं. हा विचार श्री. प्रभाकर दत्तात्रय मेढी यांनी मांडताच श्री. एकनाथ वेडूजी आहिरे, श्री. प्रमोद दिनकर महाजन, मेजर प्रभाकर काशीनाथ सोमण, प्रोफेसर जगन्नाथ संभाजी आर्वीकर आणि सध्या दिवंगत झालेले भीमगौंडा आदगौंडा पाटील यांनी त्याला ताबडतोब दुजोरा दिला. म्हणून आम्ही अनेक नामवंत स्त्रीपुरुषांना भेटलो. परंतु या विषयावर बोलायला कुणी तयार होईना. कारण बरोबरच आहे हा विषय वाटतो तितका सोपा नाही. आणि शिवाय असं की या विषयावर बोलायचं तर स्वतःचं अंतःकरण उघडं करून दाखवण्यासारखंच होतं. कारण त्या शिवाय 'माझं जीवनविषयक तत्त्वज्ञान' या विषयावर काय बोलणार ?

एके दिवशी महाराष्ट्रातले एक सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉक्टर गजानन श्रीपाद खैर यांनी या विषयावर बोलावं अशी विनंती आम्ही त्यांना केली. तेव्हा ते म्हणाले "मी कोणत्या विषयावर बोलावं याचं बंधन मजवर नसल्यास मी बोलायला तयार आहे." हे ऐकून आम्ही सांगितलं की आपणास पाहिजे त्या विषयावर आपण बोला. पण जरूर या. त्याप्रमाणं ठरलेल्या दिवशी ते व्याख्यानासाठी आले. तेव्हा पुष्पहार घालून आम्ही त्यांचं स्वागत केलं. नंतर प्रास्ताविक दोन शब्द बोलताना मी म्हटलं,

"आमच्या या जॉली क्लबचं आमंत्रण आमच्या अण्णांनी स्वीकारलं आणि त्याप्रमाणं ते इथं आलेले आहेत हे पाहून आम्हा सर्व सभासदांना अत्यानंद झाला आहे. 'माझं जीवनविषयक तत्त्वज्ञान' या विषयावर बोलावं म्हणून आम्ही काही श्रेष्ठ व्यक्तींना भेटलो. परंतु कुणी होकार दिला नाही. आज अण्णांच्यावरही विषयाचं बंधन नाही. त्यांना पाहिजे त्या विषयावर त्यांनी बोलावं. आम्ही त्यांचं भाषण ऐकायला उत्सुक आहोत. कारण या वर्षातलं हे पहिलंच भाषण होणार आहे. आपल्या जॉली क्लबचं आमंत्रण अण्णांनी स्वीकारलं आणि काहीही सबब न सांगता त्याप्रमाणं ते इथं आले, याबद्दल आपल्या सर्वांच्या वतीनं मी त्यांचं पुन्हा अभिनंदन करतो. आणि त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी अशी विनंती करतो."

हे ऐकून अण्णांना आनंद झाला. ते भाषणाला उभे राहिले आणि म्हणाले,

" जॉली क्लबच्या सभासदांनो ! आपण मजवर विषयाचं बंधन घातलं नाही ही आनंदाची गोष्ट आहे. तुमच्या या जॉली क्लबमध्ये भाषणाच्या ऐवजी इतर कार्यक्रमावरच अधिक भर देण्यात येतो असं मी ऐकलं आहे आणि भाषण असलंच तर ते संभाषणाच्या रूपानं असावं असा आपला कटाक्ष आहे. तेव्हा आज मी भाषणाच्या ऐवजी तुमच्याबरोबर संभाषण करायलाच आलो आहे असं समजा.

आता सुरुवातीलाच तुम्हांला सुप्रसिद्ध राजा भोज याच्या जीवनातली एक हृदयस्पर्शी घटना सांगतो. ती मी कां सांगत आहे हे तुमच्यापैकी कुणी मला मागाहून सांगितलं तर मला अर्थातच आनंद होईल. असं सांगतात की राजा भोज लहान असताना त्याला ठार मारण्यासाठी त्याच्या काकानं मारेकऱ्यांबरोबर त्याला अरण्यात पाठवून दिलं. कारण भोजाचा निकाल लावल्याशिवाय आपल्याला गादीवर बसता येणार नाही हे त्याला ठाऊक होतं. मारेकऱ्यांच्या मनात मात्र लहान भोजाविषयी प्रीती वाटत होती. परंतु चुलत्याच्या आज्ञेपुढं त्यांना काही करता येण्यासारखं नव्हतं. रस्त्यानं चालताचालता भोजाचा निर्व्याज स्वभाव पाहून व त्याचं सरळ संभाषण ऐकून मारेकऱ्यांचं मन अधिकच द्रवलं. चार-पाच मैल चालून गेल्यावर बाल भोजानं मारेकऱ्यांना विचारलं,

" तुम्ही मला जंगलात का घेऊन चाललात ? " हे ऐकून मारेकरी म्हणाले,

" तुमच्या चुलत्यांचा तसा हुकूम आहे आम्हांला, म्हणून ! "

" काय हुकूम आहे माझ्या काकांचा ?"

" आपल्याला जिथं जायचं आहे तिथं पोचल्यावर आपल्याला काकांची आज्ञा आम्ही सांगू ! "

" कां बरं ? आताच सांगा की ! "

हे ऐकून मारेकऱ्यांचे कंठ दाटून आले. ते सद्गदित होऊन म्हणाले,

" बाल राजे ! आपल्याला काकांची आज्ञा कशी सांगावी हे आम्हांला समजत नाही. याबद्दल क्षमा असावी ! "

" हे बघा, तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. माझ्या काकांचा कोणताही हुकूम असला तरी तो मला मान्य आहे. आणि त्याप्रमाणं वागायला मी एका पायावर तयार आहे. मग तर झालं ! आता तुम्हाला सांगायला काय हरकत आहे ?"

हे ऐकून मारेकऱ्यांना अधिकच वाईट वाटलं. त्यांनी बाल भोजाला जवळ घेऊन कुरवाळलं. त्या वेळी त्यांच्या चित्तात विचारांचं काहूर उठलं होतं. त्यांच्या डोळ्यांवाटे अश्रू ओघळत होते.

परंतु बाल भोजानं फारच आग्रह धरल्यामुळं मारेकऱ्यांपैकी वृद्ध अशा एकानं खाली मान घालून सांगितलं,

" महाराज ! आपल्याला ठार मारावं असा काकांचा आम्हांला हुकूम आहे ! "

हे ऐकून बाल भोजाला आश्चर्याचा आणि भीतीचा मोठाच धक्का बसला. कारण काका जरी गादीवर बसले असते तरी त्याला आनंदच झाला असता ! तेव्हा झालेलं दुःख आतल्याआत गिळून टाकण्यासाठी त्यानं थोडा वेळ डोळे मिटून घेतले. आलेले अश्रू पुसून टाकले आणि थोडा वेळ आपल्या इष्ट देवतेचं स्मरण केलं. त्यामुळं त्या कठीण परिस्थितीतही त्याला मोठा धीर आला. नंतर शांत चित्तानं तो मारेकऱ्यांना म्हणाला,

" ठीक आहे ! मला ठार मारावं अशी जर माझ्या काकांची इच्छा आहे तर त्याला माझी तयारी आहे. आणि हे बघा ! आपण वाईट वाटून घेऊ नका. पण आपल्याला माझी अशी विनंती आहे की मी काकांना एक पत्र लिहितो ते त्यांना जरूर द्या ! "

बाल भोजाचा हा सात्विक भाव पाहून मारेकऱ्यांचं मन अधिकच द्रवलं. त्यामुळं रस्त्यानं आणखी पुढं चालता चालता भोजाला ठार मारायचं नाही असा त्यांनी मनोमनी पक्का निश्चय केला. मग काकांनी आपल्याला फाशी दिलं तरी चालेल ! एखाद्या रानटी पशूला ठार मारून त्याच्या रक्तानं भोजाचे कपडे भिजवायचे आणि ते काकांना नेऊन दाखवायचे असा त्यांनी पक्का बेत केला.

आणि मग ठरल्याप्रमाणं तेच नाटक मारेकऱ्यांनी केलं. रानटी पशूच्या रक्तानं माखलेले भोजाचे कपडे मारेकऱ्यांनी धारानगरीला परत गेल्यावर काकांच्या समोर ठेवले. तसंच भोजाचं पत्रही काकांना दिलं. आणि माना खाली घालून खिन्न मनानं ते उभे राहिले.

' भोजाला अरण्यात घेऊन जा आणि त्याला तिकडे ठार करा ' असा हुकूम फर्मावल्यानंतर मारेकरी त्याप्रमाणं बाल भोजाला जंगलात घेऊन गेले. पण नंतर जसजसा काळ लोटू लागला तसंतसं काकांचं मन अधिकाधिक विरघळायला लागलं. त्यांच्या मनानंच त्यांना धारेवर धरलं. त्यांचं एक मन म्हणू लागलं,

"मी म्हटलं असतं की तू लहान आहेस तर मीच राजा होतो. तर भोजानं विरोध केला असता का ?"

"छे, मुळीच केला नसता !"

"मग त्याला ठार मारायचा हुकूम आपण काय म्हणून सोडला ?"

या आणि असल्याच विचारांनी काकांना बेजार करून सोडलं होतं. आणि आता ते रक्तानं भिजलेले भोजाचे कपडे प्रत्यक्ष पाहून काकांचं मन अधिकच करपून गेलं. त्यांच्या सर्व शरीरावर भीतीचे शहारे आले. त्यांची बोबडी वळली. दे माय धरणी ठाय अशी त्यांची अवस्था झाली. अश्रू ढाळताढाळता ते मोठमोठ्यानं रडू लागले.

"मी चांडाळ ! मी दुष्ट ! मी नीच ! मी पातकी ! मी कपटी ! मी उलट्या काळजाचा ! मी फार मोठं पातक केलं ! खरोखर मी फारच मोठं पातक केलं ! माझा भोज ! भोजा ! अरे भोजा ! तू पत्रात लिहितोस तेच खरं ! म्हणतो कसा पत्रात, "

"काका ! तुम्हाला राजा व्हायचं होतं तर मला ठार मारायची आवश्यकता नव्हती. खरं म्हणजे मी एवढा लहान आहे की मी राज्य काय करणार ? आणि समजा मी गादीवर बसलो असतो तरी राज्यकारभार तर तुम्हालाच पहावा लागला असता. पण ते आता जाऊ द्या."

काका ! आता तुम्ही सुखानं राज्य करा ! ईश्वर तुम्हाला ऐश्वर्य, वैभव आणि सुख देवो, अशी त्या दयाघन भगवंताच्या चरणी मी नम्र प्रार्थना करतो !

आणि काका ! आता हे माझं शेवटचंच पत्र आहे तुम्हाला ! तेव्हा माझ्या मनात आलेला एक विचार आपल्यासमोर मांडायची आज्ञा मागतो. आता मला थोड्याच वेळात मरण येणार आहे. आणि आपल्याला मात्र पुष्कळ वर्षं राज्य केल्यावर मग मरण येईल. एवढाच काय तो फरक ! पण म्हणून आपल्याला मरण येणारच नाही असं मला वाटत नाही. एवढे राम आणि कृष्ण पण त्यांनाही मृत्यूनं सोडलं नाही.

पण कुणी सांगावं ? काका ! तुम्हाला कदाचित् देवानं अमरपट्टा दिला असेल. म्हणून तुम्हाला मृत्यू येणार नाही. या काळाचं बंधन मात्र विश्वातल्या चराचरावर आहे. पण कुणी सांगावं ? याला कदाचित् तुम्ही अपवाद असाल ! ही पृथ्वी अजून तरी कुणाबरोबर गेली नाही. ती आता कदाचित् तुमच्याबरोबर जाणार असेल ! कुणी सांगावं ? तुम्ही काळावरही मात करणार असाल ! मी लहान तोंडी मोठा घास घेतला त्याबद्दल क्षमा करा !

आपला, छे आपला कुणीही नसलेला

— भोज"

हे भोजाचं पत्र वाचतावाचता काकांचा कंठ अधिकच दाटून आला. काका खरोखरच पश्चात्तापदग्ध झाले. ते एकदम उद्गारले,

"अरे! माझ्या भोजाला भेटवा ! अरे ! कुणीतरी माझ्या भोजाचं दर्शन घडवा ! भोजा, मी पातकी ! मी कसला तुझा काका ! भोजा ! बाळा ! आता मी काय करू ?" असं म्हणून काकांनी अधिकच टाहो फोडला.

कोणत्याही दुःखावर काळासारखं दुसरं औषध नाही असं म्हणतात. पण याला भोजाचे काका मात्र अपवाद ठरले. कारण जसजसे दिवस लोटत चालले तसंतसं काकांचं दुःख वाढतच गेलं. ते गादीवर बसले नाहीत. भोजाच्या आठवणीशिवाय त्यांना चैन पडेनाशी झाली. त्यांना खरोखरच उपरती आली होती. या विषयी पूर्ण खात्री झाल्यावर एके दिवशी ते चारही मारेकरी काकांच्यासमोर गेले आणि लवून मुजरा करून म्हणाले,

"महाराज ! एक विनंती आहे !"

"बोला ! बोला ! काय सांगायचं आहे तुम्हाला ?"

"महाराज ! भोजाबद्दल बोलायचं आहे ! "

"सांगा ! सांगा ! माझ्या भोजाबद्दल जरूर सांगा ! अरे ! त्याला जिवंत घेऊन या ! चांडाळांनो ! तुम्ही खरोखरच मारलं की काय त्याला ! तुम्ही माझ्या भोजाला घेऊन या. मी तुम्हाला पाहिजे ते बक्षीस देईन. पण कसंही करून माझ्या सोनुल्याची भेट करवा. मी त्याला केव्हा पाहीन असं मला झालंय !"

हे ऐकून मारेकऱ्यांना धीर आला. ते मुजरा करून निघून गेले. आणि लौकरच बाल भोजाला जंगलातल्या एकांत स्थळाहून परत घेऊन आले. कुमार भोजाला सुखरूप आलेला पाहताच काकांना स्वर्ग ठेंगणा वाटू लागला. काकांनी भोजालाच गादीवर बसवलं. त्या जीवदान देणाऱ्या चारही मारेकऱ्यांना काकांनी फार मोठं बक्षीस दिलं.

पुढे भोज राजानं गादीवर बसल्यावरही काकांचा सतत सन्मान केला. त्यामुळं काकांना अखेरपर्यंत खुषी होत होती. या भोज राजानं प्रजेची फार सेवा केली. आपण प्रजेचे सेवक आहोत ही भावना भोज राजाच्या अंतःकरणात देव्हाऱ्यातल्या निरांजनाप्रमाणं सतत तेवत होती. भोज राजा मोठा विद्याप्रिय होता. असं सांगतात की भोज राजाच्या राज्यात बरेच लोक विद्यासंपन्न होते. राजा भोजानं स्वतः साहित्यशास्त्रावर ग्रंथ लिहिले आहेत. या वरून या राजाची महती सहज पटण्यासारखी आहे.

आजही धार येथील भोजशाळा, मुंज तलाव आणि इतर अनेक स्मारकं भोज राजाची आठवण करून देतात. त्या तलावाला गोलाकार वळसा घालून जाणारा रस्ता, त्या रस्त्याला लागून एका बाजूनं असलेले मोठमोठे आम्रवृक्ष, त्या

मराठी ग्रंथ संग्रहालय
१६६०९



तलावाच्या पश्चिमेस असलेल्या टेकडीवरील कालिकादेवीचं उंच आणि भव्य देवालय, पूर्वेच्या बाजूस असलेलं नित्यानंद महाराजांचं चित्ताकर्षक मंदिर, प्रातःकाळी अरुणोदयाची तांबूस किरणं तलावाच्या पृष्ठभागावर पडताच लाल, पांढरी आणि इतर रंगाची उमललेली कमळं व वाऱ्याबरोबर पाण्यावर उठणारे तरंग आणि त्यामुळं त्या नयनमनोहर कमळांचं तालावर चाललेलं नृत्य पाहिल्यावर स्वर्गीय सुखाचा आनंद ज्याला झाला नाही, असा मनुष्य तुम्हाला सापडणार नाही. आपल्या या भारतवर्षातले जे राजे अजरामर झाले आहेत त्यात भोज राजाचीही गणना होते एवढं सांगितलं म्हणजे पुरे !

ही भोज राजाची गोष्ट मी तुम्हाला का सांगितली याचा तुम्ही विचार करा. माझा हेतू स्पष्ट झाला नसेल असं मला वाटत नाही. परंतु तरीही माझा विचार अधिक स्पष्ट करण्यासाठी मी एका पाश्चिमात्य लेखकाच्या जीवनातली गमतीची गोष्ट सांगतो.

त्या लेखकाच्या ओळखीचे गृहस्थ एकदा त्यांना भेटायला आले आणि म्हणाले,

"स्पेन्सरसाहेब ! मला आपलं एक पुस्तक विकत घ्यायचं आहे. म्हणून मी मुद्दाम आपल्या घरी आलो आहे." हे ऐकून स्पेन्सरसाहेब म्हणाले,

"आपण माझं पुस्तक घ्यायला आलात ही खरोखर आनंदाची गोष्ट आहे. आपल्याला पुस्तकाच्या किती प्रती हव्या आहेत ?"

"पण अगोदर पुस्तकाची किती किंमत आहे हे तर सांगा !"

"पुस्तकाची किंमत पंधरा शिलिंग आहे." हे ऐकून ते गृहस्थ म्हणाले,

"अहो ! काही कमी करा की किंमत ! मी मुद्दाम घरी आलो तरी तुम्ही तेवढीच किंमत सांगता ! हे कसं काय ?"

"आता पुस्तकाची किंमत सोळा शिलिंग आहे !" असं स्पेन्सरसाहेब शांत चित्तानं बोलले. हे ऐकून तो गृहस्थ अधिकच बुचकळ्यात पडला. तो म्हणाला,

"वा राव ! थोड्या वेळापूर्वी पुस्तकाची किंमत पंधरा शिलिंग ही तुम्हीच सांगितली आणि आता सोळा शिलिंग सांगता, हे कसं काय ! मी किंमत कमी करा म्हणून म्हटलं, तर तुम्ही उलट जास्त किंमत मागता ! माझी थट्टा करता की काय ?"

तेव्हा स्पेन्सरसाहेब पुन्हा शांत चित्तानं म्हणाले,

"छे छे ! मी आपली मुळीच थट्टा करीत नाही. परंतु भेटीची वेळ अगोदर न ठरविता आपण माझा आतापर्यंतचा वेळ काय म्हणून घेतला ? आता आपल्याला पुस्तकाची किंमत सतरा शिलिंग द्यावी लागेल. ती सुद्धा

आताच दिली तर ! आणि माझा अधिक समय घ्याल तर पुस्तकाची किंमत वाढतच जाईल. अहो ! वेळेची किंमत तुम्हाला नसली तरी मला फार आहे !"

तेव्हा त्या गृहस्थांनी मुकाट्यानं पुस्तकाची किंमत म्हणून सतरा शिलिंग दिले आणि ते एक प्रत घेऊन गेले.

यावरून वेळेचं महत्त्व स्पेन्सरसाहेब किती मानीत होते हे आपल्या लक्षात येईल.

महाराष्ट्रातले सुप्रसिद्ध कवी माधव ज्यूलियन यांनीही या विषयी आपले विचार मोठ्या मार्मिकपणानं 'भ्रांत तुम्हा कां पडे ?' या कवितेत मांडले आहेत. एका कडव्यात कवी म्हणतात,

"कायदा पाळा गतीचा, काळ मागे लागला,
थांबला तो संपला.
धावत्याला शक्ती येई आणि रस्ता सापडे.
भ्रांत तुम्हा का पडे ?"

या कडव्यातून कवीनं काळाच्या गतीचं त्रिकालाबाधित सत्य सांगितलं आहे. काळ सारखा पुढ जात आहे. काळाचंच दुसरं नाव गती असं आहे. काळ सतत चालत आहे. तेव्हा आपल्यालाही काळाबरोबर चाललं पाहिजे. यावर आपण अशी शंका घ्याल की पृथ्वी सतत फिरत आहे. तर तिच्याबरोबर हे पर्वत, हे महासागर आणि सर्व प्राणिमात्र जसे आपोआप फिरतात तसे आम्हीही फिरतच आहोत. म्हणजे 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा' याप्रमाणं आम्हीही गतिमानच आहोत. परंतु याला गतिमान असणं असं म्हणता येणार नाही.

उलट या अगाध अशा काळाच्या गतीपैकी जो काळ आपल्या वाट्याला आला आहे, त्याचा आपण जास्तीत जास्त उपयोग करून घेतला पाहिजे. आणि अशा तऱ्हेनं काळाचा उपयोग करून घ्यायचा तर मला अमुक अमुक कार्य करायचं आहे असा निदिध्यास आपल्याला लहानपणापासूनच लागला पाहिजे. आता हेच दुसऱ्या शब्दांत सांगायचं तर आपलं ध्येय साध्य करून घेण्यासाठी आपण काळावरही मात करायला शिकलं पाहिजे. परंतु हा गतीचा नियम न ओळखून जो मनुष्य आळसात वेळ घालवितो तो खरोखरच करंटा होय. असा मनुष्य सुखी होणं कदापिही शक्य नाही. असा मनुष्य म्हणजे भूमीला भार होय. तो जिवंत असून मेल्यासारखाच आहे. ज्यानं गतीचा नियम पाळला नाही अशा मनुष्याला कवीनं 'थांबला तो संपला' असं स्पष्ट शब्दांत बजावलं आहे.

म्हणूनच तर असं म्हणतात की गेलेली संपत्ती कष्ट करून पुन्हा मिळवता येते. गेलेलं आरोग्य व्यायामानं पुन्हा प्राप्त करून घेता येतं. परंतु

गेलेला काळ कधीही परत मिळविता येत नाही याची आपणांपैकी प्रत्येकानं मनोमनी खूणगाठ बांधली पाहिजे. आणि याच कारणासाठी 'आपण आहोत त्याहून आपणास मोठं व्हायचं आहे' हा विचार आपल्या मनात पुन्हा पुन्हा उचंबळून आला पाहिजे. त्याप्रमाणं प्रत्यक्ष कृती करायला आपण उत्सुक असलं पाहिजे. हरघडी 'अरे! आपल्याला असं असं करायचं आहे. अरेच्या हे तर अजून झालंच नाही! होय, होय, ते अमुक अमुक आताच करायला हवं!' अशा विचारांनी आपल्या मनात सारखी गर्दी केली पाहिजे. ही विचारांची टोचणी जबरदस्त असली तर आपल्या हातून आपल्याला हवं ते कार्य झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणजे आपले विचारच आपल्याला कार्यप्रवृत्त केल्याशिवाय राहणार नाहीत. आणि मग आपण स्वतःच सद्‌विचार व सदाचार यांची सांगड घातल्याशिवाय गप्प बसणार नाही. ही गोष्ट म्हटली तर सोपी आणि म्हटली तर अवघड अशी आहे. परंतु एकदा मनाचा हिय्या करून ठरविलेल्या ध्येयाकडे जाण्यासाठी आपण प्रत्यक्ष कृती करायला निश्चयानं, तळमळीनं आणि अंतःकरणापासून लागलो तर ही विचारांची व कृतीची जुळणी अगदी आपोआपच घडून येते. याची तुम्ही आपल्या अंतःकरणात पक्की खूणगाठ बांधून ठेवा.

कर्तृत्ववान लोक म्हणूनच काळाची फार कदर करतात. प्रत्येक गोष्ट वेळेवर व्हावी म्हणून जिद्द धरतात. त्यामुळं त्यांच्या कर्तृत्वाला आपोआपच गती येते. आणि ही गती वाढत गेली की ते काळावरही सहजासहजी मात करतात. म्हणजे उत्तम कार्य करून अमर होतात, अजरामर होतात. त्यांचं गुणगान काळाला हिरावून घेता येत नाही. ज्या गोष्टी वर्षोन्‌वर्षं स्वप्नातही साकार झाल्या नसत्या त्या ते प्रत्यक्ष कृतीनं करून दाखवतात. कारण ते गतिमान असतात.

आपला देश स्वतंत्र होऊन इतकी वर्षं लोटलीत तरी पुष्कळसे सुशिक्षित लोकही वेळेचं महत्त्व अजूनही ओळखत नाहीत ही मोठी लांछनास्पद अशी गोष्ट आहे. कोणतंही काम ठरलेल्या वेळी करायची लोकांना सवय नाही. त्यामुळं आपण 'इंडियन टाईम' प्रमाणं वागतो. आणि इंडियन टाईम म्हणजे तरी काय? तर जे काम जेव्हा करायचं तेव्हा न करता उशिरा करणं म्हणजे इंडियन टाईम प्रमाणं वागणं होय. जसं एखाद्या सभेला सुरुवात सहाला होणार असेल तर ती साडेसहाला किंवा त्याहूनही उशीरा करणं म्हणजे इंडियन टाईम प्रमाणं वागणं होय. अशा तऱ्हेनं प्रत्येक कार्य आपणापैकी पुष्कळजण ठरलेल्या वेळी वैयक्तिकरीत्या आणि सार्वजनिकरीत्या करीत नाहीत. आणि या विषयी आपणास थोडंसुद्धा वाईट वाटत नाही. उलट "अहो! हे चालायचंच! हा आपला इंडियन टाईम आहे!" असं म्हणून आपण वेळ मारून नेतो. अशा तऱ्हेनं वागणारे पुष्कळ लोक आपल्या देशात आहेत. म्हणून आपली व्हायला

हवी तेवढी प्रगती होत नाही. आपण जगाच्या मागेमागे रेंगाळत आहोत. या ऐवजी वेळेचं महत्त्व ओळखून आपल्यापैकी प्रत्येकजण आपलं काम वेळच्या वेळी व उत्तम तऱ्हेनं करील तर आपली वैयक्तिक व सामाजिक उन्नती व्हायला वेळ लागणार नाही.

हे काळाच्या गतीचं तत्त्व अबाधित आहे. खरं म्हणजे हे ईश्वराचंच रूप आहे. कारण ज्या क्षणी पृथ्वीची गती बंद होईल त्याच क्षणी पृथ्वी नष्ट होईल. परंतु गेल्या अगणित वर्षांपासून पृथ्वी गतिमान आहे आणि पुढंही अनंतकाळ-पर्यंत ती गतिमानच राहील असं समजायला काही हरकत नाही. हे गतीचं बंधन आपण पाळलं पाहिजे. हे लक्षात ठेवून जर आपण नियमितपणानं वागू आणि निश्चयपूर्वक आपल्या उद्योगात गर्क होऊन जाऊ तर आपल्याला वेळेचं ओझं कधीही वाटणार नाही. उलट आहे त्या परिस्थितीतही आपल्याला काही करामत करून दाखविता येईल. भोज राजाला बालपणातही मरणाचं भय वाटलं नाही. कारण त्याला काळाचं बंधन ठाऊक होतं. स्पेन्सरला वेळेचं महत्त्व फार वाटत होतं. म्हणूनच त्यानं त्या गृहस्थाकडून पुस्तकाची किंमत जास्त मागितली. पैसे जास्त मिळावेत यापेक्षा त्या पुस्तक विकत घेणाऱ्या गृहस्थाला वेळेचं महत्त्व पटावं अशी स्पेन्सरची इच्छा होती. विद्याप्रिय राजा भोज आणि तत्त्ववेत्ता स्पेन्सर हे दोघेही अमर झाले आहेत. कर्तबगारी करून त्यांनी काळा-वर कुरघोडी केली आहे. कारण त्यांची कीर्ती दिगंत पसरली आहे.

मित्रांनो ! तुम्ही मोठ्या प्रेमानं तुमच्या जॉली क्लबमध्ये मला बोलावलं. वास्तविक पहाता इथं सन्मानानं बोलावलेल्या पाहुण्यानं तुम्हाला जॉली म्हणजे आनंदी करावं अशी तुमची अपेक्षा आहे. परंतु कधीकधी उथळ हास्यविनोदा-पेक्षा आत्मचिंतन करणं हेही आवश्यक असतं. इथं येऊन पाहिजे त्या विषयावर बोलायची संधी तुम्ही सर्व सदस्यांनी मला दिली याबद्दल मी आपणा सर्वांचा आभारी आहे. आता मला एवढंच सांगायचं की, तुम्ही आपापल्या वाटचाला आलेलं काम काळावर मात करायची आहे अशा ईर्ष्येनं करायला लागा. म्हणजे मग तुम्ही खरोखरच जॉली झाल्याशिवाय राहणार नाही. जय हिंद !"

नंतर मी गुरुवर्य अण्णांचे आभार मानले. आणि चहापानानंतर त्या दिवसाचा कार्यक्रम संपला. थोड्या वेळानं आम्ही आपापल्या घरी निघून गेलो. परंतु त्या दिवशी त्या भाषणाचा माझ्या मनावर उमटलेला ठसा जणू काही आताच उमटला आहे, असं मला आजही अनुभवाला येत आहे.

## ७

# नियम म्हणजे नियम

चार साडेचार हजार वर्षांपूर्वी तो कार्तिकी एकादशीचाच दिवस होता. थंडी फार पडली होती. गेल्या दोन दिवसांपासून सूर्यदर्शन क्वचितच घडलं होतं. कडाक्याच्या थंडीमुळं सांदीपनी ऋषींच्या आश्रमातल्या शिष्यांना अंथरुणातच पडून राहावसं वाटत होतं. त्यातच आज कार्तिकी एकादशीनिमित्त पाठशाळेला सुट्टी होती. म्हणून थोडसं उशिरा उठलं तरी चालण्यासारखं होतं. आज शिष्यांना मनमानेल तिकडे अरण्यात जाऊन दिवस घालवायला परवानगी होती. कारण निसर्गाचा सहवास माणसाला अनेक गोष्टी आपोआपच शिकवतो असा सांदीपनी ऋषींचा विश्वास होता.

आश्रमातल्या सर्व शिष्यांत सर्वांच्या आधी उठणारा सुदामा त्या दिवशीही अगोदरच उठला आणि प्रातःस्नानासाठी आश्रमाबाहेर आला. तोच त्यानं पाहिलं की, सांदीपनी ऋषी पाठशाळेभोवतालच्या बागेला स्वतः पाणी घालीत आहेत. प्रथम त्याचा विश्वासच बसेना. कारण आश्रमातल्या सर्व बागेला विद्यार्थीच पाळीपाळीनं पाणी घालीत असत. आज श्रीकृष्णाची पाळी होती आणि तो नंतर पाणी घालणारच होता. म्हणून सुदामानं अधिक निरखून पाहिलं तेव्हा त्याची खात्री झाली की दुसरं तिसरं कुणीही नसून स्वतः सांदीपनी मुनीच बागेला पाणी देत होते. म्हणून तो श्रीकृष्णाला उठवायला आत धावला.

"श्रीकृष्णा ! ए श्रीकृष्णा ! अरे ऊठ लौकर ! ते पाहा, प्रत्यक्ष गुरुदेव बागेला पाणी देत आहेत. आज तर तुझी पाळी आहे ना ? मग हे कसं काय ?"

हे ऐकून श्रीकृष्ण खडबडून जागा झाला. हा हा म्हणता सर्वच आश्रमवासी जागे झाले. श्रीकृष्ण, सुदामा आणि इतर सर्व विद्यार्थी धावत धावत सांदीपनीऋषींच्याजवळ गेले. तिथं जाताच श्रीकृष्ण म्हणाला,

"गुरुदेव ! पाठशाळेतल्या बागेला पाणी घालायची आज माझी पाळी आहे. मग आपण हे काम का करता ?" श्रीकृष्ण असं बोलताच सुदामानं पुस्ती जोडली,

" होय गुरुवर्य ! आज तर श्रीकृष्ण पाणी देणार आहे. मग आपण का करता हे काम ?" हे ऐकून सांदीपनीऋषींनी बागेला पाणी घालायचं काम क्षणभर थांबवलं आणि म्हणाले,

" पाठशाळेतल्या सर्व बागेला आज मीच पाणी देणार आहे. आज हे काम श्रीकृष्णानं करायचं नाही !"

" का बरं ? असं काय झालं गुरुदेव ?"

" आणि आजच नाही तर एक आठवडा मीच हे काम करणार आहे. तुमच्यापैकी कुणीही एक आठवडा या बागेला पाणी द्यायचं नाही ! "

" पण असं का ? असं का ? "

" तुम्ही मला हे कारण आजच विचारू नका. एका आठवड्यानंतर सायंकाळी प्रार्थनेच्या वेळी मी तुम्हाला ते सांगेन ! "

" पण गुरुदेव ! आश्रमातल्या सर्व बागेला आम्ही सर्वजण क्रमाक्रमानं पाणी घालतो. या कामाचा आम्ही कधी कंटाळा केला नाही. उलट हे काम आम्ही मोठ्या हौसेनं करतो. म्हणून आपल्याला आम्हा सर्वांची नम्र विनंती आहे की, या वयात आपण हे काम करू नका. थंडी किती पडली आहे ! आम्ही सर्वजण इथं असताना आपण हे काम का करावं ?"

" ठीक आहे, ठीक आहे तुमचं म्हणणं ! परंतु आजपासून एक आठवडा हे काम मीच करीन. आज गुरुवार आहे तर पुढच्या गुरुवारपर्यंत तुमच्यापैकी कुणीही या बागेला पाणी घालायचं नाही ! "

यावर काय बोलावं हे कुणाला सुचेना. तेव्हा श्रीकृष्ण म्हणाला,

" गुरुदेव ! आज माझी पाळी आहे बागेला पाणी घालायची ! तेव्हा माझीच काहीतरी चूक झाली असली पाहिजे. यास्तव आपण मला क्षमा करा. परंतु हे काम आपण करू नका ! "

" छे रे ! तुझी काहीही चूक नाही. आणि तुझीच काय पण तुमच्यापैकी कुणाकडूनही काही वावगं घडलं नाही. जी काय चूक घडली आहे ती माझ्याच हातून ! म्हणून मी प्रायश्चित्त घेत आहे. यास्तव तुम्ही मला हे काम करू द्या. आता तुम्ही तुमच्या उद्योगाला लागा ! "

हे गुरुदेवांचं बोलणं ऐकून सर्वजण एकमेकांच्या तोंडाकडे आश्चर्यानं पहात राहिले. यावर काय बोलावं हे कुणालाही समजेना. सांदीपनीऋषी आपल्या कामात पुन्हा मग्न झाले.

त्या नंतर आश्रमातले विद्यार्थी आपापल्या कामासाठी परत गेले. परंतु सांदीपनीऋषींच्या हातून अशी कोणती चूक घडली असेल की त्यांनी सर्व

बागेला पाणी घालायची शिक्षा स्वत:ला लावून घ्यावी, हे त्यांना काही केल्या उमगेना. बरं एवढ्या विस्तीर्ण बागेला पाणी द्यायचं आणि तेही एकट्यानं तर त्यांना जवळजवळ तीनचार तास सहज लागणार होते. तशातच त्यांचा वृद्धापकाळ होता. त्यामुळं सर्व विद्यार्थी चिंतामग्न झाले.

असं करता करता सूर्य माथ्यावर आला. आज अरण्यातली अनेक रमणीय ठिकाणं पाहायचा बेत सर्व शिष्यांनी आदल्या दिवशीच ठरवलेला होता. परंतु सकाळच्या घटनेमुळं सर्वांनी तो बेत रद्द केला. सर्वजण आश्रमातच राहिले. दुपारचा फलाहार करण्यासाठी म्हणून सर्वजण भोजनगृहात गोळा झाले. सर्वांच्या पोटात कावळे कावकाव करीत होते. परंतु गुरुदेवांनी स्वत:ला शिक्षा करून घेतली याचं दु:ख त्यांना भुकेहूनही अधिक तापदायक वाटत होतं. तेव्हा त्यावेळी सुदामानं असं सुचवलं की फलाहार घेण्यापूर्वी आपण सर्वांनी सांदीपनींच्या कुटीत जावं. तिथं जाऊन सर्वांनी गुरुदेवांच्या चरणांना वंदन करावं आणि नंतर सर्वांनी हात जोडून सांगावं की गुरुदेव जो काय अपराध घडला असेल तो आमच्याच हातून ! आपल्या हातून काही अयोग्य घडलं असेल असं आम्हाला वाटत नाही. यास्तव आम्हा सर्व बालकांना आपण क्षमा करावी. आणि अशी क्षमा आपण जोवर करणार नाही तोवर आम्ही फलाहार घेणार नाही.

हे सुदामाचं बोलणं सर्वांना पसंत पडलं. परंतु सांदीपनी ऋषींच्या समोर आपलं म्हणणं कुणी मांडावं असा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हा श्रीकृष्ण म्हणाला की ते काम मी करतो.

त्याप्रमाणं सर्वजण सांदीपनी ऋषींच्या निवासस्थानी गेले. आणि काहीही न बोलता सर्वांनी क्रमाक्रमानं गुरुदेवांच्या चरणांची धूळ आपल्या मस्तकाला लावून घेतली. त्यामुळं आपण पावन झालो असं त्यांना वाटलं. पण हे काय चाललंय याची गुरुदेवांना काही कल्पना येईना. म्हणून ते म्हणाले,

"अरे ! हे काय करता आहा तुम्ही आज !"

"गुरुदेव ! आम्ही सर्वांनी असं ठरवलं आहे की ......"

"हं, काय ठरवलं आहे तुम्ही ?"

"गुरुदेव ! आपण सकाळी इतक्या कडाक्याच्या थंडीत तीनचार तास बागेला पाणी घातलं आणि आम्हाला घालू दिलं नाही. याबद्दल आम्हा सर्वांना दु:ख होत आहे. यास्तव आम्हा सर्वांची आपल्याला अशी नम्र विनंती आहे की आमचा अपराध आम्हाला सांगावा. त्याबद्दल आम्ही प्रायश्चित्त घेऊ. पण आपणास उद्या पाणी घालू देणार नाही !"

"अरे ! मी सकाळी सांगितलं तेच खरं. माझ्याच हातून अपराध घडला आहे. माणसाच्या हातून कधीकधी चुका होतात. तशी ती माझ्या हातूनही घडली आहे. आता माझी आज्ञा म्हणून तुम्ही भोजनशाळेत जाऊन फलाहार घ्या !"

"नाही ! गुरुदेव नाही ! आम्हाला काय वाटेल ती शिक्षा केली तरी चालेल ! पण सकाळी उठून बागेला पाणी घालायचं काम आपण उद्यापासून थांबवणार आहात, असं जाहीर केल्याशिवाय आम्ही इथून जाणार नाही, आणि फलाहारही घेणार नाही !"

हे ऐकून गुरुदेवांचा कंठ दाटून आला. ते सद्‌गदीत होऊन म्हणाले,

"हे पाहा तुम्हाला मजबद्दल एवढी आपुलकी वाटते, ही खरोखर आनंदाची गोष्ट आहे. परंतु मी तुम्हाला खरंच सांगतो की चूक माझ्याच हातून घडली. असा अपराध माझ्या हातून पुन्हा होऊ नये म्हणून मी ही शिक्षा माझी मलाच दिलेली आहे. तीच ती चूक पुन्हा होऊ नये म्हणून जो पुन्हा पुन्हा प्रयत्न करतो त्याचं नाव मनुष्य असं म्हणायला हरकत नाही. एकही चूक ज्याच्या हातून घडली नाही, असा एकही मनुष्य असणार नाही. पण आपली चूक कबूल करणं, ती पुन्हा होऊ नये म्हणून प्रायश्चित्त घेणं आणि त्यासाठी देवाची करुणा भाकणं हे मनुष्यत्वाचं खरं लक्षण आहे. तुमच्यासारखे प्रेमळ शिष्य मला लाभले याबद्दल खरोखरच मला मोठं समाधान वाटत आहे. आता अधिक विलंब न करता तुम्ही भोजनगृहात जाऊन फलाहार घ्या !"

"गुरुदेव ! सर्व काही पुढच्या गुरुवारी सांगेन असं आपण म्हणता पण आज सांगितलं तर काय हरकत आहे ?" असं श्रीकृष्ण म्हणताच,

"नाही नाही ! मी स्वतःहून ठरविलेल्या शिक्षेचं पालन केल्याशिवाय ती चूक सांगू शकत नाही. आपल्या मनात सतत सद्विचार यावेत अशी आपली इच्छा असायला हवी. यास्तव प्रत्येक कृती चांगली अशीच आपण करावी. म्हणजे एक चांगला विचार व त्या विचाराप्रमाणं एक चांगली कृती अशी सद्विचार व सदाचार यांची सांगड आपण घातली पाहिजे. असं जर आपण केलं नाही तर आपलं ओढाळ मन आपल्याला कुठं घेऊन जाईल याचा नेम नाही. आणि आपण बाहेर एकमेकांशी बोलतो त्याहून कितीतरी पटीनं मनातल्या मनात बोलत असतो. म्हणून आपल्या मनानं आपल्याशी चांगलं बोलावं अशी आपल्याला उत्कंठा असली पाहिजे. त्यासाठी आपण अंगमेहनतही खूप केली पाहिजे. मी बारा तास प्रवचन देऊन जे तुम्हाला समजणार नाही ते या माझ्या हातून घडलेल्या चुकीबद्दल मी जे प्रायश्चित्त भोगत आहे, ते पाहून तुम्ही पुष्कळ शिकाल असा माझा विश्वास आहे. आम्ही गुरुजनांनी 'आधी केलं मग सांगितलं' असंच वागलं पाहिजे. आणि मी अशी कृती केली नाही तर माझं शिकवणं म्हणजे निव्वळ बडबड केल्यासारखं होईल. आता अधिक विलंब करू नका. ताबडतोब जाऊन आधी फराळ करा !"

"पण गुरुदेव ! या आपल्या सर्व शिष्यांची अशी इच्छा आहे की आपणही आमच्याबरोबर फलाहार घ्यावा. आपण आमच्याबरोबर आल्याशिवाय .. ..."

"बरं ! बरं !" असं म्हणून सांदीपनी ऋषी मृगाजनमंडित आसनावरून उठले आणि एक हात श्रीकृष्णाच्या खांद्यावर व दुसरा हात सुदामाच्या खांद्यावर ठेवून भोजनगृहाकडे जाऊ लागले. तेव्हा सर्व विद्यार्थ्यांना फार आनंद झाला. भोजनशाळेत गेल्यावर सर्व शिष्यांच्या आग्रहावरून सांदीपनी ऋषींनी थोडासा फलाहार केला. मग शिष्यांनीही फराळ केला.

त्यानंतर एकेक दिवस केव्हा उगवतो आणि केव्हा मावळतो असं सर्व शिष्यांना झालं. तो आठवडा केव्हा संपतो याची सर्वजण मोठ्या आतुरतेनं वाट पाहू लागले. शेवटी एकदाचा तो आठवडा संपला आणि गुरुवारचा दिवस उगवला. सर्वांना मोठा हर्ष झाला. सर्व शिष्यांना देवाप्रमाणं आदर्श वाटणारे त्यांचे गुरुदेव आज शिक्षेचं कारण सांगणार होते.

त्या दिवशी सकाळी सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या हौसेनं बागेला पाणी घातलं. इतके दिवस हे काम करायला न मिळाल्यामुळं ते करण्यासाठी ते फारच उत्सुक होते. नंतर त्या दिवशी सायंकाळी प्रार्थनेला सर्वजण अगोदरच गोळा झाले. ठरलेल्या वेळी गुरुदेव प्रार्थना-मंदिरात येताच सर्वांनी उठून गुरुदेवांना अभिवादन केलं. स्मित हास्य करून अभिवादनाचा स्वीकार करता करता सांदीपनीऋषींनी सर्वांना बसायला सांगितलं. तेव्हा सुरुवातीला श्रीकृष्ण म्हणाला,

"परम आदरणीय गुरुदेव ! आणि माझ्या प्रिय बंधूंनो ! ज्या दिवसाची आपण मोठ्या आतुरतेनं वाट पहात होतो, तो हा आजचा दिवस होय ! गुरुदेवांनी आज आम्हाला सर्व काही सांगायचं कबूल केलं आहे. तरी त्यांनी ते सांगावं अशी त्यांच्या चरणी आम्हा सर्व आश्रमवासीयांची विनम्र प्रार्थना आहे !"

श्रीकृष्णाचं बोलणं संपताच सर्वांनी हर्षभरानं टाळ्या वाजवल्या. त्यावरून विद्यार्थ्यांची उत्सुकता किती आहे हे गुरुवर्यांच्या लक्षात आलं. त्यांनी डोळे मिटून थोडा वेळ आराध्य देवतेचं मनातल्या मनात स्मरण केलं. आणि नंतर ते म्हणाले,

"माझ्या प्रिय शिष्यांनो ! माझ्या लहानपणची एक घटना प्रथम सांगतो. कारण आज ती मला पुन्हा पुन्हा आठवत आहे. मी आठ वर्षांचा होताच मला वडिलांनी एक नियम घालून दिला होता की, सूर्योदयापूर्वी स्नान करून ध्यानस्थ बसायचं आणि मनातल्या मनात 'हरि ॐ नमः शिवाय' या मंत्राचा जप एकशे-आठ वेळा करायचा. हा मंत्र का म्हणायचा आणि असं म्हटल्यानं काय होणार आहे याविषयी मी वडिलांना विचारताच ते म्हणाले,

" हे बघ सांदीपनी ! असं केलं तर काय होईल आणि तसं केलं तर काय होईल अशा शंकाकुशंका काढीत बसू नये. लहान मुलांनी मोठ्या माणसांचं म्हणणं निदान लहानपणी तरी पाळावं. कारण काही गोष्टींचं महत्त्व प्रत्यक्ष कृतीशिवाय कळणं कठीण असतं. आपलं मन एखाद्या विषयावर एकाग्र करणं ही आयुष्यातली अत्यावश्यक अशी बाब आहे. इष्ट देवतेची प्रार्थना करणं हे आवश्यक एवढ्यासाठी आहे की, त्यामुळं आपलं मन आपल्या ताब्यात ठेवायला सहाय्य मिळतं. आपलं मन आपल्या काबूत ठेवायचा हाच एक मार्ग आहे. वाऱ्याहूनही चपळ गतीनं सैरावैरा धावणाऱ्या मनाला ध्यानधारणेच्या खुंटीला बांधून ठेवलं तर आपल्याला आपल्या मनावर थोडासा ताबा मिळवता येतो. आणि आपल्या मनावर आपलं प्रभुत्व असणं हे मनुष्य जीवनाचं एक अत्यावश्यक असं अंग आहे. पुष्कळ गोष्टी दुसऱ्याच्या तोंडून नुसत्या ऐकून त्यांचं महत्त्व आपल्या लक्षात येत नाही. पण आपण स्वत: एखाद्या चांगल्या नियमाचं नियमितपणानं पालन करू लागलो की, तळ्यातल्या स्वच्छ पाण्यात खालचे वाळूचे बारीक बारीक कणही जसे स्पष्ट दिसू लागतात; तसंच आपल्या मनाला नियमाचं बंधन बसताच ते अंतर्मुख होऊन आपल्या अंतःकरणातल्या अनेक बारीकसारीक गोष्टी पाहू लागतं. आणि मग चांगलं काय, वाईट काय याची ओळख आपल्याला अधिकाधिक होऊन आपल्या अंगीकृत कार्यात आपलं मनच आपल्याला मार्गदर्शन करू लागतं. "

असा वडिलांनी उपदेश केल्यावर सूर्योदयापूर्वी स्नान करून जपमाळ घेऊन आणि डोळे मिटून मी ' हरि ॐ नमः शिवाय ' या मंत्राचा जप मनातल्या मनात एकशेआठ वेळा करू लागलो.

परंतु एके दिवशी असं झालं की, वडील गावाला गेले आणि दुसऱ्या दिवशी माझे मित्र भल्या पहाटे सहलीला जाण्यासाठी म्हणून मला बोलवायला आले. त्यावेळी स्नान करून मी जपाला बसणारच होतो. तेव्हा मित्रांनी आग्रह केला की, अरे ! जपालाही सुट्टी द्यायला शीक. तेव्हा मित्रांच्या आग्रहामुळं त्या दिवशी जप करायच्या ऐवजी मी त्यांच्याबरोबर सहलीला गेलो.

अरण्यात आम्हाला हरिणाची शिकार मिळाली. एका ओढ्याच्या काठी त्या हरिणाचं मांस शिजवून ते मोठ्या आवडीनं आम्ही तिथं खाल्लं. मग दररोज आम्ही शिकारीसाठी सूर्योदयापूर्वी एकदीड घटका अगोदर घराबाहेर पडू लागलो. आणि दररोजच मी जप करायचं सोडून दिलं. पाळीपाळीनं हरिणाची शिकार एकेकाला मिळू लागली आणि आमचा जंगलातला शिकारीचा प्रत्येक दिवस मोठ्या मजेत जाऊ लागला. अशा तऱ्हेनं माझ्या सहाही सवंगड्यांना लागोपाठ शिकार मिळाली होती. सातव्या दिवशी दुपारपर्यंत शिकारीसाठी

आम्ही सर्व जंगल पालथं घातलं पण शिकार मिळाली नाही. दुपारी थकल्यामुळं एका ओढ्याच्या काठी 'आता काय करावं?' म्हणून आम्ही विचार करीत बसलो. सर्वजण मला म्हणू लागले,

"सांदीपनी ! तू काहीही कर पण हरिण घेऊन ये. आज तुझीच पाळी आहे !"

तेव्हा मी म्हटलं, "पण मी काय करणार ? हरिण कुठं दिसलंच नाही. त्याला माझा काय उपाय ?"

"उपाय नाही अन् बिपाय नाही. तू मुकाट्यानं हरिण घेऊन ये, नाहीतर आजपासून आम्ही तुझं नाव भागूबाई असं ठेवणार !" हे ऐकून मला फार दुःख झालं. हे पाहून एका मित्रानं मला बाजूला येण्याविषयी खुणावलं. अन् तो माझ्या कानात म्हणाला की तू घरी जाऊन पाळलेल्या हरिणांपैकी एक घेऊन ये ! म्हणजे तुला कुणी भागूबाई म्हणणार नाही !"

मला ही मित्राची कल्पना पटली. मी लागलीच घरी जाऊन एका पाळलेल्या हरिणाला घेऊन आलो. त्यामुळं त्या दिवशीसुद्धा आमची सहल झकासपैकी झाली. सर्व मित्रांनी माझी पाठ थोपटली. मित्र असावा तर सांदीपनीसारखा असं त्यांनी बोलून दाखवलं.

थोड्या दिवसांनी माझे वडील गावाहून परत आले. त्यांनी 'आपलं लहान हरिण कुठं आहे?' म्हणून मला विचारलं. तेव्हा त्यांना मी सपशेल खोटं सांगितलं की, मला माहीत नाही. म्हणून त्या हरणाच्या शोधासाठी ते दिवसभर वणवण हिंडले. पण त्याचा पत्ता लागला नाही. हरिण जीवंतच नव्हतं तर मिळणार तरी कुठून ?

माझ्या वडिलांचं पाळलेल्या सर्व प्राण्यांवर फार प्रेम होतं. ते हरिण हरवल्यामुळं त्यांनी तीन दिवस अन्न घ्यायचं नाही अशी स्वतःला शिक्षा ठरवून घेतली, आणि एक आठवडा मौन पाळायचं असंही मनानं ठरवलं.

अशा तऱ्हेनं एक दिवस लोटला. मी खोटं बोलल्याबद्दल माझी मलाच लाज वाटू लागली. दुसऱ्या दिवशी सकाळी लौकर उठून मी जप करायला बसताच माझं मन मला खायला उठलं,

"अरे ! कशाला हरि ॐ नमः शिवाय असं देवाचं नाव घेतोस ? ज्या जिभेनं त्या लहान हरणाच्या मांसाची चव घेतलीस त्या जिभेनं निदान खोटं तरी बोलायला नको होतं. अरे ! आता तरी वडिलांना खरं खरं काय ते सांगून टाक ! गेल्या चोवीस तासांत त्यांनी अन्न घेतलं नाही याची तरी तुला काही लाज वाटते का ? आणि समजा आता तू वडिलांना खरं सांगितलं नाहीस पण

तुझे मित्र कशावरून सांगणार नाहीत ? अरे ! सत्य केव्हान्केव्हा उघडकीला आल्याशिवाय रहात नाही. त्यापेक्षा तूच खरं का बोलत नाहीस? "

असं माझ्या मनानं मला धारेवर धरल्यामुळं तिसऱ्या दिवशी घडलेली सर्व हकीकत मी वडिलांना सांगितली. तेव्हा ते म्हणाले,

" तू खोटं बोललास आणि आपल्याच पाळलेल्या हरिणाला तू जिवंत मारलंस म्हणून मी आणखी एक दिवस अन्न घेणार नाही आणि आणखी एक आठवडा मौन पाळीन." त्याप्रमाणं त्यांनी दोन आठवडे मौन धारण केलं आणि चार दिवस अन्न घेतलं नाही.

तेव्हा माझ्या मनात पुन्हापुन्हा विचार येऊ लागला की, मित्र सहलीसाठी बोलवायला आले होते त्या पहिल्याच दिवशी जप केल्याशिवाय मी घराबाहेर पडलो नसतो तर ! आणि समजा जप होईपर्यंत मित्र थांबायला तयार नव्हते तर मी त्यांच्याबरोबर गेलोच नसतो तर ! कारण लागोपाठ एक आठवडा आपण मग जपच केला नाही. आणि नियमितपणानं जप करायचं वचन तर आपण वडिलांना दिलं होतं. ठरविलेल्या नियमाचं पालन केलं नाही म्हणून एवढा अनर्थ ओढवला.

त्यानंतर ठरविलेला नियम मी कधी मोडला नाही. मी जी काय विद्या आयुष्यात मिळवली ती नियमाचं पालन करीत गेलो म्हणूनच, असं म्हटलं तर बिलकूल अतिशयोक्ती होणार नाही. त्यानंतर माझं मन बेतालपणानं वागलं असं कधीच घडलं नाही.

आता गेल्या सोमवारी काय झालं ते सांगतो. आपल्या आश्रमात अनिरुद्ध ऋषी आले होते आणि रात्ररात्रभर अनेक विषयावर आम्ही चर्चा करीत होतो. ' मनुष्यदेहाची सार्थकता कशात आहे ?' या विषयावर झालेली चर्चा तर तुम्हाला ठाऊकच आहे. पण या रात्ररात्र झालेल्या चर्चेचा परिणाम असा झाला की, मंगळवारी सूर्योदयापूर्वी उठून स्नान व जपजाप्य आटोपून ठरलेल्या वेळी मी पाठशाळेत तुम्हाला शिकवायला येऊ शकलो नाही. बरं त्या दिवशी तर त्या दिवशी पण बुधवारीही वेळेवर शिकवायला पाठशाळेत येऊ शकलो नाही. माझ्यासारख्या गुरुवर्यानं ही अक्षम्य चूक केली आहे. जो शिक्षक ठरलेल्या वेळी विद्यामंदिरात जाऊ शकत नाही तो खरा गुरूच नव्हे. त्यानं गुरूचं काम करू नये. मी तुम्हा सर्व विद्यार्थ्यांचा असा दोन दिवस अपराध केला हे माझ्या आदर्शपणाला लांछन आहे. यास्तव मी स्वतःला शिक्षा लावून घेतली. ती शिक्षा मी एक आठवडा भोगल्यामुळं आज मला थोडंसं प्रसन्न वाटत आहे !"

" पण गुरुदेव ! हा सूर्योदयापूर्वी उठायचा व वेळेवर पाठशाळेत जायचा नियम तर आम्हा शिष्यांसाठी आहे. आपण तर आमचे गुरुवर्य आहात. हा नियम आपल्यासाठी नाही !"

" कुणी सांगितलं तुम्हाला की हा नियम माझ्यासाठी नाही म्हणून ? वेळेवर विद्यालयात यायचा नियम जसा तुमच्यासाठी तसाच तो माझ्याहीसाठी !"

" पण गुरुदेव ! आपणच आम्हाला सांगितलं ना की नियम हे माणसानं बनविलेले असतात. त्यात बदल करायला काही हरकत नाही."

" होय, नियमात बदल जरूर करा. पण ठरविलेल्या नियमाचं पालन अगोदर करा आणि वेळेवर विद्यालयात जायचा नियम तर सदासर्वकाळ आहे तसाच राहण्यासारखा आहे !"

" पण गुरुदेव ! नियमालासुद्धा अपवाद असतातच की नाही !"

" होय नियमांनासुद्धा अपवाद असतात. पण ते अपरिहार्य परिस्थितीत ! मला जर विद्यामंदिरात वेळेवर शिकवायला येता येण्यासारखं नव्हतं तर ते मी आदल्या दिवशी तुम्हाला निरोप पाठवून सांगायला हवं होतं !"

" गुरुदेव ! ब्रह्मचर्याश्रमाचे नियम वेगळे आणि वानप्रस्थाश्रमाचे नियम वेगळे. एक तर या उतार वयात विद्यार्थ्यांनी पाळावयाचे नियम आपण स्वतः काटेकोरपणानं कृतीत उतरवता हेच मुळी आम्हाला बरोबर वाटत नाही. इतक्या थंडीत आपण एकट्यानं बागेला पाणी घातलं आणि समजा आजारी पडला असता तर ! तर मग आपल्या हातून कोणत्या नियमाचं पालन घडलं असतं ?"

" मी स्वतःला दिलेल्या शिक्षेचं पालन केल्यानं मी आजारी पडलो नाही, हे तर तुम्हाला दिसतच आहे. आणि मी तुम्हाला सांगतो की, आपण आजारी पडणं किंवा न पडणं हे आपल्या मनावरच फार अवलंबून असतं. हां ! आपल्याला काही बहाणाच करायचा असला तर ती गोष्ट वेगळी. मी तर म्हणतो की नियम अगदी इवलासाच का असेना, पण नियमानं तुम्ही त्याचं पालन तर करून पाहा ! कारण काही काही गोष्टी प्रत्यक्ष कृती केल्यानंच समजतात, मनाला पटतात आणि मग आपल्याला पुन्हा पुन्हा कार्यप्रवृत्त करतात."

हे ऐकून सर्व शिष्यांचं समाधान झालं. प्रार्थना केल्यावर ते मोठ्या उमेदीनं आपापल्या उद्योगाला लागले. त्यांच्या मनात गुरुदेवांच्या विषयी वाटणारा अभिमान आणि आदर अधिकच दुणावला.

कार्तिकी एकादशीच्या दिवशी मी सांदीपनी आश्रमाच्या रस्त्यानंच फिरायला गेलो होतो. सध्याच्या उज्जैनपासून उत्तरेस तीनचार किलोमीटर अंतरावर सांदीपनीऋषींचा आश्रम होता असं म्हणतात. या ठिकाणी सध्या गोमती नावाचं शंभर फूट लांब व शंभर फूट रुंद असं खूप मोठं कुंड आहे. ते खूप खोल आहे. या कुंडास चारही बाजूंनी थेट तळापर्यंत पायऱ्या आहेत. या कुंडातल्या पाण्यानं

सांदीपनीऋषी प्रात:स्नान करीत असत अशी आख्यायिका आहे. या ठिकाणी शंकराच एक जुनं देऊळ आहे. ते सध्या मोडकळीस आलं आहे. दुसरं एक कुंडेश्वर महादेवाचं मंदिर आहे. यापलीकडे इथं आज दुसरी कोणतीही जुनी वास्तू नाही.

सांदीपनीऋषींच्या सारखे थोर गुरुदेव आपल्या देशात होऊन गेले ही आजही आपणांस मोठी अभिमानाची गोष्ट वाटते. श्रीकृष्ण व सुदामा हे सांदीपनींचे शिष्य होते एवढं सांगितलं म्हणजे पुरे! कुंडेश्वर महादेवाच्या मंदिरासमोर बसून गोमतीकुंडाकडे पाहता पाहता सांदीपनीऋषींच्या जीवनातले असे अनेक प्रसंग मला आठवले. त्यांच्याविषयी वाटणाऱ्या आदरानं माझं अंत:करण भरून आलं. म्हणून उठता उठता तिथली माती मी माझ्या कपाळाला लावून घेतली.

आणि तिथून गावाकडे परत येता येता मला वाटलं की, गतवर्षी उज्जैनला जे महाविद्यालय सुरू करण्यात आलं त्याचं नाव 'सांदीपनी महाविद्यालय' ठेवण्यात यावं म्हणून मी आग्रह धरला होता आणि अखेरीस डॉ. प्रभात कुमार भट्टाचार्य यांनी व इतर सर्व सभासदांनी माझ्या सूचनेला रुकार दिला होता हे एक प्रकारानं बरंच झालं. कारण सांदीपनीऋषींचं जीवन क्षिप्रेच्या प्रवाहाप्रमाणं जसं मंगलमय आहे तसंच त्यांचं नावही स्फूर्तिप्रद आहे असं कोण नाही म्हणणार ?

ग्रंथालय; ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४३४६२ वि. निबंध
क्रमांक १६५५ नों. दि. २३/८/८८

# ८

# “ मला अमुक अमुक व्हावसं वाटतं ! ”

माझा सेकंडरी स्कूल सर्टीफिकेट परीक्षेचा निकाल लागला आणि मी परीक्षेत उत्तीर्ण झाले म्हणून माझ्या आईवडिलांना व भावंडांना फारच खुशी झाली. आमच्या घराण्यात व जवळच्या लांबच्या सर्व नातेवाईकात एस्. एस्. सी. परीक्षा पास होणारी मी पहिलीच मुलगी असल्यानं माझ्या आईला स्वर्ग दोन बोटं उरला. तिला कुणीही भेटलं की तिनं काढलंच माझ्याविषयी बोलणं. ती म्हणायची,

“ हो, आमची पद्मा आहेच तशी हुशार ! अगदी पहिल्यांदाच ती मॅट्रिक पास झाली. आणि ते सुद्धा सेकंड क्लास. अहो फक्त पाचच मार्कांनी तिचा फर्स्ट क्लास गेला. आमची पद्मा आहेच तशी हुशार ! ”

पण तिला काय माहीत की पास झाल्याबद्दल आनंद होण्याच्या ऐवजी मला दु:खच झालं. कारण मला प्राध्यापक व्हायचं आहे आणि ती नोकरी मिळवायची तर मॅट्रिक म्हणजे एस्. एस्. सी. परीक्षेतही मला फर्स्ट क्लास मिळाला असता तर ‘ थ्रु आऊट फर्स्ट क्लास ’ असं ज्यानं त्यानं माझ्याविषयी म्हटलं असतं. पण आता पस्तावा करण्यात काही अर्थ नव्हता. हातची संधी मी गमावून बसले होते. आता मला भविष्यकाळाकडेच पाहिलं पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे मला कॉलेजमध्ये जाता येईल का ? मला महाविद्यालयाची पायरी चढता येईल का ? प्राध्यापक व्हायची तर फारच दूरची गोष्ट ! मग आता काय करावं ? मग आता काय करावं ?

मी अशा विचारात गर्क असतानाच शेजारच्या सुंदराबाई आमच्या घरी आल्या. तेव्हा त्यांना माझ्या आईनं मुद्दाम बसवून घेतलं. त्यांची मुलगी चित्रा गेल्या दोन वर्षापासून एस्. एस्. सी. परीक्षेला सारखी नापास होत होती. हायस्कूलमध्ये मी तिच्या दोन वर्षं मागं होते. पण यंदा मी पास झाल्यानं मीच तिला मागे टाकलं होतं. त्यामुळं सुंदराबाई मनातल्यामनात माझ्यावर जळून होत्या. आईला हे सर्व ठाऊक होतं. तरीही आईनं तिच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणं त्यांना

चहाला बसवून घेतलं. इतक्यात चित्राही आईला बोलवायला म्हणून आमच्या घरी आली. तेव्हा माझी आई म्हणाली,

"हे ग काय चित्रा! तू तर आमच्या घरी येणंच सोडलं आता ! आता तू पण थांब ! चहा घेतल्याशिवाय जाऊ नकोस !"

नंतर आईनं त्यांना मी पास झाले म्हणून दोन दोन पेढे व चिवडा दिला. आणि चिवडा खाऊन होताच चहाचे कप त्यांच्या हातात दिले. तेव्हा सुंदराबाई म्हणाल्या,

" आता पद्मा पुढं काय करणार ? " हा प्रश्न ऐकून चित्रा म्हणाली,

"काय करणार ? काय करणार ? असं काय विचारतेस ग आई ? पद्मा तर पुढे प्रोफेसर होऊन कॉलेजमधे शिकवणार आहे !"

या चित्राच्या बोलण्यात मोठी खोच होती. तिला असं ध्वनित करायचं होतं की पद्मा जरी एस्. एस्. सी. परीक्षेत पास झाली असली, तरी तिला काही कॉलेजचं शिक्षण घेता येणं शक्य नाही. कारण तिचे वडील प्राथमिक शाळेतले शिक्षक अन् त्यांचा पगार महिन्याचा दीडशे रुपये, या दीडशे रुपड्यात ती काय शिक्षण घेणार ? तिच्या पाठीवर आणखी पाच बहिणी आणि नंतर एक भाऊ ! म्हणजे पद्मासहित यांच्या घरात एकूण आठ माणसं ! तेव्हा यांना म्हणावं नीट पोट भरून तर दाखवा अगोदर ! मग मोठं होण्याची हौस बाळगा ! प्रोफेसर होणं काही सोपी गोष्ट नाही की उचलली जीभ अन् लावली टाळूला !

हे तर हे पण चित्राच्या बोलण्यात या शिवाय आणखी एक टोमणा होता. एकदा असं झालं की मी एस्. एस्. सी. च्या वर्गात असताना आम्हाला शहाणे नावाचे शिक्षक शिकवीत होते. एक दिवस अशी टूम निघाली की आपण पुढं कोण होणार हे प्रत्येकीनं सांगावं. चित्राची पाळी येताच तिनं सांगितलं की मी डॉक्टर होणार ! तेव्हा शहाणे सरांनी लगेच तिची पाठ थोपटली. ते म्हणाले की होय ! चित्रा नुसती एम्. बी. बी. एस्. एवढंच काय पण इंग्लंडला जाऊन एफ्. आर. सी. एस. ही पदवीही मिळवू शकते. तिच्या वडिलांची गडगंज संपत्ती आहे. ते तिच्यासाठी वाटेल तितका पैसा खर्च करू शकतात. अन् जेव्हा मी म्हटलं की मी प्रोफेसर होणार तर चित्रानं माझ्याकडे 'अं, तू काय होणार प्रोफेसर ? ' असं म्हणून तिरस्कारानं पाहिलं. हे चित्राचं माझ्याकडे असं तिरस्कारानं पाहणं शहाणे सरांच्या लक्षात आलं पण उलट त्यांनी तिलाच दुजोरा दिला. त्यांनी मुद्दाम दुसरीकडे तोंड फिरवून माझ्या बोलण्याबद्दल नापसंती व्यक्त केली होती. कारण बरोबरच आहे. मला वाटलं

की शहाणे सरांना कशाला दोष द्या. ज्या समाजात व्यक्तीचं मूल्य निव्वळ पैशावरून ठरवलं जातं तिथं शाळेत शिकविणारे शिक्षकही असं वागले नाहीत तरच नवल ! आणखी असं की शहाणे सर चित्राला घरी जाऊन शिकवीत होते आणि त्याबद्दल त्यांना महिना साठ रुपये मिळत होते. तेव्हा ते चित्राचीच बाजू का नाही घेणार ?

त्यावेळी माझ्या मनात विचार आला होता की ' मी प्रोफेसर होणार ' असं सहजासहजी म्हटलं ते काय आणि या वर्गात इतक्या मुलींच्यासमोर त्यावर अशी प्रतिकूल वावटळ उठावी ती काय ! म्हणून मग मला असंही वाटलं की यांच्या जिद्दीवर काय वाटेल ते झालं तरी प्रोफेसर होऊन दाखवलंच पाहिजे !

हा पूर्वी शाळेत घडलेला प्रसंग मला जो आठवला तो खराच ठरला. कारण चित्राच्या मनात काय शिजत होतं याचा अदमास तावडतोब माझ्या प्रत्ययाला आला. चहा घेता घेता सुंदराबाई म्हणाल्या,

" अहो पार्वतीबाई ! आमचं एक काम कराल का ? "

माझी आई बिचारी फार साधी भोळी ! दुसऱ्याच्या पोटात काय काळंबेरं आहे हे तिच्या चटकन ध्यानात येत नाही. ती म्हणाली,

" हे काय बोलणं तुमचं सुंदराबाई ! तुमचं काही काम असलं आणि ते जर आमच्याकडून होणार असलं, तर ते आम्ही करणार नाही असं कधीतरी झालं आहे का ? " हे आईचं बोलणं ऐकून सुंदराबाई मजकडे पाहात म्हणाल्या,

" हे बघा ! आता जे काही काम आहे ते पद्माकडे आहे. ती करणार असली तर सांगते ! "

" हो ती तर जरूर करील ! सांगा तुम्ही तुमचं काम ! " असा आईनं आणखी दुजोरा देताच सुंदराबाई म्हणाल्या,

" आता ही पद्मा परीक्षा पास झाली आहे, तर हिनं आमच्या चित्राला दररोज एक तास शिकवलं तर ! "

" हो हो, आमची पद्मा जरूर शिकवील ! " असं आईनं माझ्या वतीनं एकदम सांगून टाकलं. त्यावेळी मला आईचा असा राग आला की काही विचारू नका. म्हणे " हो हो आमची पद्मा जरूर शिकवील ! " हिला काय लागतं असं बोलायला ! स्वतः शिकवायला जाईल तेव्हा माहीत पडेल हिला !

चहा पिऊन झाल्यावर आईनं सुंदराबाईंना व चित्राला हळदीकुंकू लावलं. नंतर माझ्याकडे पहातापहाता त्या घरी जायला निघाल्या. तेव्हा माझ्या अगदी ओठात आलं होतं की यांना म्हणावं,

" अहो सुंदराबाई ! मी आताच तर कुठं एस्. एस्. सी. परीक्षा पास झाले आहे. तेव्हा मी चित्राला काय शिकवणार ? तुम्ही दुसऱ्या कुणाची तरी शिकवणी लावा ! "

पण मी असं बोलू शकले नाही. याला कारण म्हणजे आमची गरीबी होय. गरीबीमुळं माणसाला माणसाचं जिणं जगता येत नाही याचा मला पुन्हापुन्हा प्रत्यय येत होता. माझा एस्. एस्. सी. चा फॉर्म भरण्यासाठी आईनं सुंदराबाईंच्या जवळून पन्नास रुपये उधार आणले होते. त्याला आता सहा महिने होऊनही त्यातले पाच रुपयेसुद्धा आम्ही परत करू शकलो नव्हतो. मग " आमची पद्मा नाही शिकवणार ! " असं आई कोणत्या तोंडानं म्हणणार ? आणि " अहो सुंदराबाई ! मी तर आताच एस्. एस्. सी. परीक्षा पास झाले. तेव्हा चित्राला काय शिकवणार ?" असं मी तरी कोणत्या तोंडानं बोलणार ?

तेव्हा मी मनातल्या मनात म्हटलं, " हे देवी गरीबी ! माझ्या मायगंगे ! तू तुझं तोंड कधी काळं करणार ? आतापर्यंत पडलेल्या स्त्री पुरुषांची आहुती तुला पुरे नाही का झाली ? माझाही बळी असाच घेणार का ? माझाही बळी ... ! "

परीक्षेचा निकाल जाहीर होऊन जसजसे दिवस लोटत चालले, तसतसा वरील विषण्णतेचा विचार माझ्या मनात अधिकाधिक घर करू लागला. कारण परीक्षा पास झालेल्या माझ्या मैत्रिणी कुणी कुठं तर कुणी कुठं शिकायला जाणार होत्या. काही पुण्याला फर्ग्युसन कॉलेजमधे तर दोघीजणी मामाच्या घरी जाऊन कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधे आणि एक मैत्रीण कऱ्हाडच्या संत गाडगेबाबा कॉलेजमधे शिक्षण घेणार होती. आणि मी मात्र ' आता काय करावं ? ' या विचारानं खिन्न होऊन परिस्थितीच्या पायथ्यांशी पुन्हापुन्हा डोकं घाशीत बसले होते.

' आता पुढं काय करावं ? ' असं आईवडिलांना विचारलं तर ते म्हणाले की तुला जे वाटेल ते कर. आता मी काय करणार ? कपाळ ! संसार आई-बापांचा पण जणू काही तो माझ्याच डोक्यावर येऊन पडला होता. आणि यामुळं माझ्या डोक्याच्या ठिकऱ्याठिकऱ्या व्हायच्याच बाकी राहिल्या होत्या. वडिलांना आणखी थोड्याच वर्षांनी पेन्शन मिळणार होती. कारण त्यांना डोळ्यांनी कमी दिसू लागलं होतं. शाळेतले हेडमास्तर व इतर शिक्षक वडिलांना धकवून घेत होते. परंतु शाळानिरीक्षकांच्या ही गोष्ट लक्षात येताच ' तुम्हाला जर कमी दिसतं तर तुम्हाला नोकरीतून लौकर निवृत्त का करू नये याची कारणं सांगा. ' असं शाळानिरीक्षकाकडून लेखी विचारण्यात आलं होतं. म्हणजे आता वडील

लौकरच पेन्शन घेऊन घरी बसणार हे स्पष्ट दिसत होतं. कारण आता डोळे सुधारणं शक्य नाही असं डोळयांच्या डॉक्टरांनी स्पष्ट सांगितलं होतं.

माझ्याहून धाकटी बहीण दोन वर्षांनी एस्. एस्. सी. परीक्षेला बसणार होती. शेजारच्या सुंदराबाई जवळून पन्नास, तर प्रमिलाबाईंच्या जवळून पंचाहत्तर असं करताकरता लोकांच्या जवळून कमीतकमी सहाशेसातशे रुपये उधार घेतले होते. कर्जाचा एवढा आकडा ऐकून माझी तर छातीच दडपून जाई. तशातच या पैसे कर्जाऊ दिलेल्या शेजारणी बाया पुन्हापुन्हा घरी पैसे मागायला येत. त्यांचं बोलणं ऐकून मला तर मेल्याहून मेल्यासारखं होई. एकदा प्रमिलाबाई म्हणाल्या,

" तुम्हाला जर पैसे परत करता येत नव्हते तर घेतले कशाला ? आणि आज देऊ उद्या देऊ असं करताकरता आता दोन वर्षं झालीत. पैसे कधी परत करणार ? पैसे काही झाडाला लागत नाहीत ! आम्हालाही आमचा संसार आहेच की नाही ?" आणि आमच्या घरातून बाहेर पडतापडता म्हणाल्या,

" इतक्या पोरांना पोसता येत नव्हतं तर जन्म दिला कशाला ? मुलांना पैदा करायची यांना हौस आणि दुसऱ्यांचे पैसे परत देण्याची मात्र यांना आठवण रहात नाही. मेले माणसं आहेत का कुणी हैवान !"

हे ऐकून तर माझ्या मनात चर्रर् झालं. कुठंतरी जाऊन एकदम जीव द्यावा असंही वाटलं. पण लगेच विचार आला की आपल्याला आईवडिलांनी एस्. एस्. सी. पास होईपर्यंत शिकवलं ते एवढ्यासाठीच वाटतं ? आणि आता जीवनापासून असं पळून जाण्यात तरी कोणता शहाणपणा ? त्यापेक्षा परिस्थितीशी झुंज करण्यात खरी मौज आहे. इतक्या मुलांना जन्म द्यायला नको होता, याची जाणीव आईवडिलांनाही झालेली आहे. पण ते तरी काय करणार ? आपल्याला पुत्र व्हावा असं कोणत्या आईबापांना वाटत नाही ? म्हणून त्यांनी पुन्हापुन्हा मुलं होऊ दिली. तेव्हा पाच बहिणींनंतर एक भाऊ जन्मला. मुलगी काय नि मुलगा काय सारखेच हे जोपर्यंत स्त्री पुरुषांना पटत नाही, तोपर्यंत हे असंच चालायचं !

इतका सगळा विचार माझ्या मनात येऊनही माझी समस्या मात्र मुळीच सुटली नाही. मला कॉलेजमधे जायला मिळालं नाही आणि पुढं मिळेल असंही वाटत नव्हतं. इतकं असूनही प्राध्यापक व्हावं हा विचार मात्र मी सोडला नव्हता. परिस्थिती आणि महत्त्वाकांक्षा यांच्या अडकित्त्यात सुपारीप्रमाणं मी सापडले होते. मला कधीकधी वाटे 'आपण प्रोफेसर होणार आहोत' हा विचार आपण कायमचाच का सोडून देत नाही ? माणसानं कसं आंथरूण पाहून पाय पसरावेत. आपली परिस्थिती ही अशी असताना आपण असली महत्त्वाकांक्षा बाळगणं म्हणजे शिरमें खौडे और गुलाल की हौस असं आहे.

पण याच वेळी माझ्या मनात असा विचार यायचा की आपण आपली महत्त्वाकांक्षा मरू द्यायची नाही. कुणी सांगावं आज ना उद्या या असल्या भकास परिस्थितीतूनच काहीतरी मार्ग दिसेल. आपण निदान धडपड तरी करीत राहिलं पाहिजे. कारण 'मी प्रोफेसर होणार !' या ऐवजी 'मी प्रोफेसर होऊ शकणार नाही !' याच विचाराला आपण उठल्याबसल्या कवटाळलं तर आपलं उत्साही मन मरून जाईल आणि मग पाठीवर माती वाहून नेणाऱ्या मुक्या प्राण्याप्रमाणं जीवन आपल्याला जगावं लागेल. यास्तव आपण निराश होण्यात अर्थ नाही. शिक्षण घेऊनही परिस्थितीपुढं लोटांगण घालणं एवढंच जर आपण करणार असू तर धिक्कार असो आपल्या जिण्याला !

अखेरीस मी नोकरी करायचं ठरवलं. पण नोकरी मिळवणं मोठं मुष्किलीचं होतं. आज या ऑफिसमधे तर उद्या त्या ऑफिसमधे अशात-हेनं सर्व कार्यालयात अर्ज देण्यासाठी मी वणवण हिंडत होते. परंतु काही उपयोग होत नव्हता. तसंच मी चित्राला नियमितपणानं शिकवायला जात होते. परंतु तिच्याकडे शिकवणीबद्दल पैसे मागायची काही सोय नव्हती. एक तर मला एस्. एस्. सी. चा फॉर्म भरायला तिच्या आईनं पन्नास रुपये उधार दिले होते. आणि दुसरं असं की मधूनमधून चित्राची आई आमच्या घरी येऊन आईला सांगून जायची की सध्या अडलेले लोक एका रुपयाला महिना पंधरा पैसे व्याज देऊन जातात. आम्ही तुम्हाला पन्नास रुपये तसेच दिलेत. गेल्या सहा महिन्यांचं व्याज जोडलं तर महिना साडेसात रुपये व्याजाप्रमाणं सहा महिन्यांचं व्याजच पंचेचाळीस रुपये होतं. ते मुद्दलात जोडलं तर आणखी व्याज होईल ते वेगळच. पण आम्ही तुमच्याकडून व्याजबीज काही घेत नाही. अहो तुमची पद्मा कुणी दुसरी का आहे ? तुम्ही मुद्दलसुद्धा सवडीप्रमाणं द्या. काही घाई नाही.

म्हणजे मी चित्राला दररोज नियमानं शिकवायला जायचे तर त्याबद्दल निदान महिना दहा रुपये तरी तिच्या आईनं द्यावेत अशी माझी अपेक्षा होती. पण शिकवणीचे पैसे द्यायचं तर नाव नाही आणि उलट मी तिला शिकवायला जाण्यात चित्राचा व तिच्या आईचा विचार असा की मग काय झालं मोफत शिकवलं तर? आम्ही पैसे दिलेत तर ते सुद्धा बिना व्याजानेच दिलेत की नाही ? आम्ही कुठं व्याजबीज मागितलं ?

चित्रा व तिची आई अशा तऱ्हेनं वागत असल्या तरी मी मात्र नियमितपणानं आणि मनापासून शिकवीत होते.

माझी नोकरी मिळवायची धडपड चालूच होती. एका ऑफिसमधे टाईपिस्टची जागा खाली होती. परंतु मला टाईपिंग येत नसल्यानं ती नोकरी मिळू शकली नाही. पुढे आमच्या शेजारी राहणाऱ्या बेंडाळेसाहेबांनी मला

सहाय्य करायचं कबूल केलं. ते एका बँकेत मॅनेजर होते. त्यांच्या बँकेत आज नाहीतरी सहा महिन्यांनी एका टाईपीस्टची जागा रिकामी होणार होती. म्हणून त्यांनी त्यांच्या बँकेत असलेल्या टाईपीस्ट जवळून टाईपिंग शिकायला मला परवानगी दिली. तसं त्या टाईपीस्टलाही सांगितलं. म्हणून मी दररोज त्यांच्या बँकेत टाईपींग शिकायला जाऊ लागले. अशा तऱ्हेनं टाईपिंगचं काम मी सहा महिने शिकले. मला टाईपिंग येऊही लागलं. पण सहा महिन्यानंतर रिकामी झालेली टाईपिस्टची जागा मला मिळू शकली नाही. दुसऱ्याच एका मुलीला ती नोकरी देण्यात आली. तिनं फार मोठ्या माणसाचा वशीला आणला होता. म्हणून मॅनेजर साहेबांनी सांगितलं की काही इलाज चालला नाही.

शेवटी टाईपिस्टच्या नोकरीचा नाद मी सोडून दिला. कुठल्यान् कुठल्यातरी शाळेत शिक्षिका व्हायचं ठरवलं. कारण मला वाटलं की पुस्तकाबरोबर आपला तेवढाच संबंध येईल. आणि प्राध्यापिका होता आलं नाही तरी निदान शिक्षिका झाल्याचं तरी आपल्याला समाधान मिळेल. शेवटी प्रयत्न करताकरता एका मुख्याध्यापिका बाईंची व वडीलांची ओळख निघाली. ती बाई लहानपणी वडीलांची विद्यार्थीनी होती. तिनं मला तीन महिन्यांची लीव्ह व्हेकन्सी म्हणून नोकरी देण्याचं कबूल केलं. ठरल्याप्रमाणं एक तारखेला मी प्राथमिक शाळेत गेले. त्या शाळेतल्या सौ. शालीनीबाई पवार या मॅटरनिटी लीव्हवर गेल्यानं ही नोकरी मला मिळाली होती. मी पहिल्या दिवसापासूनच अगदी मनापासून शिकवायला सुरुवात केली.

मजजवळ इतर दुसरे गुण नसतीलही कदाचित् परंतु एक मात्र आहे असं वाटतं. तो गुण हा की जे काम करायचं ते अगदी मनापासून करायचं. यामुळं मी पहिल्या आठवड्यातच मुलींची मनं काबीज केली. माझ्या शिकवण्यावर मुली बेहद्द खूष आहेत ही वार्ता हा हा म्हणता सर्व शाळेत पसरली.

तीन महिन्यांचा अवधी जसजसा संपायला आला तसंतसं माझं मन खट्टू होऊ लागलं. म्हणून तीन महिने संपायच्या पूर्वीच तीन दिवस मी किरकोळ रजा घेतली आणि घरीच पुस्तक वाचीत बसले. पण त्या तीन दिवसात कितीतरी मुली घरी येऊन माझी चौकशी करून गेल्या.

घरी आलेल्या मुलींच्यापैकी एक म्हणाली,

" बाई ! तुम्ही आज शाळेत का आला नाहीत ? आम्हाला वाटलंच की बाईंना बरं नसेल म्हणून ! नाहीतर बाई शाळेत येणार नाहीत असं होणंच शक्य नाही ! "

दुसरी एक चिमुरडी मुलगी म्हणाली,

" खरंच बाई ! तुमचं शिकवणं आम्हांला फार आवडतं. तुम्ही आला नाहीत तर शाळेत आम्हाला अगदी चुकल्याचुकल्यासारखं होतं. शाळेत जाऊन तुमचं बोलणं ऐकायला मिळालं नाही तर वाटतं की आजचा दिवस फुकट गेला ! "

आणखी एक विद्यार्थिनी म्हणाली, " काही कामबीम असलं तर आम्हांला सांगा ना बाई ! तुम्ही आजारी पडला की आम्हांला वाईट वाटतं ! "

मुलींच्या या आपुलकीच्या बोलण्यानं मला फार बरं वाटलं. आपण शिकवायचं काम चांगलं करतो असं माझं मन मला पुन्हापुन्हा सांगू लागलं !

बाळंतपणाच्या सुट्टीवर गेलेल्या बाईंनी आणखी एका महिन्याची सुट्टी वाढवली. म्हणून मला आणखी एक महिना शिकवायला मिळालं. त्यानंतर मात्र मी पुन्हा चिंताग्रस्त विचारात आणि कुढत बसण्यात सर्व वेळ घालवू लागले.

पुढच्या वर्षी शेजारची चित्रा एस. एस. सी. परीक्षा पास झाली. तिला चांगले मार्क्स मिळाल्यामुळं तिला कॉलेजमधे प्रवेशही मिळाला. अशा तऱ्हेनं उलट चित्राच आता माझ्यापुढं गेली. माझं एक वर्ष फुकट गेल्यावर पुढच्या वर्षी खाजगी रीतीनं अभ्यास करून मी बी. ए. प्रथम वर्ष परीक्षेला बसले. या परीक्षेत मी उत्तीर्ण झाले.

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर शाळा सुरू होताच त्याच मुलींच्या प्राथमिक शाळेत एका वर्षासाठी तात्पुरती मला शिक्षिकेची नोकरी मिळाली. याबद्दल मला फार आनंद झाला. परंतु कुठल्याही परीक्षेला एक वर्ष बसायचं नाही अशी मला लेखी समज देण्यात आली. यामुळं इकडे नोकरी लागल्याचं समाधान तर दुसरीकडे परीक्षेला बसायचं नाही याचं दुःख अशा पेचात मी सापडले होते. माझ्या बरोबरीच्या मैत्रिणी शैक्षणिक उन्नती करीत होत्या. त्यांची प्रगती पाहून मला माझ्या परिस्थितीची चीड यायची. तसंच शाळेतल्या शिक्षिका आपापसात बोलायच्या की खाजगी रीतीनं तयारी करून परीक्षेला बसणाऱ्याला प्रथम श्रेणीचे मार्क्स सहसा मिळत नाहीत. फर्स्ट क्लास पाहिजे तर कॉलेजमधे जाऊनच शिकायला पाहिजे. हे ऐकून माझं मन अधिकच भांबावून जाई.

आमच्या शेजारी राहणारी चित्रा मेडीकल कॉलेजमधे भरती झाल्यापासून आमच्याशी फारच उद्धटपणानं वागत होती. मला नोकरी लागल्यावर दर महिना दहा रुपये या प्रमाणं चाळीस रुपये दिल्यावर मध्यंतरी एका महिन्यात दहा रुपये देता आले नाहीत. तेव्हा चित्रा स्वतः पैसे मागायला आली आणि म्हणाली,

" पन्नास रुपये उधार घेऊन आता पंधरा महिने झालेत. तरी अजून परत करीत नाहीत. मग घेतले होते कशाला ?"

हे ऐकून माझ्या अगदी ओठावर आलं होतं की एक वर्ष मी शिकवलं त्याचे महिना दहा रुपये धरले तरी एकशेवीस रुपये होतात. पण त्याबद्दल चित्रा एक शब्द बोलायला तयार नाही. आणि उलट आपल्याच पैशांचा तोरा मिरवते ! परंतु आईनं खूण करून मला बोलू दिलं नाही. चित्रा गेल्यावर आई म्हणाली,

" पद्मा शेराला सवाशेर कुणीतरी भेटतोच. कुणी अभद्र वाणी उच्चारली तरी आपण उच्चारलीच पाहिजे असं नाही. सहन करायलाही शक्ती लागते. ती तू कमव. कुणालाही अन् काहीही बोलण्यानं आपलाच उर्मटपणा दिसतो. आपण सध्या त्यांचे मिंधे आहोत. येत्या एक तारखेला त्यांचे दहा रुपये देऊ आणि आपण कर्जमुक्त होऊ !" हे ऐकून मी म्हटलं,

" मला नाही पटत आई, तुझं हे बोलणं ! चित्राचे वडील श्रीमंत आहेत म्हणून चित्रानं उठसूठ आपला अपमान करावा हा कुठचा न्याय ? तिचे दहा रुपये राहिले तर घरी मागायला आली अन् वाटेल ते बोलून गेली. आणि मी एक वर्ष फुकट शिकवलं, तर साधे आभार मानायलाही तयार नाही ! "

" पद्मा सध्या आपला पडता काळ आहे. अजून तुझं शिक्षण पूर्ण व्हायचं आहे. हे लोक आपल्या शेजारीच राहतात आपलं कुणाशी अन् केव्हा काय काम पडेल याचा काही नेम नाही ! अशा वेळी आपण धीर धरावा ! धीर तो गंभीर अन् उतावळा तो बावळा असं म्हणतात ते काही खोटं नाही. आपल्याला राग आला तर मनातल्यामनात दहा अंक मोजून त्या रागाला आपण घालवून द्यावं ! "

बाहेरचे शेजारीपाजारी मला हा असा त्रास देत होते. आणि घरचे आई-वडील तरी काय कमी त्रास देत होते ? मी रात्री आठ ते अकरा अभ्यासाला बसले की वडील म्हणायचे,

" पद्मा कशाला एवढा त्रास करून घेतेस ? नाही झालं पदवीधर तर नाही का चालणार ? " हे असं वडिलांचं बोलणं तीनचार वेळा ऐकून घेतल्यावर मी वडिलांना चक्क सांगितलं,

" आपण मला असला उपदेश करू नका. मी पदवीधर व्हावं किंवा नाही हे मी स्वतः ठरवीन. तुम्ही पदवीधर नाहीत म्हणून मीही ग्रॅज्यूएट नसावं असं तुम्हाला वाटतं का ? "

तेव्हापासून वडिलांनी माझ्याशी बोलणं बंद केलं. मी मात्र रात्री आठ ते अकरा ही अभ्यासाची वेळ ठरविली. परीक्षेला नेमलेली पुस्तकं व संदर्भाची पुस्तकं बारकाईनं वाचणं आणि प्रत्येक पाठाचा स्वतःच्या समजुतीप्रमाणं सारांश लिहून काढणं हा उद्योग मी मनापासून करू लागले. माझ्या ज्या मैत्रिणी

कॉलेजमधे होत्या त्यांच्या जवळून पुस्तकं मागून आणून मी त्यांना वेळच्यावेळी परत करीत असे. मी पुस्तकांचा अशा तऱ्हेनं सारांश काढल्यामुळं मला पुन्हा पुस्तकं वाचायची जरूर भासली नाही. उलट माझी तयारी पाहून माझ्या मैत्रिणींना आश्चर्य वाटलं. माझ्या या अभ्यासाच्या पद्धतीचा मला फायदा झाल्याशिवाय राहणार नाही असं माझं मन मला पुन्हापुन्हा सांगत होतं.

आणि अखेरीस तसंच घडलं. प्राथमिक शाळेतली दोन वर्षांची नोकरी झाल्यावर मी बी. ए. च्या सेकंड इअर परीक्षेला बसले. तेव्हाही मला परीक्षेत यश मिळालं. माझा विश्वास वाढला. मी परीक्षेची तयारी अधिक चांगल्या तऱ्हेनं करू लागले. कारण आता अनुभवानं अभ्यास कसा करावा आणि परीक्षेत उत्तरं कशी लिहावीत याचा सराव मला झाला होता. कारण परीक्षेची तयारी करणं म्हणजे ढोर मेहनत करणं नव्हे. तसंच निव्वळ वाचणं म्हणजेच सर्वकाही नाही. तर मनन करणं आणि काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरं लिहून काढणं या गोष्टी आता अनुभवानं मला पटल्या होत्या. मी असाच अभ्यास करायला सुरुवात केली. आणि याचा फायदा मला पुरेपूर मिळाला. पुढच्या वर्षी मी बी. ए. च्या तृतीय वर्षाच्या परीक्षेला बसले. आणि मला सांगायला आनंद वाटतो की मला परीक्षेत फर्स्ट क्लास मिळाला. माझ्या श्रमाचं चीज झालं.

हे पाहून चित्राची आई घरी येऊन म्हणाली, "अहो पार्वतीबाई ! पद्मा बी. ए. झाली म्हणून तिचे हात काही आकाशाला पोचले नाहीत. बी. ए. झालेल्यांना का कुठे प्रोफेसर म्हणून नेमतात ? पद्माला म्हणावं अजून दिल्ली फार दूर आहे !"

आता अनुभवानं हळूहळू एक गोष्ट माझ्या लक्षात आली आहे की आपल्या ओळखीपाळखीचे बहुतेक लोक दुटप्पी असतात. आपला उत्कर्ष सर्वांना सहन होतोच असं नाही. कारण दुसऱ्याच्या उत्कर्षात आनंद मानणारे फारच थोडे असतात. यास्तव आपण आपल्या उद्योगात मग्न असावं. पुष्कळदा तर असं घडतं की अमुक एक मनुष्य आपला चाहता म्हणून तो आपल्याला प्रोत्साहन देईल, असं समजून आपण त्याच्याकडे जाताच नेमका तोच मनुष्य आपला हिरमोड करतो. यास्तव आपण कुणाच्याही प्रोत्साहनाची अपेक्षा करू नये. कारण आपण जसजसे प्रगती करायला लागतो तसतसे आपली ईर्ष्या आणि मत्सर करणारे वाढतच जातात. यास्तव शेवटी शेवटी आपलं मन हाच आपला गुरू असं समजून आपण आपल्याच मनाचा सल्ला घ्यावा. असं मनोमनी ठरवून रात्री आठ ते अकरा या वेळात मी एम्. ए. ची पुस्तकं वाचायला सुरुवात केली. मला बी. ए. च्या परीक्षेत प्रथम श्रेणीचे मार्क्स मिळाल्यामुळं माझा आत्मविश्वास वाढला होता. माझी

परीक्षेची तयारी करायची पद्धत चांगली आहे असं माझं मन मला पुन्हा पुन्हा सांगत होतं. कॉलेजच्या प्राध्यापकांनीही एम्. ए. होण्यासाठी मला प्रोत्साहन दिलं. पुस्तकं द्यायचंही कबूल केलं. तसंच माझं कॉलेजमधे नाव नसलं तरीही त्या विषयावरली व्याख्यानं ऐकायची त्यांनी मला परवानगी दिली. या प्रोत्साहनामुळं माझी उमेद आणखी वाढली. मी एम्. ए. साठी तत्त्वज्ञान हा विषय घेतला. हे चित्राच्या आईला समजताच त्या आमच्या घरी येऊन आईला म्हणाल्या,

"अहो पार्वतीबाई ! पद्माला म्हणावं तत्त्वज्ञान घेऊन काय करणार ? सध्या सायन्सला जे महत्त्व आहे ते दुसऱ्या कशालाच नाही. आमची चित्रा आठ वर्षांनी किंवा दहा वर्षांनी जरी डॉक्टर झाली तरी तिची समाजाला फार गरज आहे. उलट तत्त्वज्ञानासारख्या रुक्ष विषयाला विचारतो कोण ? बरं, उद्या पद्माचा जरी फर्स्ट क्लास आला तरी ती प्राध्यापिका होईलच कशावरून ? तिच्या अगोदर जे एम. ए. झालेले आहेत त्यांना प्रथम घेतील कॉलेजमधे ? यापेक्षा तिचे हात पिवळे करायचे असतील तर बोला ! एक पदवीधर झालेला शिक्षक आहे !" हे ऐकून मी म्हटलं,

"सुंदराकाकू माझ्या लग्नाचा सल्ला माझ्या आईला तुम्ही देऊ नका. अजून माझ्या बहिणींचं शिक्षण व्हायचं आहे. त्यांचं शिक्षण झाल्यावर मग मी करीन काय करायचं ते !"

"एवढं काही उद्दामपणानं बोलायला नको बर का पद्मा ! अजून कुठं नुसती बी. ए. झालीस तर तुझा हा तोरा ! मग एम्. ए. झाल्यावर काय करशील कुणास ठाऊक ? सध्याच्या मुली लहानतोंडी मोठा घास घेतात. पार्वतीबाई तुम्हीच पाहा !"

"हा पद्मा ! असं बोलू नये. जरा लहानमोठं पाहशील की नाही ?"

नंतर मी काही बोलले नाही.

पण पुढं तत्त्वज्ञान विषय घेऊनच मी एम. ए. ची परीक्षा दिली. आणि आता आपल्याला सांगायला मला खरोखरच मोठा आनंद वाटतो की एम्. ए. च्या परीक्षेतही मला प्रथम श्रेणीचेच मार्क्स मिळाले. अशा तऱ्हेनं एस्. एस्. सी. परीक्षेनंतर नऊ वर्षांनी मी एम्. ए. झाले. आणि त्याच वर्षी कॉलेजमधे प्राध्यापिका म्हणून शिकवू लागले. त्यावेळी मला जी खुशी झाली, ती मी आपल्याला सांगू शकत नाही. कारण अखेरीस माझं ध्येय मी गाठलं, या विचारानं मला आतल्याआत ज्या गुदगुल्या झाल्या त्यांचं वर्णन मी करायचं म्हटलं तरी मला करता येणार नाही. माझ्या श्रमाचं चीज झालं म्हणून मी माझं आराध्य दैवत जे पांडुरंग त्याची मनातल्या मनात पुन्हा पुन्हा प्रार्थना केली. कारण हा आजचा सोन्याचा दिवस जो उगवला तो विठ्ठलाच्याच कृपेमुळं असं मला वाटतं.

सुंदराबाईंची चित्रा मात्र डॉक्टर होऊ शकली नाही. पुन्हा पुन्हा नापास झाल्यामुळं ‘ आपण एम. बी. बी. एस. होऊ शकणार नाही ’ असं चित्राचं मन तिला पुन्हा पुन्हा सांगू लागलं. आणि मग ‘ मन के हारे हार है, मनके जीते जीत ’ या हिंदीतल्या म्हणीप्रमाणं चित्रानं स्वतःहूनच शिक्षण सोडून दिलं.

आता मात्र सुंदराबाईंच्या बोलण्यात व आमच्याशी वागण्यात बदल झाला आहे. चित्राही आमच्याशी ठीक वागते. मागच्यासारखी आमचा अपमान करण्याच्या दुष्ट हेतूनं वागत नाही. कारण मी स्वतःच्या कर्तबगारीनं माझा मोठेपणा सिद्ध करून दाखविला आहे. आपल्या अंगच्या कर्तबगारीला वाव मिळण्यासाठी पैशांची फार आवश्यकता असते यात काहीच शंका नाही. परंतु पैसा म्हणजेच सर्वकाही असं समजण्यातही काही अर्थ नाही. अशा अनेक गोष्टी असतात की त्या केवळ पैशांच्या जोरावर होणं शक्य नाही.

माझी रात्रीची आठ ते अकरा ही वाचनाची आणि लेखनाची वेळ मला पुढेही फार फार उपयोगी पडली. कारण कॉलेजमध्येही पहिल्याच वर्षी ‘ चांगलं शिकविणाऱ्या प्राध्यापिका ’ अशी कॉलेज विद्यार्थ्यांच्या मनात मजविषयी आपुलकीची भावना निर्माण झाली आहे. हे माझ्या महत्त्वाकांक्षेला, माझ्या अपरंपार कष्टांना आणि माझ्या चिकाटीला लागलेलं मधुर फळ होय असं कोण नाही म्हणणार ? ”

१

# इच्छा तिथे मार्ग

एकलव्य धनुर्विद्येत कसा पारंगत झाला हे मुद्दाम पाहण्यासारखं आहे. ही एकलव्याची गोष्ट जरी फार पूर्वी घडलेली असली तरी तिच्यापासून घ्यावयाचा बोध सर्व लोकांनी सदासर्वकाळ ध्यानात ठेवण्यासारखा आहे. यास्तव ही एकलव्याची कथा आता त्याच्याच तोंडून ऐका,

" मला धनुर्विद्येत निष्णात व्हायचं होतं. त्या वेळी द्रोणाचार्य हे धनुर्विद्या शिकविण्यात फार निष्णात होते. उत्कृष्ट धनुर्विद्या शिकवणारे मुनी म्हणून त्यांचा लौकिक सर्वत्र पसरला होता. म्हणून एके दिवशी मी द्रोणाचार्यांच्या आश्रमात गेलो आणि त्यांना वंदन करून नम्रतेनं म्हणालो, "

" गुरुदेव ! मला धनुर्विद्या शिकायची फार इच्छा आहे ! "

हे ऐकून द्रोणाचार्य म्हणाले,

" तुला धनुर्विद्या शिकायची फार इच्छा आहे हे ऐकून बरं वाटलं. परंतु तू कोण आहेस हे तर सांगशील ! "

" गुरुवर्य ! माझं नाव एकलव्य असं आहे. मी एक भिल्लाचा मुलगा आहे. आपली कीर्ती ऐकून आपल्याजवळ धनुर्विद्या शिकायला आलो आहे. " हे ऐकून कपाळावर आठ्या आणीत द्रोणाचार्य तिरस्कारानं म्हणाले,

" अरे ! मी फक्त क्षत्रियांनाच धनुर्विद्या शिकवतो हे तुला माहीत नाही का ? "

" नाही महाराज ! हे मला माहीत नाही ! "

" माहीत नाही तर आता नीट लक्षात ठेव. मी फक्त क्षत्रियांनाच धनुर्विद्या शिकवतो. इतरांना नाही शिकवीत ! "

" महाराज ! मग मी काय करू ? "

" तू धनुर्विद्या शिकू नकोस ! "

" पण महाराज ! असं का ? असं का सांगता आपण ? "

" मी फक्त क्षत्रियांनाच शिकवतो म्हणून ! "

" पण महाराज ! मी आपल्याला हेच विचारतो की आपण फक्त क्षत्रियांनाच का शिकवता ? इतरांना का शिकवत नाही ? "

" असं का म्हणजे ? असं मी ठरवलं आहे म्हणून ! "

" पण गुरुदेव ! असं आपण का ठरवलं हेच तर मी आपणाला विचारीत आहे ! "

" का ठरवलं हे नाही मी सांगू शकत ! "

" पण गुरुवर्य ! मला धनुर्विद्या शिकायची फार प्रबळ इच्छा आहे. आणि आपण तर मला शिकवायला तयार नाही. मग मी काय करू ? "

" दुसरा कुणी शिकवणारा असल्यास त्याच्याकडे जा ! "

" पण महाराज ! मला तर आपणाजवळच शिकायचं आहे. म्हणून मी आपल्या चरणी पुन्हा पुन्हा नम्र विनंती करतो की आपणच मला धनुर्विद्या शिकवा ! "

" अरे, मी सांगितलं ना तुला की मी इतरांना शिकवीत नाही म्हणून ! "

" गुरुदेव ! मी क्षत्रिय कुलात जन्मलो नाही हा काय माझा गुन्हा ? "

" गुन्हा नाही अन् काही नाही. मला तुझ्याशी अधिक बोलायचं नाही ! "

" पण गुरुवर्य हे काय माझ्या प्रश्नाचं उत्तर झालं ? "

" हे बघ ! मी तुला धनुर्विद्या शिकवणार नाही हे माझं अखेरचंच बोलणं समज ! "

हे ऐकून मी एकदम म्हणालो,

" पण मी धनुर्विद्या शिकल्याशिवाय रहाणार नाही हेही आपल्याला आताच मुद्दाम सांगून ठेवतो ! "

असं म्हणून मी द्रोणाचार्यांच्या आश्रमातून बाहेर पडलो आणि माझ्या झोपडीकडे जलद गतीनं जाऊ लागलो. पण रस्त्यानं चालता चालता माझ्या मनात द्वंद्व सुरू झालं,

" मी धनुर्विद्या शिकल्याशिवाय राहणार नाही हेही आपल्याला आताच मुद्दाम सांगून ठेवतो " असं आपण बोलायला नको होतं.

" का ? "

" का म्हणजे ? अरे ! उचलली जीभ अन् लावली टाळूला असं वागून कसं चालेल ! आणि आता आपल्याला शिकवणार तरी कोण ? द्रोणाचार्यांच्या सारखा निष्णात गुरू दुसरा कुणीही नाही. हे आपल्याला माहीत होतं ना ? मग आता त्यांच्याशिवाय आपण धनुर्विद्या कशी शिकणार ? "

" होय, हेही खरंच ! मग आता आपण काय करावं ? आता करावं तरी काय ? "

" पुन्हा द्रोणाचार्यांच्या जवळ जाऊन त्यांना विनंती करावी की ..."

" छे, छे ! काही उपयोग व्हायचा नाही त्याचा !"

" मग आपण काय करणार ? कुणाला शरण जाणार ? आपल्याला कोण शिकवणार ? आपली महत्त्वाकांक्षा कशी पुरी होणार ? आपण आपलं ध्येय कसं गाठणार ? आपण केलेली प्रतिज्ञा आता वाया तर नाही ना जाणार ? यापेक्षा आपण प्रतिज्ञाच केली नसती तर ? आता आपलं जिणं फुकट आहे ! आपलं जिणं फुकट आहे ! "

असा विचार करता करता मी घरी येऊन पोचलो. पण माझ्या प्रश्नाचं उत्तर मला मिळालं नाही. उलट जितका जितका मी जास्त जास्त विचार करू लागलो तितका तितका मी उदास होऊ लागलो. द्रोणाचार्यांचं वाक्य की 'तुला, माहीत नाही तर आता नीट लक्षात ठेव की मी फक्त क्षत्रियांनाच धनुर्विद्या शिकवितो, इतरांना शिकवत नाही !' हे पुन्हापुन्हा आठवून माझं मन अधिकच विषण्ण झालं. कारण 'अहो ! पण तुम्ही फक्त क्षत्रियांनाच का शिकविता ? इतरांना का शिकवीत नाही ?' या माझ्या प्रश्नाचं उत्तर द्रोणाचार्यांनी दिलं नाही. बरोबरच आहे. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी ! द्रोणाचार्य पडले कौरव-पांडवांचे नोकर, तेव्हा ते दुसऱ्यांना धनुर्विद्या कशी शिकवणार ? 'म्हणे मी तुला धनुर्विद्या शिकवणार नाही, हे माझं अखेरचंच बोलणं समज !' असं त्यांनी म्हणताच आपण काहीएक न बोलता तिथून परत यायला हवं होतं. पण तेव्हा आपल्याला तरी काय अवसान आलं कुणास ठाऊक ! आपण अगदी ताडकन् अन् त्याच सुरात त्यांना उत्तर दिलं की 'मी धनुर्विद्या शिकल्याशिवाय राहणार नाही,' हेही आपल्याला आताच मुद्दाम सांगून ठेवतो. असं आपण बोलायला नको होतं. आता आपण धनुर्विद्या कुणाजवळ शिकणार ? आपण आपल्याच हातानं आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली. नाही का ?

त्या दिवशी रात्री माझ्या डोळ्याला डोळा लागला नाही. कारण धनुर्विद्या शिकायची तर ती द्रोणाचार्यांच्याजवळच ही तर माझी जबरदस्त इच्छा होती. आणि त्या इच्छेचा असा चक्काचूर झाला होता.

दुसऱ्या दिवशीही मी तसाच बेचैन होतो. त्या दिवशीही रात्री मला झोप येईना. माझ्या मनात पुन्हा असा विचार आला की,

" समजा आपण पुन्हा एकदा द्रोणाचार्यांच्या आश्रमात जाऊन त्यांना विनंती केली तर – "

" तर काही उपयोग व्हायचा नाही. ते म्हणतील आला तसा चालता हो ! "

" पण आपण तर निश्चय केला आहे की धनुर्विद्या शिकल्याशिवाय राह्यचं नाही ! मग त्याचं काय ? "

अशा विचारात बराच वेळ गेला पण मला झोप आली नाही. माझं मन फार बेचैन झालं होतं. तऱ्हेतऱ्हेचे अनेक विचार मला भंडावीत होते. माझं दुःख कुणाजवळ सांगावं हेही मला सुचेना ! त्यामुळं माझ्या दुःखाला पारावार राहिला नाही. अंथरुणावर पडल्यापडल्या कितीतरी वेळ मी अश्रू ढाळीत होतो. त्यामुळं मला किंचित हलकं वाटलं असावं. नंतर रात्री मला झोप केव्हा लागली हे कळलंही नाही. परंतु सकाळी मी उठलो तेव्हा माझं मन किंचित प्रसन्न झालेलं दिसलं. कारण मला त्या बिकट परिस्थितीतून काही मार्ग सुचला होता. नक्की कोणता मार्ग सुचला होता हे सांगता येत नाही. परंतु आपण सकाळी सूर्योदयापासून तो सूर्यास्त होईपर्यंत धनुर्विद्येचा अगदी अंतःकरणापासून अभ्यास करायचा असा मी बेत केला होता. आणि त्या प्रमाणं मी त्याच दिवसापासून उद्योगाला लागलो.

धनुष्य घेऊन मी सूर्योदयापूर्वी घराबाहेर पडत असे. आणि या झाडावरील फळावर नेम धर तर त्या झाडावरील शेंड्यावर नेम धर अशा तऱ्हेनं सारखे बाण सोडीत असे. अशा वेळी माझा नेम बहुधा चुकत असे. आणि माझ्या मनात 'अरे ! गुरुशिवाय विद्या प्राप्त होते का ? शिकवणारा असल्याशिवाय तू निष्णात कसा होणार ?' हा विचार पुन्हा पुन्हा येई.

'आपण सतत लागोपाठ अभ्यास तर करू या ! मग पुढं काय व्हायचं ते होईल.' असं मी माझ्या मनाचं समाधान करायचा प्रयत्न करी, पण व्यर्थ.

'अरे गुरूशिवाय विद्या प्राप्त होते का ? '

' पण आता गुरूच नाही म्हणतात तर काय करावं ? '

' काय करावं, काय करावं ? असं कशाला म्हणतोस ? त्या पेक्षा धनुर्विद्या शिकणं सोडूनच का देत नाहीस ? '

' छे छे ! ते तर शक्य नाही. माझा निश्चय ठरला त्यात कदापिही बदल होणार नाही. एक वेळ सूर्य उगवण्याचं कार्य विसरेल पण मी माझ्या निश्चयापासून तसूभरही ढळणार नाही. मी धनुर्विद्या शिकल्याशिवाय राहणार नाही. अरे ! गुरु शिकवत असताना तर धनुर्विद्या कुणीही शिकेल आणि मोठा निपुण होऊ शकेल. पण शिकवणारा गुरू नसताना निष्णात होऊन दाखवलं आणि नावलौकिक मिळवला तरच खरी बहाद्दुरी ! नाही का ? '

'पण शिकवायला गुरू पाहिजे ! शिकवणारा गुरू पाहिजेच !' हा विचार माझ्या मनातून काही केल्या जाईना. ' आपलं मनच आपलं खरं मार्गदर्शन करू शकतं. म्हणून

माणसानं आपल्या मनालाच आपला गुरू करावा !' हे मी माझ्या मनाला हजारदा सांगितलं. पण ते काही केल्या गप्प बसेना. म्हणून मनाच्या समाधानासाठी मी द्रोणाचार्यांची एक मातीची मूर्ती तयार करून उच्चासनावर ठेवली. त्या मूर्तीला सकाळसंध्याकाळ भक्ति-भावानं नमन करून धनुर्विद्या शिकायच्या उद्योगात मी एवढा मग्न झालो की पुढंपुढं आपल्याला शिकवणारा कुणी गुरु नाही हे मी विसरूनच गेलो. हे कसं घडून आलं याचं माझं मलाच आश्यर्य वाटू लागलं.

पण त्या वेळी धनुर्विद्या शिकता शिकता मला किती त्रास झाला, निराशा झाल्यामुळं मी किती वेळा बेचैन झालो, अंत:करणाला झालेल्या अपमानाच्या जखमा मला रात्रंदिवस कशा भेडसावीत होत्या, अश्रू ढाळण्याचे प्रसंग मजवर किती आणि कसेकसे गुदरले, तरीही पुन्हापुन्हा प्रयत्न करण्यासाठी माझ्या मनानंच मला कसकसा धीर दिला, माझ्या मित्रांनीही माझा पुन्हापुन्हा हिरमोड कसा केला आणि तरीही खचून न जाता माझ्या मनानंच माझ्या दुःखावर हळूवार फुंकर कशी घातली व मला कसा धीर दिला आणि अंधारात मी चाचपडत असताना एक पाऊल टाकण्याचं साहस मी कसं केलं हे सर्व आपल्याला सांगायला लागलो तर कित्येक दिवस पुरणार नाहीत. परंतु माझं मनच मला मार्गदर्शन करीत होतं ही गोष्ट खरी आहे. त्यामुळं अचूक बाण सोडण्यासाठी मी जेव्हा थोडी थोडी प्रगती करू लागलो, एकएक पाऊल पुढंपुढं टाकू लागलो तेव्हा मला जो आनंद व्हायचा व स्फूर्ती मिळायची त्याची खडान् खडा माहिती सांगायला मी खरोखर असमर्थ आहे. मी फक्त एवढंच म्हणतो की तुम्हीही असं करून तर पहा ! कारण लोक म्हणतात म्हणून आपण आपल्या मनाला मारून टाकू नये. उलट मला अमुक व्हायचं आहे असा विचार ज्या अर्थी तुमच्या मनात उचंबळून येत आहे त्या अर्थी तशी शक्ती व तशी युक्ती तुमच्या ठिकाणी निसर्गानेच ठेवलेली आहे असं समजा. त्याप्रमाणं निष्ठापूर्वक नियमानं तपश्चर्या करायची करामत मात्र तुमच्याजवळ असायला हवी. त्यासाठी बाकीच्या सर्व सुखावर तुम्ही लाथ मारली पाहिजे. म्हणजे मग लाथ मारीन तिथं पाणी काढीन अशी धमक तुमच्या ठिकाणी आल्याशिवाय रहाणार नाही. मी धनुर्विद्येत पारंगत झालो होतो यात काहीच शंका नाही. कारण ....

कारण एकदा द्रोणाचार्य व त्यांचे अर्जुनासहित अनेक शिष्य शिकारीसाठी अरण्यात चालले होते. आपल्या शिष्यांची धनुर्विद्येत कितपत तयारी झाली आहे हेही द्रोणाचार्यांना पाह्यचं होतं. ते पायीपायी चालत असताना त्यांच्या बरोबर काही शिकारी कुत्रेही पुढंपुढं चालले होते. आणि योगायोग असा की ते द्रोणाचार्यांचे शिकारी कुत्रे पुढंपुढं येत असताना नेमके माझ्या झोपडीजवळ

येऊन मजवर भुंकू लागले. त्या वेळी मीही शिकारीला जायची तयारीच करीत होतो. म्हणून त्या कुत्र्यांचं भुंकणं बंद करण्यासाठी त्या कुत्र्यांच्या तोंडात मी धनुष्यानं बाण अशा तऱ्हेनं मारले की त्यांना इजा तर फार झाली नाही पण त्यांच भुंकणं मात्र आपोआपच बंद पडलं. हे पुढे आलेले कुत्रे तोंडातल्या बाणासहित द्रोणाचार्यांच्याकडे परत गेले. त्या कुत्र्यांच्या तोंडात अडकलेले बाण पाहून द्रोणाचार्यांनी तोंडात बोट घातलं. कारण त्यांच्या आवडत्या शिष्याला म्हणजे खुद्द अर्जुनालाही एवढी धनुर्विद्या अवगत झाली नव्हती.

म्हणून हे बाण इतक्या कौशल्यानं कुणी मारले हे पाहण्यासाठी द्रोणाचार्य त्यांच्या शिष्यासह माझ्या झोपडीत आले. हे बाण मी मारले आहेत हे समजल्यावर त्यांना आनंदही झाला आणि आश्चर्यही वाटलं. तसंच उच्चासनावरील त्यांची मूर्ती पाहून तर त्यांना मोठं नवल वाटलं.

परंतु क्षणार्धात का कुणास ठाऊक पण त्यांना मजविषयी फार मत्सर वाटू लागला. इतका की तो त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट उमटला. कारण उघडच होतं की धनुर्विद्येत मी अर्जुनावर मात केली होती. आणि आपल्या अर्जुनाचा धनुर्विद्येत कुणी हात धरणार नाही अशी तर त्यांना फार घमेंड झाली होती. तसंच मला धनुर्विद्या शिकवणार नाही हे त्यांनी साफसाफ सांगितलं होतं. त्यामुळं त्यांना वाटलं होतं की मी कसचा धनुर्विद्या शिकतो नि कसचं काय ! परंतु स्वतः माझं मन मला मार्गदर्शन करीत होतं. माझा निश्चय ध्रुव ताऱ्या-प्रमाणं अढळ होता. माझ्या प्रयत्नात मी माझा प्राण ओतला होता. आणि त्या मुळं माझ्या यशाचं मोल अनमोल होतं. नेमकं हेच त्यांना सलत होतं. म्हणून त्यांना मजविषयी मोठा द्वेष वाटू लागल्यास नवल ते काय ! यास्तव मोठ्या रागारागानं ते मला म्हणाले,

"ही धनुर्विद्या तुला कुणी शिकविली ?"

तेव्हा मी नम्रतेनं उत्तर दिलं,

"गुरुवर्य, आपणच ! आपणच माझे गुरू आहात. ही उच्चासनावर स्थापन केलेली आपली मूर्तीच मला शिकवीत होती. कारण धनुर्विद्या आपणाजवळूनच शिकायचा माझा निश्चय होता; आणि धनुर्विद्या शिकल्याशिवाय राहणार नाही हेही मी आपल्याला सांगितलं होतं ते आठवत असेलच !"

तेव्हा किंचित् हास्याचा आव आणीत द्रोणाचार्य म्हणाले,

"तर मग मला गुरुदक्षिणा द्यायला हवी ! नाही का ?"

"होय गुरुवर्य ! गुरुदक्षिणा द्यायला पाहिजे !"

"मग मी मागू का गुरुदक्षिणा ?"

"होय, जरूर मागा. आपण मला आपला शिष्य समजत आहात असाच याचा अर्थ झाला. तेव्हा आपण गुरुदक्षिणा मागितल्यावर मी का देणार नाही ? उलट असा भाग्याचा दिवस उगवावा आणि आपण मला आपला शिष्य समजावं हीच तर माझी इच्छा होती. तेव्हा गुरुदेव ! आपण जरूर दक्षिणा मागा !"

"पण तू गुरुदक्षिणा देशील का ?"

"का देणार नाही ? आपले पाय माझ्या झोपडीला लागले. आपण मला आपला शिष्य समजता. मग मी गुरुदक्षिणा का देणार नाही ?"

"हे जर तुझं म्हणणं मनापासून आहे तर दक्षिणा म्हणून मला तुझ्या उजव्या हाताचा आंगठा कापून दे !"

हे ऐकून एकलव्याला आश्चर्याचा मोठा धक्का बसला. मत्सरग्रस्त गुरू काय करू शकतो याचा तो पुरावा होता. षड्रिपूपासून कुणाचीही सुटका होत नाही हेच खरं !

द्रोणाचार्यांचे सर्व शिष्य तिथं हजर होते. द्रोणाचार्यांची मातीची मूर्ती उच्चासनावर बसलेली होती. ती मातीची मूर्ती चालत्या बोलत्या द्रोणाचार्यांहून फार मोठी होती. तेव्हा त्या मूर्तीची साक्ष म्हणून एकलव्यानं ताबडतोब आपल्या उजव्या हाताचा आंगठा कापून दिला.

ही एकलव्याची कथा संपली. पण ती पूर्ण करता करता माझ्या मनात हजारदा असा विचार आला की, द्रोणाचार्यांनी असं करायला नको होतं, नाही का !

आता हे एका दुसऱ्या व्यक्तीचं उदाहरण पाहा. सर विल्यम जोन्स या इंग्रज गृहस्थानं अठराव्या शतकात संस्कृत शिकण्यासाठी केवढा उद्योग केला आणि अकरा वर्षांच्या अवधीत न्यायाधिशाचं मोठ्या जबाबदारीचं काम सांभाळून संस्कृत भाषेवर केवढं प्रभुत्व मिळवलं हे आपण सर्वांनी अंतःकरणापासून अवलोकन करण्यासारखं आहे. एक शिकायची इच्छा असली तर मनुष्य केवढा प्रचंड उद्योग करतो याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे सर विल्यम जोन्स होत. हा जोन्स साहेबांचा वृत्तांत आता त्यांच्याच शब्दात ऐका. ही काल्पनिक घटना नव्हे, तर सत्य घटना आहे हे लक्षात ठेवा. वाचा आता.

"इसवी सन १७८३ त सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश म्हणून माझी नेमणूक झाली. हिंदुस्थानात कलकत्त्याला आल्यावर थोडंफार हिंदी भाषेचं ज्ञान मी करून घेतलं. त्यामुळं नोकरांच्या बरोबर मला थोडं थोडं हिंदी बोलता येऊ लागलं. इंग्लंडमध्ये असतानाच संस्कृत शिकायची माझी फार इच्छा होती. परंतु इथे कलकत्त्याला कुणीही पंडित मला संस्कृत शिकवायला तयार होईना. बंगालमधले कृष्णनगरचे महाराज शिवचंद्र हे माझे मित्र होते. त्यांनीही संस्कृत शिकवणारा

पंडित शोधायचा खूप प्रयत्न केला; पण व्यर्थ. एकादोघा पंडितांनी मला संस्कृत शिकवायची हिम्मत केली. ते माझ्या घरी शिकवायला आलेही. परंतु नवलाईची गोष्ट अशी की, ही गोष्ट त्यांच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना समजताच त्यांनी त्या पंडितावर बहिष्कार घातला. त्यामुळं त्यांनी माझ्या घरी शिकवायला यायचं तावडतोब बंद केलं.

कलकत्याला कुणी संस्कृत पंडित शिकवायला तयार नाही, म्हणून मी दुसऱ्या एखाद्या गावचा पंडित मिळतो की काय असा प्रयत्न केला. परंतु त्यातही मला यश आलं नाही. पुढं कुणीही ब्राह्मण पंडित संस्कृत शिकवायला तयार नाही म्हणून दुसरा एखादा पंडित मिळतो की काय असा मी प्रयत्न केला. तेव्हा पंडित रामलोचन कविभूषण हे महिना शंभर रुपये पगारावर मला संस्कृत शिकवायला तयार झाले. पंडित रामलोचन हे एकटेच होते आणि ते कुणाशीही फारसा संबंध ठेवीत नसत. त्यांचा वैद्यकीचा धंदाही बरा चालत असे. तेव्हा त्यांनी विचार केला की साहेबाला संस्कृत शिकवायला सुरुवात केली तर शेजारपाजारचे रोगी पूर्वीप्रमाणंच आपल्याकडे येणार नाहीत, असं वाटत नाही. कारण त्या भागात दुसरा कुणीही वैद्य नव्हता. म्हणून त्यांनी मला शिकवायचं साहस केलं. महिना शंभर रुपये पगाराशिवाय सकलीयापासून तर चौरिंघीपर्यंत म्हणजे रामलोचनजींच्या घरापासून तर माझ्या बंगल्यापर्यंत जायला यायला पालखीचीही मी व्यवस्था केली. त्याबद्दल महिना तीस रुपयांचा खर्चही मीच करणार होतो.

पंडित रामलोचन यांनी मजवर आणखीही अटी घातल्या होत्या. त्या सर्व अटी मी मोठ्या खुशीनं मान्य केल्या. माझ्या बंगल्यातल्या एका खोलीला मी संगमरवरी दगड बसवून घेतले. त्या खोलीची फरशी व भिंतींचा खालचा भाग दररोज धुण्यासाठी एका हिंदू मनुष्याला मुद्दाम मी नोकरीवर ठेवलं. ती खोली धुण्यासाठी त्या मनुष्याला दररोज हुगळी नदीचं ताजं पाणी आणावं लागे. त्या खोलीतलं इतर सर्व सामान काढून त्या ठिकाणी एक टेबल व चार पाच खुर्च्या ठेवण्याची मी व्यवस्था केली. त्या टेबल खुर्च्यांनाही दररोज पाण्यानं धुवावं लागे. पंडित रामलोचन यांची दुसरी अट अशी होती की, खोलीत प्रवेश करण्यापूर्वी मी एक कप चहाशिवाय दुसरं काहीही घेतलं न पाहिजे. ही अटही मी मान्य केली. पंडितजींची तिसरी अट अशी होती की, माझ्या बंगल्यावर कधीही गाय, बैल किंवा डुक्कर यांचं मांस येता कामा नये. ही अटही मी मान्य केली होती.

याशिवाय शिकवायच्या शेजारची खोली पंडितजींना कपडे बदलण्यासाठी म्हणून मी मुद्दाम राखून ठेवली होती. ही खोलीही दररोज धुवावी लागे. पंडितजींचा रस्त्यानं जायचा यायचा पोशाख वेगळा व शिकवायचा पोशाख वेगळा

असायचा. खोलीत शिरण्यापूर्वी ते शिकवायचा पोशाख परिधान करीत आणि शिकवणं संपल्यावर घरी परतण्यापूर्वी शेजारच्या खोलीत तो शिकवायचा पोशाख काढून ठेवीत.

सुरुवाती सुरुवातीला तर अशी स्थिती होती की पंडितजींना इंग्रजी येत नव्हतं आणि मला संस्कृत येत नव्हतं. नाही म्हणायला मला थोडं थोडं हिंदी मात्र येत होतं. परंतु पंडितजी शिकविण्यात वाकबगार होते आणि मी शिकायला फार उत्सुक होतो यात काही शंका नाही. मी अध्ययनाचं काम इतक्या चिकाटीनं आणि अंतःकरणापासून सुरू केलं की एका वर्षाच्या आत मला थोडं थोडं संस्कृत बोलता येऊ लागलं.

पुढं एके दिवशी बोलता बोलता नाटकाचा विषय निघाला. संस्कृत भाषेतही नाटकं आहेत आणि पूर्वी ती नाटकं रंगभूमीवर केलीही जात होती असं पंडित रामलोचनजींनी सांगताच मला मोठं आश्चर्य वाटलं. म्हणून मी कुतूहलानं 'शाकुंतल' नाटक शिकायला सुरुवात केली. मला हे नाटक इतकं आवडलं की, ते मी आपल्याला सांगू शकत नाही. या नाटकाचा मी ताबडतोब इंग्रजीत अनुवाद केला. हा अनुवाद उत्तम उतरला नव्हता याची मला जाणीव होती. तरीही युरोपातल्या साहित्यिकांना तो फार आवडला. त्यामुळं युरोपातल्या लोकांना साहजिकच संस्कृत भाषेबद्दल आदर वाटू लागला. कारण त्या पूर्वी त्यांना संस्कृत भाषेबद्दल फारशी माहिती नव्हती. सुप्रसिद्ध जर्मन कवी गटे याला शाकुंतल नाटकाचा प्रथम परिचय झाला तो या अनुवादामुळेच. त्या गटे कवीला हे नाटक इतकं आवडलं की तो ते डोक्यावर घेऊन नाचू लागला. त्यानं त्याचवेळी या नाटकाच्या स्तुतिपर एक कविता केली.

पंडित रामलोचन हे जुन्या पद्धतीप्रमाणं संस्कृत शिकवीत असत. त्यांचा सर्व भर पाठांतर पद्धतीवरच होता. त्यामुळं एखाद्या श्लोकाचा अर्थ मला समजला नाही तर मी पुन्हा विचारीत असे. तेव्हा पंडित रामलोचन म्हणत,

"अरे, मासमच्छी खाणाऱ्यांना का कुठं संस्कृत येणार आहे?"

पंडितजींचं हे बोलणं ऐकून मी फक्त हसत असे. आणि तो विषय शक्यतोवर टाळण्याचा प्रयत्न करीत असे.

पंडित रामलोचन काव्य, नाटक, अलंकार आणि व्याकरण शिकविण्यात वाकबगार होते. परंतु धर्मशास्त्र व दर्शनशास्त्र शिकविण्यात पारंगत नव्हते. यास्तव धर्मशास्त्र व दर्शनशास्त्र शिकविण्यासाठी मी दुसऱ्या एका पंडिताची नेमणूक केली. मी १७८३ ते १७९४ पर्यंत कलकत्त्याला न्यायाधीश होतो. या अकरा वर्षांच्या अवधीत मी संस्कृतचं बरच अध्ययन केलं. त्यामुळं मला मोठा लाभ झाला हे मला आपल्याला मुद्दाम सांगावसं वाटतं."

एकलव्य आणि सर विल्यम जोन्स या दोन पुरुषांची उदाहरणं तुम्हाला सांगितली. आता तुमच्यासमोर दोन स्त्रियांची उदाहरणं मांडतो. त्या दोन स्त्रियांच्या जीवनातल्या घटना तुम्हाला तितक्याच आवडतील असा मला भरवसा वाटतो. कारण त्या दोन्ही स्त्रियांनी फार मोठी कामगिरी बजावली आहे.

महाराष्ट्रातील एक थोर पुरुष महादेव गोविंद रानडे यांचं नाव तुम्ही ऐकलं असेलच. त्यांच्या पत्नी रमाबाई रानडे यांनी 'आमच्या आयुष्यातील आठवणी' या नावाचं आत्मचरित्र लिहिलं आहे. प्रत्येकानं हे आत्मचरित्र निदान एकदातरी वाचावं इतकं ते चित्ताकर्षक आहे. त्या आत्मचरित्रावरून न्यायमूर्ती रानडे यांना त्यांच्या पत्नीला शिकविण्यासाठी किती अडचणींना तोंड द्यावं लागलं हे दिसून येतं. तसंच रमाबाईनाही किती कष्ट सहन करावे लागले, किती बोलणं ऐकून घ्यावं लागलं आणि किती अपमान गिळावा लागला याची आपणास जाणीव होते.

रमाबाईंच्या बरोबर लग्न ठरण्यापूर्वी न्यायमूर्ती रानडे यांची अशी इच्छा होती की आपलं लग्न एव्हाशी न होता एक दोन वर्षानंतर व्हावं. परंतु त्यांच्या वडिलांनी आग्रह धरला की त्याच वर्षी लग्न झालं पाहिजे. आपले वडील आपलं काहीच ऐकत नाहीत हे पाहून न्यायमूर्ती शेवटी लग्नाला तयार झाले. रमाबाईंना न्यायमूर्तींच्या वडिलांनी पाहिलं होतं आणि त्यांनीच हे लग्न निश्चित केलं होतं.

रमाबाई 'आमच्या आयुष्यातील आठवणी' या आत्मचरित्रात लिहितात की, लग्न झाल्यावर न्यायमूर्ती रानडे यांनी विचारलं की, शिक्षण किती झालं आहे ? तेव्हा रमाबाईंनी उत्तर दिलं की माझं शिक्षणबिक्षण काही झालेलं नाही. तेव्हा न्यायमूर्तींनी त्याच दिवशी पाटी पेन्सिल विकत आणून रमाबाईंना शिकवायला सुरुवात केली. पुढं रमाबाईंना थोडं थोडं लिहिता वाचता येऊ लागलं. परंतु त्यांना इंग्रजीही यावं अशी न्यायमूर्तींची इच्छा होती. आणि इंग्रजी शिकण्यात अनंत अडचणी होत्या. त्याबद्दलची काही हकीकत आता रमाबाईंच्याच तोंडून ऐका. 'आमच्या आयुष्यातील आठवणी' पृष्ठ ७९ वर रमाबाई लिहितात.

"दुपारी हरफर्डबाई शिकवून गेल्यावर आता अंग धुऊ की काय करू असा विचार करीत दहा पाच मिनिटे मी तशीच बसले. इतक्यात वन्संकडून निरोप आला की 'तिला म्हणावे आडावर जाऊन अंगबिग धुऊन आमच्या भोवती आणखी दुखणी आणू नकोस. आमची आम्हांला कामे पुरेशी आहेत. त्यात तुमची दुखणी काढायला वेळ नाही. हव्या तशा नाचा ! जे एक एक होईल ते थोडे आहे !"

त्या दिवशी हिराबागेत मौजा पाहण्याला आलेली आमच्या घरची आश्रित नि विद्यार्थी मंडळी परत आल्यावर आमच्या घरातील वडील बायकांना

'वहिनीबाईंनी हजार दोन हजार माणसांत इंग्रजीत वाचले. लाजल्या नाहीत किंवा घाबरल्या नाहीत.' वगैरे खूप तिखटमीठ लावून व फुगवून मजकूर सांगितला. पण हा दोन अर्थांनी होता. ह्याबद्दल जसजसे आमच्या वडील बायकांकडून त्यांना प्रोत्साहन मिळत जाई तसतसे ते पुन्हा पुन्हा तेच ते सांगत. आमच्या घरात बायकांपैकी सगळ्यात वडील काय त्या ताईसासूबाईच होत्या. आमच्या सासूबाई वारल्यावर स्वतःला (म्हणजे न्यायमूर्तींना) ताईसासूबाईंनी दोनतीन वर्षेपर्यंत सर्वपरीने आईसारखे वागवले. त्यामुळे त्यांना आईच्याच ठिकाणी मानावयाचे असे. त्या कोणाला काही बोलल्या, वेळेवर शिव्या दिल्या तरी त्यांना कोणीही उलट उत्तर दिलेले स्वतःला आवडत नसे. इतकेच नव्हे तर स्वतः-लासुद्धा त्या काही बोलल्या तरी ते सर्व मुकाट्याने ऐकून घ्यावयाचे पण त्यांना उत्तर म्हणून द्यावयाचे नाही असा नियम असे. हा नियम असल्यामुळे राग आला म्हणजे ताईसासूबाई वाटेल त्याला वाटेल तसे बोलत व सर्वजण त्यांना भीत. कोणावर ही गदा केव्हा येईल याचा नेम नसे, व त्याला काही कारणही लागत नसे.

वर सांगितलेली सभेची हकीकत होता होता ताईसाहेबांच्या कानावर गेली. त्या ती हकीकत ऐकत असता वन्स त्यांच्याजवळ येऊन म्हणाल्या,

"ताई ! अलीकडे होताहेत या गोष्टी चांगल्या नाहीत बरे ! भाऊंच्या वेळचा (म्हणजे न्यायमूर्तींच्या वडिलांच्या वेळचा) अभिमान आता तुम्हीच राखला पाहिजे. बायको दुसरी व फजिती तिसरी हा अनुभव आमच्याच घरी येऊ पहात आहे. आपल्या माईच नाहीत का ? (म्हणजे न्यायमूर्तींची आई.) त्याही दुसऱ्याच होत्या. लाडक्या होत्या. पण परक्या पुरुषाच्या दृष्टीस पडण्याची त्यांची काय ताप होती ? एक दिवस पन्हाळगडावर अंगणामध्ये कारकून पाणी प्यावयास आले. त्या वेळेस आम्ही आत न जाता तेथेच उभ्या राहिलो. इतकाच अपराध ! एवढ्यावरून आमच्या भाऊंनी या माईशी चार दिवस भाषण वर्ज्य केले होते. ती कदर कोणीकडे व हल्लीचा प्रकार कोणीकडे ! जे पाहावे ते अधिक आहे !"

याप्रमाणे ताईसाहेबांच्या रागात भर घालून वन्स देवघरात गेल्यावर ताईसाहेबांचा भडिमार सुरू झाला. तो साडेनऊ वाजेपर्यंत चालू होता. त्या दिवशी स्वतःला (न्यायमूर्तींना) घरी येण्यास बरीच रात्र झाली. घरी आल्यावर स्वतःच्या समक्ष ताईसासूबाई रागाने बोलत होत्या. पण पहिला आवेश मात्र नव्हता. त्या म्हणाल्या,

"दिवसेंदिवस माणसांनी अन्न अगदी सोडून दिली. पहिल्या बायका पुरुषांच्या पुढे उभ्यासुद्धा रहात नसत. मग बोलण्याची गोष्ट कशाला ! त्या बायका का लाडक्या नसत ? का त्यांच्यामधे प्रेम नसे. आताचे प्रेम म्हणजे बायकोने पदर

बांधून जवळ असावे, खुर्चीला खुर्ची लावून जवळ बसावे. पुरुषासारखे लिहावे व वाचावे येथवर आले. आतापर्यंत घरातल्या घरातच ऐकत होतो. पण आजची त्यावर कडी आहे ! एवढ्या हजार दोन हजार मंडळींत बायकोने इंग्रजी वाचले त्याची लाज कशी नाही वाटली ? डोक्यावरचे पागोटे तरी राहिले कसे ? पहिले लोक अब्रूला किती जपत असत. पण ती आता राहिलीच नाही. उलट मोठे आवडले असेल ! त्याच वेळेस उठून पाठ थोपटायची होती म्हणजे अधिक चांगले झाले असते !

बायकांना शिकवले म्हणजे त्या उद्धट होतात. त्यांच्या डोळ्यात पाणी रहात नाही. ही गोष्ट खोटी आहे काय ? शिकवायचेच तर व्यंकटेशस्तोत्र, शिवलीलामृत यांसारखे काही वाचता आले म्हणजे पुष्कळ झाले. पुरुषासारखे इंग्रजी शिकून काय चाकरी करावयाची आहे ? कोणतीही गोष्ट मर्यादेच्या बाहेर गेली म्हणजे तिचा परिणाम असाच व्हावयाचा. इंग्रजी शिकवले म्हणून असे झाले. आता तरी ते इंग्रजी सोडून द्या. आताच्या या मुली बोट दिले म्हणजे हात गिळावयास येतात. त्यांना बेताने वागवले नाही तर त्या आळ्यात रहावयाच्या नाहीत. काय तरी बाई ! घरात ती एक शब्द बोलत नाही. रागावले तर चकार शब्द काढीत नाही. कितीतरी गरीब दिसते. पण बाहेर पहा तिला इतका कुठला धीटपणा आला तो ! ऐकल्यापासून मला पुन्हा पुन्हा नवल वाटते आहे !"

नंतर वरच्या खोलीत रमाबाईंची व न्यायमूर्तींची भेट होताच रमाबाईंना अधिकच रडायला आलं. कारण ते लहानसं इंग्रजी भाषण स्वत: न्यायमूर्तींनीच लिहून दिलं होतं. आणि त्यांनीच वाचायला सांगितलं होतं. तेव्हा न्यायमूर्ती म्हणाले,

"ताईबाईंना तोंडाने उत्तर द्यायचे नाही. कारण त्या आईसारख्या आहेत. परंतु आपले शिक्षणाचे ध्येयही सोडायचे नाही. कारण त्या जुन्या मतालाच चिकटून राहतील. त्यांची मते आपल्याला बदलता यायची नाहीत. पण शिक्षणाचे महत्त्व जेवढे सांगावे तेवढे थोडेच आहे. यास्तव या अडचणींतूनच आपण मार्ग काढला पाहिजे !"

एवढा हा लांब उतारा द्यायचा उद्देश असा की रमाबाई रानडे यांना इंग्रजी शिकण्यासाठी किती बोलणी सोसावी लागली आणि न्यायमूर्ती रानडे यांनाही किती अडचणींना तोंड द्यावं लागलं हे आपल्या ध्यानात यावं. शेवटी या सर्व अडचणींवर त्यांनी विजय मिळवला. रमाबाईंनी 'आमच्या आयुष्यातील आठवणी' लिहून त्या अजरामर झाल्या आहेत. त्यांनी स्त्री शिक्षणासाठी जे कार्य केलं त्याचं स्मरण म्हणून भारत सरकारनं त्यांच्या नावाचं पोस्टाचं तिकिटही काढलं होतं.

लग्नापूर्वी जशा रमाबाई रानडे शिकलेल्या नव्हत्या तशाच लक्ष्मीबाई टिळक याही शिकलेल्या नव्हत्या. लग्नानंतर रेव्हरंड टिळक यांनी लक्ष्मीबाईंना शिकवायला सुरुवात केली. त्या वेळचा एक प्रसंग पाहा. 'स्मृतिचित्रे' या लक्ष्मीबाई टिळक यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रातल्या पहिल्या भागात त्या सांगतात,

"लक्ष्मीबाई खऱ्यांना वाचता येते तर तसे लक्ष्मीबाई टिळकांनाही आले पाहिजे असे टिळकांनी ठरविले. टिळकांना लहान मुलांना चांगले शिकविता येत असले तरी माझ्या बाबतीत ते अगदी निराळेच ठरले. एक तर मी लहान नव्हते. दुसरे परकी नव्हते. तिसरे मला हसू फार येत असे. त्या हसण्याने माझ्या शिक्षणातही दगा दिला.

मला शिकविण्याचे ठरल्यावर टिळकांनी पहिलीपासून सहावीपर्यंत पुस्तके जवळ होते नव्हते तितके सर्व पैसे खर्च करून एक दिवस खरेदी करून आणली. एका बाजूला टिळक बसले, पलीकडे मी बसले. मध्ये पुस्तकांचा ढीग घातला, व आमच्या अभ्यासाला सुरुवात झाली.

व्याकरणापासून सुरुवात. टिळक म्हणाले,

"शब्द म्हणजे काय?"

मला सपाटून हसू लोटले. हा कसा चमत्कारिक प्रश्न! शब्द म्हणजे शब्द! म्हणून "शब्द म्हणजे शब्द" मी उत्तर दिले.

"पण शब्द म्हणजे काय?"

"शब्द म्हणजे शब्द!"

"पण शब्द म्हणजे काय?"

पुन्हा आपले माझे "शब्द म्हणजे शब्द" हे उत्तर ठरलेले. झाले! टिळक खूप संतापले. ते संतापत तसतशी मी हसू लागे. तसतसे ते आणखी संतापत. शेवटी संतापाग्नीने व माझ्या हास्याच्या वायूने मोठा भडका उडाला. तो भडका होताच पुस्तकांचा भडका उडाला! टिळकांनी सारी पुस्तके टराटर फाडून टाकली व त्या चिंध्यांच्या ढिगाऱ्याला काडी लावून पेटवून दिले.

हा आमच्या पहिल्या दिवसाचा 'अभ्यास!' एका आठ दिवसांच्या आत आपल्या नायकोने आपल्यासारखे व्हावे असे टिळकांना वाटे व मी पडले मठ्ठातली मठ्ठ! तेव्हा ते व्हावयाचे कसे?

पण हळूहळू त्यांना आपली चूक कळून आली. त्यांनी मला अ पासून ज्ञ पर्यंत अक्षरे वळविण्यास दिली. ती झाल्यावर क ची बाराखडी करून घेतली पण हे शिक्षण देत बसण्यात त्यांना काहीच गंमत वाटेना. म्हणून माझे शिक्षण

येथेच आटोपले ! मात्र या पुढे माझे वाचन पुष्कळ वाढले व त्या वाचनातूनच बाकीच्या बाराखडचा व जोडाक्षरे वगैरे मला आपोआप आली. पण मागे सांगितल्याप्रमाणे क्ष, ज्ञ, कै, खै वगैरे मंडळी अजून माझी एखादे वेळेस फजिती करतात. "

यावरून लक्ष्मीबाई टिळक यांना लिहायलावाचायला शिकण्यासाठी किती कष्ट पडले असतील याची आपण कल्पनाच करावी. परंतु 'आपल्याला लिहितावाचता आलंच पाहिजे' अशी त्यांची जबरदस्त इच्छा असल्यानं आलेल्या अडचणीवर त्यांनी हळूहळू विजय मिळवला. पुढंपुढं लक्ष्मीबाई नुसत्या लिहायलावाचायलाच शिकल्या नाहीत तर शब्दचित्र रेखाटण्यातही निष्णात झाल्या. त्यांनी लिहिलेले आत्मचरित्र 'स्मृतिचित्रे' खरोखर अप्रतिम आहे. आपल्या मराठी भाषेत असं आत्मचरित्र आहे याचा आपल्याला मोठा अभिमान वाटावा, इतकं हे आत्मचरित्र उत्कृष्ट उतरलं आहे. अंतःकरणाची तळमळ, घरगुती सहजसुलभ भाषा आणि हास्यविनोदाची मधूनमधून थय्थय्थय्थय् नाचणारी कारंजी यामुळं हे आत्मचरित्र वाचताना आपल्याला अनिर्वचनीय असा आनंद होतो, आणि लक्ष्मीबाई टिळक यांच्याविषयी मोठा अभिमान वाटू लागतो. आपणही ही स्मृतिचित्रे अवश्य वाचा.

एकलव्य, सर विल्यम जोन्स, रमाबाई रानडे आणि लक्ष्मीबाई टिळक यांच्या चरित्रावरून आपण काहीच बोध घेऊ शकणार नाही का ?

# १०

# हिम्मत मर्दा तो मदत खुदा

सुमित्राच्या आईनं "जेवायला चला" अशी हाक मारताच मी म्हटलं, "सुमित्राला येऊ द्या ना!"

"काही नको. ती केव्हा येईल ते सांगता येत नाही. तुम्ही तर तुमचं आटपा!"

काय करावं आणि काय नाही याचा विचार करायलाही मला सवड मिळू नये अशी सुमित्राच्या आईनं घाई करताच मी उठलो. बाथरूममधे जाऊन हातपाय धुतले, चूळ भरली आणि पाटावर येऊन बसलो. 'आपण सुमित्राशिवाय जेवायला बसतो आहोत हे काही ठीक नाही' असं माझं मन मला पुन्हापुन्हा सांगत होतं. पण हे सुमित्राच्या आईला कसं सांगावं हे मला उमजेना. इतक्यात सुमित्राच्या आईनं वाढलेलं ताट माझ्यासमोर आणून ठेवलं. तेव्हा एकदम इथून निघून जावं असाही विचार माझ्या मनात येऊन गेला. पण अन्न समोर आल्यावर उठू नये, अन्नाचा अपमान करू नये असं माझ्या आईवडिलांचं लहानपणापासून सांगणं असल्यानं आणि तशाच तऱ्हेनं मी आतापर्यंत वागत आल्यानं, मला उठून जायचं धैर्य झालं नाही. आणि मी पहिला घास हातात घेतला मात्र,

"काय हो चंद्रकांत! बऱ्याच दिवसापासून विचारीन विचारीन म्हणून म्हणते, पण कधी जमलंच नाही. तुम्हाला असं विचारायचं होतं की ..."

सुमित्राच्या आईच्या चेहऱ्यावरील तिरस्काराचा, संशयाचा, संतापाचा आणि सूड उगवण्याचा एकवटलेला भाव पाहून माझ्या हातातला घास हातातच राहिला. त्या आता काय विचारणार हे जाणायला मी अति उत्सुक झालो होतो. रागारागानं मजकडे पाहतापाहता त्या म्हणाल्या,

"तुम्ही सुमित्राबरोबर इतकी लाडीगोडी का लावीत आहात? ती एम्. बी. बी. एस्. परीक्षा पास झाली आहे. आता ती कमवती आहे. तेव्हा तिच्या पगारावर तुम्हाला चैन करायची आहे! नाही का? असं नसतं तर तुम्ही तिच्याशी इतका संबंध कशाला वाढवला असता? तुम्ही परीक्षेत नापास झाला असूनही तिच्याबरोबर सारखी लाळ का घोटीत असता? तुमच्यासारख्या

दरवर्षी नापास होणाऱ्या दरिद्री तरुणाबरोबर तिनं लग्न करावं असं तुम्हाला वाटतं का ? खरं म्हणजे तुम्ही तुमच्या पायरीनं वागायला पाहिजे ! आमचं घराणं, आमचा लौकिक, आमची इस्टेट पाहता तुमच्यासारख्या दारोदार भटकणाऱ्यांच्याजवळ काय आहे ? आणि मला तर आता असं वाटू लागलं आहे की परीक्षेत नापास झाल्यामुळं तुमचं मन तुम्हाला सारखं खात आहे. अशा वेळी सुमित्रा हातची जाऊ नये म्हणून तुम्ही सारखे तिच्या मागेमागे असता ! तिच्याशिवाय तुमचं पान हालत नाही. तुम्ही सुमित्राला घेऊन सिनेमाला का गेला होता ? अहो ! तिचं तिला मलंबुरं कळत नसलं तरी आम्हाला तिच्या हिताची काळजी घ्यायलाच पाहिजे. आणि तेवढ्यासाठी तुम्ही तुमच्या पायरीनं वागत नसला तर आम्ही तुम्हाला तसं वागायला भाग पाडू ! तुम्ही आहात कोणत्या घमेंडीत ? तुम्ही स्वतःला काय समजता कुणास ठाऊक ? अहो ! ती नुसती एम्. बी. बी. एस्. झाली आहे असं नव्हे तर तिला आम्ही फॉरेनलाही पाठविणार आहोत. तिला इंग्लंडला पाठवून आम्ही तिला एफ्. आर. सी. एस्. करणार आहोत ! बोला काय म्हणणं आहे तुमचं !"

हे ऐकून माझ्या सर्वांगाची लाहीलाही झाली. तळपायाची आग मस्तकाला गेली. काय बोलावं नि काय नाही असं मला झालं. मी हातातला घास ताटात टाकला आणि पाटावरून उठताउठता म्हटलं,

"आपण आता जे बोललात त्यातलं एक अक्षरही खरं नाही ! उलट खरी गोष्ट अशी आहे की ..."

"काही सांगू नका खरी गोष्ट ! आम्ही काही आता बोळच्यानं दूध पीत नाही. म्हणे त्यातलं एक अक्षरही खरं नाही ! मग काय खरं आहे ? तुमचं डोचकं ! तुमच्या घरची एक दमडीची मिळकत नाही. मग तुमचा इथला खर्च भागतो तरी कसा ? अन् कोण भागवतो ? तुम्ही खाता, पिता, शिक्षण घेता, फी भरता हे सर्व कुणाच्या जिवावर करता ? दर आठ दिवसाला तुमचा सिनेमा चुकत नाही ! नवीननवीन फॅशनचे कपडे तुम्ही घालता ! हे सर्व कुणाच्या जिवावर ? हा तुमचा सर्व खर्च सुमित्राच करते हे न समजण्याइतके आम्ही दुधखुळे नाही ! समजलात ! आजच तिला फॉरेनरिटर्नड् पैसेवाला डॉक्टर मागणी घालीत आहे. तुमच्यासारखे तिचे नोकर शोभतात नोकर ! समजलात ! आणि तुम्ही खुशाल तिला घेऊन इकडे फिर नि तिकडे फिर असं मिरवता ! तुम्ही स्वतःला समजता तरी कोण ?"

मी बाथरूममधे चूळ भरून बाहेर येताच म्हटलं,

"हे बघा !"

"अहो, हे बघा काय हे बघा! मी आता बोलले यातलं एक अक्षर तरी खोटं आहे का? तुमच्या बुद्धीचा, तुमच्या सांपत्तिक स्थितीचा आणि तुमच्या सामाजिक दर्जाचा विचार करता तुम्ही तिच्या तळपायाची तरी बरोबरी करू शकता का? तुमच्यासारख्यांची तिचे नोकर म्हणून राह्यचीही लायकी नाही. आणि तुम्ही ...."

हे ऐकून माझा संताप फारच अनावर झाला. मी स्वतःला कसं काय आवरलं कुणास ठाऊक! खोलीत जाऊन मी कोट घातला आणि जिन्याच्या पायऱ्या झर्झर्झर्झर् उतरू लागलो. इतक्यात सुमित्रा हॉस्पिटलमधून परत आली. ती जिना चढू लागायला आणि मी उतरायला एकच गाठ पडली. सुमित्रानं विचारलं,

"कुठं चाललात?"

पण मी काहीएक उत्तर दिलं नाही. तडक माझ्या खोलीवर येऊन दरवाजा लावून घेतला आणि वडीलांच्या फोटोसमोर उदबत्ती लावून, त्यांना नमस्कार करून मी मनातल्या मनात म्हटलं,

"बाबा! मला क्षमा करा! आज माझा फारच अपमान झाला! यात माझा अपराध किती हे मला समजत नाही. परंतु मी परीक्षेत यंदा नापास झालो हे मला मोठं लांछन होय. समजा मी यंदा नापास झालो नसतो तर तुम्हाला दिलेलं वचन याच वर्षी पूर्ण केल्याचं समाधान मला मिळालं असतं.

बाबा! हा इहलोक सोडून जाण्यापूर्वी तुम्ही म्हणाला होता की चंदू तू डॉक्टर हो डॉक्टर! तुला गोरगरिबांची सेवा करता येईल. तुझ्या आईचा अंत कसा झाला हे तर ठाऊकच आहे तुला! त्या वेळी मी एका खेडेगावात होतो. तुझी आई सकाळी कॉलऱ्यानं आजारी पडली आणि दुपारी दिवंगत झाली. वेळेवर कुणीही डॉक्टर येऊ शकला नाही. गावतल्या लोकांनी मरीआईला मणभर गूळ कबूल केला होता. पण त्याचा उपयोग झाला नाही. तुझी आई गेल्यामुळं मला आभाळ फाटल्यासारखं झालं. त्या वेळी असे कितीतरी लोक मरण पावले. आणि बिना औषधपाण्यानं अनेक रोगामुळं कितीतरी लोक आजही मरत आहेत. गरिबांचा कुणी वाली नाही. कुणालाही याची पर्वा वाटत नाही. म्हणून मला वाटलं की हे सगळं चंदूला मोठेपणी कुणीतरी सांगावं आणि त्याला म्हणावं की बेटा! तू डॉक्टर हो! तुझ्याकडून होईल तितक्या गरिबांची सेवा कर! तेवढंच आपल्याला समाधान!

माझ्या समोर माझा मुलगा डॉक्टर झाला आहे, हे पाह्यचं भाग्य मला नाही. परंतु तू पुढं डॉक्टर होणार आहेस असं मला निश्चयपूर्वक सांग. तेवढ्या आधारावर मी सुखासमाधानानं मरेन. मी मरणाला घाबरलो नाही. परंतु तुझं

शिक्षण पूर्ण न होताच मला हा इहलोक सोडून जावं लागत आहे, याचं मला फार दु:ख होतं. परंतु त्याला आता काही इलाज नाही !

तेव्हा बाबा मी आपल्याला सांगितलं होतं की मी डॉक्टर झाल्याशिवाय राहणार नाही ! काय वाटेल त्या अडचणी आल्या तरी त्यांना जुमानणार नाही. मी मेडीकल कॉलेजमध्ये भरती झालो तेव्हाच जवळ जवळ हे निश्चित झालं होतं की डॉक्टर होणारच ! पण सध्या फार अडचणी येत आहेत. माझ्याविषयी सुमित्राच्या आईनं उगीचच गैरसमज करून घेतला आहे. आणि त्या मला काहीही बोलल्या तरी मी माझ्या ध्येयापासून विचलीत होणार नाही.

तसं पाहिलं तर मला यंदाच अपयश यायला नको होतं. कारण ज्या सुमित्राला मी शिकवलं ती पास झाली आणि मी मात्र होऊ शकलो नाही. आम्ही दोघांनी बरोबरच अभ्यास केला. खरं म्हणजे माझ्याचमुळं ती पास झाली. माझ्याशिवाय तिचं पान हालत नाही. तिला एकटीला अभ्यास करता येत नाही. आणि सुमित्राच्या आईला हे सगळं ठाऊक आहे.

पण या वर्षी मी नापास झाल्यानं आणि सुमित्रा पास झाल्यानं सुमित्राच्या आईला स्वर्ग ठेंगणा झाला आहे ! त्यांना मोठी घमेंड झालेली आहे. म्हणून त्यांनी माझा पाणउतारा केला. मला वाटेल तशा त्या बोलल्या आहेत. माझ्या-जागी दुसरा कुणी असता तर त्यानं तिथल्यातिथं त्यांना जबाब दिला असता ! आणि एका वाक्यात त्यांची बोबडी वळविली असती. पण एकानं गाय मारली म्हणून दुसऱ्यानं वासरू मारण्यात अर्थ नाही.

आज खरं म्हणजे सुमित्राचा वाढदिवस होता. म्हणून तिनं मला मुद्दाम तिच्या घरी जेवायला बोलावलं होतं. साडेअकरा वाजेपर्यंत मी हॉस्पिटलमधून परत येईन आणि मग आपण बरोबरच जेवण करू असं ती म्हणाली होती. म्हणून मी बरोबर साडेअकरा वाजता तिथं गेलो. बारा वाजेपर्यंत तिची वाट पाहिली. बाराचे साडेबारा झाले. मी पुढच्या खोलीत वाट पहात बसलो होतो. तेव्हा सुमित्राची आई म्हणाली की जेवायला चला, वाढलं ! तरी मी म्हटलं की सुमित्राला येऊ द्या. तर त्या म्हणाल्या की नको, ती येईल तेव्हा येईल. तुम्ही तर तुमचं आटपा ! म्हणून मी नाइलाजानं पाटावर बसलो. आणि मी हातात घास घेतला मात्र ! तोच त्यांनी माझं अंत:करण चिरून टाकणारं भाषण सुरू केलं.

काय हो चंद्रकांत विचारीन विचारीन म्हणते तर आज विचारतेच ! तुम्ही सुमित्राबरोबर एवढी घसट कशाला करता ? कुठं ती आणि कुठं तुम्ही ! ती आता एम. बी. बी. एस. झाली आहे. म्हणजे ती आता डॉक्टर झाली आहे. ती फॉरेनला जाऊ शकते. ती एफ. आर. सी. एस. होऊ शकते. एवढा पैसा आहे आमच्या-जवळ ! तिला आजच एफ. आर. सी. एस. झालेला डॉक्टर मागणी घालीत

आहे ! त्याच्याजवळ गडगंज संपत्ती आहे. त्याचा स्वतंत्र दवाखाना आहे ! त्याचा मोठा बंगला आहे. त्याच्या दोन मोटारी आहेत. त्याच्या घरी नोकरचाकर आहेत. त्याच्या मानानं तुम्ही सुमित्राचे नोकर म्हणून शोभता ! आणि असं असताना तुम्ही सुमित्राला बरोबर घेऊन हिंडता ! तिच्याशी संबंध वाढवता ! तिच्या संपत्तीवर डोळा ठेवता ! ज्यानं तिचं नोकर म्हणून रहायला पाहिजे त्यानं तिचं पाणिग्रहणं करायचं स्वप्न बघायचं ! खबरदार असं वागाल तर !

अशा तऱ्हेनं जे तोंडाला येईल ते त्या बोलल्या आहेत ! म्हणून मी आपल्या चरणी आज प्रतिज्ञा करतो की मी आजपासून सुमित्राच्या घराची पायरी चढणार नाही. आजपासून तिच्याशी भाषण बंद ! मी भला नि माझा अभ्यास भला ! मी एम. बी. बी. एस. झाल्याशिवाय राहणार नाही. आजपासून सुत्रित्राबरोबर कसलाही संबंध मी ठेवणार नाही ! बाबा ! आपण माझ्यावर विश्वास ठेवा. मी आजपासून . . . ."

असा विचार माझ्या मनात चालू असतानाच दारावर टक्टक् टक्टक् असा आवाज आला. मी दार उघडून पाहिलं तर सुमित्रा दारात उभी होती. तिच्या गालावरून अश्रू ओघळत होते. आत येताच तिनं बाबांच्या फोटोला लवून नमस्कार केला आणि माझ्या समोरच्या खुर्चीवर बसली. पण तिला काही बोलताच येईना. सारख्या अश्रूधारा वहात होत्या. रडता रडता ती म्हणाली,

"मला काय कल्पना की आई तुमचा असा अपमान करील म्हणून ! मला हॉस्पिटलमध्ये ऑपरेशनला वेळ लागला. नाहीतर मी वेळेवरच घरी आले असते. माझा रिझल्ट लागल्यापासून आणि तुम्ही नापास झाल्याचं समजल्यापासून आई तुमच्याबद्दल असं तुसडया सारखं का बोलत होती याचा आज मला उलगडा झाला. पण बाबांच्या समोर शपथ घेऊन सांगते की आपला अपमान होईल असं मला स्वप्नातही वाटलं नव्हतं. तुमच्यामुळंच माझा अभ्यास झाला आणि मी परीक्षेत पास झाले. पण आईला याचं काय ? आई तुम्हाला काय वाटेल ते बोलली असेल. पण तुम्ही काहीही मनात आणू नका. मला क्षमा करा !"

"पण सुमित्रा तुझ्या यशाचं श्रेय तू मला देऊ नकोस. माझ्यामुळं तुला यश मिळालं असं समजू नकोस. तू हुषार म्हणून तुला यश आलं. आणि तुझी आई म्हणते तेच खरं !"

"काय खरं ? काय म्हणाली आई ?"

"तुझ्या माझ्या सांपत्तिक स्थितीत जमीनअस्मानाचं अंतर आहे. तू इंग्लंडला जाऊन एफ. आर. सी. एस. होऊ शकतेस. स्वतःचा भरभराटीत असलेला दवाखाना चालवणारा, स्वतःच्या दोन दोन मोटारी असणारा, स्वतःच्या घरी नोकरचाकर ठेवणारा असा फॉरेनरिटर्न्ड देखणा पती तुला मिळू शकतो.

त्या मानानं मी त्याच्या पासंगालाही पुरण्यासारखा नाही. एवढंच काय पण तुझी आई म्हणते त्या प्रमाणं मी तुझा नोकर म्हणूनही शोभून दिसत नाही ! " हे ऐकून सुमित्रानं माझ्या तोंडावर हात ठेवला आणि ती म्हणाली,

"असं काहीही अभद्र बोलू नका. मला कॉरेनला जायचं नाही अन् अशा धनवान डॉक्टरबरोबर लग्नही करायचं नाही. तुम्ही आईच्या बोलण्याकडे बिलकूल लक्ष देऊ नका. तुमचा झालेला अपमान हा माझाच अपमान झाला असं मी तिला स्पष्ट बजावलं आहे. तुम्ही अन्न घेतल्याशिवाय मी घेणार नाही हे तिच्या पुरतेपणी लक्षात आलं आहे ! तेव्हा माझ्यासाठी म्हणून आपण जेवायला घरी चला. मी आपल्याला हात जोडून विनंती करते ! "

" हे बघ सुमित्रा ! आता मी तुझ्या घरी येणं शक्य नाही ! माझी झाली एवढी शोभा बस्स झाली. आता मला प्रथम एम. बी. बी. एस. झालं पाहिजे. मी आता तुझ्या घराची पायरी चढणार नाही. आणि हा जो निश्चय मी केला आहे त्यात कदापीही बदल होणार नाही ! तेव्हा हे लक्षात घेऊन तुला कसा संबंध ठेवायचा ते तू ठरव ! "

मी तिच्या घरी जेवायला जाणं शक्य नाही हे सुमित्राच्या लक्षात येताच तिनं त्या दिवशी स्टोव्हवर माझ्या घरीच सैपाक केला. मग आम्ही दोघेजण बरोबरच जेवलो.

दुसऱ्या दिवसापासून माझा नियमित दैनिक जीवनक्रम सुरू झाला. ' आता अगोदर आपण एम. बी. बी. एस. परीक्षा उत्तीर्ण झालं पाहिजे ' या गोष्टीचा जणू काही मला निदिध्यास लागला होता. परीक्षेच्या अभ्यासापुढं मला दुसरी कोणतीच गोष्ट सुचेना ! आपण परीक्षेत नापास झालो हे फार मोठं लांछन होय याची जाणीव होऊ लागली. आणि सुमित्राच्या आईनं आपला अपमान केला हे एकप्रकारानं बरंच झालं असं मला वाटलं. कारण त्यामुळं मला माझ्या स्वत्वाची नव्यानं जाणीव झाली. माझा स्वाभिमान जागृत झाला. माझा कामाचा जोम वाढला. माझी अभ्यासाची जिद्द अधिकच दृढ झाली. त्यामुळं मला माझ्या ध्येयाशिवाय दुसरं काहीही दिसेनासं झालं. आणि ही माझी अभ्यास करण्याची गती म्हणजे अभ्यासाची पुस्तकं वाचणं, त्यांच्या नोट्स काढणं, त्यावर विचार करणं आणि पुन्हा वाचन करून पुन्हा चिंतन करणं ही कृती इतक्या ठामपणानं होऊ लागली की कधी कधी तर मी तहानभूकही विसरून गेलो. याच वेळेला मी असाही निश्चय केला की एम. बी. बी. एस. ची परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत सिनेमा पाहायचा नाही की नाटकालाही जायचं नाही. त्यामुळं माझ्या अभ्यासाला एक तीक्ष्ण अशी धार आली. कठिणकठिण गोष्टी मला इतरांच्या मानानं अधिक चांगल्या समजू लागल्या. आपण परीक्षेत उत्तम पैकी यश मिळविणार असं मला

पुन्हा पुन्हा वाटू लागलं. यामुळं अगदी पहिल्या दिवशी जरी मी सुमित्राच्या आईला माझा अपमान केल्याबद्दल दोष दिला होता तरी आता मी त्यांना मनातल्यामनात अनेकवेळा धन्यवाद दिलेत. वाईटातून चांगलं निघतं असं जे म्हणतात ते काही खोटं नाही !

माझा दिनक्रम अगदी ठरून गेला होता. मी सकाळी चारला उठत असे. तोंड धुतल्यावर अभ्यासाला बसत असे. त्यामुळं सकाळी साडेचार ते साडेसहा असे माझे सकाळचे दोन तास वाचनात जात असत. या वेळी मी पुढची पुढची पृष्ठं वाचून ठेवीत असे. त्यामुळं वर्गात प्रोफेसर काय शिकवतात हे माझ्या लक्षात येई. आणि तोच भाग मी झोपण्यापूर्वी पुन्हा पहात असे. त्यामुळं तो इतका पक्का होई की मला केव्हाही विचारलं तरी मी बरोबर सांगू शकलो असतो. सकाळी सात ते साडे अकरा कॉलेजमध्ये जाई. दुपारी जेवण व प्रॅक्टिकल्स असत. नंतर रात्री पाळीपाळीनं हॉस्पिटलमध्ये ड्यूटी द्यावी लागे.

तशातच माझ्या खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी मेडिकल कॉलेजमधील सेकंड इअरच्या परीक्षेत नापास झालेल्या एका मुलाची शिकवणी मी पत्करली होती. त्या शिकवणीचे मला महिना शंभर रुपये मिळत. त्या मुलाचे वडील ओळखीचे असल्यानं मला ती शिकवणी पत्करावी लागली होती. शिवाय मलाही पैशांची आवश्यकता असल्यानं माझीही सोयच झाली असं म्हणायला हरकत नाही. म्हणजे सकाळी चार वाजल्यापासून तर रात्री बारा वाजेपर्यंत मी सारखा उद्योगात असे. मी फक्त दुपारी एकदाच जेवण घेत असे. रात्रीचं जेवण मी बंद केलं होतं.

अशा तऱ्हेनं एक वर्षपर्यंत मी जी तपश्चर्या केली तिचं योग्य ते फळ मला मिळालं. काय फळ मिळालं ते मी आपल्याला नंतर सांगतो.

मी नापास झालो त्याच वर्षी सुमित्रानं लग्न करावं म्हणून तिच्या आईनं तिला फार गळ घातली. नुकताच फॉरेनहून आलेला एक नामांकित डॉक्टर आमच्या कॉलेजमध्ये भाषण द्यायला आला होता. विद्यार्थ्यांच्यावतीनं चार शब्द बोलायचा मान मलाही मिळाला होता. त्या रमाकांत डॉक्टरांचं भाषण झाल्यावर विद्यार्थ्यांच्यावतीनं आभार मानण्याचं काम मजकडे सोपवण्यात आलं होतं. माझं भाषण, का कुणास ठाऊक, पण विद्यार्थ्यांना व आमच्या प्रोफेसरांना उत्स्फूर्त असं वाटलं. कारण आमच्या इथल्या विद्यार्थ्यांनी परदेशातल्या लोकांच्याजवळून पुष्कळ गोष्टी शिकण्यासारख्या आहेत हे खरं ! परंतु आपणही आपल्या अंगी असं काही नैपुण्य संपादन करावं, अशी सेवावृत्ती अंगी बाणवून घ्यावी, अशी काही शालीनता आत्मसात करावी, आणि असं काही राष्ट्रीय चारित्र्य अंगी बाणवून घ्यावं की त्यामुळं परदेशातल्या लोकांनाही आपल्याजवळून

काहीतरी शिकण्यासारखं आहे असं वाटावं, नाहीतर परदेशात जाऊनही आपणाला पाहिजे तसा फायदा करून घेता येणार नाही. असं मी सहज ओघाओघात म्हटलं होत. ते त्या रमाकांत डॉक्टरांना उद्देशून नव्हतं. आमच्या विद्यार्थ्यांनी मात्र माझ्या आभाराच्या भाषणानंतर जोरानं टाळ्या वाजवल्या. असो.

काय विचित्र योगायोग असतात पाहा ! या रमाकांत डॉक्टरचं आणि माझं जणू काही याच दिवसापासून वितुष्ट सुरू झालं. आणि ते वाढतंच गेलं. डॉक्टर रमाकांत यांनी सुमित्राला प्रथम पाहिलं ते त्यांच्या या भाषणाच्या वेळीच. नंतर अनेकांच्याबरोबर सुमित्राचाही त्यांच्याशी परिचय झाला. आणि त्याचवेळी सुमित्रा त्या डॉक्टरच्या मनात भरली. ती यंदाच एम. बी. बी. एस. झाली आहे आणि अजून अविवाहित आहे याची माहिती मिळताच त्याची उत्सुकता अधिकच वाढली.

त्यानं सुमित्राविषयी बरीच माहिती मिळवली. आणि नंतर तो स्वतः सुमित्राच्या घरी जाऊन तिच्या आईवडिलांना भेटला. त्याचा तो श्रीमंती ऐटवाज पोषाख, अमेरिकेत नुकतीच फार मोठ्या पगाराची नोकरी मिळाल्यामुळं वाटणारा स्वाभिमान, तो स्वतः देखणा असल्यानं त्याच्या वागण्यात आणि बोलण्यात आलेली ऐट यामुळं सुमित्राच्या आईवडिलांवर त्याची चांगलीच छाप पडली. त्यानं पहिल्या भेटीतच आपण हिंदुस्थानात एवढ्यासाठी आलो आहोत की इकडून जाताना चतुर्भुज होऊन जावं. यास्तव योग्य वधू शोधण्याचं काम चालू आहे. मला पुष्कळ मुली सांगून आल्या आहेत. परंतु मला सुमित्राच पसंत पडली आहे. माझ्या अपॉइंटमेंटचं ओरिजीनल लेटरही मी आपल्याला मुद्दाम दाखवीत आहे. सुमित्रा लग्नाला तयार झाल्यास मला मोठा आनंद होईल. तिला अधिक शिकायचं असल्यास अमेरिकेत शिकता येईल. प्रॅक्टिस करायची असल्यास ती करता येईल. लग्नाच्या बाबतीत माझी कोणतीही अट नाही. वगैरे वगैरे पुष्कळ गोष्टी त्यानं सांगितल्या. रमाकांत डॉक्टरनं सुमित्राच्या आईला तर पूर्णपणानं जिंकलं. कारण "आपण चार दिवसांनी भेटा. मग काय ते सांगू. सुमित्राला विचारून पाहू ! सुमित्रा आमचं ऐकणार नाही असं वाटत नाही !" असं सुमित्राच्या आईनं रमाकांतला सांगितलं होतं.

परंतु चार दिवसानंतरही "मला यंदा लग्न करायचं नाही. पुढच्या वर्षी पाहीन !" असा सुमित्रानं आईला स्पष्ट जबाब दिला होता. आणि हे ऐकूनही रमाकांत म्हणाला, "काही हरकत नाही. सुमित्राची या वर्षी लग्न करायची इच्छा नसल्यास मी थांबायला तयार आहे. मी पुढच्या वर्षी अमेरिकेतून परत येईन." यावरून सुमित्राबरोबर विवाहाला तो किती उत्सुक होता हे स्पष्ट झालं होतं.

शिवाय सुमित्राच्या आईवडिलांचा जबरदस्त पाठिंबा असल्यानं सुमित्रा पुढच्या वर्षी आल्याबरोबर लग्नाला तयार होईल याविषयी त्याला मोठी आशा वाटत होती.

रमाकांत अमेरिकेत परत गेला तरी त्या सबंध वर्षभर सुमित्राच्या आईनं तिच्यामागं लग्नाचा लकडा लावला होता. " त्या रमाकांतांना हातचे जाऊ देऊ नकोस. पाहा ! पुढं पस्तावशील ! त्यांच्यासारखा सर्वगुणसंपन्न डॉक्टर शोधून मिळायचा नाही. म्हणून म्हणते की ही आपणहून चालून आलेली संधी वाया घालवू नकोस. तू होकार देशील तर आता बोलावते रमाकांतांना ! " असा तिच्या आईचा उपदेश चालूच होता.

एक वर्षानं सुमित्राच्या आईनं त्या रमाकांत डॉक्टरला मुद्दाम बोलावून घेतलं. आणि " तू म्हणाली होतीस की मी पुढच्या वर्षी पाहीन ! तेव्हा आता हो लग्नाला तयार ! हे डॉक्टर रमाकांत आम्हा सर्वांना सर्व दृष्टीनं पसंत आहेत. तेव्हा तुझं काय म्हणणं आहे ? आणि मोघममोघम काही बोलू नकोस ! त्या चंद्रकांत का फंद्रकांत बरोबर तू विवाह करावास हे आम्हांला बिलकूल मान्य नाही. हे तू नीट लक्षात ठेव ! असल्या भिकारड्याबरोबर आम्ही तुझं लग्न होऊ देणार नाही. तेव्हा आता तुझं काय म्हणणं आहे ते सांग ! कुठं ते डॉक्टर रमाकांत अन् कुठं तो भिकारडा चंदू का फंदू ! " असा तिच्या आईनं तिच्या मागं सारखा लकडा लावला होता.

सुमित्राच्या घरी घडलेली ही हकीकत मला समजताच मी बेचैन झालो. कारण यंदा माझा परीक्षेचा निकाल जाहीर झाला होता. एम्. बी. बी. एस्. परीक्षेत विश्वविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांत माझा पहिला नंबर आला होता. त्यामुळं मला सुवर्ण पारितोषिक मिळालं होतं. गतवर्षी मी नापास झालो होतो. पण त्याचा वचपा मी यंदा भरून काढला होता. हिम्मत मर्दा तो मदत खुदा हे मी माझ्या तपश्चर्येनं सिद्ध करून दाखवलं होतं. म्हणून माझ्या मित्रांनी माझं अभिनंदन केलं होतं. कित्येक प्रोफेसरांनी त्यांच्या घरी मुद्दाम चहाला बोलावून माझ्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव केला होता. प्रिन्सिपॉलसाहेबांनी मला मुद्दाम बोलावून माझी पाठ थोपटली होती. नातेवाईकांच्याकडून व परगावच्या चाहत्यांकडून अभिनंदनपर टेलिग्रॅम्स व पत्रं आली होती. या सर्व अभिनंदनामुळं मला आनंद झाला नाही असं नाही. परंतु ज्या व्यक्तीनं माझं अभिनंदन करावं अशी मला उत्सुकता होती ती मला भेटली नव्हती. माझा परीक्षेचा निकाल जाहीर होऊन आणि माझं अभिनंदन करणारा फोटो वर्तमानपत्रात प्रकाशित होऊन एक नव्हे दोन नव्हे तर सात दिवस लोटले तरीही सुमित्रा मला येऊन भेटली नाही. तिनं माझं अभिनंदन केलं नाही.

खरं म्हणजे मला परीक्षेत मिळालेल्या घवघवीत यशामुळं तिचं मन प्रफुल्लित झालं होतं. तिला मजविषयी आता दुप्पट अभिमान वाटू लागला होता. धावतधावत येऊन माझं अभिनंदन करावं आणि मजवर स्तुतीसुमनांचा वर्षाव करावा असंच तिला फारफार वाटलं होतं. पण ती तसं करू शकली नव्हती.

दैवाचा खेळ काय विचित्र असतो पहा. माझा स्वतःचा नशिबावर किंवा दैवावर बिलकूल भरवसा नाही. माणसानं प्रयत्नांची जिद्द केली तर तो यशस्वी होतो, हाच जीवनाचा खरा सिद्धांत आहे. कारण याप्रमाणं इरेला पेटून मी इतका प्रयत्न केला की शेवटी विजयश्रीनं मला माळ घातली. माझा विश्वविद्यालयात पहिला नंबर आला होता. आतापर्यंत कुणाला मिळाले नव्हते इतके गुण मला प्राप्त झाले होते. मला सुवर्ण पारितोषिक मिळालं होतं. परंतु सुमित्रा माझं अभिनंदन करायला येऊ शकली नव्हती.

कारण तिच्यावर याच वेळी संकट कोसळलं होतं. सुमित्राच्या आईला सुमित्राचं मन वळविण्यात अपयश आलं होतं तरी सुमित्राच्या आईनं हार मानली नव्हती. काय वाटेल ते झालं तरी सुमित्राचा माझ्याशी विवाह होऊ द्यायचा नाही अशी तिच्या आईनं जणू काही प्रतिज्ञाच केली होती. म्हणून डॉक्टर रमाकांत पुन्हा येताच सुमित्राच्या आईनं तिचं मन वळविण्याचा पुन्हा प्रयत्न सुरू केला.

आतापर्यंत सुमित्राचे वडील तिला प्रत्येक बाबतीत प्रोत्साहन देत असत. नवीन नवीन पुस्तकं विकत घेण्यासाठी, सहलीला जाण्यासाठी, मजबरोबर अभ्यास करण्यासाठी किंवा आम्ही अधून मधून बरोबर सिनेमाला किंवा नाटकाला जाण्यासाठी त्यांनी कधीही विरोध केला नव्हता. त्यामुळं जीवनाचा जोडीदार निवडण्याच्या बाबतीत आईनं कितीही अडथळा आणला तरी आपले वडील आपल्याच बाजूनं मत देतील आणि शेवटी पाहिजे त्याच व्यक्तीबरोबर आपल्याला लग्न करायला मिळेल अशी सुमित्राला जी खात्री वाटत होती, ती खोटी ठरली. कारण तिचे वडीलही तिला त्या रमाकांत डॉक्टरबरोबरच विवाह करण्यासाठी आग्रह करू लागले. त्यामुळं सुमित्राचा मनस्ताप वाढला. सुमित्राचे वडील तिला वारंवार सांगत होते,

"लग्नाच्या बाबतीत घरातल्या वडील माणसांनी आपल्या तरुण मुलां-मुलींच्या कलाकलानं घ्यावं हे खरं आहे. कारण आपल्या मुलांमुलींना त्यांचा जोडीदार निवडण्याचं पूर्ण स्वातंत्र्य असावं यात शंकाच नाही. त्या स्वातंत्र्याचा आपली मुलं चांगल्या तऱ्हेनं उपयोग करीत असतील तर उत्तमच झालं. परंतु दिलेल्या स्वातंत्र्याचा आपली तरुण मुलं किंवा मुली जर दुरुपयोग करीत असतील तर त्यांना आवरून धरणं हे वडील माणसांचं कर्तव्यच आहे. एवढंच

नव्हे तर मी असंही म्हणतो की आपली मुलं भलत्याच मार्गानं जात असतील तर त्यांना मागं वळवण्यासाठी त्यांचा कान उपटणं हे वडिलधाऱ्यांचं कर्तव्यच आहे.

आणि तसं पाहिलं तर चंद्रकांतमधे काय आहे ? तो आताच तर परीक्षा पास झाला आहे ? तोही दुसऱ्यांदा परीक्षेला बसून ! अजून नोकरीचा पत्ता नाही. आणि भांडवलं नसल्यानं असे कितीतरी एम्. बी. बी. एस् आहेत की त्यांना स्वतंत्र दवाखाना काढता येत नाही. आज स्वतंत्र दवाखाना काढायला कमीतकमी पंचवीस हजार रुपये हवेत. त्या चंद्रकांताला म्हणावं आयुष्यभर कष्ट करूनही इतके पैसे मिळवता येतील का तुला ?

उलट त्या रमाकांतांना फार मोठ्या पगाराची नोकरी अमेरिकेत लागली आहे. त्यांचा स्वतंत्र बंगला आहे. दोन मोटारी आहेत त्यांच्या ! घरात नोकरचाकर आहेत. त्यांचा फार मोठा नावलौकिक आहे. पाच वर्षांनंतर वाटलं तर तुम्ही अमेरिकेतून परत येऊ शकता. इथं दवाखाना काढू शकता ! एवढी इस्टेट आहे त्यांची ! रमाकांत काय दिसायला चांगले नाहीत ? ते काय शिकले सवरलेले नाहीत ? अमेरिकेतली शस्त्रक्रियेतली पदवी त्यांनी फर्स्टक्लासमधे मिळवली आहे. मग रमाकांतमधे असं काय नाही की तू त्यांना स्पष्ट नकार द्यावास ? ते काही नाही ! तू त्यांच्याशी विवाह केल्यानंच सुखी होशील असं आम्हाला वाटतं ! तरुण मुलींनी उगीच भावनेच्या भरात मनात येईल तसं वागू नये. निदान सुमित्रानं तरी असं वागता कामा नये ! " हे वडिलांचं बोलणं ऐकून सुमित्राचा राग अनावर झाला आणि रागाच्या भरात ती वडिलांना खूप बोलली. ती संतपानं म्हणाली,

" बाबा ! तुम्हाला अमेरिकेत जायची फारच उत्सुकता झालेली दिसते. पण मला मात्र अमेरिकेत जायचं नाही. तुम्हाला जायची खूपच खवखव असेल तर तुम्ही जाऊ शकता. म्हणे लग्नाच्या बाबतीत मुलींना स्वातंत्र्य द्यावं. वा रे वा हे तुमचं स्वातंत्र्य ! म्हणे मुली बेताल वागू लागल्या तर त्यांचे कान उपटणं आणि त्यांना वठणीवर आणणं वडिलधाऱ्यांचं कर्तव्यच आहे आणि आम्ही त्याचं पालन करणारच ! खुशाल करा तुमच्या कर्तव्याचं पालन. त्या रमाकांतबरोबर माझ्या प्रेताचं लग्न लावायचं असलं तर जरूर लावा. पण माझा निश्चय बदलणार नाही. मला ज्यांच्याबरोबर विवाह करायचा आहे त्यांच्याच बरोबर करीन. म्हणे चंद्रकांत गरीब आहेत ! असेनात का ! गरीब असले म्हणून काय झालं. त्यांच्याबरोबर चटणीभाकर खाऊनही मी सुखी होईन. मनुष्य काही नुसत्या अन्नावर जगत नाही. गेल्या वर्षी चंद्रकांतांचा केवढा अपमान केला आईनं ! तरीही ते हिम्मत हारले नाहीत ! त्यांनी यंदा युनिव्हर्सिटीत पहिला नंबर

मिळवला. त्यांना सुवर्ण पारितोषिक मिळालं आहे. असं असूनही तुम्ही त्यांना त्यांच्या गरिबीबद्दल हिणवता ! बरोबरच आहे, पैशांची भुरळ पडली आहे तुम्हाला ! म्हणून तुम्ही मला विकायला निघाला आहात. दुसरं काय !

गेल्या वर्षापासून मी नकार देते आहे पण ऐकत नाहीत ! आपल्या मुलीचं सुख कशात आहे याचा मक्ता आईबापांनी घ्यावा आणि वरून स्त्री-स्वातंत्र्याचा टेंभा मिरवावा ! वा रे वा स्त्री-स्वातंत्र्य ! यापेक्षा जन्मल्याबरोबरच मला मारून का नाही टाकलंत ? "

अशा तऱ्हेनं सुमित्रा फार बोलली. तिला संताप अनावर झाला होता. म्हणून बोलताबोलता ती मूर्च्छित होऊन पडली.

बराच वेळ झाला तरी सुमित्रा शुद्धीवर आली नाही म्हणून मग डॉक्टरांना बोलावण्यात आलं. डॉक्टरांनी सुमित्राला तपासून इंजेक्शन व औषध दिलं. तेव्हा कुठं ती शुद्धीवर आली. पण डॉक्टरांनी सांगितलं की सुमित्राला ताबडतोब हॉस्पिटलमधे भरती करण्यात यावं. तिच्या मेंदूवर आघात झाला आहे. डॉक्टरांच्या देखरेखीची तिला फार आवश्यकता आहे. तिला कमीत कमी एक महिना पूर्ण विश्रांती मिळाली पाहिजे.

त्याप्रमाणं सुमित्राला हॉस्पिटलमधील स्पेशल वॉर्डमधे ठेवण्यात आलं. त्याच दिवशी निरोप पाठवून तिनं मला बोलावून घेतलं. म्हणून मी लौकरलौकर जाऊन तिला भेटलो. मला पाहाताच तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. मला जवळ बोलवून ती माझ्या कानात म्हणाली.

" Hearty Congratulations ! "

मी म्हटलं, " Thank you ! पण तू प्रथम बरी तर हो ! "

" मी आता बरी झालेच म्हणून समजा ! पण तुम्ही मला सोडून जाऊ नका. इथंच राहा ! आईवडिलांच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका ! "

तीन आठवड्यानंतर सुमित्रा पूर्ण बरी झाली. सुमित्राच्या इच्छेप्रमाणं मी तिला हॉस्पिटलमधून माझ्या घरी घेऊन आलो आणि थोड्याच दिवसांनी आम्ही दोघांनी नोंदणी पद्धतीनं विवाह केला.

माझ्या पत्नीनं आणि मी मिळून सुरू केलेल्या दवाखान्यात प्रथम अगदीच थोड्या वस्तू होत्या. बाबांचा फोटो मात्र आम्ही मुद्दाम लावला होता. गोरगरीब आजाऱ्यांचीही आम्ही अंतःकरणापासून सेवा करतो. त्यामुळं त्यांचेही आशीर्वाद आम्हाला मिळत आहेत. पैसाही मिळत आहे आणि आमचा लौकिकही वाढत आहे. दूरदूर राहणाऱ्या आजाऱ्यांची सेवा करता यावी म्हणून आमच्याजवळ

सध्या मोटरही आहे. सुमित्राच्या आईवडिलांचीही मनं आता निवळली असून त्यांना आमच्याबद्दल अभिमान वाटत आहे. त्यांचेही आशीर्वाद आम्हाला मिळत आहेत. ज्याचा शेवट गोड ते सर्वच गोड असं म्हणतात ते काही खोटं नाही.

तेव्हा वाचकांना नम्र विनंती की आमचा दवाखाना किती लोकोपयोगी व लोकप्रिय आहे हे प्रत्यक्ष पाहण्यासाठी आपण आम्हाला अवश्य भेटा ! भेटाल का ?

## ११

# 'अहो ! अंगी नम्रता असायला पाहिजे !'

एखाद्या वेळी आनंदाच्या अशा काही घटना घडतात की, एकदम विश्वास ठेवावा की न ठेवावा असं आपल्याला होऊन जातं. माझा मित्र श्रीकांत याचं परवा दिल्लीहून पत्र आलं की, अमुकअमुक गोष्ट घडलेली आहे आणि ही आनंदाची बातमी तुला एकदोन दिवसांत कळेलच. ते त्याचं पत्र आल्यापासून 'हे असं खरोखरच घडलं असेल का ?' हा प्रश्न मी मनातल्यामनात हजारदा विचारला असेल ! हे श्रीकांतानं पाठवलेलं पत्र मी आता कितव्यांदा वाचतो आहे, हे माझं मलाच सांगता येणार नाही. त्यानं पत्रात सांगितलेली बातमी खरी असावी असं वाटतं. परंतु शंकाही येते, कारण सध्या वशिला असल्याशिवाय इकडचं पान तिकडे हालत नाही. शिवाय श्रीकांताचा थेट दिल्लीपर्यंत वशिला आणि ओळखपाळख असल्यानं जी आनंदाची घटना माझ्याबद्दल झालेली आहे असं त्यानं लिहिलं, ती कदाचित् त्याच्याबद्दल असून मला हिणवण्यासाठीही त्यानं लिहिलं असलं पाहिजे; असंही मला वाटू लागलं. आणि आपलं मन एकदा शंकाकुशंका घेऊ लागलं की ते कुठपर्यंत धाव घेईल हे सांगता येणं कठिण !

अशी शंका माझ्या मनात यायला कारणंही तशीच होती. त्यातलं मुख्य कारण हे की श्रीकांत जरी वरूनवरून मैत्रीचा आव आणत होता, तरी तो मनातल्यामनात माझा द्वेषच करीत होता. मी त्याला गेल्या आठ वर्षांपासून चांगला ओळखत होतो. स्वतः अंगी कर्तबगारी नसल्यास मनुष्य दुसऱ्याचा फक्त हेवादावा करतो. त्यापैकीच श्रीकांत होता.

ऑल इंडिया रेडिओतर्फे घेण्यात आलेल्या गायनवादनाच्या चढाओढीसाठी तबलावादनात 'शंकर संगीत विद्यालय,' या संस्थेतर्फे माझं एकट्याचच नाव पाठविल्यामुळं श्रीकांत चिडला होता. म्हणून त्यानं हेडमास्तरांच्याबरोबर बाचाबाची केली होती. 'मी माझ्या खर्चानं दिल्लीला जायला तयार आहे' असं श्रीकांतनं पुन्हापुन्हा सांगितल्यामुळं आणि त्याच्या वडिलांनीही गळ घातल्यामुळं मागाहून श्रीकांतचंही नाव पाठविण्यात आलं होतं. म्हणून दिल्लीच्या

गायनवादनाच्या एक महिन्यापूर्वी झालेल्या चढाओढीत आम्ही दोघांनीही भाग घेतला होता.

आठ वर्षापूर्वी मराठी चवथीत श्रीकांत आणि मी बरोबरच होतो. आम्हाला संताजी शिंदे नावाचे शिक्षक शिकवायचे. यांची मजवर मोठी मर्जी होती. हे श्रीकांतला पहावेना म्हणून तो मला पाण्यात पहात असे. त्याला वाटे की मी जर श्रीमंताचा मुलगा आहे, हे शिंदे शिक्षक मला घरी शिकवायला येतात आणि शिकवणीचे महिना तीस रुपये घेतात तर यांनी वर्गात माझा पहिला नंबर आणण्याऐवजी हे या पुरुषोत्तमला कशाला डोक्यावर बसवतात ! आणि याचे कपडे तरी धड आहेत का ? पुस्तकं तर मजजवळून घेतो अभ्यासाला ! अशा विचारानं ग्रासल्यामुळं श्रीकांत मजवर फार चरफडून होता.

नाही म्हणायला शंकर संगीत विद्यालयात अगदी सुरुवातीला आम्ही भरती झालो तेव्हा श्रीकांतनं माझ्यावर मात केली होती. श्रीकांतनं आणि मी तबलावादन शिकायचं ठरवलं. त्याच्या घरी तबला होता आणि गायन शाळेतले शिक्षक त्याला घरीही शिकवायला येत. म्हणून सहामाही परीक्षेत श्रीकांतचा पहिला नंबर आला होता. उलट माझ्याशी बोलता बोलता शिक्षक म्हणाले होते " तू पक्का ढ आहेस ! तू श्रीकांतची काय बरोबरी करणार ? "

हे तबलावादन शिक्षकांचं बोलणं जखमेवर मीठ चोळल्याप्रमाणं मला झोंबलं. पण मी काय करणार ? वडील निवर्तले आणि मला आभाळ फाटल्यासारखं झालं. माझ्या आईच्या अंतःकरणात तर दुःखानं कायमचं घर केलं. पोट भरण्याचं काही साधन नाही आणि कुणाचा काहीही आसरा नाही अशा वेळी माझे काका आईला व मला या नंदूरबारला घेऊन आले. काय वाटेल ते झालं तरी माझ्या पुरुषोत्तमानं शिक्षण घ्यावं आणि मोठं व्हावं या ध्यासानं आई हळूहळू दुःख विसरली. काकांच्या घरी दहाबारा माणसांचा ती दोन्हीवेळी सैपाक करायची. दिवसाच्या चोवीस तासांपैकी सोळा तास ती सैपाकघरात असायची असं म्हटलं तर अतिशयोक्ती व्हायची नाही. माझी आई म्हणजे काकांना एक सैपाकीणच मिळाली होती. कारण आई आल्यापासून माझ्या काकूनं सैपाक करणं बंद केलं. त्या फक्त देखरेख करायच्या आणि कोठारातून सामान काढून द्यायच्या आणि कोठाराच्या किल्ल्या सांभाळायच्या.

आणि वरकड कामासाठी मी काकांच्या समोर हजर असायचा. जरासं काही झालं की "कुठं गेला हा कारटा ! पुरुषा ! तुला कधी रे अक्कल येणार ?" असं म्हणून त्यांनी माझा कान पिळलाच म्हणून समजा. उठल्याबसल्या माझा कान पिळणं आणि माझ्या टपलीत मारणं हा त्यांचा नेहमीचाच उद्योग झाला होता. मी समोर येताच काका म्हणायचे, "अरे पुरुषा ! माझी

तंबाखू कुठं आहे ? ती तिथून चिलीम आण बरं ! अरे छापी भिजवून आण की ! अन् त्या शेजारच्या शेवंताबाईला म्हणावं आज दूध नाही मिळणार ! आज म्हशीनं दूध दिलं नाही. आणि त्या दगड्यानं उशीर कसा केला यायला ? त्याला म्हणावं विहिरीवरून पाणी कोण आणणार तुझा बाप ! पगार फुकटचा पाहिजे याला ! सध्या नोकरसुद्धा नुसते माजले आहेत लेकाचे ! अन् तिकडून येतायेता बाजारातून काही भाजीबीजी घेऊन ये. आणि पुरुषा तू इतका हळू-हळू काय काम करतोस रे ! तुझ्यासारख्या मुलानं कशी भरभरभरभर कामं करावीत. मी तुझ्याएवढा होतो तेव्हा – — – – "

म्हणजे मी कधी रिकामा असता नये असं काकांचं ठाम मत होतं. म्हणून ते मला सारखी कामं सांगत. कोणतंही काम असलं की त्यांना माझी आठवण झालीच म्हणून समजा ! त्यांनी माझं नाव शाळेत घातलं हीच मेहेरबानी म्हणायची ! माझी आई सारखी चुलीजवळ व दहाअकरा वर्षांचं वय असलेल्या मला सारखी बाहेरची कामं करावी लागतात आणि कधीकधी एकट्यालाच काका शेतावरही काही कामासाठी पाठवतात. हे पाहून माझ्या आईच्या मनात फार कालवाकालव होई. पण ती तरी काय करणार ? माझा मुलगा शिक्षण घेईल आणि मोठा होईल. तो मोठा झाल्यावर माझे पांग फेडील ! या आशेवर ती एकेक दिवस लोटीत होती आणि सर्व कष्ट सहन करीत होती.

एके दिवशी झोपता झोपता मी आईला म्हटलं " आई तू किती कामं करतेस ?" तिनं उत्तर दिलं, " बेटा ! तुझं शिक्षण व्हावं ही एकच माझी इच्छा आहे. तू शिकून मोठा झालास की मी सर्व काही भरून पावले. तू शिक्षण घेऊन मोठं व्हावस ही तुझ्या वडिलांची फार इच्छा होती ! " तेव्हा मी आईला धीर देत असे,

" आई ! तू काळजी करू नकोस ! मी शिक्षण घेतल्याशिवाय राहणार नाही ! पण आई ! काका मला तबला का शिकू देत नाहीत ? आणि उठल्याबसल्या माझा कान पिरगाळतात आणि माझ्या डोक्यात मारतात ! "

" बेटा ! त्यांच्याशिवाय आपलं कोण आहे ? म्हणून ते ठेवतील तसं आपल्याला राहिलं पाहिजे ! तू सुद्धा सर्वकाही सहन करायला शीक ! आपले हेही दिवस निघून जातील ! "

मी मराठी चवथीत असताना शाळा सुरू होताच बरेच दिवस मुदतीच्या तापानं आजारी पडलो होतो. आधीच तर मी मूळचा हडकुळा आणि तशातच या आजारानं मी अधिकच कृष झालो. त्यानंतर बरेच दिवस मी शाळेत जाऊ शकलो नव्हतो. थोडंथोडं बरं वाटू लागल्यावर गायनशाळेत मात्र तबला ऐकायला जात असे. पुढंपुढं शाळेत जाऊ लागलो तरी माझा अभ्यास कधीच भरून निघाला

नाही. या मुळं मी वार्षिक परीक्षेत नापास होईन असं मला वाटलं आणि झालंही तसंच. ज्या दिवशी परीक्षेचा निकाल लागणार होता त्या दिवशी मी शाळेत गेलो नाही. तेव्हा हाच श्रीकांत आणि एक विद्यार्थी माझं प्रगतीपुस्तक घेऊन घरी आले. मी नापास झालो आहे, याची खात्री करून घेतल्यावर काकांनी माझा कान धरून मला आंथरुणाबाहेर काढलं आणि खूप मारलं. ते म्हणाले,

" काय रे ! फुकटचं खायला पाहिजे आणि अभ्यास करायला नको ! मग शाळेत जाऊन काय करतोस ? का तिथंही ढम्ढम्ढम्ढम् वाजवत बसतोस ? "

त्या दिवशी मी खूप रडलो. पण आईनंसुद्धा मला जवळ घेतलं नाही. तिचं म्हणणं असं की मी अभ्यास करायलाच पाहिजे अन् परीक्षेत पास झालंच पाहिजे. नापास होऊन कसं चालेल ?

हातात येईल ती वस्तू वाजवायची ही सवय मला कशी काय लागली कुणास ठाऊक ! परंतु हातात येईल ती वस्तू मग तो तांब्या असो नाहीतर ताट, पुठ्ठा असो नाहीतर पाटी, बघुणं असो नाहीतर बादली अशी जी वस्तू हातात येईल ती वाजवायची सवय मला लहानपणीच लागली. आईनं आणि काकांनी हजारदा सांगितलं की असं वाजवणं चांगलं नाही. हे करंटेपणाचं लक्षण आहे. परंतु त्यांच्या बोलण्याकडे मी बिलकूल लक्ष दिलं नाही.

एकदा तर असं झालं की सायंकाळी घरी कुणी नाही असं पाहून मी खोका वाजवण्यात दंग झालो होतो. कोणता ठेका वाजवीत होतो माहीत नाही. कसला ठेका नि कसलं काय ! परंतु माझं हे वाजवणं काकांच्या कौमुदी नावाच्या धाकट्या मुलीला आवडलं होतं. ती नाचतानाचता डुलत होती आणि डुलताडुलता नाचत होती. अशा तऱ्हेनं हा आमचा खेळ बराच रंगात आला होता. इतक्यात काका बाहेरून केव्हा आले हे आम्हाला कळलं नाही. परंतु मला असं खोका वाजवताना व कौमुदीला नाचताना पाहून काकांचा राग अनावर झाला. त्यांनी मला खूप मारलं आणि बजावलं,

" यापुढं जर तू असं वाजवताना दिसलास तर याद राख ! तुझे हातच तोडून टाकीन ! हे असं वाजवणं आणि नाचगाणं या घरात चालायचं नाही. तुला इथं चांगलं वळण लावण्यासाठी आणलं का बिघडवण्यासाठी ? तुला हजारदा सांगितलं की असं दळभद्र्यासारखं वाजवू नकोस पण तू ऐकतच नाहीस. अरे तुला ताशे वाजवणारा का व्हायचं आहे ? कधी घासलेटचा डबा वाजवतो, तर कधी ताट वाजवतो. अरे ! ढम्ढम्ढम्ढम् वाजवणं चांगलं थोडंच आहे ? हा कारटा वाजवतो आणि ही कारटी नाचते ! हे काय घर आहे का तमाशा ? आणि अभ्यासाच्या नावानं बोंबाबोंब ! "

परंतु काकांच्या चोरून मी गायनशाळेत तबलावादन शिकण्यासाठी जायला सुरुवात केली होती. शंकर संगीत विद्यालयात महिना पाच रुपये फी द्यावी लागे. म्हणून शाळा झाडून काढणं व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना पाणी पाजणं अशी किरकोळ कामं मी करीत असे. म्हणून मला फी माफ करण्यात आली होती. मी श्रीकांतच्या घरी सायंकाळी सात ते नऊ अभ्यासाला जातो असं काकांना सांगून ठेवलं होतं. श्रीकांतला काकांनी विचारलं तर त्यानंही असंच सांगावं म्हणून मी त्यालाही बजावलं होतं. तबलावादनात सहामाही परीक्षेत श्रीकांतचा पहिला नंबर आला आणि " तू पक्का ढ आहेस. तू श्रीकांतची बरोबरी काय करणार ? " हे शिक्षकांचं बोलणं मला फारच झोंबलं. त्या दिवशी रात्री मला बराच वेळ झोप आली नाही.

" तुला काय झालं ?" असं आईनं विचारलं तर मी तिला सांगितलं,

" काही नाही ! काही झालं नाही मला ! "

पण त्याच रात्री मी निश्चय केला की आपण तबला वादनात नैपुण्य मिळवायचंच. श्रीकांतच्या घरी तबला असला म्हणून काय झालं ? म्हणून दुसऱ्या दिवसापासून अगदी नियमानं मी अर्धा तास अगोदर शाळेत जाऊन तबला वाजवायची प्रॅक्टिस करू लागलो. या माझ्या दृढ निश्चयामुळं आणि नियमितपणानं दररोज अंत:करणापासून तबला वाजवायची सवय केल्यामुळं वार्षिक परीक्षेत श्रीकांतला मी मागं टाकलं.

ज्या दिवशी मराठी चवथीच्या वार्षिक परीक्षेत नापास झाल्यामुळं मला काकांनी खूप बडवलं, त्याच दिवशी गायन शाळेतल्या मुख्याध्यापकांचं पत्र काकांना घरी मिळालं. हेडमास्तरांनी पत्रात लिहिलं होतं,

" आपल्याला सांगायला आनंद होतो की पुरुषोत्तमनं तबलावादनात उत्कृष्ट यश संपादन केलं आहे. शाळेतल्या सर्व विद्यार्थ्यांत त्यालाच जास्त गुण मिळाल्यामुळं त्याला महिना पाच रुपये शिष्यवृत्ती देण्यात आली आहे.

आणखी एका गोष्टीचा इथं मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. ती ही की पुरुषोत्तमचा हासरा चेहरा व त्याची विनम्र वागणूक यामुळं तो संगीत शाळेतल्या सर्व शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना प्रिय झाला आहे. त्याच्या शालीन वागणुकीमुळं आदर्श वागणुकीबद्दलचं प्रशस्तीपत्रही यंदा त्यालाच देण्यात आलेलं आहे. "

हे पत्र वाचून काका मनातल्यामनात म्हणाले, 'पुरुषोत्तमचं ढम्‌ढम्‌ढम्‌ढम् वाजवणं मला पसंत नाही म्हणून मी त्याला किती मारलं ! पण बेटयानं तबला वादनात पहिला नंबर पटकावला ! शिवाय आदर्श वागणुकीचं प्रशस्ती पत्रही त्यालाच मिळालं ! '

श्रीकांतच्या घरी तबला होता आणि गायनशाळेचे एक शिक्षक त्याला घरी शिकवायला जात होते तरीही तो माझी बरोबरी करू शकणार नाही हे मी सात वर्षांपूर्वी सिद्ध केलं होतं. त्या नंतर प्रत्येक वर्षी तबला वादनात माझाच पहिला नंबर आला होता. एवढंच काय पण दोन वर्षांपूर्वी स्वर्गीय विष्णु नारायण भातखंडे यांच्या स्मरणार्थ जेव्हा धुळयाला चढाओढी घेण्यात आल्या होत्या, तेव्हाही माझाच पहिला नंबर आला होता. श्रीकांतला पहिला नंबर मिळावा म्हणून त्यानं त्याही वेळी खटपट केली होती. परंतु त्या वेळी नेमलेल्या तिन्ही परीक्षकांनी मलाच सर्वांत जास्त गुण दिले होते. त्यामुळं श्रीकांतला त्याही वेळी काही करता आल नव्हतं. म्हणून त्याचं परवा दिल्लीहून आलेलं पत्र आता पुन्हा एकदा वाचतावाचता मला वाटलं की कुणी सांगावं याही वेळेला त्याचं काही चाललं नसेल ! पैशाच्या जोरावर सर्वच कलावंतांना खरेदी करता येईल इतके काही सर्वच कलावंत नादान नाहीत ! आपला पहिला नंबर येणं शक्य आहे.

आणि अखेरीस तसंच घडलं. ऑल इंडिया रेडिओतर्फे तबलावादनात माझा सर्व प्रथम नंबर आला आहे व मला राष्ट्रपती पारितोषिक मिळालं आहे असं शंकर संगीत विद्यालयाच्या मुख्याध्यापकांना टेलिग्रॅमनं काल कळविण्यात आलं. तसंच ऑल इंडिया रेडिओनं काल बातम्या सांगतांना हे मुद्दाम जाहीरही केलं.

अशा तऱ्हेनं माझ्या आयुष्यातला अत्यंत भाग्याचा दिवस उगवला होता. मला राष्ट्रपती पारितोषिक मिळाल्याचं वर्तमानपत्रातूनही जाहीर झालं होतं. म्हणून हेडमास्तरांचा निरोप येताच मी धावतधावत जाऊन गुरुच्या चरणावर मस्तक ठेवलं. माझ्या अश्रूंनी माझ्या गुरूचे चरण भिजले. त्यामुळं मी कृतार्थ झालो असं मला वाटलं. गुरु परमेश्वरासमान असतो हे मला अनुभवानं पटलं.

नंदूरबार नगरपालिकेतर्फे जिल्हा कलेक्टरांच्या अध्यक्षतेखाली शंकर संगीत विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. चारुदत्त चव्हाण यांचा व माझा राजमाता जिजाबाई हॉलमध्ये सायंकाळी सात वाजता जाहीर सत्कार करण्यात येणार आहे, ही गोष्ट काकांच्या कानावर जायला वेळ लागला नाही. मला पहाताच ते म्हणाले,

"कायरे पुरुषोत्तम ! हे तर तू मला सांगितलंच नाहीस !"

"मग मी काल तुम्हाला लवून नमस्कार केला तो कशाबद्दल ?"

"तेव्हा तर तू म्हणालास की तबल्याच्या शेवटच्या परीक्षेत तुझा पहिला नंबर आला !"

"होय, ते खरंच आहे. कारण त्या परीक्षेचा निकाल कालच लागला !"

"अरे ! पण तुला राष्ट्रपती पारितोषिक मिळालं आणि आज तुझा जाहीर सत्कार होणार आहे; हे तर तू बोललाच नाहीस !"

"हे माझं मीच काय सांगायचं !"

"अरे लबाडा !" असं म्हणून काका बसल्या जागेवरून उठले. त्यांनी मला पोटाशी धरलं. माझ्या डोक्यावरून व पाठीवरून प्रेमानं हात फिरविला. हे करता करता काकांच्या डोळ्यात एकदम अश्रू गोळा झाले. त्यांचा कंठ दाटून आला. ते सद्‌गदित होऊन म्हणाले, "पुरुषोत्तमा ! मी लहानपणी तुझा फार छळ केला. त्याचा मला आता पश्चात्ताप होत आहे. त्याबद्दल तू मला क्षमा कर !"

"हे काय बोलणं काका ! आपण मुळीच कठोरपणानं वागला नाहीत उलट मीच तुम्हाला त्रास दिला !"

"छे ! छे ! निदान असं तरी बोलू नकोस ! अशानं माझं काळीज तुटायला लागेल" हे बोलताबोलता काकांना जोराचा हुंदका आला. त्यामुळ त्यांचं सर्वांग लटलट लटलट कापू लागलं. म्हणून मी त्यांचा हात धरून त्यांना खांबाशी बसवलं. मी एवढं यश मिळवलं याचं सुख आणि माझा लहानपणी छळ केला याचं दुःख अशा जणू काही दोन धारा काकाच्या दोन्ही डोळ्यातून वाहू लागल्या. त्या काही केल्या त्यांना आवरता येईनात. म्हणून एका हातानं अश्रू पुसतापुसता काका म्हणाले,

"पुरुषोत्तमा ! तू खरोखर नावाप्रमाणंच पुरुषोत्तम आहेस ! बेटा, तू तुझ्या आईलाही नमस्कार कर. अहो सगुणावहिनी ! ऐकलं का ? आपल्या पुरुषोत्तमानं केवढं यश मिळवलं !"

हे ऐकून माझी आई सैपाकघरातून बाहेर आली. तिचा एक हात पिठा भरला होता आणि एका हातानं ती घाम पुशीत होती. ती म्हणाली,

"काय झालं ?"

"अहो ! या आपल्या पुरुषोत्तमला राष्ट्रपती पारितोषिक मिळालं. आपल्य घराण्याचा हा केवढा लौकिक वाढवला यानं ! हा आपल्या वंशाचा कुलदीपक आहे. धन्य हा पुरुषोत्तम !"

इतक्यात मी आईला लवून नमस्कार केला. आईच्या डोळ्यातही आनंदाश्रू आले. त्यातले काही माझ्या डोक्यावर पडले. आईचा आशीर्वाद आनंदाश्रूंच्या रूपानं मिळावा याची जणू काही मी वाटच पहात होतो. आज माझे वडील हयात असायला पाहिजे होते. हा विचार आईच्या मनात फार मोठ्या प्रमाणात उचंबळून आला असला पाहिजे. कारण ती म्हणाली,

"अरे ! काकांना नमस्कार कर ! तेच तुझ्या वडिलांच्या ठिकाणी आहेत त्यांनी शिकवलं म्हणून एवढं झालं !"

असं आमचं बोलणं चाललं असतानाच श्रीकांत दिल्लीच्या हिंदुस्थान टाइम्स नावाच्या वर्तमानपत्राच्या स्पेशल रिपोर्टरला घेऊन घरीच आला. श्रीकांतनं मला प्रेमानं आलिंगन दिलं आणि म्हणाला " हा स्पेशल रिपोर्टर मजबरोबर मुद्दाम आला आहे. त्याला तुझा फोटो काढायचा आहे आणि काही प्रश्नही विचारायचे आहेत. कारण संपादकाला हिंदुस्थान टाइम्सचा एक स्पेशल अंक प्रकाशित करायचा आहे.

आमचं ते कौलारू घर, घराच्या मातीच्या भिंती, साधी सारवलेली जमीन आणि त्या जमिनीवरील कोपऱ्यातली एक संतरजी, हे पाहून त्या रिपोर्टरला ज़रा नवलच वाटलं. आमच्या घरी खुर्चीटेबल नव्हतं. काकांच्याकडे शेतीवाडी असली तरी काका पक्के चिक्कू मारवाडी होते. माझा पोषाख म्हणजे एक नेहरू शर्ट व धोतर हाच काय तो. हे सर्व पाहून त्या सुटाबुटातल्या रिपोर्टरला आश्चर्य वाटलं. त्याला बसण्यासाठी श्रीकांतनं शेजारच्या दामले मास्तरांच्या घरून खुर्ची आणली. संपाकघरातून मी एक मोठा खोका घेऊन आलो. खुर्चीत बसताबसता रिपोर्टर महाशय म्हणाले,

" पुरुषोत्तम पाटील आपणच का ? " हे ऐकून मी म्हटलं,

" काय रे श्रीकांत ! पुरुषोत्तम पाटील मीच ना ! "

" वा ! ही खाशी उत्तर द्यायची तऱ्हा ! " असं श्रीकांतनं म्हटलं आणि आम्ही सर्वजण हसलो.

" मला तुमचा एक फोटो काढायचा आहे. तेव्हा तुम्हाला काही कपडे बदलायचे की काय ते पहा ! "

" काही कपडे बदलायचे नाहीत ! " असं मी उत्तर देताच, त्या फोटोग्राफरनं माझा स्वतंत्र असा एक आणि आई व काका यांच्यासह एक असे वेगवेगळे फोटो काढले. फोटो काढायला आईनं फारच आढेवेढे घेतले. पण मी फारच आग्रह केल्यामुळं ती तयार झाली. काकांचाही फोटो निघाल्यामुळं ते अधिकच प्रसन्न झाले. इतक्यात आईनं चहाचे कप पाठवले. तेव्हा आम्ही सर्वांनी मिळून चहा घेतला. नंतर ते रिपोर्टर म्हणाले,

" आता तुम्हाला काही प्रश्न विचारतो ! "

मी म्हटलं, " विचारा. "

" तुम्ही तबलावादनाचा अभ्यास केव्हा करता ? "

" जेव्हा वेळ मिळेल तेव्हा ! "

" तुम्हाला तबला कोणी शिकविला ? "

" माझे गुरु श्री. चारुदत्त चव्हाण यांनी ! "

" तुम्हाला जे यश मिळालं त्याचं कारण काय असावं असं तुम्हाला वाटतं ? "

" माझ्या गुरूचे आशीर्वाद ! दुसरं काय !"

" तुम्हाला तबला शिकण्यात काही अडथळे आलेत का ?"

हा प्रश्न ऐकून काका मधेच म्हणाले,

" हो ! हो ! याला तबला शिकण्यात फार अडथळे आले. त्याचं मुख्य कारण म्हणजे मी ! "

म्हणून मग मी म्हटलं, " काका ! हे काय बोलता आहा तुम्ही !"

" अरे ! खरं सांगायला काय हरकत आहे ? "

" मग मी का खरं सांगत नाही ? "

हा आमचा काका पुतण्याचा संवाद ऐकून त्या रिपोर्टरला मौज वाटली. तो म्हणाला,

" काही अडथळे आले असल्यास जरूर सांगा !"

" काहीही अडथळा आला नाही. उलट सर्वांनी मला आशीर्वादच दिला !"

" बरं, पण गुरूचा आशीर्वाद मिळवण्यासाठी तुम्ही काय काय केलं ? "

" हे सांगता येणं अवघडच आहे. परंतु पहिली गोष्ट ही की गुरूवर माझी दृढ श्रद्धा आहे. त्यामुळं शिकवताना माझे गुरु मला रागं भरले, त्यांनी माझा कान धरला किंवा मला मारलं तरी त्याबद्दल मी वाईट वाटून घेतलं नाही. माझा गुरुबद्दलचा आदर दिवसेंदिवस वाढतच गेला. म्हणून मला तबलावादन शिकून मोठं व्हायचं आहे याबद्दल त्यांची खात्री झाली."

" तुमच्या या गुरूंच्याशिवाय आणखी कुणाजवळून काय शिकलात ?"

" कुणाजवळून काय शिकलो हे सांगता येणं कठिण आहे. परंतु या आमच्या तालुक्याच्या गावी किंवा जिल्हयाच्या गावी गाण्याबजावण्याचा कार्यक्रम असल्यास मी नेहमी हजर राहतो. प्रत्येक तबला वाजवणारा किंवा मृदंग वाजवणारा कसा वाजवतो हे मी अंतःकरणाचे कान करून ऐकतो. एखाद्याची वाजवण्याची तऱ्हा मला आवडल्यास तबल्याचे ते बोल किंवा त्यांचे तुकडे मी तेव्हाच आत्मसात करतो. त्यामुळं ज्याच्यापासून जे शिकता येण्यासारखं आहे ते मी शिकलो. जो जो म्यां घेतला गुण ! तो तो म्यां गुरु केला जाण ।। असंच का म्हणाना !"

त्याच दिवशी सायंकाळी राजमाता जिजाबाई सभागृहात जिल्हयाच्या कलेक्टरांच्या अध्यक्षतेखाली माझ्या अभिनंदनाची सभा भरली. माझ्या आईला मी मुद्दाम आग्रह करून घेऊन गेलो. काकाही सभेला आले होते. तो रिपोर्टरही हजर राहिला. त्या सभेच्या पूर्वी एक छोटासा गायनवादनाचा कार्यक्रम झाला. माझं तबलावादन ऐकून सर्वांना खूप खुषी झाली. टाळ्या वाजवून सर्वांनी वन्स मोर म्हणून माझं पुन्हापुन्हा अभिनंदन केलं. माझं तबलावादन ऐकून रसिकलोक इतके मुग्ध होऊ शकतात याचा मला प्रथमच प्रत्यय आला. त्यामुळं माझ्या

सर्वांगावर आनंदाचे रोमांचं उठले. आपल्या जीवनाचं सार्थक झालं असं मला वाटलं.

नंतर कलेक्टर साहेबांच्या अध्यक्षतेखाली सभेला सुरुवात झाली. प्रास्ताविक भाषणानंतर अध्यक्षांच्या हस्ते एक भारी किंमतीची शाल व श्रीफल देऊन माझे गुरु श्री. चारुदत्त चव्हाण यांचं अभिनंदन करण्यात आलं. नंतर नगरपालिकेतर्फे अध्यक्षांनी एकशे एक रुपये नगद पुरस्कार म्हणून मला दिले व माझंही अभिनंदन केलं. तेव्हा त्या भरसभेत मी माझ्या गुरूंच्या चरणावर डोकं ठेवलं आणि नंतर सर्वांना अभिवादन केलं. हे पाहून श्रोत्यांनी टाळ्यांचा फार मोठा कडकडाट केला. " शिष्य असावा तर हा असा ! काय ही शालीनता ! काय ही नम्रता ! " असं सर्वजण आपापसात बोलू लागले.

उत्तरादाखल बोलतांना गुरुवर्य चव्हाण म्हणाले,

" रसिक मित्रांनो ! आपण आपुलकीनं माझा शिष्य श्री. पुरुषोत्तम पाटील याचं व माझं जे अभिनंदन केलंत त्यानं माझं मन भारावून गेलं आहे. मी इतरांना जे शिकविलं तेच यालाही शिकवलं. परंतु तबल्याचा प्रत्येक बोल जसाचातसा उतरवून लय व ताल यांचा योग्य संगम घडवून आणताआणता त्यात गोडी निर्माण करण्यासाठी पुरुषोत्तमनं जी मेहनत केली ती वाखाणण्यासारखी आहे. अंतःकरणापासून तबलावादन दररोज तासनतास शिकल्यामुळं त्याच्या बोटात एक प्रकारची जादू निर्माण झाली. त्रितालचे बोल अगदी साधे आहेत. ते असे की,

धा धिन् धिन् धा
धा धिन् धिन् धा
धा तिन् तिन् ता
ता धिन् धिन् धा

पण हेच बोल पुरुषोत्तमच्या बोटातून तबल्यावर उतरू लागले की आपली मान डोलायला लागते. कोणतीही कला शिकण्यासाठी अंतःकरणाची तळमळ आणि रात्रंदिवस कष्ट करायची तयारी लागते. पण एवढयावरच आपण उत्कृष्ट कलावंत होऊ किंवा एखाद्या कलेत निपुण होऊ असं कुणीही समजू नये. कारण ज्याच्या जवळून काही शिकायचं आहे, त्याच्या पोटात शिरून आपल्याला विद्या हस्तगत करावी लागते. आणि दुसऱ्याच्या अंतःकरणात आपल्याविषयी आपुलकी निर्माण करायची तर आपल्या जवळ नम्रता असली पाहिजे. शालीनतेमुळं आपण दुसऱ्यांची अंतःकरणं जिंकू शकतो.

पुरुषोत्तमच्या या शालीन स्वभावाची मला मुद्दाम तारीफ करावीशी वाटते. भल्याबुऱ्या कोणत्याही प्रसंगी त्यानं नम्रता सोडली नाही. त्यामुळं घरीदारी, रस्त्यात किंवा कुठंही तो भेटला तर त्याची शालीनता आपल्याला वश करून घेते. म्हणून त्याला पहाताच 'हा मोठा सुशील मुलगा आहे' ही भावना आपल्या मनात आपोआपच उचंबळून येते. पुरुषोत्तमच्या या गुणाची वाहवा इथं मुद्दाम एवढ्यासाठी करावीशी वाटते की सध्या विद्यार्थ्यांच्या ठिकाणी हा गुण दुर्मिळ होत चालला आहे. ही गोष्ट विद्यार्थ्यांच्या दृष्टीनं आणि शिक्षकांच्या दृष्टीनंही ठीक नाही. विद्यार्थ्यांनी नम्रतेनंच वागायला पाहिजे. विद्यार्थी विनम्र असल्याशिवाय त्याला गुरूचं अंतःकरण काबीज करता येणार नाही. आपल्या शिक्षकानं आपल्याला अंतःकरणापासून शिकवावं असं वाटत असेल तर विद्यार्थ्यांनी नम्रतेनं वागणं ही एक अत्यावश्यक अशी बाब आहे. असो.

आपल्या गावच्या जनतेनं मोठ्या आपुलकीनं हा सत्कारसमारंभ घडवून आणला. शंकर संगीत विद्यालयाच्या या आदर्श विद्यार्थ्याला म्हणजे पुरुषोत्तमला नगरपालिकेनं एकशेएक रुपये नगद बक्षीस देऊन त्याचं अभिनंदन केलं या बद्दल मला मोठी धन्यता वाटते. तेव्हा शंकर संगीत विद्यालयातर्फे एक उत्कृष्ट असा तबल्याचा जोड त्याला बक्षीस म्हणून देण्यात येत आहे, हे मी आपल्यासमोर मुद्दाम जाहीर करतो. आपण माझाही जाहीर सन्मान केलात. या बद्दल मी आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. आमच्या शंकर संगीत विद्यालयावर आपला असाच लोभ असू द्या अशी विनंती करतो. जयहिंद !"

माझ्या गुरूचं भाषण संपल्यावर मला दोन शब्द बोलण्याबद्दल सुचवण्यात आलं. तेव्हा मी म्हणालो,

"अध्यक्ष महाराज आणि बंधु-भगिनींनो ! माझ्या गुरूच्या आशीर्वादामुळंच हा सोन्याचा दिवस उगवला. गुरूला साक्षात् परमेश्वर असं म्हणतात ते अगदी बरोबर आहे. माझ्या गुरूनं मायेची फुंकर घातली नसती तर माझ्या अंतकरणात स्फूर्तीची ज्योत प्रज्वलित झाली नसती. म्हणून माझ्या यशाचं सर्व श्रेय माझ्या गुरूलाच आहे. मजसारख्या एका सामान्य विद्यार्थ्यावर आपण आज आपुलकीचा आणि अभिनंदनाचा जो वर्षाव केला त्याचा मी कसा उतराई होऊ ! मी फक्त एवढंच म्हणतो की आपला आशीर्वाद मला असाच मिळू द्या आणि आपल्या चरणावर मला लोटांगण घालू द्या."

या अभिनंदनाच्या सभेहून परत येतायेता आनंदातिशयानं माझं मन फारच भारावून गेलं. तबलावादन नैपुण्याबद्दल मला राष्ट्रपती पारितोषिक मिळालं म्हणून वर्तमानपत्रातून मुखपृष्ठावर माझा फोटो छापला जाईल, माझी मुलाखत

घ्यायला वर्तमानपत्राचा स्पेशल रिपोर्टर इथं येईल, माझी मुलाखत वर्तमानपत्रात छापली जाईल, गावच्या नगरपालिकेकडून माझा जाहीर सत्कार करण्यात येईल, मला नगरपालिकेतर्फे एकशेएक रुपये बक्षीस म्हणून देण्यात येतील, माझ्या गायनशाळेतर्फे मला उत्कृष्ट तबल्याचा जोड बक्षीस देण्यात येईल आणि इतके लोक माझं इतकं कौतुक करतील असं मला कधी वाटलं नव्हतं. परंतु राष्ट्रपती पारितोषिक मिळाल्यानं हे सगळं घडून आलं एवढं खरं!

घरी येताच दत्तात्रेयाच्या फोटोसमोर मला मिळालेलं बक्षीस मी ठेवलं. उदबत्त्या लावल्या. त्या सुगंधानं सर्व खोली दरवळली. नंतर साष्टांग नमस्कार घालता घालता मी मनातल्या मनात म्हटलं,

'देवा दत्तात्रेया! केवढी ही तुझी कृपा! आज गुरुवार आणि आजच हा सत्कारसमारंभ झाला. हे सर्व तू बुद्धी दिलीस व मला कार्यप्रवृत्त केलंस म्हणून घडलं. म्हणून हे परमेश्वरा आयुष्यभर मला कधीही तुझा विसर पडणार नाही असा आशीर्वाद दे.' आणि मग मी अभंग म्हटला,

हेची दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥
गुण गाईन आवडी । हेची माझी सर्व जोडी ॥
नलगे मुक्ती धनसंपदा । संत संग देई सदा ॥
तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ॥

१२

# कुरकुर करतो, तो करंटा

आज आमच्या शाळेत वार्षिक परीक्षेचा निकाल लागणार होता. म्हणून मी सकाळी लौकर उठून शाळेत जायची तयारी करू लागलो. गेल्या दोन वर्षांपासून म्हणजे नववीत आणि दहावीत मला स्कॉलरशिप मिळत होती. आणि आता या दहावीच्या वार्षिक परीक्षेत मी पहिल्या नंबरनं पास झाल्यास मला पुढच्याही वर्षी म्हणजे अकरावीतही शिष्यवृत्ती मिळेल असं मला वाटत होतं. मी वर्गात हुशार आहे याचा मला मोठा अभिमान वाटत होता. माझी कुणाशी ओळख करून देताना 'याचा वर्गात पहिला नंबर आहे. हा मोठा स्कॉलर आहे!' असं कुणी म्हटलं की माझ्या अंगावर मूठभर मांस चढल्यासारखं होई. म्हणून या अकरावीतही मलाच शिष्यवृत्ती मिळेल असं मला वाटत होतं. परंतु प्रत्यक्ष रिझल्ट् लागला तेव्हा मला कळलं की वर्गात माझा पहिला नंबर आलेला नाही. म्हणून मला फार दुःख व संताप झाला. मला घरी तोंड दाखवावसं वाटेना. म्हणून मी जीव द्यायचा बेत केला आणि गुपचुप गावाबाहेर निघून गेलो.

मी सकाळी सात वाजता शाळेत जायला निघालो. आमची शाळा सकाळी सात ते साडेअकरा अशी असल्यानं दुपारी साडेबारा वाजेपर्यंत मी घरी परत येत असे. म्हणून 'विठ्ठल शाळेतून आता येईल! आता हा येण्यातच असेल शाळेतून!' असं समजून सर्वांनी दुपारच्या एक वाजेपर्यंत माझी वाट पाहिली. परंतु जेव्हा दीड वाजला आणि तरीही मी घरी आलो नाही, तेव्हा घरातल्या सर्वांची धावपळ सुरू झाली. माझा भाऊ माझ्या मित्रांच्या घरी गेला तेव्हा विद्याधरनं सांगितलं की मीच त्याची सारखी वाट पाहतो आहे. कारण परीक्षेचा निकाल जाहीर होताच विठ्ठल वर्गातून जो एकदम बाहेर पडला तो नंतर कुणालाच भेटला नाही. एवढंच काय पण मला सुद्धा तो दिसला नाही.

विद्याधरकडून कळलेली सर्व हकीकत भावानं वडिलांना सांगितली. वार्षिक परीक्षेत पहिला नंबर आला नाही म्हणून विठ्ठलला दुःख व संताप झाला आणि म्हणून तो घरी न येता कुठंतरी निघून गेला. ही माहिती माझ्या भावाच्या तोंडून

ऐकताच आईवडिलांच्या पोटात भीतीचा गोळा उभा राहिला. आई डोळ्यातले अश्रू पुसतापुसता म्हणाली,

" साडेदहा ते दुपारचे अडीच म्हणजे आता चार तास झालेत. अन् अजून विठ्ठलचा पत्ता नाही. तो कुठं गेला अन् कुठं नाही ! वर्गात पहिला नंबर येईल याची त्याला खात्री वाटत होती. तिमाही अन् सहामाही परीक्षेतही आपल्या विठ्ठलचाच पहिला नंबर होता. पण आता वार्षिक परीक्षेत त्या अरविंद नावाच्या मुलाचा पहिला आला असून विठ्ठलचा दुसरा नंबर आला आहे. म्हणून दुःख होऊन तो कुठंतरी निघून गेला. अन् समजा त्यानं काही कमीजास्त करून घेतलं असेल तर ! " असं बोलता बोलता आईचा कंठ अधिकच दाटून आला. वडिलांचाही चेहरा दुःखानं काळवंडला.

माझ्या शोधासाठी म्हणून माझे वडील, माझे भाऊ, माझ्या बहिणी, माझे मित्र आणि शेजारीपाजारी असे सर्वजण निरनिराळ्या ठिकाणी जाऊन आले. माझे वडील स्वतः शाळेत जाऊन हेडमास्तरांना भेटून आले. तेव्हा मुख्याध्यापकांनी सांगितलं,

" विठ्ठल आज शाळेत आला होता. परीक्षेचा निकाल बरोबर साडेदहा वाजता लागला. सर्वांना प्रगती पुस्तकं वाटण्यात आली. विठ्ठललाही त्याचं प्रगती-पुस्तक देण्यात आलं. नंतर तो शाळेतून घरी गेला. "

म्हणून जसजसा वेळ जाऊ लागला तसतशी आईवडिलांची स्थिती अधिकाधिक चिंताग्रस्त होऊ लागली. संध्याकाळचे साडेपाच वाजले तरीही माझा पत्ता लागेना म्हणून सर्वांनी धीर सोडला. कारण आतापर्यंत गावातल्या सर्व विहिरी, नदीच्या दोन्ही बाजूंचा दूरपर्यंतचा किनारा व गावाजवळचा किल्ला हे सर्व भाग माझ्या शोधासाठी पुन्हापुन्हा सर्वांनी पाहिले. पण माझा शोध मुळीच लागला नाही. म्हणून मग वडिलांनी पोलीस ठाण्यावर जाऊन मी हरवल्याची नोंद केली. आणि माझ्या शोधासाठी पोलिसांनी जास्तीतजास्त प्रयत्न करावा म्हणून वडिलांनी नम्र विनंती केली.

इकडे आईवडिलांची, बहिणभावंडांची आणि इतर सर्वांची केवलवाणी स्थिती झाली होती, तर तिकडे मी सारखा अश्रू ढाळीत होतो. आमच्या घरापासून दूर नदीच्या काठावर दुर्गा देवीचं मंदिर होतं. त्या मंदिरासमोरून पंचगंगा नदी वहात होती. मंदिरापासून आणखी पुढं थोड्या अंतरावर स्मशान होतं. त्या स्मशानाच्या पलीकडे म्हणजे नदीच्या दुसऱ्या काठावर दूरपर्यंत काटेरी झुडपं आणि मोठी झाडं बरीच होती. तिथंच नदीला एक ओढा मिळत असल्यानं तो भाग फारच उंचसखल होता. या ठिकाणी सहसा कुणी जात नसे. जवळच स्मशान असल्यानं ही जागा भुताटकीची म्हणून ओळखली जाई.

मी शाळेतून जो बाहेर पडलो तो तडक या भुताटकीच्या जागेत येऊन बसलो. त्यातही अशा जागेत लपून बसलो की मुद्दाम पाहिल्याशिवाय मी दिसणं शक्य नव्हतं. 'परीक्षेत पहिला नंबर आला नाही म्हणून आता जिवंत राहयचं नाही. आता अपमानाचं जीवन जगायचं नाही. काय वाटेल ते झालं तरी या निश्चयापासून माग फिरायचं नाही.' या विचारानं मी इतका भारला गेलो होतो की त्या भुताटकीच्या जागेचं मला बिलकूल भय वाटलं नाही. ज्या भुताटकीच्या जागेत मी कधीही अन् कुणाही बरोबर गेलो नव्हतो, तिथं खुशाल झर्झर्झर्झर् पावलं टाकीत गेलो आणि एका खोपटात लपून बसलो.

माझ्या शोधासाठी माझा भाऊ व माझे दोन मित्र या भुताटकीच्या जागेत दोनदा येऊन गेले. दोन्हीही वेळेला "विठ्ठल ! ए विठ्ठल ! ! विठ्ठल रे ! ! !" अशा त्यांनी मोठमोठ्यानं हाका मारल्या. पण मी दुःखात इतका बुडून गेलो होतो की, त्या आर्त हाकांचं मला काही वाटलं नाही. कारण गेल्या पाच वर्षापासून म्हणजे सहावीपासून तर दहावीपर्यंत वर्गात माझाच पहिला नंबर होता. आताही माझाच नंबर पहिला येईल अशी मला खात्री होती. परंतु तो तसा न आल्यानं मला फारच दुःख झालं. 'आता जगण्यात काय अर्थ आहे ? आता आपण सरळ किल्ल्यावर जावं आणि तिथून खाली उडी टाकून जीव द्यावा !' असं मी मनाशी ठरवलं होतं.

परंतु चालता चालता माझ्या विचारात एकदम बदल झाला. आपण संध्याकाळपर्यंत भुताटकीच्या गुहेत कुठंतरी लपून बसू आणि अंधार पडल्यावर मग किल्ल्यावर जाऊन जीव देऊ असं मी ठरवलं. त्याप्रमाणं मी स्मशानासमोरच्या भुताटकीच्या गुहेत जाऊन दडून बसलो. आतापर्यंत आवरून धरलेलं दुःख डोळ्यावाटे घळघळा वाहू लागलं. गेल्या पाच वर्षापासून असलेला आपला पहिला नंबरही गेला आणि आता स्कॉलरशिपही गेली. हा विचार पुन्हापुन्हा आठवून मला पुन्हापुन्हा रडू येऊ लागलं. माझ्याकडे बोट दाखवून जो तो म्हणेल 'आता काही याचा पहिला नंबर नाही ! आता याला स्कॉलरशिप मिळत नाही ! ' हा विचारही मला सारखा सताऊ लागला. त्यामुळं माझं दुःख वाढतंच चाललं आणि दुःखाचा जोर जसा वाढला तसं माझं रडणं चालूच राहिलं.

मी जिथं बसलो होतो तिथून जवळच मुंग्यांचं एक लहानसं वारूळ होतं. कुठल्यातरी प्राण्याचा पाय त्या वारूळावर पडल्यानं ते वारूळ मोडलं होतं. म्हणून मुंग्या पुन्हा त्यांचं घर बांधीत होत्या. एकीकडे मी रडत असतानाच त्या मुंग्यांच्या चिकाटीचं मला कौतुक वाटत होतं. 'असं किती वेळा त्यांचं वारूळ तुडवलं जात असेल आणि किती वेळा त्या पुन्हा बांधीत असतील ! आणि आपण मात्र भागुबाईसारखं रडतो आहोत !' हा विचार मनात आल्यामुळं माझा दुःखाचा

जोर हळूहळू कमी होऊ लागला. माझं मन अंतर्मुख होऊन मला मार्गदर्शन करू लागलं. त्यामुळं माझ्या मनाशीच माझा संवाद सुरू झाला.

'माझा परीक्षेत पहिला नंबर का आला नाही ?'

'त्या अरविंदाचा पहिला आला म्हणून !'

'पण तो अरविंद माझ्यापेक्षा जास्त हुशार आहे का ?'

'नाही ! तुझ्यापेक्षा जास्त हुशार नाही. त्याला इथं कोल्हापूरला येऊन आठ महिने झालेत. सहामाही परीक्षेत तुलाच त्याच्यापेक्षा जास्त मार्क्स मिळाले आहेत !'

'पण दिवटे सर तर त्या अरविंदाचीच सारखी तारीफ करतात !'

'बरोबरच आहे ! अरे, ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी !'

'म्हणजे ?'

'म्हणजे असं की गेल्या आठ महिन्यापासून हे दिवटे त्या अरविंदाची शिकवणी करतात. त्याला सर्व विषय घरी जाऊन शिकवतात. त्याबद्दल त्याना महिना साठ रुपये मिळतात. म्हणून या दिवटयांना असं दाखवून द्यायचं आहे की मी शिकवण्यात तरबेज आहे. मी शिकवल्यामुळं अरविंदाचा वर्गात पहिला नंबर आला !'

'पण मला असं वाटतं आणि मुलंही असंच म्हणतात की मीच अरविंद-पेक्षा जास्त हुशार आहे. वास्तविक पाहता माझाच वर्गात पहिला नंबर यायला पाहिजे होता. त्याचं काय ?'

'त्याचं काय ? अरे ! त्याचं काय मोठसं ? आणि हा प्रश्न विचारतोस तरी कशाला ? हे तुला समजायला पाहिजे की अरविंदाचा बाप मामलेदार आहे. आणि त्या मामलेदारानं दिवट्यांच्या भावाला नोकरी लावून दिली आहे. आणि हे सर्व बरोबरच आहे. कारण त्या मामलेदाराची आणि दिवटयांची एकच जात आहे !'

'म्हणून काय त्या दिवटयांनी माझ्यावर अन्याय करावा ?'

'का करू नये ? स्वार्थापायी मनुष्य काय करीत नाही ?' स्वतःच्या पोळीवर तूप ओढण्यासाठी मनुष्य दुसऱ्याच्या नरडीलाही नख लावायला मागंपुढं पहात नाही. त्यातच आणखी म्हणजे हे जातीयतेचं भूत माणसाच्या मानगुटीवर एकदा बसलं की मनुष्य सैतानासारखा वागला नाही तरच नवल !'

'म्हणज माझ्या सारख्याचा दिवटयांनी खुशाल बळी घ्यावा ?'

'अरे ! या दिवट्यांनी हा जो तुझ्यावर अन्याय केला तो तर काहीच नाही. असे असंख्य दिवटे या आपल्या देशात आहेत आणि ते दिवसाढवळ्या नंगा नाच घालीत आहेत. जसं विष रक्तात भिनलं की सर्व शरीर विषमय होऊन जातं, त्याप्रमाणं जातीयतेचं जहर या आपल्या राष्ट्रपुरुषाच्या शरीरात भिनलं आहे. ही जातीयता

कधी लपूनछपून तर कधी उघडउघड क्रूर कृत्य करीत असते. यामुळं अज्ञानी आणि गरीब लोकांचं जीवन जास्तच भरडून निघत आहे. या शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातही ही जातीयतेची विषवल्ली फोफावली आहे. तिला वेळीच मुळासकट उपटून फेकून दिली नाही तर — '

' तर काय होईल ? '

' तर काय होईल ? या जातीयतेच्या जोडीला प्रांतीयता, भाषीयता, काळाबाजार आणि लाचलुचपत या वैरिणी एकमेकींच्या गळ्यात गळा घालून आपल्या सर्वांचा संहार करतील. आजच ही पाच भुतं आपल्या मानगुटीवर बसली आहेत अन् आपल्याला जगणं मुष्किलीचं झालं आहे. राजकारण, समाजकारण, सहकारीकरण आणि शिक्षण अशा सर्व क्षेत्रांत ही भुतं थय्‌थय्‌थय्‌थय् नाचत आहेत. त्यामुळं आपण माणुसकीला पारखे झालो आहोत. त्यातल्यात्यात अशिक्षित अन् गरीब जनतेचे हाल तर कुणी कुत्रा खात नाही. ते बिचारे अजूनही नशिबाच्याच नावानं रडताहेत ! शिक्षणामुळं आपणही काही करामत करून दाखवू शकतो हे त्यांना अजून पटलेलंच नाही ! म्हणून या भुतांना बाहेर काढून हिंद महासागरात त्यांना प्रथम तिलांजली दिली पाहिजे ! असा मांत्रिक प्रथम निर्माण झाला पाहिजे ! '

' म्हणजे मी जीव द्यायला पाहिजे असं माझ्या हातून काहीही घडलेलं नाही तर ! '

' छे: ! मुळीच घडलं नाही ! '

' मग मी आता काय करावं ? '

' पहिली गोष्ट म्हणजे प्रथम घरी जावं आणि — '

' छे: ! छे: ! घरी कसा जाऊ ? घरच्यांना हे अपमानाचं तोंड कसं दाखवू ? '

' अरे वेड्या ! या दिवट्यांनी तुझ्यावर जो अन्याय केला तो प्रत्यक्ष तुला दिसतो तरी आहे ! पण शाळेतल्या भाषणांच्या किंवा नाटकांच्या चढाओढीत भाग घेण्यासाठी विद्यार्थी निवडताना; हुतुतू, खोखो किंवा क्रिकेट या खेळांच्या सामन्यासाठी विद्यार्थ्यांची निवड करताना किंवा वर्गात पहिला नंबर आणण्याच्या बाबतीत दिवटे जातीयता दाखवतात हे सर्वांना ठाऊक आहे. पण दिवट्यांच्या विरुद्ध बाकीच्या शिक्षकांना ब्र काढता येत नाही. शिवाय दिवट्यांनी बऱ्याच शिक्षकांना आपल्याच बाजूला वळवून ठेवलं आहे. हेडमास्तर आणि दिवटे हे दोनच संस्थेचे आजीव सेवक आहेत. आणि बाकीचे शिक्षक पगारी नोकर आहेत. अशा तऱ्हेची या शिक्षणसंस्थेची घडण असल्यानं दिवटे म्हणतील ते खरं, हे ठरलेलं आहे. यामुळं प्रत्येक वर्षी कितीतरी विद्यार्थ्यांवर अन्याय होतो. हे मात्र तुला समजत नाही ! '

'मग यावर उपाय काय ?'

'यावर उपाय अगदी सोपा आहे. खोलीतला अंधार नाहीसा करण्यासाठी दिवा लावावा लागतो. शेतातलं पीक फोफावण्यासाठी तण मुळासकट काढून टाकावं लागतं. आजारी पडल्यास डॉक्टरचं औषध घ्यायला पाहिजे. अशिक्षितपणा काढून टाकण्यासाठी शिक्षण घेतलं पाहिजे. हे जसं खरं आहे, तसंच जातीयता, प्रांतीयता, भाषीयता, लाचलुचपत आणि काळाबाजार या भुतांच्यापासून सुटका करून घेण्यासाठी सर्वांच्या अंतःकरणात राष्ट्रीय विचारांचा झरा वाहू लागला पाहिजे. माणुसकीच्या महामंत्रानं सर्वांची मनं भारली गेली पाहिजेत. माणुसकी हा विचार, माणुसकी हा उच्चार आणि माणुसकी हा आचार हाच आपला धर्म आपण मानला पाहिजे. असं समजून उमजून आपण वागू लागलो तर या भुतांना पळता भुई थोडी होईल !'

'पण या आपल्या देशात असं होणं कधीतरी शक्य आहे का ?'

'का ? का शक्य नाही ? का होणार नाही असं ? उलट मला तर वाटतं की जरूर होईल. अरे ! अत्यंत बिकट परिस्थितीत स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचा हा देश आहे. सर्वसामान्य लोकांना गीतेचं ज्ञान सांगणारे ज्ञानेश्वर इथंच होऊन गेलेत. पांडुरंगाच्या भक्तीचा महिमा अत्यंत सोप्या अन् सुंदर भाषेत गाणारी ज्यांची अभंगवाणी सर्वदूर सारखी दुमदुमते आहे ते तुकोबाराय याच पुण्यभूमीत जन्माला आले. शिक्षण, शिक्षण आणि शिक्षण हा एकच मार्ग मनुष्याच्या उन्नतीचा आहे, हे त्रिकालाबाधित सत्य पर्वतप्राय अडचणींची पर्वा न करता सिद्ध करणारे महात्मा ज्योतिबा फुले यांची ही कर्मभूमी आहे. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि ते मी मिळवणारच असं म्हणून त्याच्या प्राप्तीसाठी अहोरात्र तळमळणारे लोकमान्य टिळक हे याच देशातले ! समाजाच्या खालच्या बाजूस अज्ञानामुळं अवघडून पडलेल्या जनतेला खडबडून जागं करणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची ही मातृभूमी आहे. खेड्यापाड्यातल्या अठरापगड जातीतही शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून जिवात जीव असेपर्यंत कष्ट करणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांची ही आर्यभूमी आहे.

अशा तऱ्हेनं भारतमातेचे पांग फेडण्यासाठी ज्यांनी आपलं सर्वस्व अर्पण केलं असे आणखी कितीतरी थोर स्त्रीपुरुष या आपल्या देशात होऊन गेलेत. म्हणून असं निश्चितपणानं म्हणता येतं की माणुसकी या एकाच धर्माची जोपासना करणारे स्त्रीपुरुष इथं होतील. आणि मग आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रांत समता स्थापन व्हायला वेळ लागणार नाही !'

'पण मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण ? म्हणजे प्रथम सुरुवात कोण करणार ?'

'अशी माणूसकी या धर्माची आणि राष्ट्रीय चारित्र्याची चिन्हं आताच दिसू लागली आहेत. पण या महान कार्यासाठी प्रथम शिक्षकांनीच सुरुवात केली पाहिजे. त्यासाठी शिक्षकांच्या आर्थिक अडचणी सरकारनं आणि जनतेनं प्रथम सोडवल्या पाहिजेत. पण सरकारनं आणि समाजानं जरी शिक्षकांच्या अडचणी सोडवायचं काम केलं नाही, तरीही गुरुजनांनीच पुढं सरसावलं पाहिजे. कारण गुरुजन हेच खरोखर राष्ट्राचे आधारस्तंभ होत. राष्ट्रीय विचार, राष्ट्रीय आचार, राष्ट्रीय चारित्र्य आणि माणूसकीची जोपासना प्रथम शिक्षकांनी नाही करावयाची तर मग कुणी ? भावी पिढीचं जीवन हे पुष्कळ अंशी गुरुजनांवरच अवलंबून असतं. असे गुरुजन ज्या देशात असतात तो देश धन्य होय. तो देश कधीही गुलाम होऊ शकत नाही. म्हणून म्हणतो की आपल्याही देशात हे कार्य प्रथम गुरुजनांनीच करायला पाहिजे !'

'पण शिक्षकच तर असा अन्याय करतात !'

'सर्वच शिक्षक दिवट्यांच्यासारखे आहेत असं नाही. राष्ट्रीय चारित्र्यानं भारलेले आणि माणूसकी या एकाच धर्माची जोपासना करणारेही शिक्षक आहेत. या अशा गुरुजनांची संख्या वाढली पाहिजे. म्हणून तुझ्यासारख्या हुशार विद्यार्थ्यांनी पुढं सरसावलं पाहिजे ! तुझ्यासारख्या तरुणांनी ज्ञानसंपन्न होऊन माणूसकी या धर्माची जोपासना करायचं कंकण बांधलं तर राष्ट्रीय चारित्र्याची जोपासना होईल. भारतमातेचं नाव पुन्हा उज्वल होईल. पण तू तर हा असा शेळपटासारखा जीव द्यायला निघालेला !'

'छे ! छे ! मी मुळीच जीव देणार नाही !'

'मग ऊठ लवकर! शक्य तितक्या लौकर घरी जा. कारण घरचे सर्वजण चिंतामग्न झाले आहेत.'

असे अनेक विचार माझ्या मनात उचंबळून आले. अशा तऱ्हेनं मला सद्‌बुद्धी दिल्याबद्दल मी ईश्वराचे आभार मानले. 'आपणही आपल्यापरीनं समाजासाठी काहीतरी करू या !' असा विचार मनात दृढ झाल्यामुळं मला हुषारी वाटू लागली.

सूर्य लौकरच अस्ताला जाणार असं दिसून आलं. कारण भोवतालचा प्रकाश मंदावत चालला होता आणि काळोख डोकाऊ लागला होता. म्हणून मी तिथून उठलो. प्रथम मंदिरात जाऊन देवीचं दर्शन घ्यायचं मी ठरवलं. त्या भुताटकीच्या खाईमधून निघतानिघता मला वाटलं की समजा भुताटकीनं आपल्यालाच पछाडलं तर ? तेव्हा मीच माझ्या मनाचं समाधान केलं की सद्‌विचारानं प्रेरित होऊन जे समाजाचं कार्य करतात त्यांच्यासमोर भूतपिशाच्च उलट पायघड्या घालतात.

भुताटकीच्या जंगलातून निघून मी जेव्हा स्मशानातून चालू लागलो तेव्हा एका प्रेताग्नीच्या ज्वाला धगधगत होत्या. त्यांच्याकडे पाहतापाहता मी मनातल्या मनात केलेला निश्चय अधिक बळकट केला आणि आपला प्राण कुडीतून जाईपर्यंत कृतसंकल्पापासून मागं वळायचं नाही असा मी दृढनिश्चय केला.

नंतर मात्र मी झपाझप पावलं टाकून देवीच्या मंदिरात पोचलो. तेव्हा तिथं आरती होत होती. मला हा मोठा शुभशकुनच वाटला. देवळात घणाण् घणाण् घणाण् घणाण् असा सारखा घंटानाद होत होता. ' जयदेवी जयदेवी जय महिषासुरमथिनी । सुरवर ईश्वर वर दे तारक संजीवनी ॥ ' अशा आवाजानं वातावरण दुमदुमत होतं. उदबत्त्यांचा आणि कर्पुराचा घमघमाट सुटला होता. टपोऱ्या लाललाल आणि पिवळ्या सुगंधित गुलाब पुष्पांच्या हारानं देवी सुशोभित झाली होती. निरांजनाच्या प्रकाशात प्रज्वलित झालेलं दुर्गादेवीचं दैदिप्यमान आणि प्रसन्न मुखकमल मला आशीर्वाद देत आहे असं मला वाटलं. म्हणून मोठ्या भक्तीभावानं आणि आर्त स्वरानं मी देवीची प्रार्थना केली. आरती झाल्य'वर तीर्थप्रसाद घेऊन आणि देवीला पुन्हा नमस्कार करून मी घराकडे वळलो.

पण मी मंदिराच्या पायऱ्या उतरायला आणि माझा भाऊ पायऱ्या चढायला एकच गाठ पडली. मला पाहताच ' अरे विठ्ठल ! ' असं म्हणून त्यानं मला मिठी मारली. मंदिरात येणारे जाणारे आमच्याकडे पहातच राहिले. ' आता अगोदर घरी चल ! ' असं म्हणून त्यानं माझं मनगट घट्ट धरलं. जणु काही ' हा पळूनबिळून तर नाही ना जाणार ? ' अशी भीती त्याला वाटली असावी.

मी घरी जाताच सर्वांना अत्यानंद झाला. मला पाहून आईवडिलांच्या डोळ्यांचं पारणं फिटलं. आई म्हणाली,

"मी मनातल्या मनात आपल्या कुलस्वामिनीची सारखी प्रार्थना करीत होते. मी म्हणत होते, हे देवी ! भवानीमाते ! हळदकुंकू वाहून तुझं दर्शन घेतल्याशिवाय मी एकही दिवस घालवला नाही. माझी तुझ्यावर एवढी श्रद्धा ! मग तुझी माझ्यावर अवकृपा का ? माझ्या विठ्ठलाला तू वाचव ! त्याचा सांभाळ तूच कर ! तुझा आशीर्वाद म्हणून तर त्याचं नाव मी विठ्ठल असं ठेवलं. असं असताना आज सकाळपासून तो नाहीसा झाला आहे. त्याला घरी येण्याची बुद्धी तुझ्याशिवाय दुसरं कोण देणार ? तुझ्याशिवाय आम्हाला कुणाचा आधार आहे ?"

आणि वडील सांगू लागले,

"अरे ! तू गेल्यापासून माझा जीव ठिकाणावर नाही. बरं तू काही नापास तर झाला नाहीस की त्याबद्दल एवढं वाईट वाटून घ्यावस ! तुझा वर्गात पहिला नंबर आलेला नाही हे खोटं आहे ! कारण तुझा पहिला नंबर मुद्दाम येऊ दिलेला नाही हे वर्गातल्या सर्व मुलांना ठाऊक आहे. तो विद्याधर तर म्हणत

होता की एका मुलानं दिवट्याना वर्गात विचारलं की सर तुम्ही पक्षपात करीत नाही असं तुम्हाला वाटतं का ? म्हणजे तुझ्यावर अन्याय झालेला आहे, याची जाणीव सर्व विद्यार्थ्यांना आहे. अशा स्थितीत घाबरायचं कशासाठी ?

" वरं बेटा ! तू घरी परत आलास हे आमचं मोठं भाग्य ! काही पूर्वपुण्याई होती म्हणून तुला सद्बुद्धी झाली. आता तू देवीसमोर जाऊन प्रथम आपल्या कुलस्वामिनीला नमस्कार कर !"

म्हणून मी हातपाय धुतले व देवीसमोर उदबत्ती लावली. आमच्या घरच्या कुलदेवतेला साष्टांग नमस्कार घातला. आणि प्रार्थना केली, ' हे माते कोणत्याही परिस्थितीत मला माणुसकीनं वागायची बुद्धी दे. मजवर अन्याय झाला तरीही काहीएक कुरकुर न करता अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ती मला दे. स्वार्थत्यागी स्त्रीपुरुषांचा वारसा असलेल्या या हिंदभूमीत माझा जन्म झालेला आहे, याची मला सतत आठवण असू दे. आणि हा माझा देह सत्कार्य करता-करता चंदनाप्रमाणं झिजेल असा मला आशीर्वाद दे ! '

इतक्यात माझे मित्र, शेजारीपाजारी असे आणखी पुष्कळच लोक गोळा झाले ' विठ्ठल आला ! विठ्ठल आला ! ' असं जो तो म्हणू लागला. मला पाहून सर्वांना खुषी झाली. वडिलांच्या सांगण्यावरून भावानं जमलेल्या सर्वांना पेढे वाटले.

मग आम्ही सर्वजण पुढच्या खोलीत बसलो. माझ्या वडिलांचा आनंद पोटात मावत नव्हता. म्हणून ते म्हणाले,

" ज्याचा शेवट गोड ते सर्वच गोड असं म्हणतात. विठ्ठलनं जिवाचं काही बरंवाईट करून घेतलं नाही आणि तो परत आला ही त्याला सद्बुद्धी झाली. अशी सद्बुद्धी आपल्याला व्हावी म्हणून आपण परमेश्वराची करुणा भाकली पाहिजे. आणि हा तर अजून आयुष्याच्या उंबरठ्यावरच आहे. अशा वेळी जरासा अन्याय झाला की कुरकुर करायची आणि जीवाला वैतागून जायचं हे पुरुषार्थाचं लक्षण नाही. उलट आपल्यावर अन्याय झालेला आहे हे माहीत असूनही, तसा अन्याय इतरांवर होणार नाही असा बंदोबस्त करणं हे आपण आपलं कर्तव्य मानलं पाहिजे. नाहीतर एकदा कुरकुर करायची सवय झाली की मनुष्य आयुष्यभर कुरकुरच करतो. असा मनुष्य निव्वळ करंटा होय. त्याच्या सहवा-सात आपण चुकूनही जाऊ नये.

आता तुम्हांला अगदी खरीखरी गोष्ट सांगतो. या आपल्या कोल्हापूरच्या कॉर्पोरेशनमधे उंटमाने नावाचे गृहस्थ क्लॉर्क म्हणून नोकरीवर लागले. पाच वर्षांनी त्यांची सिनिऑरिटी लक्षात घेऊन त्यांना हेडक्लार्क म्हणून नेमण्यात आलं. त्याच वेळी कमिशनर साहेबांनी उंटमाने कारकुनाला ऑफिसमधे बोलावून सांगितलं की तुमचं आतापर्यंतचं काम समाधानकारक नाही. परंतु तुमची आर्थिक

परिस्थिती व पाच वर्षांची नोकरी लक्षात घेऊत तुम्हाला हेडक्लार्क करण्यात आलं आहे. तुम्ही साधे मॅट्रिक आहात. परंतु तुमच्या हाताखाली बी. कॉम्. झालेले पदवीधर कारकून म्हणून काम करताहेत. सध्या पदवीधरांचा तोटा नाही. निदान आतातरी तुमची जबाबदारी ओळखा. नीट मनापासून काम करा. नाहीतर तुम्हाला पुन्हा रिव्हर्ट करण्यात येईल.

परंतु जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही असं जे म्हणतात ते काही खोटं नाही. आपल्याकडे आलेल्या पत्रांना फाईली पाहून स्वत: उत्तरं द्यायच्या ऐवजी याच्याजवळ दे आणि त्याच्याजवळ दे असं करायची सवय उंटमान्यांना होती. त्यामुळं आपल्याकडे काही पेंडिंग काम नाही असं ते लोकांना भासवीत. पण अंदर की बात खुदा जाने अशी त्यांची स्थिती होती. संबंध दिवसभर ऑफिसमधे गप्पा मारायच्या, चहा प्यायचा आणि कुणाची नि कुणाची नालस्ती करायची हा उंटमाने यांचा धंदा होता. पण म्हणतात ना की आपण काही लोकांना काही काळ फसवू शकतो परंतु सर्व लोकांना सर्वकाळ फसवू शकत नाही. ' उंटमाने कामात चुकारपणा करतात. आपल्या कामाची टाळाटाळ करतात, ' अशा तक्रारी कारकून लोक थेट कमिशनरकडे करू लागले. वरतून मात्र ते उंटमाने यांच्या बरोबर गोड बोलत. एके दिवशी दुपारी साडेतीन चार वाजेपर्यंत उंटमाने कँटीनमधे गप्पा मारीत बसले आहेत हे स्वत: कमिशनर साहेबांनी बघितलं. कितीतरी अर्जंट उत्तराचे कागद तसेच तुंबून पडलेले आहेत हेही त्यांच्या लक्षात आलं. म्हणून कमिशनर साहेबांनी उंटमाने यांना रिव्हर्ट करून पुन्हा क्लॉर्कचं काम करायला सांगितलं. आणि त्याचबरोबर असंही जतवलं की हेही काम तुम्ही ठीक केलं नाही तर तुम्हाला बर्खास्त करण्यात येईल.

तेव्हापासून उंटमाने पुन्हा क्लार्क म्हणूनच काम करतात. पण तेही काम ते नीट करीत नाहीत. ' कमिशनरला म्हणावं तुला करायचं असलं तर कर बर्खास्त मला ! ' असं म्हणून कमिशनरच्या नावानं बोटं मोडतात. परंतु आपल्या पायाखाली काय जळतंय हे पाह्यला मात्र उंटमाने तयार नाहीत.

आता ही दुसरी पुणतांब्याला राहणाऱ्या पुंडलीकपंतांची गोष्ट ऐका. ही गोष्ट सुद्धा अगदी खरी आहे. देवाच्या दयेनं त्यांचं किराणामालाचं दुकान चांगलं चालतं. त्यांचं लग्न होऊन आज पंचवीस वर्षं झालीत. त्यांना पाच मुलं आहेत. तरीही त्यांचं आणि त्यांच्या पत्नीचं भांडण अजून संपतच नाही.

एकदा असं झालं की "ताट वाढलं आहे, जेवायला चला ! " असं पत्नीनं म्हणताच पुंडलीकपंत पाटावर येऊन बसले आणि म्हणाले,

"अग ! तुला हजारदा सांगितलं की जेवणारा पाटावर बसल्याशिवाय वाढत जाऊ नकोस. पण तुझी ही खोड काही जात नाही. आणि ओल्या नारळाची चटणी का वाढली नाही ? "

" मला जरा कौसल्याबाईंच्या घरी जायचं आहे म्हणून चटणी आता वाटली नाही. रात्री करीन ! "

" पण ओला नारळ, हिरव्या मिरच्या आणि कोथिंबीर मी मुद्दाम आताच चटणीसाठी मागविली होती ! "

" होय ते खरं ! पण —— "

" पण नाही अन् बिण नाही. व्यवस्थित सैपाक करून नवऱ्याला जेवू घालायच्या ऐवजी तुला त्या कौसल्याबाईच्या घरी जाणं जास्त महत्त्वाचं वाटतं ! नाही का ? "

असं म्हणून पुंडलीकपंतांनी ते वाढलेलं ताट पत्नीच्या अंगावर भिरकावून दिलं आणि म्हणाले,

" जेव्हाचं काम तेव्हा करायचं नाही, ही तुला सवयच जडली आहे. बरोबरच आहे ! तू तरी काय करणार ? खाण तशी माती ! लग्नाच्या वेळी तुझ्या आईबापांनी कबूल केलं होतं की हातातल्या बांगड्या, गळ्यातली एकदाणी आणि माझ्यासाठी एक सायकल व एक रिस्टवॉच या चार वस्तू आम्ही नंतर घेऊन देऊ. मी जेव्हा लग्नात अडून पाहिलं तेव्हा तुझे आईबाप माझ्या पाया पडले आणि म्हणाले की आता आम्हाला पदरात घ्या. नाहीतर इतक्या लोकांच्या-समोर आमच्या अब्रूचे धिंडवडे निघतील. आम्ही नंतर या चारही वस्तू अगदी आठवणीनं आपल्याला देऊ.

असं करताकरता म्हणजे आज देऊ उद्या देऊ म्हणता म्हणता आज पंचवीस वर्षं लोटलीत पण अजून तुझ्या आईवडिलांनी या ठरलेल्या वस्तू दिल्या नाहीत. म्हणून मला वाटतं की त्याच वेळी मी लग्न लावून घ्यायला नको होतं म्हणजे मग मागाहून असा पस्तावा करण्याचा प्रसंग आला नसता. "

पुंडलीकपंतांच्या पत्नीनं खोबऱ्याची चटणी वाटली. त्या कौसल्याबाईकडे गेल्या नाहीत. " जेवायला चला ! पुन्हा सैपाक केला आहे. चटणी वाटली आहे. कोशिंबीरही केली आहे ! " अशी पंतांच्या पत्नीनं त्यांची खूप मनधरणी केली. परंतु पंत जागेवरून उठले नाहीत. त्यांनी जेवण केलं नाही. पंतांच्या पत्नीनं त्यांना सांगितलं,

" हे बघा ! माझे आईवडील तुमचं देणं लागतात हे ते अजूनही कबूल करतात. पण दिवसेदिवस त्यांची आर्थिक स्थिती खालावतच चालली आहे तरीही ते म्हणतात की आम्ही या ठरलेल्या सर्व वस्तू घेऊन देऊ ! "

" ते काही नाही ! जेव्हाचं काम तेव्हाच झालं तर ठीक नाहीतर ते आयुष्यभर भोवतं. तुझ्या आईबापाला म्हणावं आता या चार वस्तू कधी देणार आहात ? मी मेल्यावर ! "

अशा तऱ्हेनं काहीनकाही कारणावरून कुरकुर करणारी माणसं आपल्या अवतीभोवती पायलीला पंधरा मिळतील. परंतु परिस्थिती कितीही बिकट असली, एवढंच काय पण प्रत्यक्ष आकाश कोसळलं तरी काहीएक कुरकुर न करता आपल्या ध्येयमार्गानं जाणारी माणसं किती दृढनिश्चयी असतात ते पाहा !

लोकमान्य टिळकांना सहा वर्षांची कारावासाची शिक्षा इंग्रज सरकारनं ठोठावली. आणि आरोप काय ? तर तुम्ही इंग्रजांच्या विरुद्ध लोकांना भडकावता. तेव्हा लोकमान्यांनी न्यायाधिशाला सांगितलं "या विश्वाचं नियमन करणारी वेगळीच न्यायदेवता आहे. तिच्यासमोर मी निर्दोष आहे. कारण स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि ते मी मिळवणारच. कुणी सांगावं मी तुरुंगात गेल्यानं माझं अंगीकृत कार्य अधिक झपाट्यानं पार पडणार असेल !" आणि लोकमान्यांनी नंतर मंडालेच्या तुरुंगात 'गीतारहस्य' नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचा सारांश असा की कुठल्याही परिस्थितीत न डगमगता आपलं अंगीकृत कार्य आपण केलंच पाहिजे आणि समाजाच्या जास्तीत जास्त उपयोगी पडलं पाहिजे.

आणि हे दुसरं महात्मा ज्योतिबा फुले यांचं चरित्र बघा. अस्पृश्यासहित सर्व जातीतल्या स्त्रीपुरुषांच्या शिक्षणासाठी महाराष्ट्रात पहिली शाळा ज्योतिबांनी सुरू केली. शाळेत मुलींची संख्या वाढली तेव्हा त्यांच्या पत्नी सावित्रीबाई याही त्यांना शिकवण्यासाठी मदत करू लागल्या. तेव्हा सावित्रीबाईंना घरी एक, रस्त्यानं दुसरं आणि शाळेत तिसरं अशी वेगवेगळी लुगडी नेसावी लागत. कारण ज्योतिबांनी आणि सावित्रीबाईंनी मागासलेल्या जातीतील मुलामुलींना शिकवावं या गोष्टीला त्या वेळच्या भिक्षुकांचा फार विरोध होता. म्हणून त्या रस्त्यानं चालताना त्यांच्या अंगावर चिखल फेकणं किंवा थुंकणं असे वाईटवाईट प्रकार हे भिक्षुक करीत होते. तरीही सावित्रीबाईंनी शाळेत शिकवायचं काम चालूच ठेवलं.

आपण रस्त्यानं एवढा त्रास देतो तरीही हे ज्योतिबा व सावित्रीबाई शाळेत शिकवायचं काम चालूच ठेवतात हे पाहून भिक्षुक मंडळी चिडली. त्यांनी ज्योतिबांच्या वडिलांचे म्हणजे गोविंदरावांचे कान भरायला सुरुवात केली.

"अस्पृश्यांच्या मुलांना नि मुलींना तुमच्या मुलानं शिकवावं हे तुम्हांला पाहवतं तरी कसं ? बरं मुलगा तर मुलगा ! पण तुमची सून ! अहो ! तिला तरी तुम्ही आवरून धरणार की नाही ! तुमच्या घराण्याची अब्रू ! तिची तरी तुम्हाला कदर आहे की नाही ?" असं भिक्षुकांनी सांगताच गोविंदराव म्हणाले,

"ठीक आहे ! मी याचा आजच बंदोबस्त करतो !"

आणि त्या दिवशी रात्री ज्योतिबा घरी येताच रागारागानं गोविंदराव म्हणाले,

"ज्योती ! तू अस्पृश्यांच्याही मुलामुलींना शिकवतोस हे आम्हाला पसंत नाही !" हा भ्रष्टाचार आम्हांला पाहवत नाही !"

" अस्पृश्यासहित सर्व स्त्रीपुरुषांना शिकवणं हा भ्रष्टाचार नाही. शिक्षणानंच जर मनुष्य सुसंस्कृत बनतो तर शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार मला करायलाच पाहिजे. म्हणून मी शिकवतो ! "

" तू तर तू ! पण सूनबाई कशाला जाते शिकवायला ? "

" कारण आणखी शिकवणारं दुसरं कुणी नाही म्हणून ! "

" तू मला काही कारणं सांगू नकोस ! उद्यापासून हे शिकवायचं काम बंद केलंच पाहिजे ! "

" आणि बंद नाही केलं तर ? "

" बंद नाही केलं तर ? तर घरातून चालतं व्हावं लागेल. समजलास ! "

" होय समजलो ! मी आताच घराबाहेर जातो ! " असं ज्योतिबांनी शांतपणानं उत्तर दिलं. आणि घराबाहेर जाण्यापूर्वी ज्योतिबा सावित्रीबाईंना म्हणाले की तुला जसं योग्य वाटेल तसं कर ! या बाबतीत तू स्वतंत्र आहेस.

परंतु सावित्रीबाईंनी ताबडतोब उत्तर दिलं की जिकडे तुम्ही तिकडे मी ! आणि नंतर ज्योतिबा व सावित्रीबाई फक्त अंगावरच्या कपड्यासहित घराबाहेर पडले. परंतु त्यांनी अंगीकृत कार्य सोडलं नाही. समाजातल्या सर्व थरातल्या मुलामुलींना शिकवायचं पवित्र कार्य जिवात जीव असेपर्यंत त्यांनी चालू ठेवलं.

म्हणजे हे पहा की सावित्रीबाई आणि ज्योतिबा यांच्यावर प्रत्यक्ष गोविंदरावांनी म्हणजे त्यांच्या वडिलांनीच केवढा अन्याय केला ! पण ज्योतिबा डगमगले नाहीत. मग कुरकुर करणं तर लांबच राहिलं. त्यांनी ज्ञानदानाचं कार्य कधीही सोडलं नाही. धन्य ते महात्मा !

आजही हेच शिक्षणाचं कार्य अत्यंत तळमळीनं आणि काहीएक कुरकुर न करता व कुणावरही अन्याय न करता निष्ठेनं करणाऱ्या तरुणतरुणींची फारफार आवश्यकता आहे. हे जेव्हा आम्हांला समजेल तो सुदिन !

ही वडिलांनी सांगितलेली माहिती एकाग्रचित्तानं ऐकताऐकता आमची करमणूक तर झालीच पण आम्हा सर्वांना एक प्रकारची स्फूर्तीही मिळाली.

आता रात्रीचे जवळजवळ दोन वाजले होते. म्हणून वडील म्हणाले की आपण आता गप्पा मारायचं थांबवू या ! रात्रही बरीच झाली आहे. आता झोपू या !

म्हणून माझे मित्र व शेजारीपाजारी आपापल्या घरी गेले. थोड्या वेळानं मीही अंथरुणावर पडलो. तेव्हा माझी आई माझ्या डोक्यावरून हात फिरवीत होती आणि देवीच्यासमोर मी केलेली प्रार्थना मला पुन्हापुन्हा आठवत होती.

१ ३

# गोष्ट साधी, पण फार महत्त्वाची

थोडचा वेळापूर्वी माझ्या मधल्या भावाचा फोन आला होता की, आईची तब्येत जरा जास्तच आहे. म्हणून मी तावडतोब बंगल्यावर यावं. तेव्हा मी फोनवरूनच त्याला उत्तर दिलं होतं की, माझी मोटर दुरुस्तीसाठी गेल्यानं तू तुझीच मोटर घेऊन ये. मी इथं हॉस्पिटलमध्ये तुझी वाट पहाते. त्याप्रमाणं दिलीपदादा त्याची मोटर घेऊन येताच त्यानं कॉलबेल वाजवून आल्याची सूचना दिली. मी म्हटलं,

"हो मी आलेच !"

पण दिलीप दादाच्या चेहऱ्यावरून तो बराच सचिंत झालेला दिसला. माझ्या या भावाचा बंगला माझ्या प्रशांत प्रसूतीगृहापासून पाचसात किलोमीटर अंतरावर होता. मी प्रसूतीगृहाशेजारच्याच बंगल्यात रहात होते. पण दर रविवारी आणि मधूनमधून केव्हाही आईनं बोलावलं किंवा मलाच वाटलं तर दादाच्या बंगल्यावर मी जाऊन येत असे. माझी मुंबईची मैत्रीण सुनीता काल माझ्याकडे मुंबईहून मुद्दाम आल्यानं मी आईच्या भेटीला गेले नव्हते. माझ्या आईला दम्याचा विकार होता. पण नियमितपणानं औषध घेणं, कशाचीही काळजी न करणं आणि संपूर्ण विश्रांती घेणं या मी सांगितलेल्या औषधोपचारामुळं आईची प्रकृती सुधारत होती. पण मधूनच एखाद्यावेळी आईला खोकल्याची उबळ आली की तिची प्रकृती पुन्हा मूळ पदावर यायची. म्हणून दिलीपदादाच्या चेहऱ्यावरील काळजीची छटा पाहून मला पण चिंता वाटू लागली.

या माझ्या दिलीपदादाची पत्नी कल्पना पहिल्यांदाच गरोदर असूनसुद्धा ती तिच्या सासूची म्हणजे माझ्या आईची इतकी काळजी घेत होती की, तिला स्वतःच्या प्रकृतीकडे पाहयला बिलकूल वेळ मिळत नव्हता. ती तिच्या सासूला आईच म्हणते, आणि माझ्याहूनही आईची जास्त काळजी घेते. हे पाहिलं म्हणजे वाटतं की कोण म्हणतं की सासूसुनांचं पटत नाही म्हणून! माझी आई आणि

तिची सून कल्पना या इतक्या गुण्यागोविंदानं नांदतात आणि त्यांची अंत:करणं आपुलकीच्या ओलाव्यानं इतकी ओतप्रोत भरलेली आहेत की आदर्श सासूसुना म्हणून दाखवायच्या झाल्या तर मी प्रथम यांच्याकडे बोट दाखवीन.

दिलीपदादाच्या दु:खी चेहऱ्याकडे पाहून बाळंतिणींच्या हॉलमध्ये जाता जाता हा वरील विचार माझ्या मनात यायचं कारण असंही असावं की, आजच सकाळी आमच्या प्रसूतिगृहात शकुंतलाबाई शेळके भरती झाल्या. यांचे यजमान प्राथमिक शाळेत शिक्षक होते. अलीकडे ते सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांची सांपत्तिक स्थिती गरिबीचीच आहे. त्यांचा सर्वांत मोठा मुलगा चांगला पोलिस इन्स्पेक्टर असून त्याला वरची मिळकतही बरीच आहे असं म्हणतात. परंतु त्या पोलिस इन्स्पेक्टरच्या बायकोचं आणि त्याच्या आईचं म्हणजे शकुंतलाबाईंचं बिलकूल पटत नाही. त्यामुळं त्या एकमेकींचं तोंड पहात नाहीत. आपला पती आईवडिलांना भेटायला गेला किंवा त्यानं आईवडिलांना पैशांची मदत केली असा नुसता संशय जरी त्याच्या पत्नीला आला की घेतलंच तिनं घर डोक्यावर ! त्यामुळं बाहेरचा बंदोबस्त करण्यात तो फौजदार कितीही तरबेज असला तरी त्याच्या घरात त्याच्या पत्नीपुढं त्याचं काही चालत नाही.

इथं मॅटरनिटी-होममध्ये भरती व्हायलाच शकुंतलाबाईंच्या जवळ बिलकूल पैसे नव्हते. परंतु त्या शेळके शिक्षकांच्याच पत्नी आहेत असं कळल्यामुळं मी त्यांना ताबडतोब भरती करून घेतलं. इकडे त्या शकुंतलाबाईंच्या जवळ प्रसूतीगृहात भरती व्हायला आणि मूलबाळ होऊ नये म्हणून ऑपरेशन करून घ्यायला पैसे नाहीत आणि तिकडे मुलगा पोलिस इन्स्पेक्टर असून गुंडांचा बंदोबस्त करण्यात पटाईत असल्यामुळं त्याच्या खिशात खूप पैसे खुळखुळत असतात. परंतु त्याचं त्याच्या पत्नीपुढं काही चालत नाही. त्यामुळं तो त्याच्या आईला पैशांची मदत करू शकत नव्हता. हे पाहून एकेक मनुष्याचा स्वभाव कसा असतो आणि त्याचे पडसाद मनुष्य जीवनात किती विचित्र तऱ्हेनं उमटतात की त्यामुळं मनुष्याला सुखानं जगणंही मुष्किलीचं होऊन जावं !

असा विचार करीत असतानाच बाळंतिणींच्या खोलीत असलेल्या मेट्रन प्रमोदिनीबाईंना जवळ बोलवून मी म्हटलं,

"मी जाते. तुम्ही पाच नंबरच्या केसकडे जरा लक्ष ठेवा. आणि जरूर पडली तर मला फोनवरून कळवा. आवश्यकताच वाटली तर मी ताबडतोब येईन !"

असं म्हणून मी दिलीपदादाच्या बरोबर प्रसूतीगृहाच्या बाहेर आले. आम्ही दोघंही अँबॅसॅडर कारमध्ये बसून त्याच्या 'समाधान' बंगल्याकडे जायला निघालो. तेव्हा मी म्हटलं,

"काय म्हणते आईची तब्येत ?"

"अग ! काल रविवार होता. आई, तुझी वाट सबंध दिवसभर सारखी पहात होती. तिला वाटलं की, ठरल्याप्रमाणं दर रविवारी जशी सकाळी आठला तू अगदी नियमितपणानं येतेस तशी कालही येशील. परंतु तू न आल्यानं आईची निराशा झाली. बरं मीही काल इतक्या कामात होतो की, दुपारी जेवायलाही मी घरी येऊ शकलो नाही. कॉर्पोरेशनची नवीन इमारत बांधायची आहे. तर ती योजना आखण्यातच सर्व दिवस गेला. कमिशनरसाहेबांना कॉर्पोरेशनच्या बिल्डिंगचा नकाशा सर्व सभासदांना दाखवून लगेच मंजुरी घ्यायची होती. शेवटी कमिशनरसाहेबांच्या इच्छेप्रमाणं कॉर्पोरेशनच्या सर्व सभासदांनी आज प्लॅन मंजूर केला आणि येत्या २६ जानेवारीच्या पूर्वी इमारत बांधून पूर्ण करण्याचा संकल्प मी सोडला. त्यामुळं काल नि आज आईजवळ फक्त कल्पनाच बसून होती."

"अस्सं ! म्हणजे बऱ्याच मोठमोठ्या इमारती बांधून आणखी बराच पैसा मिळवायचा तुझा बेत दिसतोय !"

"नाही, असंच काही नाही ! परंतु धंद्याचं प्रेस्टीज टिकवायचं तर कामं अगदी बिनचूक आणि ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणं करून देणं आवश्यक असतं. मोठमोठ्या कामात हाताखालचे इंजिनीअर जरी लक्ष घालीत असले तरी मलाही तिथं हजर राहणं आवश्यक असतं. लग्न पाहावं करून आणि घर पाहावं बांधून असं जे म्हणतात ते खरोखरच काही खोटं नाही."

"पण म्हणून काय आईची सेवा करायला तुला वेळ नाही असं तू सांगू शकतोस."

"अग ! असं कुठं म्हणतोय मी ! पण मी आईजवळ चोवीस तास बसून कसा राहणार ? आणि कल्पना आईजवळून एक क्षणभरही दूर जात नाही हे काय तुला ठाऊक नाही ?"

"तेही एक प्रकारानं दिलीपदादा तुझं चुकतंच ! अरे ! कल्पनावहिनी प्रथमच गरोदर आहे ! तिचीही काही हौस वगैरे पुरवशील की नाही ? तिला कुठं गावाबिवाला घेऊन जाशील की नाही ?"

"मी तिला पुष्कळ सांगतो की आईला आपण विद्याताईच्या दवाखान्यात ठेवू आणि आपण आठदहा दिवसासाठी कुठंतरी जाऊन येऊ ! तर ती म्हणते की, मी आईसाहेबांना सोडून कुठं जाणार नाही !"

"हां ! बाकी वहिनचंही म्हणणं बरोबरच आहे."

असं बोलणं चालू असतानाच आम्ही बंगल्यात येऊन पोचलो. आणि आम्ही लागलीच आईच्या खोलीत गेलो. बंगल्यातल्या तळ मजल्यावर पोर्चच्या उजव्या

बाजूला असलेल्या एका प्रशस्त खोलीत आई पलंगावर पडून होती. कल्पना वहिनी जवळच बसून आईचं डोकं दाबीत होती. मला पाहताच कल्पना वहिनी म्हणाली,

"केव्हाची वाट पाहताहेत आईसाहेब तुमची ?"

मी स्टेथॉस्कोपनं आईची प्रकृती तपासली. खोकला बराच आल्यामुळं तिला अगदी थकल्यासारखं झालं होतं. तिला ताबडतोब बरं वाटावं म्हणून बरोबर आणलेल्यापैकी एक गोळी मी स्वतःच आईला घ्यायला सांगितली. बाकीच्या गोळ्या तीन तीन तासांनी देण्यासाठी वहिनींना सांगितलं.

ज्या डॉक्टरवर आपला पूर्ण भरवसा असतो त्याला पेशंट परमेश्वराप्रमाणं समजतो. त्यामुळं त्या डॉक्टरांच्या नुसत्या भेटीनं आजाऱ्याला पुष्कळ समाधान वाटतं. आईची मी सर्वांत धाकटी मुलगी. एम्. बी. बी. एस्. परीक्षेत मला उत्कृष्ट यश मिळालं होतं. आणि प्रशांत प्रसूतिगृहाची लोकप्रियता दिवसेदिवस वाढत होती. माझा नावलौकिक पसरत होता. माझ्या हाताला यश आहे हे दुसऱ्याच्या तोंडून ऐकलं की आईला माझ्याविषयी वाटणाऱ्या अभिमानाला अधिकच भरती येत असे. त्यामुळं मी आठवड्यातून दोनदा नाहीतर रविवारी तरी सकाळी आठ ते बारा वाजेपर्यंतचा वेळ आईच्या सहवासात घालवावा, अशी तिची फार इच्छा असायची. एवढंच काय पण रविवारचं जेवण तिथंच आईजवळ बसून घेतलं पाहिजे असा तिचा आग्रह होता. कल्पना वहिनीचा माझ्यावर इतका जीव की, काही दिवसांपूर्वी प्रसूतीगृहाच्या कामानिमित्तानं मी रविवारी तिच्याकडे गेले नव्हते तर तिनं संध्याकाळपर्यंत म्हणजे मी जाईपर्यंत जेवण घेतलं नव्हतं. तेव्हा कालही असंच घडलं की काय अशी भीती वाटून मी म्हटलं,

"अग आई ! काल माझी बालमैत्रीण सुनीता मुंबईहून आल्यानं मला इकडे बिलकूल येता आलं नाही !"

हे ऐकून कल्पना वहिनी म्हणाली,

"अहो ! मग त्या सुनीतावन्संनाही तुम्ही इथंच का नाही घेऊन आलात ? त्या इथंच उतरल्या असत्या. आईसाहेबांना केवढं समाधान वाटलं असतं ?"

कल्पना वहिनी मला वन्स म्हणते. तिच्याहून मी लहान असले तरी अहो जाहो करून मला हाक मारते. पण माझ्या मैत्रिणीलाही तिनं वन्स म्हणून बहुमानार्थी हाक मारल्यामुळं आम्हा सर्वांना मोठी गम्मत वाटली. म्हणून दिलीपदादाकडे पहाता पहाता मी म्हटलं,

"कल्पना वहिनीला वाटतं की तिच्याशिवाय जगातल्या सर्व तरुणींना दादा बहिणी समजतो. भ्रमात आहे झालं वहिनी ! दुसरं काय !"

हे ऐकून आई म्हणाली,

"का नाही समजणार दिलीप असं ? कल्पना आहेच तशी त्याची लाडकी ! "

हे ऐकून कल्पना वहिनीला स्वर्ग ठेंगणा वाटला. गरोदरपणामुळं तिचं मूळचंच लावण्ययुक्त आरक्त मुखकमल कमालीचं मोहक दिसू लागलं ! हे पाहून दादा काही बोलला नाही. पण विषय बदलण्यासाठी तो म्हणाला,

"संपतराव ! अहो संपतराव ! लौकर आणा की कॉफी ! "

आणि संपतरावांनी कॉफी आणल्यावर दादानं स्वतःच ट्रेमधून कॉफी कपात ओतून आम्हा सर्वांना दिली. आणि कॉफी पिता पिता दादा म्हणाला,

"आता याच कारमधून तू घरी जा आणि तुझ्या मैत्रिणीला इथंच घेऊन ये. सैपाक तयार आहे. तुझ्या आवडीचे पदार्थ केलेले आहेत असं कल्पना म्हणते. मग येशील ना ताबडतोब ?"

असं दिलीपदादा बोलताच कल्पना वहिनीनं माझ्याकडे पाहून होकारार्थी मान हालविली. म्हणून आई म्हणाली,

"ताबडतोब ये बर का ग ! काही सबब-बिबब सांगू नकोस ! "

हे ऐकून मी म्हटलं,

"हो आत्ताच येते. अन् त्या सुनीतालाही घेऊन येते. पण दादा हे तर सांग की तुझ्याकडे सकाळी श्रीपतराव शेळके नावाचे शिक्षक आले होते का ?" हे ऐकून दिलीपदादा म्हणाला,

"हो आले होते. पण मी इथं भेटलो नाही म्हणून दुपारी ऑफिसमध्ये येऊन भेटले ! पण हे तुला कसं कळलं ग विद्या ?"

"ते प्रसूतीगृहातही आले होते, म्हणून कळलं !"

"का ?"

"का ते नंतर सांगते ! अगोदर तुझ्या ऑफिसमध्ये कशाला आले होते ते सांग ! "

"ते म्हणत होते की सरकारनं घर बांधण्यासाठी आठ हजार रुपये कर्ज म्हणून द्यायचे मंजूर केले आहेत. तेव्हा तुम्ही तुमच्या बिल्डिंग कन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे आमचं घर बांधून द्या. सर्व सामान तुमचं आणि देखरेखही तुमची ! "

"मग शेळके शिक्षकांचं काय ?"

"त्यांचं म्हणणं असं की आठ हजार रुपयात घर कसं बांधावं हे आम्हाला माहीत नाही. आणि स्वतः बांधायला लागलो तर आठ हजारांच्याऐवजी अठरा हजार लागतील. आणि मग जीव जायचा प्रसंग येईल. म्हणून तुम्हीच घर बांधून द्या ! "

"मग तू काय सांगितलं ?"

"ते मी नंतर सांगतो. अगोदर तू घरी जाऊन तुझ्या सुनीता मैत्रिणीला तर घेऊन ये!"

"तिला तर मी आताच घेऊन येते रे! पण तू शेळक्यांना काय उत्तर दिलंस ते तर सांग."

"मी म्हणालो की आम्ही असली लहानसहान कामं हाती घेत नाही. मोठे सरकारी कॉंट्रॅक्टस् घेतो. किंवा कॉर्पोरेशनच्या मोठमोठ्या इमारती बांधतो. असलं एखाद दुसरं घर बांधायचं काम आम्ही हाती घेत नाही!"

"मग काय म्हणाले शेळके?"

"काय म्हणणार शेळके? ते म्हणाले की आमचं घर मग या जन्मात बांधून होणार नाही. आणि मी म्हणालो की याला आमचा इलाज नाही. शेवटी शेळके एवढसं तोंड करून निघून गेले!"

"पण दादा! तुला या शेळक्यांचं घर बांधायला पाहिजे!"

"विद्या! तू या माझ्या धंद्याच्या बाबतीत असं कां बोलतेस कुणास ठाऊक! पण तुला हे सगळं कळलं कसं?"

"ते शेळके शिक्षक प्रसूतिगृहात आजच आले होते. त्यांच्या पत्नीचं बाळंत-पणानंतर ऑपरेशन करायचं आहे म्हणून भरती करायला आले होते."

"पण त्याचा आणि त्यांचं घर बांधायचा संबंध काय?"

"ते म्हणत होते की निदान तुम्हीतरी सौभाग्यवतीला भरती करून घ्यायला अनमान करू नका. तुमच्या बंधूंनी घर बांधायचं साफसाफ नाकारलं. तसं तुम्हीही करता की काय? तुम्ही प्राथमिक शाळेत आमच्या एक वर्ष विद्यार्थिनी होता. तेव्हा तुम्हीतरी आमचं काम करावं अशी विनंती आहे!"

"अस्सं! म्हणजे तू शेळके शिक्षकांची विद्यार्थिनी म्हणून त्यांचं घर बांधायची सक्ती आमच्यावर करतेस वाटतं! अग, धंद्यात असं करून चालत नाही. बरं, एकाचं घर बांधलं तर दुसरेही असेच आणखी लोक आमच्या मागं लागतील. म्हणून माझं म्हणणं असं की, तू दुसरं काहीही काम सांग परंतु याचं घर बांध नि त्याचं घर बांध असं सांगू नकोस!"

"मी आता प्रथम जाऊन सुनीताला घेऊन येते. पण दादा एवढंच सांगते की तुला शेळके सरांचं घर बांधलंच पाहिजे!"

थोड्याच वेळात मी प्रसूतीगृहाच्या शेजारच्या बंगल्यावर थांबलेल्या माझ्या मैत्रिणीला म्हणजे सुनीताला मोटारीतून 'समाधान' बंगल्यात घेऊन आले. आईची भेट झाल्यानं सुनीताला आनंद झाला. जेवणानंतर रात्रभर सुनीता आणि मी अशा आम्ही दोघीजणी आईच्याच खोलीत झोपणार होतो. त्यामुळं आईला फारच बरं वाटलं.

जेवताना सुनीतानं मुंबईच्या ज.वनातल्या कितीतरी गमतीजमती सांगितल्या. त्यामुळं आईलाही हसायला आलं. कल्पना वहिनींच्या आपुलकीमुळं आणि माझ्या आवडीचे पदार्थ जेवायला असल्यामुळं आम्ही गप्पासप्पा मारण्यात व जेवणात बराच वेळ घालविला. त्यावेळी मी मुद्दामच शेळके शिक्षकांच्या विषयी सुनीता-जवळ बोलले नाही.

पण नंतर अंथरुणावर पडल्यापडल्या सुनीता आणि मी बोलत असताना मी मुद्दामच शेळके शिक्षकांच्या विषयी बोलणं काढलं. त्यांचं घर बांधायचं काम दिलीपदादानं कसं नाकारलं पण ते बांधावं म्हणून मी कशी गळ घातली हेही मी तिला सांगितलं. तसंच शेळके शिक्षकांच्या पत्नी शकुंतलाबाई यांचं आठ मुला-मुलींच्यानंतर म्हणजे नवव्या बाळंतपणानंतर मूलबाळ होऊ नये म्हणून ऑपरेशन करायचंही मी मान्य केलं आहे. हे ऐकून सुनीताला फार आनंद झाला.

कारण सुनीता आज मुंबईच्या मेडिकल कॉलेजमध्ये गायनिकॉलाजी या विषयाची प्रोफेसर होती. तिला मोठा पगार मिळत होता. तसंच तिच्या ज्ञानावर व भाषणावर तिथले सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी खूष होत्या. याचं थोडंफार श्रेय शेळके शिक्षकांनाच होतं याची जाणीव सुनीताला होती. म्हणूनच ती म्हणाली की, दिलीपदादाला म्हणावं निदान चार खोल्यातरी तू शेळके शिक्षकांना बांधून दे. आठ हजाराहून जे जास्त पैसे लागतील ते मी देईन. तसंच उद्या तू शेळके सरांची आणि त्यांच्या पत्नीची अवश्य भेट घडव.

हे ऐकून मला आनंद झाला. नंतर मी रेडिओ लावला. तर रेडिओवर रामकथा चालू होती. दुसऱ्या दिवशी रामनवमी असल्यानं गेल्या काही दिवसांपासून रामायणातला थोडा थोडा भाग रेडिओवरून सांगण्यात येत होता. त्या निवेदनात संभाषण व गाणं अशा धाटणीत रामचरित्राचं गुणगान चालू होतं. बोलणाराचा आवाज मधुर होता आणि तो अंतःकरणापासून सांगत होता. आजच्या कथेतला भाग ' रावणाचा शेवट ' असा होता.

एकीकडे हातातली मासिकं चाळता चाळता सुनीता आणि मी रेडिओवरचं कथानक ऐकू लागले.

" रावण मरायला टेकला आहे, हे पाहून रामानं लक्ष्मणाला सुचवलं की तू रावणाजवळ जाऊन जे शिकण्यासारखं असेल ते शिकून ये. कारण अशी संधी पुन्हा मिळणार नाही. आणि रावणासारखा बलवान रावणच ! यास्तव त्याच्या जवळ जाऊन तू नमस्कार कर आणि जेवढं ज्ञान मिळवता येईल तेवढं मिळव."

म्हणून लक्ष्मण रावणाच्या जवळ गेला. रावणाचा तो अवाढव्य जमिनीवर पडलेला देह पाहून लक्ष्मणाला वाईट वाटलं. ज्या बाजूला रावणाचं मस्तक होतं त्या बाजूनं तो गेला. त्यानं रावणाला नमस्कार केला. आणि काही बोलायची

इच्छा प्रगट केली. परंतु रावणानं तिकडे बिलकूल लक्ष दिलं नाही. म्हणून लक्ष्मण रामाकडे परत गेला. तेव्हा राम लक्ष्मणाला राग भरला आणि म्हणाला की लक्ष्मणा तुला एवढं समजायला पाहिजे की, तू रावणासारख्या बलाढ्य, शूर आणि स्वाभिमानी राजाकडे गेला होतास. असे लोक मरातानासुद्धा स्वाभिमानानंच वागतात. मरण आलं म्हणून गांगरून जाणारा रावण नाही. तेव्हा त्याच्यापासून तुला काही शिकायचं तर तू शालीनतेनं वागायला पाहिजे. तू नम्रतेनं वागलास का ? तू रावणाच्या पायाजवळ जाऊन नमस्कार करायला हवा होता. तर तू म्हणतो की, त्याच्या डोक्याकडे जाऊन तू नमस्कार केलास. हे तुझं सर्वस्वी चुकलं.

आपल्यापेक्षा वयानं, अनुभवानं आणि ज्ञानानं जे मोठे आहेत त्यांच्या-समोर जाऊन आपण नमस्कार कसा करावा, तिथं जाऊन उभं कसं राहावं, त्यांच्याशी कसं बोलावं, त्यांच्या मनाचा कल पाहून आपण उत्तर कसं द्यावं, त्यांचा अनुग्रह मिळण्यासाठी आपण आपली उत्कंठता कशी व केव्हा व्यक्त करावी इत्यादी अनेक गोष्टी अशा असतात की त्या आपल्याला लहानसहान वाटतात. पण त्याच फार महत्त्वाच्या असतात. या अशा लहानलहान गोष्टीवरून मोठे लोक आपली पारख करतात. आपण अत्यंत शालीन होऊन थोरामोठ्यांचा अनुग्रह मिळविण्यासाठी अंत:करणापासून प्रयत्न करायला हवा. आणि आपल्या नम्र वागणुकीमुळं व आपल्या अंत:करणापासून असलेल्या उत्सुकतेमुळं हे थोर पुरुष प्रसन्न झाले, की त्यांना आनंदाची भरती येते. मग ते आपलं बोट धरून आपल्याला मोठ्या खुशीनं पुढं घेऊन जातात. आई ज्याप्रमाणं बालकाला लहानलहान घास करून भरवते त्या प्रमाणं आपल्याला समजेल उमजेल अशा भाषेत हे ज्ञानी लोक आपल्याशी बोलतात. म्हणून म्हणतो की तू आता पुन्हा रावणाकडे जा. ज्या दिशेला रावणाचं मस्तक आहे त्या दिशेनं त्याच्याजवळ जाऊ नकोस. तर ज्या बाजूला त्याचे पाय आहेत त्या बाजूनं त्याच्याजवळ जा. गेल्याबरोबर लवून नमस्कार कर. आणि नम्रतेनं खाली मान घालून उभा रहा. मग काय होतं ते पाहा.

रामानं सांगितल्याप्रमाणं लक्ष्मण पुन्हा रावणाजवळ गेला. त्यानं रावणाच्या पायाजवळ जाऊन त्याला लवून नमस्कार केला; आणि मान खाली घालून नम्रतेनं उभा राहिला. ही लक्ष्मणाची शालीनता पाहून रावणाला मोठा संतोष वाटला. आणि रामाचं म्हणणं खरं ठरलं. कारण रावण म्हणाला,

"लक्ष्मणा ! तू कशासाठी आलास ते सांग !"

"महाराज ! आता अखेरीस हा मृत्युलोक सोडून जाताजाता आपण मला काही ज्ञान द्यावं म्हणून मी आपणाजवळ नम्र विनंती करायला आलो आहे !"

"छान ! फारच छान ! तुझी ही शालीनता पाहून मी प्रसन्न झालो आहे. लक्ष्मणा ! ज्ञान देणाऱ्याच्या प्रसन्नतेहूनही ज्ञान घेणाऱ्याच्या उत्सुकतेचं मोल

अधिक आहे. आणि म्हणूनच तुझी ही नम्रता पाहून माझ्या जीवनातल्या अनुभवाचं ज्ञान मी तुला सांगतो. हा माझा गुह्य ठेवा आहे असंच तू समज. लक्ष्मणा ! मी या लंकेचा राजा होतो. मोठा बलाढ्य राजा म्हणून माझी कीर्ती पसरली होती. सुख, समृद्धी आणि सामर्थ्य माझ्या पायाशी सतत लोळत होतं, म्हणून माझ्या या राज्यात म्हणजे लंकेत तीन गोष्टी घडवून आणाव्यात असं मी ठरवलं होतं. पहिली गोष्ट ही की, अग्नीमध्ये धूर असणार नाही अशी व्यवस्था करणं. दुसरी गोष्ट अशी की समुद्राचं खारट पाणी गोड करणं आणि तिसरी गोष्ट ही की, स्वर्गात जाण्यासाठी शिडी उभारणं. परंतु या तीनही गोष्टी आज करू उद्या करू असं करताकरता मी कधीच करू शकलो नाही. म्हणजे या गोष्टी इतक्या चांगल्या होत्या की कल करे सो आज कर और आज करे सो अब असं म्हणून मी ताबडतोब उद्योगाला लागायला पाहिजे होतं. परंतु या गोष्टी मी करू शकलो नाही. म्हणजे चांगल्या गोष्टी करायला मी क्षणाचाही विलंब लावायला नको होता. उलट सीतेला हरण करायचा दुष्ट विचार माझ्या मनात येताच मी त्या विचाराला ताबडतोब अमलात आणलं; आणि अखेरीस मीच माझा हा असा नाश करून घेतला. म्हणून मला असं वाटतं की वाईट विचार मनात आला तर त्याची अंमलबजावणी कमीत कमी चोवीस तास तरी लांबणीवर टाकावी. हेच माझ्या जीवनाचं बोधामृत समज. तेही तू या पायाकडून येऊन मला नमस्कार केलास व नम्रतेनं ज्ञानलालसा दाखविलीस म्हणून मी बोललो नाहीतर आता हेही बोललो नसतो.

नंतर लक्ष्मणानं रावणाला पुन्हा नमस्कार केला आणि तो रामाकडे परत गेला !

एकीकडे रेडिओवरून रावणाच्या जीवनातलं अनुभवाचं ज्ञान ऐकता ऐकता शेळके शिक्षकांनी आपुलकीच्या जिव्हाळ्याची फुंकर सुनीताच्या लहानपणी तिच्यावर घातली नसती तर तिला आज मेडिकल कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून मिरवता आलं असतं की नाही हेही मला आठवलं. म्हणूनच शेळके सरांची सध्याची खालावलेली सांपत्तिक स्थिती पाहून त्यांचं घर बांधण्यासाठी पैशांची मदत करायला सुनीता अगदी एका पायावर तयार झाली.

सुनीता, अलका, मंदा आणि मी अशा आम्ही काही मैत्रिणी एकाच वर्गात शिकत होतो. तेव्हा शाळेच्या स्नेहसंमेलनाच्या निमित्तानं होणाऱ्या भाषणांच्या चढाओढीसाठी आमच्या वर्गातील प्रतिनिधींची जेव्हा निवड होत होती, तेव्हा सुनीतानंही त्यात भाग घेतला होता. तेव्हा सरपटेबाईंनी सुनीताची निवड का केली नाही हे सांगताना त्यांनी सुनीताचा नुसता अपमानच केला नाही तर सुनीताच्या सात पिढ्यांना बोल लावला. म्हणून तो तास संपताच सुनीता धावत धावत जाऊन

घरी गेली व आपल्या खोलीत जाऊन तिनं खोलीचं दार आतून बंद केलं; आणि ती हुंदके देऊन रडू लागली. सुनीतानं दार उघडावं म्हणून तिच्या आईनं पुष्कळ सांगून बघितलं. पण ती काही केल्या दार उघडेना आणि रडणंही थांबवेना म्हणून सुनीताच्या आईवडिलांनी अलकाला, मंदाला आणि मला बोलावणं पाठवलं.

आम्ही मैत्रिणी तिच्या घरी गोळा होताच सुनीतानं आतून दार उघडलं तेव्हा मी सुनीताच्या आईला म्हटलं,

" होय मावशी ! भर वर्गात सर्व मुलींच्या समोर त्या सरपटेबाईंनी सुनीताचा अपमान केला. त्या सुनीताला म्हणाल्या की, तुमच्या जातीत का कुठं जास्त शिकतात ? जी पाणी या शब्दाचा उच्चार पानी या शब्दाप्रमाणं करते ती भाषण काय देणार, कपाळ ! आणि ज्यांचे उच्चार वाईट त्यांचे विचारही वाईटच. म्हणजे याचा अर्थ असा की ज्यांचे उच्चार वाईट त्यांचे आचारही वाईटच असतात, हे काय सांगायला पाहिजे ? बैस तू खाली ! म्हणे मला भाषणाच्या चढाओढीत भाग घ्यायचा आहे ! तू तर काय पण तुझ्या सात पिढयांनाही शुद्ध बोलता येणार नाही. मग भाषण देणं तर दूरच राहिलं. तुझा गणितात पहिला नंबर आला म्हणून काय झालं ? म्हणून काय भाषेतही पहिला नंबर येईल तुझा ? जिचे उच्चार शुद्ध नाहीत तिचा भाषेत पहिला नंबर येणं, या जन्मात तरी शक्य आहे का ? पण त्याला तू तरी काय करणार ? तुझ्या जातीतल्या सर्वांचेच उच्चार असे धेड-गुजरी आहेत. ज्यांना शुद्ध कसं बोलावं व शुद्ध कसं लिहावं हे समजत नाही त्यांना भाषा कसची येणार डोंबल्याची ! त्यांनी अशीच खालची कामं करावीत. बैस बया, आतातरी खाली बैस ! हे ऐकून सुनीताला रडायला नाही येणार तर काय ! "
हे माझं बोलणं ऐकून सुनीताचे वडील म्हणाले,

" सरपटेबाईंनीं जे सांगितलं ते बरोबरच आहे! " हे ऐकून आम्ही सर्व मैत्रिणींनी एकदम विचारलं,

" काय बरोबर आहे.? "

" फक्त सरपटेबाईंच्याच जातीतल्या मुलींनी शिकावं असं त्यांना वाटतं. म्हणून इतर जातींच्या मुलींना त्या निरुत्साही करतात."

" मग हे काय चांगलं आहे वाटतं वागणं ? "

"असं आहे की आमच्यासारख्या मागासलेल्या जातीतल्या मुली शिक्षण घेऊन पुढं आल्या तर सरपटेबाईंच्यासारखे जे शिकलेले लोक आहेत, त्यांच्या पोटावर पाय पडतो. तेवढयाच काही नोकऱ्या आम्ही त्यांच्या हातातून हिसकावून घेतो. हे त्यांना कसं पाहवणार ? कारण खालपासून तर वरपर्यंत सर्व क्षेत्रातल्या अधिकाराच्या जागांचं कुरण आतापर्यंत फक्त याच सुशिक्षित लोकांना चरायला मोकळं होतं. म्हणून इतर जातीतल्या मागासलेल्या मुलामुलींनी मोठं

व्हावं, असं यांना अंतःकरणापासून वाटत नाही. या सरपटेबाई कोत्या विचारांच्या आहेत. लहान मुलामुलींचा असा हिरमोड आणि अपमान करणं महापातक आहे. पण सर्वच शिक्षिका अशा असतात असं मात्र नाही. काही शिक्षक व शिक्षिका सर्वांच्या बरोबर ममतेनं वागतात."

हे सुनीताच्या वडिलांचं म्हणणं खरं होतं. कारण सरपटेबाईंनी सुनीताचा असा अपमान केल्यामुळं तिनं वर्गातच रडायला सुरुवात केली होती. ही गोष्ट शेळके शिक्षकांना समजताच त्यांनी आम्हा पाचसात मुलींना मुद्दाम त्यांच्या घरी बोलवून घेतलं. सुनीतानं किंवा आमच्यापैकी कुणीही निरुत्साही होऊ नये म्हणून परोपरीनं समजावून सांगितलं. ही गोष्ट सरपटेबाईंना समजताच "मोठे आले आहेत मुलींचा कैवार घेणारे ?" असं म्हणून सरपटेबाईंनी इतर शिक्षिकांच्या-समोर शेळके शिक्षकांना टोमणा मारायला सुरुवात केली. त्या वेळी त्या मुलींच्या शाळेत फक्त शेळकेच शिक्षक होते. बाकीच्या सर्व स्त्रियाच आम्हाला शिकवीत असत. त्यामुळं सरपटेबाईंनी इथूनतिथून सर्व शिक्षिकांची मनं शेळके शिक्षकांच्या विरुद्ध कलुषित केली. तरीही शेळके शिक्षक आम्हा पाचसात विद्यार्थीनींना दर रविवारी दुपारी दोन ते चार त्यांच्या घरी बोलवून उच्चार कसे सुधारावेत याची माहिती ममतेनं सांगू लागले. हे पाहून तर सरपटेबाईंना आणखीनच मिरच्या झोंबल्या. तरीही शेळके शिक्षकांनी त्याची पर्वा केली नाही. आमच्याकडून पुष्कळ मराठी कविता प्रथम पाठ करून घेतल्या. त्या कवितांचा अर्थ अगदी सोप्या भाषेत समजावून सांगितल्यामुळं आम्हाला त्या कविता तेव्हाच समजल्या. तसंच पाठांतरा-मुळं स्मरणशक्ती वाढून उच्चारही आपोआपच सुधारतात हे त्यांनीच आमच्या मनावर बिंबवलं. एवढंच काय पण कित्येक पाठ झालेल्या कविता पाठ झाल्या आहेत किंवा नाही हे पाहण्यासाठी मुद्दाम पुन्हापुन्हा आमच्याकडून लिहवून घेतल्या.

आमचं मन पाठांतराला अनुकूल झालेलं आहे हे त्यांच्या लक्षात येताच आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् । सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति-गच्छति ।। असे कितीतरी संस्कृत श्लोकही त्यांनी आमच्याकडून पाठ करवून घेतले. असे श्लोक आमचे पाठ व्हायचं एक कारण हे की शेळके शिक्षक आमच्याशी अत्यंत आपुलकीनं वागत. तसच उच्चार सुधारणं ही गोष्ट जरी सोपी असली तरी तिकडे दुर्लक्ष करू नका; हे त्यांनीच अनेक गोष्टी सांगून आमच्या मनावर बिंबवलं. कारण एकदा उच्चार अशुद्ध राहिले तर ते पुढं आयुष्यात लौकर सुधारत नाहीत. आणि मग पुढं पुढं आपली आपल्यालाच लाज वाटू लागते. मग संभाषण चातुर्यात पारंगत होणं तर फार दूरची गोष्ट ! म्हणून उच्चार आताच सुधारण्यावर त्यांनी भर दिला. आमचे संस्कृत श्लोकही पाठ होऊ लागताच त्यांनी भगवद्-गीतेचा बारावा अध्याय आमच्याकडून म्हणवून घ्यायला सुरुवात केली. प्रत्येक

श्लोकाच्या चरणातला दोनतीन शब्दांचा लहानसा भाग ते स्वतः अगोदर म्हणत आणि नंतर आम्हाला म्हणायला सांगत. असा क्रम जवळजवळ सहा महिने चालू होता. यामुळं आमचा बारावा अध्याय पाठ झाला. तो अध्याय दररोज सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपण्यापूर्वी म्हणावा ही सवय आम्हाला शेळके सरांनीच लावली. ती आमची सवय आजही कायम आहे. आम्हाला या बाराव्या अध्यायातल्या प्रत्येक श्लोकाचा अर्थ आजही कदाचित सांगता येणार नाही. परंतु एखाद्या मंत्रोच्चाराप्रमाणं तो अध्याय आम्ही सकाळी उठल्याबरोबर आणि रात्री झोपण्यापूर्वी घडघडा म्हणतो. म्हणून शेळके शिक्षकांचं स्मरण आम्हाला आजही होत असल्यास आश्चर्य नाही.

पुढच्या वर्षी सुनीतानं भाषणांच्या चढाओढीत वर्गातून निवड होण्यासाठी पुन्हा भाग घेतला. तेव्हा पहिल्या तीन मुलींत तिचा पहिला नंबर आला. यामुळं तिची संभाषण चातुर्याची उमेद वाढली. हा असा शुद्ध उच्चारांचा स्फुल्लिंग शेळके शिक्षकांनी सुनीताच्या मनात लहानपणी रुजवला नसता तर आज नामांकित प्रोफेसर म्हणून तिला इतकं अपूर्व यश मिळालं नसतं. लहानपणी तिचे उच्चार जर अशुद्धच राहिले असते आणि तिचा पुन्हापुन्हा असाच हिरमोड व अपमान झाला असता, तर तिचं उत्साही मन कधीच करपून गेलं असतं. तिच्या इच्छा-आकांक्षेची केव्हाच राखरांगोळी झाली असती. असं होऊ नये म्हणून शेळके शिक्षकांनी फार मोठी दक्षता घेतली. ही गोष्ट दिसायला लहानशी वाटत असली तरी लाख मोलाची आहे. म्हणूनच सुनीताला शेळके सरांच्याविषयी आणि त्यांच्या पत्नीविषयी आपुलकी, अभिमान आणि आदर वाटतो. कारण बरोबरच आहे. जाईजुईच्या वेलीला योग्य प्रमाणात जमीन, पाणी, हवा आणि प्रकाश मिळाला तर ती तेव्हाच फोफावते. ती काही दिवसांनी फुलांनी डवरून जाते. तेव्हा त्या पांढऱ्याशुभ्र सुगंधित फुलांनी सर्व वातावरण सकाळसंध्याकाळ प्रसन्न, पवित्र आणि मंगलमय होऊन जातं. त्याचप्रमाणं लहान मुलामुलींच्या उत्साहाला शिक्षकांनी आपुलकीनं आणि प्रेमानं सिंचन केलं तर ती मुलं आणि त्या मुली आपलं भवितव्य उज्ज्वल करून दाखवतात. नाही का !

अशा अनेक विचारात त्या दिवशी रात्री मला केव्हा झोप लागली कुणास ठाऊक ! परंतु दिलीपदादा जरी शेळके सरांचं घर बांधायचं नको म्हणत असला तरी त्याला ते घर बांधायला लावयचंच, असा जणू काही मी मनातल्या मनात पक्का निश्चय केला होता. ज्या शेळके शिक्षकांनी विद्यार्थीदक्षेत आपल्याला …कीनं वागवून इतर शिक्षिकांच्या हेटाळणीकडे मुद्दाम दुर्लक्ष करून पाठां… …त्त्व पटवून दिलं, त्याबद्दल शेळके सरांचं उतराई व्हायचंच असा …ही मी ध्यास धरला होता. दुसऱ्या दिवशी त्या शेळके शिक्षकांची, त्यांच्या

पत्नीची व त्यांच्या मुलामुलींची भेट झाल्यानं सुनीताला फार आनंद झाला. तिच्यासारख्या प्राध्यापक असलेल्या तरुणीनं पूर्वस्मरण ठेवून त्या शेळके शिक्षकांना व त्यांच्या पत्नीला प्रसूतीगृहातील सर्वांच्यासमोर लवून नमस्कार करताच त्या पतीपत्नींच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. प्रसूतीगृहातल्या स्त्रियांनाही अत्यानंद झाला. मग मला किती झाला असेल ?

माझ्या सांगण्यावरून दिलीपदादानं शेळके शिक्षकांचं घर चार महिन्यांच्या आत बांधून दिलं. त्या स्वतःच्या नवीन घरात एका सुमुहूर्तावर शेळके पतीपत्नी आपल्या मुलाबाळांसह राहुचला गेल्या. तेव्हा तिथं त्या नवीन घरात झालेल्या सत्यनारायणाचा तीर्थप्रसाद शकुंतलाबाईंच्या हातून घेताघेता माझं अंतःकरण आनंदानं किती भरून आलं असेल, याची आपण कल्पनाच केलेली बरी !

ग्रंथसंग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
निबंध

## १४

# आपला आपण मित्र

दारावर टक्टक्टक्टक् असा आवाज येताच मी दार उघडलं. समोर माझा मित्र दौलतराव देसाई उभा होता. तो आत येतायेता म्हणाला,

" आताच्या आता तुला नि मला होस्टेल सुपरिंटेंडेंट साहेबांनी बोलावलं आहे ! " हे ऐकून मी म्हटलं,

" कशाला ? "

" कुणास ठाऊक ! पण त्यांचा नोकर सांगून गेला की बोलावलं ! "

म्हणून मी कपडे घातले आणि आम्ही वसतीगृहाचा जिना उतरून सुपरिंटेंडेंटच्या बंगल्याकडे जाऊ लागलो काय काम असावं या विषयी काही कल्पना करता येईना. म्हणून त्यांच्या बंगल्यापर्यंत आम्ही काही बोललो नाही. तिथं पोचल्यावर कॉलबेल वाजवून आम्ही बाहेरच्या बैठकीतील वेताच्या खुर्च्यांवर बसलो. समोरच भिंतीवर टांगलेल्या हिमाच्छादित टेकड्यावर नुकत्याच उगवलेल्या सूर्यकिरणांचा प्रकाश पडल्यानं कसं नवचैतन्य स्फुरण पावलं आहे, अशा चित्राकडे मी पाहू लागलो. ते चित्र मला आवडलं. इतक्यात सुपरिंटेंडेंट बाहेर आले आणि म्हणाले,

" आताच प्रिन्सिपॉल साहेबांचा फोन आला होता. त्यांनी तुम्हाला अकरा वाजता ऑफिसमधे बोलावलं आहे ! "

हे ऐकून आम्ही दोघांनी एकदमच विचारलं,

" काही विशेष ? "

" काही सांगता येत नाही. पण त्यांनी सांगितलं की तुम्हा दोघांना हा निरोप आताच सांगा. म्हणजे ते ताबडतोब भेटतील. "

हे ऐकून दौलतराव आणि मी होस्टेलच्या क्लबमधे लागलीच परत आलो. घाईघाईत आम्ही दोघांनी जेवण उरकलं आणि आम्ही प्रिन्सिपॉल साहेबांच्या कार्यालयात गेलो. दाराजवळ उभ्या असलेल्या प्यून बरोबर प्राचार्यांच्याकडे चिठ्ठी

पाठवून आम्ही बाहेर उभे राहिलो. आमची चिठी मिळताच त्यांनी आम्हाला ताबडतोब आत बोलावलं. आम्हाला पाहताच प्राचार्य मोठ्या खुशीतच म्हणाले,

"मी तुमचं दोघांचंही अंतःकरणापासून अभिनंदन करतो." आणि असं म्हणून त्यांनी आमच्याबरोबर हस्तांदोलन करून आम्हाला समोरच्या खुर्च्यांवर बसायला सांगितलं. परंतु आम्ही खुर्चीवर बसायचा संकोच करू लागलो. तेव्हा ते म्हणाले,

"प्लीज सिट् डाऊन!" हे ऐकताच मग मात्र आम्ही खुर्च्यांवर बसलो. स्वतः प्राचार्यही त्यांच्या कोणत्याही दिशेला फिरणाऱ्या खुर्चीत बसले आणि म्हणाले,

"तुमचं अभिनंदन मी एवढ्यासाठी केलं की दिल्लीच्या इंडियन कौंसिल ऑफ ॲग्रिकलचर रीसर्च या भारत सरकारच्या मध्यवर्ती शेतकी संशोधन संस्थेतर्फे आपल्या कॉलेजच्या प्रथम वर्षात पास झालेल्या विद्यार्थ्यांत वसतीगृहातल्या तुम्हा दोघांना आणि गावात राहणाऱ्यांपैकी तिघांना अशा एकूण पाच विद्यार्थ्यांना महिना पंचाहत्तर रुपये स्कॉलरशिप गेल्या वर्षापासून देण्यात आली आहे. आणि सबंध वर्षाची शिष्यवृत्ती महिना पंचाहत्तर रुपयाप्रमाणं एकून नऊशे रुपये आता एकदमच देण्यात येत आहे. तुमचा अभ्यास असाच उत्तम तऱ्हेनं चालला तर ही शिष्यवृत्ती सतत मिळत राहील. एवढंच काय पण निश्चयपूर्वक पण नियमितपणानं तुम्ही सतत झटून असाच अभ्यास कराल तर तुम्हाला रशियात किंवा अमेरिकेत जाऊन पुढील अध्ययन करायलाही स्कॉलरशिप मिळू शकेल.

परंतु तुम्हाला आताच मुद्दाम बोलवायचं कारण असं की तुम्ही होस्टेलमधे राहता. तेव्हा हे इतके नऊशे रुपये जवळ ठेवू नका. अकाऊंटंट जवळून पैसे आताच घेऊन तुम्ही साताऱ्याला घरी जाऊन हे रुपये आईवडिलांना नेऊन द्या. आणि रुपये घरी मिळाल्याबद्दल वडिलांच्याकडून लिहून आणा. पण अकाऊंटंटकडून पैसे घेतल्याचं मात्र मला आताच सांगा!"

हे ऐकून आम्हाला अत्यानंद झाला. एस्. एस्. सी परीक्षेत मला प्रथम श्रेणीचे मार्क्स मिळाले होते. आणि गेल्या वर्षात मी अभ्यासाच्या बाबतीत फार मेहनत केली होती. वर्गातल्या सर्व विद्यार्थ्यांत इंग्रजीत व प्लँट पॅथॉलाजी म्हणजे वनस्पती रोगनिदानशास्त्र या दोन विषयांत मला सर्वांत जास्त गुण मिळाले होते. आम्ही मोठ्या अभिमानानं आणि आनंदातिशयानं,

"थँक् यू सर!" असं म्हणून प्राचार्यांच्या कार्यालयातून बाहेर आलो. लगेच शेजारीच असलेल्या अकाऊंटंटच्या कार्यालयात जाऊन शंभरशंभर रुपयांच्या नऊनऊ नोटा प्रत्येकानं घेतल्या. आणि पुन्हा एकदा प्राचार्यांना भेटून, त्यांना स्कॉलरशिपचे पैसे मिळाल्याचं सांगून आम्ही वसतीगृहातल्या आपापल्या खोलीवर आलो.

दौलतराव लागलीच दुपारच्या दोनच्या एस्. टी. बसनं साताऱ्याला जायला निघाला. वडिलांना देण्यासाठी मी त्याच्याजवळ एक चिठ्ठी दिली. मी लिहून कळवलं,

" तीर्थरूप अप्पांना

सप्रेम नमस्कार

मी उद्या सकाळच्या सातच्या बसनं निघून अकरा साडे-अकरा वाजता साताऱ्याला येत आहे. मित्रवर्य दौलतरावकडून तुम्हाला कळेलच की गेल्या वर्षापासून महिना पंचाहत्तार रुपयाप्रमाणं वर्षाला नऊशे रुपये स्कॉलरशिप दिल्लीच्या इंडियन कौंसिल ऑफ ॲग्रिकलचर रीसर्च या भारत सरकारच्या शिक्षण खात्यातील मध्यवर्ती संस्थेकडून शिष्यवृत्ती मिळालेली आहे. अधिक माहिती समक्ष सांगेन. तीर्थरूप सौ. आईस सप्रेम नमस्कार. चि. श्रद्धा व चि. संध्या यांना अनेक उत्तम आशीर्वाद. कळावे.

आपला

अशोक

मी त्याच दिवशी साताऱ्याला न जाता दुसऱ्या दिवशी घरी जायचं जे ठरवलं ते यासाठी की, शिष्यवृत्तीची नऊशे रुपये रक्कम माझ्या हातात येताच मला असं वाटलं की अप्पांच्यासाठी व आईच्यासाठी एकेक रिस्टवॉच घ्यावं. वडिलांचा पेशा शिक्षकाचा असूनही त्यांच्याजवळ घड्याळ नव्हतं. त्यांच्या वर्गातल्या विद्यार्थ्यांजवळ घड्याळं असून त्यांच्याजवळ नसल्यानं कधीकधी "किती वाजले ? " म्हणून ते विद्यार्थ्यांना विचारीत. ही गोष्ट ज्या दिवशी मी प्रत्यक्ष पाहिली, त्याच दिवशी माझ्या लक्षात आलं की मनगटावरील घड्याळाची त्यांना फार आवश्यकता आहे. म्हणून आजच रिस्टवॉच विकत घ्यायचं असं ठरवून मी शेतकी महाविद्यालयाच्या वसतीगृहातून सायकलवरून बाहेर पडलो. डेक्कन जिमखान्यावरील फर्ग्युसन कॉलेजच्या समोरील रोडवरून लकडी पुलापर्यंत आणि तिथून लक्ष्मीरोडवरील घड्याळाच्या दुकानात जाईपर्यंत पँटच्या उजव्या खिशात शंभराशंभराच्या ज्या नऊ नोटा ठेवल्या होत्या त्यांना निदान नऊ वेळा तरी मी चाचपून पाहिलं. लक्ष्मी वॉच हाऊस या दुकानात गेल्यावर दुकानदारानं मला अनेक घड्याळं दाखविली. अखेरीस हिंदुस्थान मशीन टूल्स या बंगलोर येथील कारखान्यात तयार झालेलं जनता रिस्टवॉच अप्पांच्यासाठी व सुजाता लेडीज रिस्टवॉच आईसाठी मी खरेदी केलं. तसंच मंडईतल्या काका हलवायाच्या मिठाईच्या दुकानात जाऊन एक किलो पेढेही घेतले. तसं पाहिलं तर आमच्या सातारचे पेढे काही कमी प्रसिद्ध नाहीत. परंतु घड्याळासाठी जर आपण सव्वादोनशे रुपये खर्च केलेत तर पेढ्यासाठी आठ रुपये खर्च करायला काही हरकत नाही असं मला वाटलं. हे पेढे आणि घड्याळं घेऊन परत येतांनाही मी नोटांचा खिसा पुन्हापुन्हा

चाचपून पहात होतो. इतके रुपये पूर्वी आमच्या घरी मी कधी पाहिलेही नव्हते, मग जवळ बाळगायचं तर नावच काढायला नको. म्हणून 'पैसे हरवणार बिरवणार तर नाहीत ? कुणी खिसाबिसा तर कापणार नाही ?' असा विचार माझ्या मनात पुन्हापुन्हा येत होता.

अशा विचारात लकडी पूल ओलांडून डेक्कन जिमखान्यावर आलो. तेव्हा साठे स्पोर्ट्स् या दुकानाजवळ येताच मला आठवण झाली की आपल्या बहिणी-साठी आपण बॅडमिंटनची रॅकेट विकत घ्यावी. ती हायस्कूलच्या अखेरच्या वर्गात होती. ती बॅडमिंटन चांगली खेळायची. पण स्वतःची रॅकेट नाही म्हणून तिनं खेळणं बंद केलं होतं. शिवाय शटल्कॉक्स महाग असल्यानं "अग! असला महागडा खेळ आपल्यासाठी नाही. हे खेळ श्रीमंतांचे आहेत!" असं म्हणून आईनं श्रद्धाची समजूत घातली होती. आता मी तिच्यासाठी एक भारी किंमतीची रॅकेट विकत घेतली. शिवाय एक डझन शट्लकॉक्सही विकत घेतले. हे इतके शट्लकॉक्स व ही स्लेझेंजर नावाची रॅकेट पाहून तिला किती खुशी होईल या विचारानं मला फारच आनंद झाला.

तसंच माझी धाकटी बहीण संध्या हिच्यासाठी मी एक साडेसात रुपयांची बाहुली विकत घेतली. अशी निळचा डोळचांची डुलणारी मोठी बाहुली आमच्या शेजारी राहणारे श्री. मनोहर मराठे यांनी त्यांच्या नीना नावाच्या मुलीसाठी आणली होती. नीना अन् संध्या बाल मैत्रिणी होत्या. म्हणून नीनाची बाहुली पाहून "मलाही अशीच बाहुली पाहिजे!" असा संध्यानं हट्ट धरला. "अग हो! आपणही अशी बाहुली आणू! पण आज नाही. पुढं काही दिवसांनी विकत घेऊ!" असं अप्पांनी पुष्कळ सांगितलं. पण संध्या काही केल्या ऐकेना. आईनंही तिची बरीच समजूत घातली पण संध्या रडायचं काही केल्या थांबवेना! म्हणून मग,

"ऐकते की नाही ?" असं म्हणून अप्पांनी संध्याच्या पाठीत एक रपाटा मारला. त्यामुळं संध्या अधिकच रडू लागली. हे पाहून अप्पांनाच वाईट वाटलं. आपण असल्या श्रीमंती थाटाच्या वस्तू विकत घेऊ शकत नाही याची जाणीव होऊन अप्पांनी मनातल्या मनात स्वतःच बोल लावून घेतला. या प्रसंगाची आठवण होऊन आपण आपल्या धाकटचा बहिणीची हौस आज एक वर्षांनी का होईना पण भागवीत आहोत हे पाहून माझं मलाच मोठं समाधान झालं. मी नंतर खोलीवर आलो.

त्या दिवशी अंथरुणावर पडल्यापडल्या मला अनेक सुंदरसुंदर कल्पना सुचू लागल्या. माणसाजवळ पुरेसा पैसा असला म्हणजे त्याचं मन स्वतंत्ररीत्या आणि स्वैरगतीनं विचार करू शकतं याचा मला प्रथमच अनुभव आला. माझ्या

शिक्षणासाठीच वडिलांना महिना शंभर दीडशे रुपये पाठवणं मुष्किलीचं झालं होतं. अशावेळी माझी बहीण श्रद्धा हिला मेडिकल कॉलेजमध्ये पाठवावं की नाही आणि पाठवल्यास पुरेसे पैसे आपण देऊ शकू की नाही यावरून आईवडिलांचे पुष्कळदा खटके उडाले होते, याची मला आठवण झाली. म्हणून माझ्या शिक्षणाचा खर्च आता या माझ्या शिष्यवृत्तीत भागल्यास माझ्या बहिणीस तिच्या इच्छेप्रमाणं शिक्षण घेता येईल. या विचारानं मला मोठी खुशी झाली.

मी इथल्या पुण्याच्या शेतकी महाविद्यालयात प्रवेश मिळवला होता, तोच मुळी वडिलांच्या इच्छेविरुद्ध ! त्यांचं म्हणणं होतं की मी इंजिनिअर व्हावं. म्हणून इंजिनिअरिंग कॉलेजात प्रवेश मिळाल्याचं पत्र पोस्टमननं आणून देताच अप्पा मला म्हणाले होते,

" अशोक ! बघ तुला सांगलीच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. हे बघ हे प्रवेश मिळाल्याचं पत्र ! " हे ऐकून मी शांतपणानं उत्तर दिलं,

" पण मला इंजिनिअरिंग कॉलेजात जायचं नाही ! "

" का ? "

" माझा गणित विषय जरा कच्चा आहे. म्हणून मला तिकडे जायची इच्छा नाही ! "

" मग हे तू पूर्वी का नाही सांगितलंस ? म्हणजे मग त्या कॉलेजचा प्रवेश अर्ज आपण पाठवला नसता ? "

हे ऐकून मी काही बोललो नाही. कारण यावर काय उत्तर द्यावं हेच मला समजेना. मी काही बोलत नाही हे पाहून अप्पा म्हणाले,

" हे बघ अशोक ! अशी घाई करून कोणताही निर्णय घेऊ नकोस ! तू इंजिनिअर होशील तर तुला आयुष्यात पैसा मिळेल आणि काहीतरी करामतही करून दाखवता येईल. सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि इतर कितीतरी विभाग इंजिनिअरिंग महाविद्यालयात असतात. यांपैकी तुला पाहिजे त्या विषयात इंजिनिअर होता येईल ! "

" पण माझी जायची इच्छा नाही. हे सांगितलं ना मी तुम्हाला ! "

हे माझं उत्तर ऐकून अप्पांचा बराच संताप झाला असं मला वाटलं. त्यांचा एक मित्र इंजिनिअर होता. त्याचा साताऱ्याला आमच्या घराच्या जवळच मोठा बंगला होता. त्याची स्वतःची अॅम्बॅसॅडर कार होती. म्हणून अप्पांना वाटत होतं की आपल्याही मुलानं इंजिनिअर व्हावं. कारण अप्पांचं जीवन म्हणजे रखडत-रखडत चालणाऱ्या एखाद्या खटाऱ्या गाडीप्रमाणं होतं. आणि काहीही केलं तरी खटाऱ्याची ज्या प्रमाणं मोटार बनू शकत नाही त्या प्रमाणं अप्पांच्या जीवनात त्यांना घरची गरिबी दूर करता येणं शक्य नव्हतं. म्हणून त्यांना वाटत होतं की

निदान आपल्या मुलाला तरी आयुष्यात पैशाची ददात पडू नये. हा त्यांचा सल्ला त्यांच्या परीनं योग्यच होता. परंतु पुण्याच्या शेतकी महाविद्यालयात प्रवेश मिळाल्याचं पत्र कालच घरी आलं होतं. आणि ते मी अजून अप्पांना मुद्दाम दाखवलं नव्हतं. म्हणून ते जेव्हा म्हणाले,

"मग काय करणार ?" तेव्हा मी त्यांच्या समोर ते पत्र टाकलं आणि म्हणालो,

"मी शेतकी महाविद्यालयात जाणार आहे !"

"अरे ! ॲग्रिकल्चर कॉलेजात जाऊन काय करणार ? पुढं शिक्षण घेऊन फर्स्टक्लास मिळाला तरच नोकरी मिळायची शक्यता आहे. बरं आपल्याकडे शेतीबाडीही नाही ! मग शेतकी महाविद्यालयात जाऊन काय उपयोग ?"

हे ऐकून आई तावातावानं सैपाकघरातून पुढच्या खोलीत आली आणि म्हणाली,

"त्याला जर नाही जायचं इंजिनिअरिंग कॉलेजात तर तुमची तरी एवढी जबरजस्ती कशाला ?"

"हं ! आता ही आली आहे मधेमधे बोलायला ! अग ! सध्या इंजिनिअर अन् डॉक्टर लोकांची जशी चलती आहे तशी शेतकी विषयातल्या एम्. एस्सी. पास झालेल्यांची नाही !"

"ते सगळं खरं ! पण ज्याला शिकायचं त्याच्या कलानं घ्याल की नाही ?"

"पूर्वी याला डेहराडूनच्या मिलीटरी अकॅडमीच्या प्रवेश परीक्षेला बसायची परवानगी मिळाली होती. तर तेव्हाही तू त्याचीच बाजू घेतलीस ! अन् त्याला परीक्षेला जाऊ दिलं नाहीस."

"हो, का नाही घेणार त्याची बाजू ? त्याची जर मिलिटरी ट्रेनिंग घ्यायची इच्छा नाही तर तुमची इच्छा तुम्ही का लादता त्याच्यावर ? मी म्हटलं की नको जाऊ रे अशोक तुझी इच्छा नाही तर ! तेव्हा तुम्ही म्हणालात की ही आली आहे आता आगीत तेल ओतायला. हे काय बोलणं झालं ? उचलली जीभ अन् लावली टाळूला. अहो ! शिक्षणशास्त्रातला सर्वात महत्त्वाचा सिद्धांत हा आहे की कुठलीही गोष्ट आपल्यावर लादली जात आहे असं शिकणाऱ्याला वाटू नये. तशातच अशोक काही आता लहान नाही. अशा वेळी तू हेच शिक्षण घे अन् ते घेऊ नकोस असं तुम्ही काय म्हणून सांगता ?"

हे आईचं बोलणं ऐकून अप्पांचा आणखीनच संताप झाला. त्यांचं म्हणणं असं होतं की डेहराडूनच्या मिलीटरी अकॅडमीत प्रवेश होण्यासाठी परीक्षेला बसायची मला मिळालेली ही शेवटचीच संधी आहे. मिलीटरीचं शिक्षण जरी सुरुवातीला शिस्तबद्ध व सक्तीचं वाटत असलं तरी पुढं पुढं आपल्या शरीराला

व मनाला तेच वळण लागून मग मनुष्य आयुष्यभर शिस्तबद्ध जीवन जगतो आणि सध्या हिंदुस्थानच्या लोकांना शिस्तीच्या जीवनाची तर फारच आवश्यकता आहे. बरं याला जायचं नव्हतं तर यानं अगोदर तसं सांगायला पाहिजे होतं. म्हणजे प्रवेश अर्जाची पस्तीस रुपये फी फुकट गेली नसती. शिवाय त्या अर्जाबरोबर जोडण्यासाठी हे प्रमाणपत्र आण आणि ते प्रमाणपत्र मिळवं असं करण्यासाठी माझा जो वेळ फुकट गेला तोही गेला नसता !

अशा तऱ्हेनं इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये मिळालेला प्रवेश अन् डेहराडूनच्या मिलिटरी अकॅडमीच्या परीक्षेस बसायची मिळालेली संधी मी नाकारल्यामुळं अप्पा माझ्यावर फारच नाराज झाले होते. सध्याची मुलं फार शेफारून गेली आहेत असं त्यांना वाटू लागलं होतं. म्हणून ते काही दिवस माझ्याशी तुटकतुटक बोलत होते.

मला शेतकी महाविद्यालयात व वसतिगृहात प्रवेश मिळाला आहे असं पुण्याहून पत्र येताच मी पुण्याला जायची तयारी करू लागलो. जूनच्या तेरा तारखेच्या आत मी वसतिगृहात व महाविद्यालयात हजर असलं पाहिजे असं मला कळविण्यात आलं होतं. त्या प्रमाणं मी सामानाची जुळवाजुळव करू लागलो. याच सुमारास अप्पांचे एक बंधू सोलापूरला आजारी असल्याचं पत्र घरी आलं. म्हणून अप्पा ताबडतोब सोलापूरला निघून गेले. त्यामुळं जूनच्या तेरा तारखेला मी जेव्हा एस. टी. बसनं साताऱ्याहून निघालो तेव्हा अप्पा घरी नव्हते. पण मला त्याच दिवशी निघणं आवश्यक असल्यानं त्यांना न भेटताच मी साताऱ्याहून निघालो.

पुण्याला दुपारी साडेअकरा वाजता शेतकी महाविद्यालयातल्या वसतिगृहात येऊन मी सुपरिटेंडेंटला भेटलो. तेव्हा मला वसतिगृहातली तेरा नंबरची खोली देण्यात आली आहे असं सांगण्यात आलं. त्याप्रमाणं मी तेरा नंबरच्या खोलीत तेरा जूनला प्रवेश केला. आणि आता मला नक्की आठवतं की गतवर्षी साताऱ्याहून पुण्यास येताना बसमध्ये जागा मिळण्यासाठी मी जेव्हा रिझर्व्हेशन केलं होतं तेव्हा मला ज्या सीटचा नंबर मिळाला होता तो तेराच होता.

आता अंथरुणावर पडल्यापडल्या मला या १३ नंबरची आठवण होण्याचं कारण हे की इंग्लंडमधले लोक तेरा नंबर अशुभ मानतात असं माझ्या वाचण्यात आलं आहे. माझा मात्र भविष्यावर किंवा हे शुभ आणि हे अशुभ असल्या गोष्टीवर विश्वास नाही. या खोलीत आल्यापासून माझी मात्र उन्नतीच झाली आहे. गतवर्षी याच दिवशी इथल्या या खोलीत रात्री अंथरुणावर पडलो असताना मी मनाशी असा विचार करीत होतो की, आपण ज्या अर्थी आपल्या इच्छेप्रमाणं या शेतकी महाविद्यालयात आलो आहोत, त्या अर्थी आपण अभ्यास मनापासून करायला पाहिजे. अप्पांचं मन आपल्याविषयी कलुषित झालेलं आहे म्हणून त्यात भर

पडेल असं कोणतंच कृत्य आपल्याकडून होता कामा नये. म्हणून नियमितपणानं अभ्यास करायला अगदी उद्यापासून सुरुवात करायची.

मी दुसऱ्या दिवशी घरी साताऱ्याला पत्र पाठवून कळवलं होतं की माझी पुण्याला चांगली सोय आहे. मी अभ्यासालाही सुरुवात केली आहे. माझा वसतीगृहातल्या खोलीचा नंबर १३ आहे. अशा तऱ्हेचं माझं पत्र मिळताच त्याचं सविस्तर उत्तर अप्पांनी पाठवलं होतं. घर सोडून मी प्रथमच दुसऱ्या गावी गेल्यामुळं अप्पांचं अंतःकरण अतिशय उचंबळून आलं होतं. म्हणून ते पत्र मी जतन करून ठेवलं होतं आणि आतापर्यंत अनेकदा वाचलं होतं. ते पुन्हा एकदा वाचू या अशी आठवण होताच मला आठवलं की रात्री झोपण्यापूर्वी प्यायचं दूध मी आज घेतलंच नाही. म्हणून मी अंथरुणावरून उठलो. इलेक्ट्रिकचं बटन लावलं. स्टोव्ह पेटवला आणि दूध गरम केलं. नंतर कपात दूध ओतून साखर व ओव्हलटीन टाकून चमच्यानं दूध हालवू लागलो. तेव्हा मला वाटलं की अप्पांचं ते पहिलं पत्र आपण पुन्हा वाचू या. म्हणून ते पत्र काढून दूध पितापिता मी वाचू लागलो. अप्पांनी लिहिलं होतं.

"अशोक ! आता तू वेगळ्या वातावरणात राहायला गेला आहेस. आता तू स्वतः चांगलं काय नि वाईट काय हे समजू शकतोस. आईबापांनी आपल्या मुलामुलींना उपदेश करावा हे साहजिकच आहे. याचं कारण असं की आपण आयुष्यात अधिक टक्केटोणपे खाल्ले आहेत. म्हणून आपल्या मुलाला उपदेशाचे दोन शब्द सांगितल्यास त्याचा फायदा होईल असं आईवडिलांना वाटतं. त्याला अनुसरून काही गोष्टी मी तुझ्यासमोर आज प्रथमच स्पष्टपणानं बोलणार आहे. त्यावर तू शांतचित्तानं विचार कर.

त्यातली पहिली गोष्ट ही की आयुष्यात स्टार्ट म्हणजे सुरुवात योग्य दिशेनं झाल्यास मग पुढं पस्तावा करण्याचा प्रसंग येत नाही. आणि मग पुढच्या आयुष्यात " मला अमुकअमुक व्हायचं होतं. पण काय करणार ? आमची सुरुवातच चुकली. आमचा स्टार्टच वेगळ्या दिशेला झाला." असं निदान तुला तरी म्हणता येणार नाही. तू इंजीनिअरिंग कॉलेजमधे जावं अशी माझी इच्छा होती. पण तुझी आवड शेतकी महाविद्यालयात जायची असल्यानं मी माझ्या मताला मुरड घातली. म्हणून म्हणतो की तू स्वतःहून निवडलेल्या महाविद्यालयातील अभ्यासाला आता निश्चयपूर्वक सुरुवात केली पाहिजे. अगदी नियमितपणानं दररोज ठराविक तास मनापासून अभ्यास करशील तर कठिण विषयही तुला समजू शकेल. आईबाप काय, अध्यापक काय किंवा कॉलेजचे प्राध्यापक काय मार्गदर्शन करू शकतील. कधीकधी स्फूर्तीचा स्फुल्लिंगही देतील. ही गोष्ट कमी महत्त्वाची आहे असं मी म्हणत नाही. परंतु विद्यार्थी जोवर स्वतः प्रयत्न करणार नाही तोवर

त्याला त्या मार्गदर्शनाचा काहीही फायदा होऊ शकणार नाही. म्हणून स्वतः विद्यार्थ्यानं मेहनत करणं ही गोष्ट सर्वस्वी त्याच्याच हातात आहे. आता तू तिथं स्वतंत्र आहेस. इथं घरी असताना लौकर ऊठ, अभ्यास कर, हे कर अन् ते करू नकोस, अशा अनेक गोष्टींचा लकडा आम्ही तुझ्यामागं सतत लावीत होतो. आमचं असं विचारणं पुष्कळदा तुला आवडतही नव्हतं. पण आता जर तू शांत-चित्तानं विचार करशील तर आमच्या या अशा वागण्याच्या मागं तुझं भलं व्हावं हाच हेतू होता. आता तिथं हे प्रश्न तुला कुणीही विचारणार नाही. पण हे प्रश्न तू स्वतःच स्वतःला विचारले पाहिजेत.

दुसरी गोष्ट अशी की तू रोजनिशी लिहीत जा. परंतु रोजनिशीत तोच तो दिनचर्येचा कार्यक्रम लिहिण्यात अर्थ नाही. जसं सकाळी सहाला उठलो, सातला चहा घेतला व साडेसातला कॉलेजमध्ये गेलो. साडेअकराला कॉलेज सुटलं, नंतर वसतिगृहात येऊन जेवण केलं. दुपारी दोन वाजेपर्यंत विश्रांती घेतली. दोन ते पाचपर्यंत कॉलेजच्या शेतावर जाऊन तिथं काम केलं. साडेपाच ते साडेसहा मैदानावर हॉकी खेळलो. साडेसातपर्यंत जेवण घेतलं. नंतर रात्री आठ ते दहा अभ्यास केला. अशा तऱ्हेनं अमक्या वाजता अमुक केलं आणि तमक्या वाजता तमुक केलं असं रोजनिशीत एखाद्या दिवशी लिहिलं तर हरकत नाही; परंतु दर-रोज तेच ते लिहिण्यात स्वारस्य नाही.

या पेक्षा संबंध दिवसात एखादा संस्मरणीय प्रसंग घडला असेल, एखाद्या सुविचारामुळं आपलं मन उचंबळून आलं असेल, एखादा प्राध्यापक शिकवताना रंगून गेला असेल आणि आपल्याला स्फूर्ती मिळाली असेल, हास्य-विनोदाचा एखादा प्रसंग घडला असेल, काही निमित्तानं कॉलेजमध्ये किंवा वसतिगृहात सभा झाली असेल, एखादं पुस्तक वाचतावाचता त्यातला काही भाग आपल्याला आवडला असेल किंवा इतर कोणत्याही कारणानं एखादी गोष्ट आपल्याला विशेष महत्त्वाची वाटली असेल तर तिला रोजनिशीत त्या दिवशी मुद्दाम लिहिलं पाहिजे. परंतु त्या लिहिण्यात पाल्हाळ नसावा. अगदी थोडक्या शब्दात पण पुन्हा केव्हाही वाचल्यास त्याचा अर्थ समजेल अशा तऱ्हेनं लिहावं.

तिसरी गोष्ट अशी की उद्या काय करायचं आहे ते आजच ठरव. निदान झोपण्यापूर्वी 'उद्या आपल्याला अमुकअमुक करायचं आहे. ते अमुकअमुक काम तर झालंच पाहिजे. कारण समजा तसं नाही झालं तर ......' असा विचार आपल्या मनात झोपताना उचंबळून आला पाहिजे. असं झालं म्हणजे मग आपण स्वतःच आपला मार्ग निश्चित करतो. असं करीत गेल्यानं आपण एखादं चांगलं काम केलं तर ते आपल्या लक्षात राहातं. समजा एखाद्या विषयाचा अभ्यास आपण मनापासून केलेला असला आणि त्यावर वर्गात प्राध्यापकांनी विचारलेल्या

प्रश्नांची उत्तरं आपण बरोबर दिली, तर प्राध्यापक इतर सर्वांच्या समोर आपली कधीकधी पाठ थोपटतात, म्हणजे मग आपली आपल्याला धन्यता वाटते. हा आपला मोठा विजय झाला असं विद्यार्थ्यांनं समजावं. त्यानं आनंद मानावा आणि अभिमान बाळगावा अशीच ही घटना होय. पण समजा काही कारणामुळं एखाद्या आठवड्यात काही आपला अभ्यास झाला नाही आणि वर्गात झालेल्या चाचणी परीक्षेत आपल्याला उत्तरं बरोबर लिहिता आली नाहीत तर कधीकधी प्राध्यापक वर्गातल्या इतर सर्व विद्यार्थ्यांच्या समोर आपली कानउघडणी करतात. तेव्हा आपण फार वाईट वाटून घेऊन निरुत्साही होऊ नये. आपल्या प्राध्यापकांनी आपल्या भल्यासाठीच आपल्याला दोष दिला असं समजून पुन्हा जोमानं उद्योगाला लागावं. आपण जर दररोज असं करीत गेलो तर आपणच आपले मित्र आहोत हे आपलं आपल्याला पटू लागतं. हे ज्याला कळलं त्याला पुष्कळ समजलं असं मी म्हणतो. तेव्हा तू तुझा मित्र व्हावंस अशी माझी फार इच्छा आहे.

पत्र बरंच मोठं लिहिलं आहे असं तू म्हणशील. परंतु तू घराच्या बाहेर प्रथमच गेला आहेस. अशा वेळी मातापित्यांना आपल्या मुलाबद्दल कायकाय वाटतं हे तुला कसं सांगणार? म्हणून एवढं मोठं पत्र लिहिल्याशिवाय मला राहवलं नाही. आता अखेरची एक गोष्ट सांगून हे लांबलेलं चऱ्हाट आखडतं घेतो. ती ही की अशोक! तू जमाखर्च लिहून ठेवायला विसरू नकोस. रोजनिशीत दररोज काहीच लिहिण्यासारखं नसलं तर निदान त्या दिवसाचा जमाखर्च लिहिला पाहिजे. जमा काय महिन्यातून एकदाच असणार. पण खर्च मात्र दररोज असू शकतो. मी माझ्या आयुष्यातल्या अनुभवानं सांगतो की जसाखर्च लिहिल्यानं आपण पैसा कसकसा खर्च करीत आहोत हे आपल्याला समजतं. प्रवासास निघालेल्या माणसाला खुणेच्या दगडावर लिहिलेल्या किलोमिटरच्या आकड्यावरून आपण किती प्रवास करून आलो आणि आपल्याला अजून किती जायचं आहे हे समजतं. तसंच जमाखर्चावरून आपली आवक किती नि आपला खर्च किती ही गोष्ट आपल्याला समजते. आपल्याला जमाखर्च लिहायचाच आहे असं एकदा ठरल्यावर मग ते काम करण्यात अळंटळं करू नये. समजा आपल्या हातून अनाठायी पैसा खर्च झाला असेल तर तेही लिहून ठेवावं.

आणि आता जरा स्पष्ट बोलतो त्या बद्दल राग मानू नकोस. आपण स्वतः कमवत नाही तोवर आपल्याला पैशांची किंमत कळत नाही. परंतु जमाखर्च लिहू लागल्यास हळूहळू पैशांची किंमत कळायला मदत होते. आपल्या मुलांना शिक्षण देऊन मोठं करणं व त्या साठी आवश्यक तितका पैसा पुरवणं हे जसं आईबापांचं कर्तव्य आहे, तसंच मनापासून शिक्षण घेणं आणि आईवडिलांची कीर्ती वाढवणं हे मुलांचं कर्तव्य आहे हे विद्यार्थ्यांनी कधीही विसरू नये. हे तू लक्षात

ठेवशील असा तुजविषयी मला मोठा विश्वास वाटतो. पत्र बरंच लांबलं. नाही का !

तुझाच
अप्पा ''

हे पत्र वाचल्यावर अप्पांच्याविषयी वाटणारा माझा आदर अधिकच दुणावला. मला वाटलं की आज शिष्यवृत्ती मिळाल्यामुळं जो अत्यानंदाचा दिवस उगवला त्याचं श्रेय आईवडिलांनाच आहे. असे आईवडिल लाभल्यामुळं आपण भाग्यवान आहोत असं मला वाटतं. त्यामुळं अनेक आशावादी विचारांनी मला कवटाळलं. म्हणून मग रात्री निद्रादेवीच्या मी केव्हा स्वाधीन झालो हे माझं मलाच कळलं नाही.

रात्री बराच वेळ जागरण झालं होतं तरी दुसऱ्या दिवशी मी बरोबर पाच वाजता उठलो. सहापर्यंत निघायची सर्व तयारी केली. मी दुसऱ्याच दिवशी परत येत असल्यानं बरोबर फारसं सामान घेतलं नाही. काल विकत घेतलेले पेढे, घड्याळ, रॅकेट आणि बाहुली मात्र न विसरता घेतली आणि बरोबर सहाला मी वसतिगृहाबाहेर पडलो. रस्त्यावर येताच मला ताबडतोब आटोरिक्षा मिळाली. म्हणून मी पंधरा मिनिटातच बस स्टँडवर पोचलो. सातच्या बसचं तिकिट मी कालच रिझर्व्हड् केल्यानं मला मोटारीत जागा मिळायला त्रास पडला नाही.

आमची बस बरोबर सातला स्टँडवरून सुटली. माझं मन प्रफुल्लित असल्यानं अवतीभोवतीचं सारं वातावरण मला मोठं रमणीय आणि आनंददायक वाटू लागलं. वास्तविक पाहता बस नेहमीचीच, प्रवासाचा रस्ता तोच, वाटेत लागणारे वृक्ष, झरे, नदीनाले आणि गावंही तीच होती. परंतु मला मात्र सर्वकाही अगदी नाविन्यपूर्ण वाटू लागलं. माणसाच्या मनाचा आणि कुठल्याही सुखाचा कसा घनिष्ट संबंध असतो याचा मला आज प्रथमच अनुभव आला. अप्पांच्यासाठी व आईसाठी घेतलेली घड्याळं ज्या लहान हँडबॅगमध्ये ठेवली होती त्या बॅगची चेन उघडून घड्याळं आत असल्याची मी पुन्हा एकदा खात्री करून घेतली. नंतर चेन ओढून बॅग बंद केली. दुसऱ्या बॅगमध्ये ठेवलेली पेढ्यांची पुडी व निळ्या डोळ्यांच्या डुलणाऱ्या बाहुलीचा डबा व्यवस्थित असल्याचं पुन्हा एकदा पाहून घेतलं. श्रद्धासाठी घेतलेली बॅडमिंटनची रॅकेट व शटलकॉक्सचा लांबोळा गोल डबाही पाहून घेतला. नंतर अप्पांच्या सांगण्यावरून लिहीत असलेली रोजनिशी त्यांना दाखवण्यासाठी मी मुद्दाम घेतली होती. तिला बाहेर काढून तिची पानं भर्भर्भर्भर् चाळू लागलो. चाळताचाळता पुढील मजकुरानं माझं लक्ष वेधून घेतलं.

"आज दौलतराव देसाई, आशाराम पवार, गुलाब देशमुख, अरविंद गुजराथी, निंबाजो शिंदे, संजय साठे आणि मी वसतिगृहातल्या कँटीनमध्ये बसल्या बसल्या कांद्याची भजी खात होतो. तेव्हा संजयनं सुचवलं की आज आपण रात्री लकी रेस्टॉरंटमध्ये जेवायला जाऊ या. त्याची सूचना दौलतरावानं ताबडतोब मान्य केली. इतर सर्वांनी होकार दिला. माझी मात्र जायची इच्छा नव्हती. कारण आम्ही गरमगरम भजी इतकी खाल्ली होती की आता फारशी भूक नव्हती. परंतु मित्रांच्या आग्रहाला मी नकार देऊ शकलो नाही. नंतर आम्ही लकीत गेलो. तिथं झक्पक् झक्पक् कपडे घातलेल्या स्त्रीपुरुषांच्या गर्दीमुळं जागा मिळायला वेळ लागला. कारण कोणतंच टेबल रिकामं नव्हतं. नंतर पूर्वेकडचं एक टेबल रिकामं होताच आम्ही तिथं जाऊन बसलो. मटण, आमलेट आणि इतर अनेक पदार्थ आम्हाला इतके आवडले आणि आम्ही इतके खाल्ले की त्याला काही सुमार नाही.

लकीतून बाहेर आल्यावर विडा खाऊन हळूहळू पावलं टाकीत आम्ही वसतिगृहात परत आलो. जास्त जेवण झाल्यामुळं आज अभ्यासाला मला सुट्टी द्यावी लागली. जगण्यासाठी खा, खाण्यासाठी जगू नका हे वाक्यं माझं पाठ झाले आहे. पण काय उपयोग? वाजवीपेक्षा जास्त खाल्ल्यामुळं अभ्यास मुळीच न केल्याचा हा आजचा पाचवा प्रसंग आहे."

दुसऱ्या एका पानावर लिहिलं होतं,

"आज आमची इंग्रजीची व वनस्पती रोगनिदानशास्त्र या दोन विषयांची प्रथम परीक्षा झाली. माझे पेपर्स फारच चांगले गेले होते. दुसऱ्या दिवशी हे विषय शिकवणाऱ्या दोन्ही प्रोफेसरांनी चांगली उत्तरं लिहिल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांच्या समोर माझी स्तुती केली. मला मूठभर मांस चढल्यासारखं झालं. माझ्या मित्रांनीही माझी पाठ थोपटली. त्यामुळं मला अधिकच उत्साह वाटू लागला. परंतु सायंकाळी खेळायच्या मैदानावरून वसतीगृहाकडे परत येतायेता श्री. 'अ' म्हणाला की इंग्रजीत आणि प्लँट पॅथॉलॉजीत पहिला नंबर आला म्हणून खेळातही पहिला नंबर येईल असं वाटतं की काय तुला? त्याच्या बोलण्यात कुत्सितपणा होता. आपण कुणाच्याही अध्यातमध्यात न पडलं तरीही आपली उन्नती काही लोकांना मुळीच सहन होत नाही हेच खरं! मी माझ्या मनाला पुष्कळ सांगितलं की आपण भले नि आपलं काम भलं. परंतु त्या 'अ' चं झोंबणारं वाक्य पुन्हापुन्हा आठवून मला बरंच दुःख झालं."

आणखी एका पानावर लिहिलं होतं,

"आज आमचे कर्मवीर भाऊराव पाटील यांचा स्मृतिदिन समारंभ शाहू विद्यामंदिरात जाहीर रीतीनं साजरा झाला. त्यासाठी माझे मित्र व मी मुद्दाम गेलो होतो. त्या वेळी एका वक्त्याचं भाषण ऐकताऐकता आमच्या साताऱ्च्या रयत शिक्षणसंस्थेत कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दिलेलं भाषण मला मनातल्या

मनात आठवलं. ते म्हणाले होते, "माझ्या विद्यार्थ्यांनो आणि विद्यार्थिनींनो ! मी तुमच्यावर पोटच्या मुलाहूनही अधिक प्रेम करतो. हे तुम्ही पहातच आहात. आणि हे मी सांगायलाच पाहिजे असं नाही. परंतु हे मी तुमच्यासमोर एवढ्या-साठी बोलत आहे की आयुष्यात तुम्ही तीन गोष्टी कराव्यात अशी माझी इच्छा आहे. पहिली गोष्ट ही की तुम्ही शिक्षण घेऊन खूप मोठं व्हा. दुसरी गोष्ट अशी की ज्या समाजात तुम्ही जन्म घेतला त्या समाजाची शैक्षणिक उन्नती करण्यासाठी झटा. आणि तिसरी गोष्ट अशी की या आपल्या रयत शिक्षण-संस्थेवर मातेसारखं प्रेम करा. ज्या दिवशी खेड्यापाड्यात राहणारा झोपडीतला खेडूत आणि रानावनात राहणारा गिरीजन हा पदवीधर होऊन सामाजिक कार्य नि:स्वार्थबुद्धीनं करीत आहे हे मी पाहीन त्या दिवशी माझं जीवन सफल झालं असं मी समजेन. या साठी माझी तुम्हाला एक विनंती आहे. ती ही की, तुम्ही स्वावलंबी बना. आपल्या संस्थेत जी लहानमोठी कामं तुम्हाला करावी लागतात ती मनापासून करा. शारीरिक कामाचा कधीही कंटाळा करू नका. जो अंग मेहनत करीत नाही तो बुद्धीची कसरतही करू शकणार नाही. तुम्ही मोठे होऊन समाजाचे पांग फेडाल व झाडून साऱ्या समाजात एकही व्यक्ती अशिक्षित राहू देणार नाही अशी मला खात्री वाटते !"

इतकं वाचून झाल्यावर मी रोजनिशी बंद केली. एस. टी. ची बस भरधाव वेगानं धावत होती. साताऱ्याभोवतालचा उंचउंच प्रदेश आणि अजिंक्य तारा जवळ जवळ येऊ लागला होता. मी घड्याळात पाहिलं. दहा वाजण्याचा सुमार होता. मी थोडावेळ डोळे बंद करून घेतले. तेव्हा मला वाटलं की काल बरोबर याच वेळी आपल्याला सुपरिंटेंडेंटनं बोलावलं होतं. तेव्हापासून तर आज सकाळी बसमध्ये बसून बस धकेपर्यंतच्या घटना मला आठवू लागल्या. त्यातलं प्राचार्यांनी मोठ्या आपुलकीनं उच्चारलेलं वाक्य की एवढंच काय पण निश्चयपूर्वक व नियमितपणानं तुम्ही सतत झटून असाच अभ्यास कराल तर तुम्हाला रशियात किंवा अमेरिकेत जाऊन पुढील अध्ययन करायलाही स्कॉलरशिप मिळू शकेल. हे वाक्य मी मनातल्या मनात, पुन्हा उच्चारलं. आणि मला महाराष्ट्रातले एक नामवंत पत्रकार 'नवशक्ति वर्तमानपत्राचे संपादक श्री. पां. वा. गाडगीळ यांच्या भाषणाची आठवण झाली. 'सोविएत देश' या पाक्षिकातल्या ऑगस्ट १९६७ च्या १५ व्या अंकातील पृष्ठ ३३ वर श्री. रॉक कार्व्हालो यांनी श्री. गाडगीळांच्या भाषणातला काही भाग वाचकांना सादर केला होता. त्यात लिहिलं होतं,

"भारतीयांना सोविएत युनीयनशी खरीखुरी मैत्री हवी असेल तर त्यांनी तिथल्या समाजसत्तावादाची माहिती करून घेतली पाहिजे. सोविएत युनियन व भारत यांची मैत्री अखंड राहिली पाहिजे. आपल्याला रशियन लोकांच्यापासून पुष्कळ शिकण्यासारखं आहे, ते लोक प्रामाणिक व शिस्तबद्ध आहेत. कुठचाही

रशियन प्रवाशी ट्रॉली, बस किंवा आगगाडी मधून तिकिटाशिवाय प्रवास करीत नाही. ही वाहने कंडक्टर शिवाय चालतात. प्रत्येक प्रवासी कर्तव्यबुद्धीनं यंत्रात नाणं टाकतो आणि तिकिट काढतो."

याच 'सोविएत देश'च्या अंकात पृष्ठ ४ वर मास्कोतल्या जनमैत्री विद्यापीठात शिकणाऱ्या १७८ विद्यार्थ्यांपैकी एक श्री. मदनलाल मन्हास याची मुलाखत प्रकाशित झाली होती. "मास्कोत तुम्हाला काय आवडलं?" या प्रश्नाचं उत्तर त्यानं पुढीलप्रमाणं दिलं होतं,

"मास्कोमधली जमिनीखालची रेल्वे, लेनीन टेकडीवरील विद्यापीठाची नवीन इमारत आणि वल्शोय थिएटरमधील हंस सरोवर इत्यादी ठिकाणं मला फार आवडली."

हे मनातल्या मनात आठवून मला वाटलं की आपणही मास्कोमधल्या जन-मैत्री विद्यापीठात पुढच्या शिक्षणासाठी का जाऊ शकणार नाही?

अशा आनंदमय अनेक विचारांनी माझं अंतःकरण ओसंडून वाहत असतानाच बस साताराच्या बस स्टँडवर येऊन उभी राहिली. मला स्टँडवर भेटण्यासाठी माझे वडील आणि श्रद्धा व संध्या या माझ्या बहिणी आल्या होत्या. त्यांना पाहून मला व मला पाहून त्यांना मोठा आनंद झाला. आम्ही लगेच तांगा करून शिवाजी पेठेतल्या आमच्या घरी जायला निघालो.

घरी पोचल्यावर माझे वडील ज्यांना परमेश्वराप्रमाणं पूजनीय आणि परम कल्याणकारक मानतात त्या संत सद्गुरु स्वामी तुकाराम महाराज यांच्या फोटोसमोर उदबत्ती लावून ती स्कॉलरशिपची रक्कम, ती घड्याळं, ती बॅडमिंटनची रॅकेट, ती बाहुली अन् ते पेढे अशा सर्व वस्तू मी ठेवल्या. आणि मग मी स्वामींना साष्टांग प्रणिपात केला. नंतर आईवडिलांनाही नमस्कार केला.

पेढे खाताखाता निळ्या डोळ्यांच्या डुलणाऱ्या बाहुलीला जवळ घेऊन संध्याला जो हर्ष झाला, बॅडमिंटनची रॅकेट हातात घेऊन 'आता मी बॅडमिंटन खेळणार' या विचारनं श्रद्धाला जो आनंद झाला आणि ती घड्याळं व स्कॉलर-शिपची रक्कम पाहून आईवडिलांना जे समाधान वाटलं, ते आपल्याला सांगायचं म्हटलं तरी मला सांगता येणार नाही.

# १५

## आपला सर्वात मोठा शत्रू..........

" मंगळवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी चार वाजता आपल्या विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचा आणि विद्यार्थिनींचा शिक्षकांच्यासह एक ग्रूप फोटो काढला जाणार आहे. सर्वांनी बरोबर चार वाजता वाचनालयासमोरील मैदानावर एकत्रित व्हावे. ज्यांना या ग्रूफ फोटोची प्रत हवी असेल त्यांनी तीन रुपये कवायत शिक्षक श्री. हिसके यांच्याजवळ सोमवार दिनांक २५ सप्टेंबर पर्यंत दिले पाहिजेत. " ही सूचना श्रीमती हौशाबाई या शिक्षिकेनं वाचून दाखवताच वर्गातल्या सर्व विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थिनींनी टाळ्या वाजवल्या, इतका त्यांना या सुचने-मुळं आनंद झाला. कारण विवेकानंद विद्यालयाचं वार्षिक सम्मेलन गेल्या महिन्यात पंधरा ऑगस्टला जोडूनच साजरं करण्यात आलं होतं. परंतु दर वर्षी निघणारा ग्रूप फोटो मात्र या वर्षी काढण्यात आला नव्हता.

कारण यंदाच्या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थिनींनी फारच आग्रह धरल्यामुळं 'नकटा नवरा नसावा' हे नाटक बसवण्यात आलं होतं. गावातल्या सर्व स्त्रीपुरुषांना हे नाटक आवडलं होतं. ज्या दिवशी या नाटकाचा प्रयोग शाळेत झाला त्या दिवशी शाळेचं मैदान मुलामुलींनी आणि स्त्री-पुरुषांनी अगदी खचा-खच भरून गेलं होतं. विद्यार्थ्यांनी केलेल्या नाटकातल्या कामाबद्दल गावातल्या जवळजवळ सर्व स्त्रीपुरुषांनी प्रशंसोद्‌गार काढले होते. त्याबद्दल मुख्याध्यापक आणि इतर सर्व शिक्षक यांना लोकांनी धन्यवाद दिले होते. विशेषत: श्री. हिसके यांनी या नाटकाचं दिग्‌दर्शन केल्याबद्दल त्यांना बक्षीस-समारंभाच्या वेळी मामलेदारांच्या हस्ते एक नटराजाची मूर्ती देऊन त्यांचा गौरव करण्यात आला होता.

एवढंच काय पण रांजणगावच्या या विवेकानंद विद्यालयाचं नाव नुसत्या राहुरी तालुक्यातच नव्हे तर सर्व नगर जिल्ह्यात जे सर्वांच्या स्मरणात राहिलं होतं, त्याचं कारणही 'नकटा नवरा नसावा' हेच नाटक होय. कारण राहुरी तालुक्यात

झालेल्या नाटकांच्या चढाओढीत याच नाटकाचा पहिला नंबर आला होता. आणि मागाहून नगरला सर्व जिल्ह्यातल्या झालेल्या नाटकांच्या चढाओढीतही याच नाटकाला पहिला क्रमांक मिळाला होता. म्हणून हिसके शिक्षकांना स्वर्ग दोन बोटं उरल्यास आश्चर्य नाही. अशा तऱ्हेनं ज्या शाळेनं सर्व नगर जिल्ह्यात प्रथम स्थान मिळवलं त्या शाळेतल्या विद्यार्थ्यांचा एक ग्रूप फोटो काढला गेल्यास सर्व विद्यार्थ्यांना त्याचं स्मरण राहील, असं सर्व विद्यार्थ्यांना वाटत होतं. परंतु पैशांच्या अभावी मुख्याध्यापक या गोष्टीला तयार होईनात. तेव्हा नाटकाचे दिग्दर्शक श्री. हिसके यांनी असं सुचवलं की ग्रूप फोटोची प्रत घेण्यासाठी निदान साठ विद्यार्थी तयार झाल्यास प्रत्येक विद्यार्थ्यास तीन रुपये या प्रमाणं एकशें ऐंशी रुपये गोळा होतील. निदान इतके विद्यार्थी तरी ग्रूप फोटो घ्यायला तयार होतील असा अदमास होता. आणि मग नगरहून फेगडे फोटोग्राफरचा येण्याजाण्याचा खर्च आपल्याला देता येईल. तसंच त्या फोटोच्या इतक्या प्रतीही आपल्याला मिळू शकतील. ही गोष्ट शिक्षकांना पटली. बाकीच्या शिक्षकांनी हेडमास्तरांनाही पटविली; आणि म्हणूनच मग वरीलप्रमाणे सूचना प्रत्येक वर्गातून फिरविण्यात आली.

त्याप्रमाणं ठरलेल्या साठ विद्यार्थ्यांनी प्रत्येकी तीन रुपये या प्रमाणं पैसे जमा केले. एकूण एकशेऐंशी रुपये हिसक्यांच्या हातात पडले. आणि मग सौ. हौसाबाई आणि त्यांचे भ्रतार श्री. हिसके यांच्या अती नीच कारस्थानामुळं एका महा भयंकर नाटकाला सुरुवात झाली. त्या शाळेतल्या इवल्या इवल्या कोवळ्या जीवांना काय कल्पना की त्यांना शिकवणाऱ्यांच्या पैकीच हे दोघे जण केसानं गळा कापणारे होते.

स्त्रीला काय, पुरुषाला काय, एखाद्या जातीला काय, एखाद्या धर्मातल्या लोकांना काय किंवा एखाद्या राष्ट्रातल्या लोकांना काय जेव्हा दुर्बुद्धी होते, तेव्हा त्याचे फार दूरगामी परिणाम होतात. एका जातीच्या लोकांनी दुसऱ्या जातीच्या लोकांचा द्वेष करणं, एका जातीच्या लोकांनी दुसऱ्या जातीच्या लोकांना हीन लेखणं, पाण्यात पाहणं, मत्सरग्रस्त होऊन सूड उगवणं, कुठल्याही लोभानं दुसऱ्याचा विश्वासघात करणं किंवा सर्वच्या सर्व आयुष्य आळसात घालवणं या सर्व गोष्टी दुर्बुद्धी झाली की आपल्या हातून घडतात. म्हणून पुष्कळ विचाराअंती माझं असं ठाम मत झालं आहे की, दुसरा कुणी आपल्या द्वेष करीत असला, मत्सर करीत असला किंवा आपल्याला तुच्छ लेखीत असला तरी आपण त्याचा द्वेष करू नये. द्वेषानं द्वेष वाढताच जातो. म्हणूनच संत तुकाराम महाराज म्हणतात, "कुणाही जिवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥"

तसंच आपल्याला कोणत्याही परिस्थितीत दुर्बुद्धी होऊ नये म्हणून आपण ईश्वरावर विश्वास ठेवून त्याची मनोभावानं प्रार्थना करायला पाहिजे. हे सर्व लक्षात

घेऊनच संतशिरोमणी तुकाराम महाराज म्हणतात,

"दुर्बुद्धी ते मना । कदा नुपजो नारायणा ।
आता मज ऐसे करी । तुझे पाय चित्ती धरी ।।
उपजला भावो । तुझ्या कृपे सिद्धी जावो ।
तुका म्हणे आता । लाभ नाही या परता ।। "

आता या रांजणगावच्या विवेकानंद विद्यालयात कोणत्या महा भयंकर नाटकाला सुरुवात झाली ते सांगतो.

याच विद्यालयात मंजुळा मराठे नावाची एक मुलगी शिकत होती. 'नकटा नवरा नसावा' या नाटकांत काम करण्यासाठी फक्त वरच्या वर्गातल्या विद्यार्थ्यांनाच निवडतील असं तिनं कुणाच्यातरी तोंडून ऐकलं होतं. परंतु नाटकात काम करायची तिची फारच इच्छा होती. कारण जन्माला यावं आणि नाटकात काम करावं असं तिला वाटत होतं. श्रीमती हौशाबाई या मंजुळाच्या वर्गशिक्षिका होत्या. श्री. हिसके यांच्या या धर्मपत्नी असल्यानं यांना काही सांगितल्यास श्री. हिसके ऐकतील असं मंजुळाला वाटत होतं. म्हणून जेव्हा "ज्यांना नाटकांत काम करायचं आहे त्यांनी आज शाळा सुटल्यावर वाचनालयाशेजारच्या ड्रील शिक्षकांच्या खोलीत जमावं" ही नोटीस वर्गात वाचून दाखविण्यात आली तेव्हा मंजुळाला खूपच खुशी झाली. ही नोटीस ऐकल्यापासून बाईंच्या शिकवण्याकडे तिचं बिलकूल लक्ष नव्हतं. म्हणून वर्ग केव्हा सुटतो आणि बाईंच्या बरोबर आपण केव्हा बोलतो असं तिला झालं होतं. त्याप्रमाणं वर्ग सुटताच मंजुळा हौशाबाईंच्या जवळ गेली आणि म्हणाली,

"बाई! मला पण नाटकात काम करायचं आहे. पण मी तर ऐकलं की, सर तर फक्त वरच्या वर्गातल्या मुलामुलींनाच निवडतात. म्हणून मी म्हणते की, तुम्ही सांगाल तर मला नाटकात काम करायला मिळेल!"

"बरं बरं पाहीन!" असं हौशाबाईंनी मंजुळाला उत्तर दिलं होतं.

त्या दिवशी रात्री झोपताना 'हौशाबाई सांगतील की सांगणार नाहीत [illegible] आणि समजा हौशाबाईंनी सांगितलं तर श्री. हिसके सर त्यांच ऐकतील क[illegible] नाही?' असा विचार मंजुळाच्या मनात बराच वेळ रेंगाळत राहिला होता. [illegible]

तेव्हा तिनं तिच्या मनाची समजूत घातली होती की 'हिसके सर का न[illegible] ऐकणार? कितीही झालं तरी हौशाबाई त्यांच्या पत्नी आहेत. मग ते त्यां[illegible], पत्नीचं नाही ऐकणार वाटतं? मला तर वाटतं की ऐकतील, जरूर ऐक[illegible] नक्कीच ऐकतील!' नंतर

दुसऱ्या दिवशी सबंध दिवसभर 'हौशाबाईंना आता विचारू का [illegible] विचारू?' हाच विचार मंजुळाच्या मनात घोळत होता. 'समजा आता [illegible] आपण असताना आपण विचारलं तर? उगीच रागावतील बिगावतील! म्हण[illegible]

वर्ग सुटल्यावरच विचारू झालं.' असं ठरवून मंजुळानं मग शेवटी शाळा सुटल्यावरच विचारलं,

"बाई ! सांगितलं का तुम्ही हिसके सरांना ?"

"अग ! मी विसरलेच ! आज सांगेन !"

हे उत्तर ऐकून हिरमुसल्या तोंडानं मंजुळाला घरी परत जावं लागलं. ती स्पष्ट बोलू शकली नाही. परंतु मंजुळा मनातल्या मनात म्हणत होती,

"बाई ! अहो बाई ! मी तुम्हाला हात जोडून सांगते की तुम्ही हिसके सरांना म्हणजे तुमच्या यजमानांना निदान उद्या तरी सांगा की तुम्ही आमच्या वर्गातल्या मंजुळाला सुद्धा नाटकात घ्या. मग मला त्यांनी अगदी थोडसं काम दिलं तरी चालेल. म्हणजे यंदा मला जरासं जरी काम मिळालं तरी पुढच्या वर्षी सांगता येईल की, सर ! मी गेल्या वर्षी नाटकात काम केलं आहे. मला नाटकातल्या कामाची सवय आहे. स्टेजवर काम करताना मला मुळीच घाबरल्यासारखं होत नाही. बरं ! मला अमुकच काम द्या आणि तमुकच काम द्या असा माझा आग्रह नाही. माझं म्हणणं फक्त एवढंच की, या वर्षी तुम्ही थोडसं म्हणजे अगदी लहानसं काम दिलं तरी चालेल. अहो, बाई ! मला दासीचं काम दिलं तरी मी ते आनंदानं करायला तयार आहे !"

"पण हे सगळं घडून येण्यासाठी आपल्या हौशाबाईंनी त्यांच्या यजमानांना म्हणजे श्री. हिसके साहेबांना आठवण करून द्यायला हवी !"

"अग ! साध्या ड्रील शिक्षकांना का साहेब म्हणतात ?"

"हो ! म्हणतात ! आणि नसतील म्हणत तर आम्ही म्हटलं म्हणून काय बिघडलं ?"

"उद्या हौशाबाईंना विचारलं तर त्या काय म्हणतील ?"

"म्हणतील की अग मंजुळा ! मी सांगितलं बरं का तुझं नाव ! ते अगोदर नाहीच म्हणत होते. पण मी त्यांना गळ घातली की, तुम्हाला घ्यायलाच पाहिजे ! तेव्हा मग त्यांना होकार देण्याशिवाय काही गत्यंतरच नव्हतं ! आजपासून तू संध्याकाळी शाळा सुटल्यावर नाटकाची प्रॅक्टिस करायला थांबत जा. थांबशील ना ?"

मग आपण उत्तर देऊ,

"मी का नाही थांबणार ? तुम्ही माझ्यासाठी एवढी खटपट केली, ती का उगीच वाटतं ? खरंच बाई ! कित्ती कित्ती चांगल्या आहात तुम्ही !" हे ऐकून बाई म्हणतील,

"ते तर ठीक आहे ग ! पण नाटकात चांगलं काम करून दाखव म्हणजे झालं ! आणि हे लक्षात ठेव बर का मंजुळा ! की नाटकातल्या कामासाठी मुख्य

म्हणजे धिटाई असली पाहिजे. कारण धीटपणा नसेल तर काहीच नाही ! "

"मी कसं काम करून दाखवते ते तुम्ही पहा तर खरं बाई ! माझं काम पाहून तुम्ही म्हणाल की बरंच झालं आपण मंजुळाची निवड करायला लावली तर ! "

असा विचार करताकरता मंजुळाला त्या दिवशी रात्री बराच वेळ झोप लागली नाही. आणि जेव्हा झोप लागली तेव्हा तिला कोणतं स्वप्न पडलं हे आपण कसं सांगावं ?

शाळेत गेल्यावर पुन्हा एकदा मंजुळानं बाईंना विचारलं,

"का बाई ! सांगितलं का तुम्ही ? "

तेव्हा हौसाबाईंनी निर्विकार मनानं उत्तर दिलं,

"अग ! खरंच ! मी विसरलेच ग सांगायला ! "

हे ऐकून मंजुळाच्या नाजुक नि हळूवार मनावर मण-दीडमण वजनाचा दगड जोरानं आदळल्यासारखं झालं. काय करावं आणि काय नाही असं तिला झालं ! क्षणभर तिच्या मनात असाही विचार आला की, आपण स्वतःच आताच्या आता हिसके सरांना जाऊन भेटावं. परंतु ती तसं करू शकली नाही.

कारण एके दिवशी हौसाबाई शाळेत आल्या नव्हत्या. म्हणून हिसके शिक्षक शिकवायला आले होते. त्यांनी एकूणतीस एक एकूणतीसचा घडा दहादा लिहायला सांगितला. तेव्हा एका मुलानं एकूणतीसच्या ऐवजी एकोणीसचा घडा लिहिला. म्हणून हिसके सरांनी त्या मुलाला इतक्या जोरात मारलं की त्या मुलानं वर्गातच मुतून दिलं. अशा तऱ्हेनं हिसके शिक्षकांचा स्वभाव मोठा रागीट म्हणून प्रसिद्ध असल्यानं मंजुळा त्यांना भेटायला गेली नाही. परंतु मनांतल्या मनात तिला फारच हिरमुसल्यासारखं झालं ! आणि मग तिनं आपल्या अंतःकरणात असं समाधान मानून घेतलं की या वर्षी नाही तर नाही; पण पुढच्या वर्षी तरी आपल्याला नाटकात काम करायला मिळेल.

ज्या दिवशी 'नकटा नवरा नसावा' हे नाटक विवेकानंद विद्यालयाच्या रंगभूमीवर चालू होतं तेव्हा प्रेक्षकांच्यापैकी सर्वात जास्त एकाग्रतेनं ते नाटक कुणी पाहिलं असेल तर ते मंजुळानं. त्या नाटकातलं मुख्य स्त्री पात्र कशा तऱ्हेनं काम करीत आहे, हे पाहून निदान तेवढा तरी अभिनय आपल्याला आला पाहिजे असं मनाशी ठरवून त्या नाटकातली मुख्य स्त्री भूमिका जणू काही आपणच करीत आहोत असं समजून मंजुळानं घरातल्या घरात कितीदा तरी त्या स्त्री पात्राच्या तोंडचा मजकूर म्हटला असेल त्याला काही गणतीच नाही. पुष्कळदा मैनाबाई हे पाहून म्हणायच्या,

"अग मंजुळा ! तू हे काय करतेस ? "

" अग आई ! हा मी अभिनय करते. नाटकात काम करायचं तर त्याचा सराव असावा लागतो ! "

' पण तू तर स्वतःच सारखी बोलत असतेस ? "

" मग रंगभूमीवर काय पुस्तक हातात घेऊन वाचतात वाटतं ? अग ! प्रत्येक पात्रानं आपापलं काम तोंडपाठ करायचं असतं. आणि अभिनय करून जणू काही ते काम करणारे आपणच आहोत असं प्रेक्षकांना भासवायचं असतं. म्हणून यासाठी पाठांतराची फार आवश्यकता असते. त्या मंदाकिनीनं पाठ करायची टाळाटाळ केली तर त्या आमच्या हिसके शिक्षकांनी तिला नाटकातून काढून टाकलं. मी दररोजच्या दररोज नाटकाची तालीम होत असताना थोडा वेळ का होईना पण तिथं जाऊन पाहून येतेच. म्हणून नाटकात पाठांतरालाही फार महत्त्व आहे. "

" तुझंही काम आहे वाटतं नाटकात ? "

" नाही ! यंदा नाही ! परंतु पुढच्या वर्षी मी नाटकात काम करणार आहे ! " असं म्हणून पाठ झालेला मजकूर अभिनय करता करता मंजुळा अशा तऱ्हेनं बोलायची की पाहणाराचं लक्ष तिनं वेधून घ्यावं. जणू काही आपला जन्म नाटकात काम करण्यासाठीच झाला आहे असं ती समजत होती. नव्हे रात्रंदिवस ती त्याच धुंदीत असायची !

मंजुळाचे वडील मोतीरामजी एक शेतमजूर होते. ते गावातल्या चिंधू पाटलाच्या घरी सालानं काम करीत. म्हणजे वर्षभर नोकरी केली तर इतके पैसे द्यायचे आणि इतकं धान्य द्यायचं असं जे ठरवतात त्याला सालदारी करणं असं म्हणतात. त्याबद्दल त्यांना वर्षाला पाचशे रुपये मिळत. या नगद पैशांच्या ऐवजी ज्वारी, तुरीची डाळ, मूग, चवळचा, उडीद असं जे धान्य लागेल ते मिळण्याची सोय होती. चिंधू पाटलांच्या घरी इमानंइतबारानं अशी सालदारी करणाऱ्यात मोतीरामजींचा सर्व नोकरांत वरचा नंबर होता. म्हणून चिंधू पाटलांचा त्यांच्यावर पूर्ण भरवसा होता. गेल्या कित्येक वर्षांपासून ते याच पाटलाच्या घरी सालदारी करीत असल्यानं चिंधू पाटील मोतीरामजींना त्यांचा उजवा हात समजत. पेरणी करायची तर कोणत्या शेतात कपाशी, कोणत्या शेतात ज्वारी, कोणत्या शेतात भुईमूग आणि कोणत्या शेतात बाजरी पेरायची हे चिंधू पाटील मोतीरामजींनाच विचारीत. तीच गोष्ट निंदणी, कोळपणी आणि लावणी करतानाही होई.

या चिंधू पाटलांच्याच घरी मैनाबाईही कामाला जात असत. शेतामध्ये पेरणीचं, निंदायचं, लावणी करायचं म्हणजे ज्वारी किंवा बाजरी कापायचं असं जे जे म्हणून काम मिळेल ते ते काम करण्यासाठी मैनाबाई सतत तत्पर असत. मोतीरामजी आणि मैनाबाई यांच्या घरात गरिबी ठाण मारून बसली होती. परंतु

या दोघांनाही आळस म्हणून बिलकूल ठाऊक नव्हता. त्यामुळं नवऱ्याच्या साल-दारीचं पीठ आणि बायकोच्या मजुरीचं मीठ मिसळून या नवराबायकोचा संसार सुखानं चालू होता.

परंतु या त्यांच्या सुखात एका गोष्टीची मोठी कमतरता होती. लग्न झाल्या-नंतर पहिल्या काही वर्षांतच आपल्याला अपत्य व्हावं असं त्या पतीपत्नीलाच काय पण नातेवाईकांना आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांनाही वाटतं. मोतीरामजी आणि मैनाबाई यांचं लग्न होऊन एक नाही दोन नाही चांगली पंधरा वर्षं लोटलीत परंतु त्यांना मूलबाळ झालं नाही. ही गोष्ट त्या दोघांच्याही मनाला सारखी झोंबत होती. विशेषतः ' आपली ओटी रिकामीच ' ही गोष्ट मैनाबाईंना रात्रंदिवस बेचैन करीत असे. तशी ती साध्वी देवधर्म पाळणारी होती. सोमवारचं व्रत करीत होती. दर पंधरा दिवसांनी येणारी एकादशी आणि शिवाय आषाढी व कार्तिकी एकादशी तिनं कधी केली नाही असं कधीच घडलं नाही. तशातच कुणी सांगितलं की तुम्ही असं असं व्रत करा त्याचं तुम्हाला असं असं फळ मिळेल. तर लागलीच मैनाबाईंनी ते व्रत सुरू केलंच म्हणून समजा. कुणी सांगितलं की तुम्ही सप्तशृंगीच्या दर्शनाला जा आणि ' आम्ही अमुक अमुक देऊ पण हे जगदंबे तू असं असं घडू दे ' असं सांगा म्हणजे तुमच्या मनोकामना पूर्ण होतील. हे ऐकताच त्या सप्तशृंगीच्या दर्शनाला गेल्याच म्हणून समजा. या अशा तऱ्हेनं केलेले नवस फेडण्यासाठी मैनाबाईंनी किती त्रास सहन केला याला काही सीमाच नाही. आणि पैसा सुद्धा खर्च करण्यात कधी मागंपुढं पाहिलं नाही.

ठरविलेल्या नियमाप्रमाणं मैनाबाई सप्तशृंगीच्या दर्शनाला सात वर्षं लागो-पाठ गेल्या. त्या केलेल्या तपश्चर्येचं फळ जणू काही त्यांना प्राप्त झालं आणि मैना-बाईंना दिवस लोटले. त्यांचा आनंद गगनात मावेना. आता ' आपली ओटी रिकामी ' असं कुणी आपल्याला म्हणणार नाही याची त्यांना मोठी खुशी झाली. आपल्याला होणारं अपत्य मोठं झाल्यावर ' आई ! आई ! ' म्हणून हाक मारील या सुखद विचारानं मैनाबाईंच्या अंतःकरणात सुखातिशयाच्या लहरी उठत आणि त्यामुळं होणारा आनंद त्यांच्या सर्वांगावर उमटलेला दिसून येई. मोठ्या पूर्वपुण्याईनं अखेरीस आई होण्याचं भाग्य आपल्याला लाभणार आहे या भविष्यात घडणाऱ्या सुखस्वप्नात मैनाबाईंचा दिवसातला किती वेळ जाई हे सांगता येणं कठिण ! रात्रं-दिवस त्यांनी याच सुखाचा ध्यास धरला होता असंच का म्हणाना ! आणि ते सुख आपण अनुभवणार या खुशीत मैनाबाईंचे गर्भारपणाचे नऊ महिने आणि नऊ दिवस कधी संपले हे त्यांचं त्यांनाच कळलं नाही.

मैनाबाई प्रसूत होऊन त्यांना कन्यारत्न प्राप्त झालं. घरात आनंद मावेनासा झाला. अवती भोवतीच्या सर्वांना आणि परिचित मित्रांना साखर वाटण्यात आली

आणि मग योग्य दिवशी मुहूर्त पाहून मैनाबाईच्या मुलीचं नाव मंजुळा असं ठेवण्यात आलं. दिवसेंदिवस मंजुळा वाढू लागली. मम् मम् मम् मम् अशा तिच्या खडी-साखरेहूनही गोड बोबड्या बोलांना ऐकण्यासाठी मैनाबाई आणि मोतीरामजी अधिकाधिक उत्सुक होऊ लागले. तिचं मंजुळा हेच नाव सर्वांना आवडलं. किंबहुना मुलगा झाला तर हे नाव आणि मुलगी झाली तर ते नाव हे मैनाबाईंनी अगोदरच ठरवून ठेवलं होतं. त्यामुळं मंजुळा मैनाबाईंना जीव की प्राण वाटल्यास नवल ते काय !

तसंच मोतीरामजींनाही आपण 'बाबा' झालोत याचं मोठं भूषण वाटू लागलं. मैनाबाईंना दिवस लोटल्यापासूनच त्यांचं शेतात कामाला जाणं मोती-रामजींनी बंद केलं होतं. तसंच त्यांनी चिंधू पाटलाच्या घरून एक दुभती गाय मुद्दाम विकत घेऊन आपल्या घरासमोर बांधायला सुरुवात केली होती. आपल्या घरी दुभती गाय आहे किंवा दुभती म्हैस आहे याचं भूषण शेतकऱ्याला किती वाटतं हे प्रत्यक्ष त्यांनाच विचारून पाहा ! मोतीरामजी चिंधू पाटलाच्या घरी जवळजवळ सकाळी सात ते संध्याकाळी सात वाजेपर्यंत म्हणजे जवळजवळ बारा तास काम करीत होते. पण तरीही त्यांना थकवा म्हणून बिलकूल वाटत नव्हता. शेतात कामाला गेले तरी त्यांचं लक्ष मैनाबाईकडे आणि लहानग्या मंजुळाकडे लागलेलं असायचं. म्हणून काहीतरी निमित्त काढून ते मधूनच घरी येऊन पत्नीला व लाडक्या लेकीला भेटून जायचे. मंजुळाला जवळ घेऊन पटापट पटापट तिचे मुके घ्यायचे. अशा तऱ्हेनं त्यांचे दिवस मोठ्या सुखासमाधानात जात होते आणि मंजुळा हळूहळू मोठी होत होती.

असं करता करता मंजुळा तीन वर्षांची झाली. परंतु तिच्या पाठीवर मैनाबाईंना दिवस लोटले नाहीत. पण त्याचं त्यांना काही वाटलं नाही. सप्तशृंगादेवीनं आपल्याला जी मंजुळा दिली आहे तीच आयुष्यवान होवो म्हणजे झालं अशी ती अंतः-करणातल्या अंतःकरणात त्या देवतेची प्रार्थना करीत असे. ईश्वरानं एकदा तरी आपली ओटी भरली आणि स्त्रीच्या जन्माला आल्याचं आपलं सार्थक झालं असं मानून ती देवाला धन्यवाद देत असे. याच कारणामुळं चतुर्थीच्या चंद्राप्रमाणं जश-जशी मंजुळा वाढत गेली तसतसा मैनाबाईंना अधिकाधिक आनंद आणि अभिमान वाटू लागला. आपल्या या नवसासायासानं झालेल्या लाडक्या लेकीला काही कमी पडू नये म्हणून मोतीरामजी आणि मैनाबाई जिवापाड मेहनत करीत असत.

जेवढी मिळकत असेल तिच्यातूनच थोडंफार मागं जपून ठेवायचं म्हणजे अडीअडचणीच्या वेळी किंवा सुखदुःखाला उपयोगी पडेल असा त्या दोघंही नवराबायकोचा स्वभाव होता. त्यामुळंच सालदारी करणाऱ्या मोतीरामजींचं स्वतःचं घर होतं. त्या घरावर पत्रे होते. घरात सामानसुमान ठेवायला पेट्या होत्या आणि

निरनिराळ्या तऱ्हेचं धान्य ठेवायला कोठ्या होत्या. तसंच संसाराला लागणारं सर्व सामान घेऊन ते जिथल्यातिथं घासून पुसून आणि व्यवस्थित ठेवल्यामुळं मैनाबाईचं घर कसं भरलेलं दिसायचं. तशातच आता मंजुळा चारपाच वर्षांची होताच तिच्यासाठी ही ताटली जेवायला विकत घे आणि हा प्याला पाणी प्यायला विकत घे अशा एकेक वस्तू घरात येऊ लागल्या होत्या. एवढंच काय पण मंजुळाच्या भावी संसाराला लागणारं सामानही हळूहळू विकत घेऊन ठेवायला मैनाबाईंनी सुरुवात केली होती.

कुंकवाची डबी आणि वेणीफणी करायचं सामान ठेवण्यासाठी जुन्या पद्धतीची लाकडाची लहानशी पेटी मैनाबाईंच्या घरी फार वर्षांपासूनच होती. परंतु मंजुळा मोठी होऊन शाळेत जाऊ लागताच भिंतीवर टांगलेला मोठा लांब आरसा व त्याला खालच्या बाजूला जोडून असलेली लाकडाची लहान पेटी मंजुळासाठी मैनाबाईंनी मनमाडहून भावाकडून मुद्दाम मागवून घेतली होती.

" अग आई ! त्या मंगलाच्या घरी अन् त्या सुनेत्राच्या घरी तर त्यांच्यासाठी जेवायला बसायला लहान पाट आहे. अन् शिवाय बाहुली आणि त्या बाहुलीचे कपडे व दागिने ठेवायला एक लहानशी पेटीही आहे ! मग आपल्या घरी कधी घेशील ? का ग आई ! आपल्या घरी कधी घेशील सांग ना ? "

असं नुसतं मंजुळा बोलायचाच अवकाश की मैनाबाईंनी सांगितलंच ते आपल्या नवऱ्याला.

" अहो ! आपल्या मंजुळाकडे काही आहे का तुमचं लक्ष ? त्या चिंधू पाटलांच्या घरचं काम काम अन् काम ! कामाला काही मर्यादाच नाही. एवढी मंजुळा एकुलती एक मुलगी ! तिनं दुपारी रडून रडून किती आकांत केला. म्हणे की मला त्या मंगलासारखी अन् त्या सुनेत्रासारखी बाहुलीचे कपडे अन् दागिने ठेवायला लहानशी पेटी पाहिजे ! तेव्हा मी तिला समजावून सांगितलं की तुझे बाबा आल्यावर त्यांना सांग संध्याकाळी ! "

असं म्हणताच मंजुळाच्या लहानशा मऊमऊ हातांचा विळखा पडलाच मोतीरामजींच्या गळ्याभोवती ! मग मंजुळाच्या गोडगोड गालांचे मुके घेता घेता मोतीरामजी म्हणत,

" अग ! हो. आताच सांगतो त्या दगडू सुताराला की उद्याच्या उद्या एक लहानशी पेटी बनवून दे. अन् त्यानं बनवून दिली नाही तर आपण बाजारातून छान पैकी लोखंडाची पेटी घेऊन येऊ. बस्स ! झालं तुझं समाधान ? "

" नाही ! आताच चला विकत घ्यायला ! "

असा मंजुळानं हट्ट करताच आणि मैनाबाईंचाही दुजोरा मिळताच मोतीरामजी लाडक्या लेकीला कडेवर घेऊन त्या दिवशी संध्याकाळीच बाजारात गेले आणि बाजारातून त्यांनी साडेसात रुपयांची निळ्या रंगाची आणि नक्षी केलेली लोखंडाची पेटी तेव्हाच्या तेव्हा मंजुळासाठी विकत घेऊन आले. तसंच मंजुळाला कळू न देता तिचा पुढील आयुष्यातला संसार सुखाचा व्हावा म्हणून मैनाबाई कधीकधी स्वतःच आणि कधीकधी नवऱ्याला सांगून अनेक वस्तू खरेदी करीत होत्या. 'नाही तरी आपल्याला मंजुळाशिवाय कोण आहे? आणि आपणच जर सर्वस्वी तिचे आहोत तर तिच्या सुखासाठी या वस्तू तिला आपणच विकत घेऊन द्यायला काय हरकत आहे?' असा लांबचा पोक्त विचार करून मैनाबाई मंजुळाच्या भावी सुखाची सुखस्वप्नं रंगविण्यात दंग होऊन जायच्या. पण हाय हाय! मंजुळाच्या दैवात लग्नाचं आणि संसाराचं सुख नव्हतं. कारण......

कारण असं की जेव्हा "मंगळवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी चार वाजता आपल्या विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांचा आणि विद्यार्थिनींचा शिक्षकांच्यासह एक ग्रूप फोटो काढला जाणार आहे. सर्वांनी बरोबर चार वाजता वाचनालयासमोरील मैदानावर एकत्रित जमावं. ज्यांना या ग्रूप फोटोची प्रत हवी असेल त्यांनी तीन रुपये कवायत शिक्षक श्री. हिसके यांच्याजवळ सोमवार दिनांक २५ सप्टेंबर पर्यंत दिले पाहिजेत." ही नोटीस वर्गात वाचून दाखविण्यात आली होती, तेव्हाच ग्रूप फोटोची प्रत विकत घ्यायचं मंजुळानं ठरवलं होतं आणि बाईंच्याजवळ स्वतःचं नावही लिहून दिलं होतं. तसंच सोमवारला मंजुळानं तीन रुपये हिसके शिक्षकांच्याजवळ जमाही केले होते. म्हणून मंगळवारी शाळेतल्या सर्व विद्यार्थ्यांना फोटोसाठी शाळेत हजर होता यावं यास्तव दुपारी दोन वाजता मुख्याध्यापकांच्या लेखी परवानगीनं सुट्टी देण्यात आली होती. म्हणून पाटीदप्तर घेऊन लगबगीनं मंजुळा मंगळवारी दुपारी अडीच वाजता घरी आली. पण पाहते तर दाराला कुलूप!

मंजुळाची आई चिंधू पाटलाच्या बायकोबरोबर राहुरीला गेली होती. चिंधू पाटलाच्या बायकोला कुठंही गावी जायचं असलं की बरोबर सोबत लागत असे. अशा वेळी त्यांना हटकून मैनाबाईंची आठवण होई. कुठंही परगावी गेल्यावर मैनाबाई चिंधू पाटलाच्या बायकोच्या सर्व वस्तू विश्वासानं सांभाळून ठेवीत हे तर खरंच पण शिवाय वेळो वेळी "असं करू नका असं करा! असं केलं तर असं होईल. आणि असं न केलं तर असं नुकसान होईल." असा सल्लाही देत असत. कुठल्याही गावाला जाऊन एक दिवसाचा जरी मुक्काम करायचा असला तरी मैनाबाई मंजुळा झाल्यापासून परगावी जायचा कंटाळा करीत. आणि समजा गावी

जावंच लागलं तर मंजुळाला बरोबर तरी घेऊन जात, किंवा मंजुळा शाळेतून परत यायच्या पूर्वी मैनाबाई घरी हजर असत.

रांजणगावाहून राहुरी पाच मैलांवर असल्यानं आणि चिधू पाटलाची बैल-जोडी पळण्यात पटाईत असल्यानं एक तास जायला, दोन तास सामान खरेदी करायला आणि एक तास परत यायला इतकाच म्हणजे चार तासांचाच प्रश्न होता. म्हणजे दुपारी अकराला रांजणगावाहून निघाल्यास दुपारी तीन वाजता आपण रांजणगावला परत येऊ असा मैनाबाईंचा हिशोब होता. तशी रांजणगाव ते राहुरी अशी बस सर्व्हिसही होती. परंतु ऐन वेळी एस्. टी. ची बस मिळते न मिळते ! म्हणून आपली स्वतःची बैलगाडी बरी !

मोतीरामजी चिधू पाटलाच्या बायकोला जिजी म्हणत. म्हणून चिधू पाटलाची बायको मैनाबाईला वहिनी म्हणत. त्यामुळं नंदेनं आग्रह केल्यामुळं मैनाबाई मंगळवारी राहुरीला जायला तयार झाल्या. परंतु मैनाबाई त्या मंगळवारी तीन वाजताच काय पण चार वाजेपर्यंत रांजणगावला परत येऊ शकल्या नाहीत.

म्हणून दुपारी दोन वाजता घराला कुलूप पाहून मंजुळानं शेजारच्या बाई-कडे ठेवलेली घराची किल्ली घेऊन दार उघडलं. परंतु फोटोसाठी कोणते कपडे घालावेत आणि कोणते दागिने घालावेत हे तिचं तिलाच काही ठरविता येईना. म्हणून ती सारखी घरातून बाहेर आणि बाहेरून घरात असं करीत होती. शेवटी राहुरी गावाहून येणाऱ्या सडकेच्या बाजूनं लांबूनच तिला बैलगाडीचा आवाज ऐकू आला. तो चिधू पाटलाच्या बैलगाडीचाच आवाज असला पाहिजे असा मंजुळानं कयास केला. तिला मोठी खुशी झाली. आणि तिनं जवळ आलेल्या बैलगाडीला पाहिलं तेव्हा ती चिधू पाटलाचीच गाडी होती.

मैनाबाई मोठ्या लगबगीनं बैलगाडीतून उतरल्या. आणि "हे बघ मी काय काय आणलं आहे तुझ्यासाठी !" असं मंजुळाला म्हणाल्या. परंतु मंजुळाचा नेहमीचा हसरा चेहरा त्यांना प्रसन्न दिसला नाही. मंजुळा म्हणाली,

"अग ! मी तुझी केव्हापासून वाट पाहते आहे ? आज आमच्या शाळेत सर्वांचा ग्रूप फोटो काढला जाणार आहे. फोटोची एक प्रत मलाही मिळावी म्हणून मी कालच तीन रुपये जमा केले आहेत. ते पैसे मी तुझ्या जवळूनच तर नेले होते !"

"त्या वन्संनी आग्रह केला म्हणून मी गेले राहुरीला. आणि तीन वाजायच्या आत मी परत येईन अशी खात्री होती मला. पण मेलं सामान खरेदी करण्याच्या धांदलीत वेळ लागला !"

"पण नेहमी तर तू राहुरीहून दुपारी तीनच्या आत परत येतेस !"

" अग मंजुळा ! त्याचं असं झालं . . . . . ! "

" काही सांगू नकोस मला तुझं कारण. अगोदर मला तो माझा नवीन रेशमी फ्रॉक काढून दे ! "

" तुला कुठं लग्नाला का जायचं आहे एवढा भारी किंमतीचा फ्रॉक घालून ?"

" अग ! फोटोला जाणं म्हणजे लग्नालाच जाणं नाही वाटतं ! अन् माझ्य कानातल्या त्या सोन्याच्या एरिंग्जही काढून दे ! अन् का ग आई ! मी माझ्या सोन्याच्या बांगड्या नि एकदाणी पण घालून जाऊ का ? "

" जा ना घालून ! काय हरकत आहे ? त्या रेशमी फ्रॉकवर तर हे सगळे दागिने घातलेच पाहिजेत ! "

" मग ती चेन पण दे न ग आई ! "

" हो ग देते ! किती घाई करतेस तू मंजुळा ? "

" चार इथंच वाजायला आलेत. आणि मला म्हणते की मी घाई करते ! "

मैनाबाईंनी दोन लाकडाच्या नि दोन लोखंडाच्या पेट्या खाली उतरून ठेवल्या. नंतर सर्वांत खालची जड पेटी उघडली. मंजुळासाठी मुद्दाम आताच अगदी अलीकडे तयार केलेले सर्व दागिने तिला घालायला दिले. मंजुळासाठी दोनच सोन्याच्या बांगड्या होत्या. म्हणून मैनाबाईंनी त्यांच्या स्वतःच्याही दोन बांगड्या मंजुळाला मुद्दाम घालायला दिल्या. म्हणजे एकेक तोळ्याची एक या प्रमाणं सोन्याच्या चार बांगड्या, कानातल्या एक तोळ्याच्या दोन एरिंग्ज, गळ्चा-तली दोन तोळ्यांची एकदाणी आणि दोन तोळ्यांची चेन अशा तऱ्हेनं नऊ तोळ्यांचे सोन्याचे दागिने मंजुळानं घातले. त्या रेशमी फ्रॉकवर हे इतके दागिने घातल्यावर मंजुळा खरोखरच चटक चांदणी दिसू लागली. तो रेशमी फ्रॉक, ती गळ्यातली एकदाणी अन् चेन, त्या कानातल्या एरिंग्ज आणि हातातल्या दोनदोन बांगड्या घातल्यामुळं मंजुळा इतकी सुरेख दिसू लागली की आपल्या एकुलत्या एक लाडक्या लेकीला कुणाची नजरबिजर लागू नये म्हणून मैनाबाईंनी तळहाताला आणि तळपायाला काजळ लावलं. पण तरीही मंजुळाला नजर लागायची ती लागलीच !

कारण मंजुळा शाळेत पोचली तेव्हा पाच केव्हाचेच वाजून गेले होते. फोटोचा कार्यक्रम चारालाच उरकून सर्व विद्यार्थी व शिक्षक आपापल्या घरी निघून गेले होते. एकटे हिसके शिक्षकच आपल्या सामानाची आवराआवर करीत होते; आणि त्यांची पत्नी श्रीमती हौशाबाई दारात उभं राहून " आवरा न लौकर ! आवरा न लौकर ! " असं म्हणून नवऱ्याला घरी चलण्याविषयी आग्रह करीत होती.

'आपल्या आवडीचा रेशमी फ्रॉक आपण घातला आहे आणि गळ्यात, कानात नि हातात सोन्याचे दागिने घातल्यामुळं आपण खरोखरच किती सुंदर दिसत आहोत ' या विचारानं मंजुळाचं मन इतकं भारलं गेलं होतं की, आपल्याला शाळेत फोटोसाठी जायला उशीर होतो आहे हे तिच्या लक्षातही आलं नाही.

शाळेत पोचल्यावर वाचनालयाजवळच्या हिसके शिक्षकांच्या खोलीजवळ उभ्या असलेल्या हौशाबाईंना मंजुळानं विचारलं,

"बाई ! फोटो काढून झाला का ?" तेव्हा हौशाबाई म्हणाल्या,

"अग ! शाळेतला फोटो काढून झाला आहे. परंतु आम्ही आमच्या घरी आमचा एक फोटो काढणार आहोत. तेव्हा त्या फोटोग्राफरला तुझाही एक फोटो काढायला सांगू ! आता तू इतका सुंदर फ्रॉक घातला आहेस आणि दागिने घातल्यामुळं तू इतकी सुंदर दिसते आहेस की तुझा फोटो काढलाच पाहिजे."

हे ऐकून मंजुळाला वाटलं आपल्या हौशाबाई आहेतच तशा चांगल्या ! त्यांचं आपल्यावर किती प्रेम आहे ? शाळेतला फोटोचा कार्यक्रम संपला तरी त्यांनी आपल्याला निराश केलं नाही. आपुलकी असल्याशिवाय इतकं कोण कुणासाठी कशाला करील ?

पण मंजुळाला काय माहीत की त्या वेळी हौशाबाईंच्या मनात किती भयंकर कपटाचं कारस्थान रचलं जात होतं ! कारण ती गळ्यातली एकदाणी व चेन घातलेली, कानात एरिंग्ज घातलेली आणि हातात दोन दोन अशा चार बांगड्या घातलेली मंजुळा लांबून दिसताच हौशाबाईंच्या मनात दुर्बुद्धी निर्माण झाली. तिची खात्री झाली की मंजुळाच्या अंगावरील सर्व दागिने सोन्याचेच आहेत. म्हणून तिनं ताबडतोब मंजुळाला जिवंत मारून टाकायचं ठरवलं ! दुरून येणाऱ्या मंजुळाला पाहाताच हौशाबाई नवऱ्याला म्हणाली,

"मी सांगेन तसं कराल ?"

"होय करीन !"

"खा माझी शपथ !"

"शपथ कशाला घ्यायला पाहिजे ?"

"मी म्हणते ना माझी शपथ खा म्हणून !"

हे ऐकून हिसके शिक्षकांनी आपल्या पत्नीची शपथ खाल्ली की तू सांगशील तसं मी करीन ! हे ऐकून हौशाबाईंना बरं वाटलं ! म्हणून हिसक्यांनी विचारलं,

"तू अशी शपथ घ्यायला का लावलीस ?"

"मग सांगेन !"

" का ? "

" कारण आता सांगण्यात काही अर्थ नाही ! तुम्ही आता माझी शपथ खाल्ली आहे, तेव्हा मी सांगेन तसं तुम्हाला वागलं पाहिजे ! "

" अग ! लग्न झाल्यापासून तुझंच तर म्हणणं ऐकतोय मी ! मग आणखी काय पाहिजे ? "

" पण या वेळचा प्रसंग वेगळा आहे ! या वेळी तुम्ही माझं म्हणणं ऐकाल की नाही अशी मला अजून शंका येतेय ! "

" म्हणजे ? नवल आहे तुझ्या या बोलण्याचं ! अग ! मी तुझी शपथ घेऊन पुन्हा एकदा सांगतो की तू जसं म्हणशील त्याप्रमाणं मी वागेन ! "

" पाहा बरं ? "

" पाहा बरं काय पाहा बरं ! मला काय तू लेचापेचा समजतेस की काय की मी दिलेलं वचन पाळणार नाही ? "

" बघू आता; घरी गेल्यावर कसं वागता तर तुम्ही ! "

हौशाबाई, तिचा नवरा हिसके आणि मंजुळा बरोबरच हौशाबाईच्या घरी जायला निघाल्या. हौशाबाईनं घरी गेल्यावर काय काय करायचं हे रस्त्यानं समजावून सांगितलं ! ते ऐकून हिसक्यांच्या अंगावर शहारे आले. ते म्हणाले,

" अग ! ही आपलीच विद्यार्थिनी आहे अन् आपल्यावर विश्वास ठेवून शाळेत आली आहे ! आणि आता आपल्यावर विश्वास ठेवूनच आपल्या घरी येत आहे. अशा वेळी तिचा केसानं गळा कापायचा ? म्हणजे आपल्याला जनाची नाही तर नाही पण निदानं मनाची तरी आहे की नाही ? "

" जनाची तर नाहीच ! आणि आता मनाची पण मुळीच नाही ! मी जसं सागेन तसं वागायचं ! तुम्ही आताच शपथ दिली आहे ! मी सांगते त्याप्रमाणं वागला नाहीत तर मला ताबडतोब मरण येईल याची कल्पना आहे ना तुम्हाला ? "

हिसक्यांनी मान हालवली. पण ती कोणत्या अर्थानं होती कुणास ठाऊक ! त्यांना आपल्या भोवतालची जमीन हादरल्याचा जबरदस्त भास झाला. आता इकडे आड आणि तिकडे विहीर अशी त्यांची अवस्था झाली. मंजुळाच्या अंगावर असलेले दागिने जवळजवळ दीड ते दोन हजार रुपयांचे होते. हौशाबाई नवऱ्याला म्हणाली,

" ही आलेली नामी संधी हातची जाऊ द्यायची नाही ! अन् कुणीही विचारलं तर आम्हाला काही माहीत नाही असं सांगून मोकळं व्हायचं ! आणि कुणाला कळेलच कशाला ? "

"पण आपण हे केल्यावर पुढं कसं करायचं ?"

"म्हणे पुढं कसं करायचं ? पुरुषासारखे पुरुष अन् म्हणे पुढं कसं करायचं ? जे सांगितलं तेवढं तर करा ! मग पुढचंही सांगेन !"

"पण हे तरी कसं करायचं ?" हे ऐकून हौशाबाई नवऱ्याला इतक्या टोचून बोलल्या की......

हौशाबाई, तिचा नवरा आणि मंजुळा हौशाबाईच्या घरी पोचल्या. घरी जाताच हौशाबाईनं मोठ्या शिताफीनं दार लावून घेतलं. लगेच तिनं मंजुळाला खाली बसायला सांगून तिच्या डोळ्यावर एकदम कापड टाकून तिचं तोंड दाबून धरलं आणि नवऱ्याला मंजुळाच्या गळ्याला दोरीनं गळफास लावायला सांगितलं. हिसक्यांनी मंजुळाच्या गळ्याला दोरी आवळली. दोन मिनिटात मंजुळा गतप्राण झाली.

आपला नवरा आपल्या म्हणण्याप्रमाणं वागल्यामुळं हौशाबाईला कधी झाला नव्हता असा असुरी आनंद झाला. तिनं नवऱ्याला डाव्या बाजूच्या दरवाज्याजवळ खड्डा खोदायचा हुकूम केला. तिचा नवरा त्याप्रमाणं उद्योगाला लागला. पण त्याला दरदरून घाम सुटला होता. त्याची बोबडी वळली होती. खड्डा खोदता-खोदता 'आपणच इथं गाडले जाऊ तर बरं होईल' हा विचार हिसक्यांच्या मनात वारंवार आला होता. नवऱ्याला तिकडे उद्योगाला लावून हौशाबाईंनी मंजुळाच्या अंगावरचे सर्व दागिने काढले आणि मग हौशाबाई म्हणाली,

"अहो ! जरा लौकर लौकर खोदा ! म्हणजे अंधार पडायच्या आधी सर्व काही आटोपलं पाहिजे. कारण कुणी आपल्याकडे आलं आणि आपल्याला विचारलं,

"इकडे मंजुळा आली होती का ?" तर आपण सांगू,

"नाही ! शाळातर आज दोनालाच सुटली. अन् शाळेतला फोटोचा कार्यक्रम तर चारालाचा संपला. आम्हाला तर काही माहीत नाही !" म्हणजे कुणालाही काही कळणार नाही.

हिसक्यांनी खड्डा खोदला. आणि त्या खड्ड्यात मंजुळाचा मृत देह पुरण्यात आला. वरून जमीन बरोबर करून हौशाबाईनं ती जमीन सारवली. त्यावेळी ती मनात म्हणत होती.

"रक्ताचा एक थेंब पडला असेल तर शपथ ! देवानं मला काय तल्लख बुद्धी दिली आहे ! म्हणूनच मला असं असं करावं हे सुचताच त्याप्रमाणं कसं वागायचं हेही सुचलं ! एकंदरीत हिसक्यांनी मी सांगितल्याप्रमाणं काम केलं तर !"

हौशाबाई सारवत असताना हिसके म्हणाले,

"काही म्हण तू ! पण मला मात्र कससंच वाटतं ! "

"हेच तर चुकतं तुमचं ! म्हणे कससंच वाटतं ! कशाला कससंच वाटतं ? चला व्हा कसे बाजूला ! माणसासारखे माणूस नि म्हणता कससंच वाटतं ! अन् कससंच वाटायला झालं काय ? सगळं जग असंच वागतं ! मग आपणच काय म्हणून गप्प बसावं. आणि मी सांगते तुम्हाला ! तुम्ही त्या पलीकडच्या खोलीत विश्रांती घ्या कसे ! कुणी आलं आपल्याकडे विचारायला तर मीच सांगेन काय सांगायचं ते ! "

आणि खरोखरच मोतीरामजी आणि मैनाबाई हौशाबाईंच्या घरी दोनदा आल्या आणि अश्रूपूर्ण नेत्रांनी म्हणाल्या,

"काय हो हौशाबाई ! आमची मंजुळा आली होती का तुमच्याकडे ? " हे ऐकून निर्विकार चेहऱ्यानं हौशाबाईनं उत्तर दिलं,

"नाही ! आमच्याकडे कशाला येईल ? "

"अहो ! फोटो काढायला शाळेस जाते म्हणून म्हणाली. घरून नवीन कपडे करून गेली. पण ती परत आलीच नाही ! "

"होय का ? म्हणजे आश्चर्यच म्हणायचं ! पण तुम्ही शाळेच्या शिपायाला विचारलं का ? अन् त्या मुख्याध्यापकांना ? अन् तिच्या मैत्रिणींना ? अहो ! ती सुलक्षणा सोनवणे आहे ना अन् ती नीना नवरंगे आहे ना ! त्या तिच्या मैत्रिणीच आहेत ! मला वाटतं ती त्यांच्याच घरी गेली असली पाहिजे ! "

अशा तऱ्हेनं मैनाबाईंनी आणि मोतीरामजींनी याच्या घरी जा अन् त्याच्या घरी जा असं करून सर्व गाव पालथं घातलं. त्यांच्या डोळ्यांच्या धारा वाढतच चालल्या. अवती भोवतीचे सगळे लोक गोळा झाले. "आता होती अन् आता कुठं गेली ? अहो ! असं कसं होईल ? " असं म्हणून सर्वजण शोधाशोध करू लागले. पण व्यर्थ ! कारण कुणालाही कल्पना करता येईना की आजकाल शिक्षक आणि शिक्षकिणी सुद्धा उलटया काळजाच्या झाल्या आहेत !

दुसऱ्या दिवशी हौशाबाई आणि हिसके शिक्षक दुसऱ्या गावाला जायला निघाले. ते दोघंही रस्त्यानं सारखे अश्रू ढाळीत होते. हौशाबाई तर रडता रडता मोठमोठ्यानं म्हणत होती,

"आमची आवडती विद्यार्थिनी होती हो मंजुळा ! पण काय झालं कुणास ठाऊक ? कुणा दुष्टाची नजर लागली माझ्या पाखराला अन् कुणाची नाही ! पोर कशी होती नक्षत्रासारखी ! आम्हाला तर इथं राहणं मुष्किलीचं झालं आहे ! दुःख पोटात मावत : ी ! "

हे हौशाबाईंचं रडता रडता बोलणं सगळ्यांना खरंच वाटलं ! पण सत्य सूर्यप्रकाशाप्रमाणं असतं. ते केव्हा न केव्हा उघडकीला आल्याशिवाय रहात नाही. मंजुळाचा देह काही फार खोल गाडलेला नव्हता. त्यामुळं तिसऱ्या दिवसापासूनच त्या घरातून दुर्गंधी यायला सुरुवात झाली आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी तर दुर्गंधी एवढी येऊ लागली की शेजाऱ्यापाजाऱ्यांना तिथं राहणं मुष्किलीचं झालं. म्हणून शेजाऱ्यांनी सरकारी अधिकाऱ्याकडे लेखी तक्रार केली. 'काय आहे तरी काय असं ?' हे पाहण्यासाठी फौजदार साहेब तिथं आले. त्यांनी पंचनामा-करून दार फोडलं. अन् पाहतात तो काय ! मंजुळाचं प्रेत पुरलेलं. तावडतोब हौशाबाईला आणि हिसक्यांना बेड्या घालून पकडण्यात आलं.

फौजदारी कोर्टात रीतसर खटला भरण्यात येऊन त्या दोघांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. हायकोर्टातही हीच शिक्षा कायम झाली.

पण बिचाऱ्या मैनाबाईंची आणि मोतीरामजींची मंजुळा जिवानिशी गेली त्याचं काय ?

१६

# चारित्र्याचं मोल अनमोल आहे

कोल्हापूरहून परत येता येता नाशिक स्टेशनवर उतरायचं असं मी अगोदरच ठरवलं होतं. म्हणून नाशिक स्टेशन येताच मला वाटलं, 'ठीक झालं. वेळ सकाळचीच आहे. जहागीरदाराचं 'वैभव-विश्रांती-गृह' या नावाचं हॉटेल स्टेशनजवळच आहे. तिथंच त्याची भेट होईल. त्याला आपण पूर्वीच पत्र पाठवलेलं आहे. म्हणून आपल्याला पाहताच त्याला खुशी होईल. तो आपला लहानपणचा मित्र असल्यानं काही दिवस आपल्याला आग्रहानं ठेवून घेईल. आपल्याला नाही तरी नाशिकला राह्यचं होतंच. पण जहागीरदारानं जर आग्रह करून ठेवून घेतलं तर आपल्याला बरं वाटेल. कारण त्याची स्वत:ची मोटर आहे. तिच्यातून लहानपणच्या आपल्या काही मित्रांच्या घरी आपल्याला जाऊन येता येईल. सुखदुःखाच्या गोष्टी बोलता येतील. म्हणजे इतक्या वर्षांनी आपल्या जन्मगावी पुन्हा आल्याचं सार्थक होईल.' असा विचार करता करता मी माझी हँडबॅग हातात घेतली आणि आगगाडीच्या डब्यातून प्लॅटफॉर्मवर उतरण्यासाठी दरवाजाकडे जाऊ लागलो. गर्दीतून मार्ग काढता काढता एकदाचा फलाटावर उतरलो.

कपडे जरा नीटनेटके करून हातातली बॅग घेऊन चालता चालता स्टेशन-बाहेर आलो. तोच समोर वैभव-विश्रांती-गृहाचा बोर्ड दिसला. म्हणून मला तेवढंच बरं वाटलं. लौकर लौकर पाय उचलून मी ताबडतोब त्या हॉटेलच्या पायऱ्या जरा ऐटीतच चढून कोपऱ्यातल्या एका खुर्चीवर जाऊन बसलो.

पण काऊंटरवर जहागीरदार नव्हता. तिथं दुसराच एक गृहस्थ बसला होता. त्याचं बोलणं आणि वागणं असं होतं की, जणू काही तोच हॉटेलचा मालक असावा असं कुणालाही वाटावं, त्याप्रमाणं तसं मलाही वाटलं. पण त्या विचाराला मी मनातून जबरदस्तीनं काढून टाकलं. मी मनात पुन्हा पुन्हा म्हटलं, 'छे! हा कसचा मालक! हे हॉटेल तर जहागीरदाराचं आहे. त्यानं याला मॅनेजर म्हणून नेमलं

असेल. आणि सध्या मॅनेजरही मालकासारखेच किंबहुना त्यांच्याहूनही वरचढ करणारे अशा तऱ्हेनं सध्या वागतात. म्हणून आपण उगीचच गैरसमज करून घेऊ नये. नाही का ? '

इतक्यात वैभव विश्रांती गृहाचा एक नोकर मजजवळ आला आणि म्हणाला,

" साहेब ! काय काय घेणार आपण ? चहा, कॉफी ! काही खायलाही आणू का ? बटाटेवडा, भजे, चिवडा, मिसळ, पेढे, बर्फी, जिलबी, लाडू अगदी सगळे पदार्थ ताजे आहेत ! "

पण त्याच्या प्रश्नाला उत्तर न देता उलट मीच त्याला विचारलं,

" काय हो ! जहागीरदार काही दिसत नाहीत ! हे हॉटेल तर त्यांचंच आहे ना ? "

" हे मला नाही ठाऊक साहेब ! हे तुम्ही आमच्या मालकांना विचारा ! " असं म्हणून तो दुसऱ्या गिऱ्हाईकाकडे निघून गेला. पण जाता जाता ' आमच्या मालकांना विचारा ' हे शब्द त्यानं त्या गल्ल्यावर बसलेल्या इसमाकडे पाहूनच उच्चारले होते. म्हणून ' हाच तर गृहस्थ नसेल ना मालक ? अन् मग जहागीरदार ? ' असा विचार माझ्या मनाला पुन्हा चाटून गेला. त्यामुळं मला आतल्या आत दुःख झालं. म्हणून मी माझ्या मनाचं पुन्हा समाधान केलं. मी म्हटलं, ' अरे ! शक्यच नाही असं होणं. हे आपल्या बालमित्राचं त्या जहागीरदाराचंच हॉटेल आहे. तोच याचा मालक आहे. हा कसला आला आहे मालकबिलक ?

माझं त्या नोकराबरोबर झालेलं बोलणं त्या काऊंटरवरच्या गृहस्थानं ऐकलं होतं. म्हणून तो हसतमुखानं मजजवळ येता येता म्हणाला,

" अरे ! सात नंबर टेबल साफ ! दोन स्पेशीयल, एक ग्लास पाणी ! " आणि मजजवळ आल्यावर जरा आपुलकीनं त्यानं विचारलं,

" आता काशी एक्सप्रेसनं आला वाटतं आपण ? मला वाटलंच ! "

" होय. आताच आलो ! " असं मी उत्तर दिलं. आणि विचारलं,

" हे हॉटेल तर जहागीरदाराचं होतं ना ? "

" होय ना साहेब ! जहागीरदाराचंच होतं, पण मी विकत घेतलं. "

" कधी ? "

" दोन वर्षांपूर्वी ! "

" मग सध्या जहागीरदार काय करतात ? "

" जहागीरदार होय ? ...... असं म्हणून त्यानं एक सुस्कारा सोडला. आणि मग हळूच म्हणाला,

" साहेब ! जहागीरदारांचा तर सध्या कुठंच पत्ता नाही ! "

" म्हणजे ? "

या माझ्या ' म्हणजे ' या तीन अक्षरी शब्दांत माझी जहागीरदाराबद्दलची आपुलकी ओतप्रोत भरलेली होती. त्यामुळं त्या वैभव विश्रांतीगृहाच्या नवीन मालकानं जहागीरदाराची सर्व हकीकत मला सांगितली. ती ऐकून माझ्या मनात चर्रर् झालं. तिकडे कोल्हापूरच्या माझ्या अल्प मुक्कामात याविषयी थोडीशी कुणकुण मला अगोदरच लागली होती. परंतु उडत उडत मिळालेल्या माहितीवर मी मुद्दामच विश्वास ठेवायची टाळाटाळ करीत होतो. परंतु तीच गोष्ट अखेरीस खरी ठरली होती. त्यामुळं माझ्या मनात अनक विचारांची एकाएकी कालवाकालव सुरू झाली. म्हणून त्या वैभव विश्रांतीगृहात माझ्याच्यानं अधिक वेळ बसवेना. त्या कपातला चहाही मला प्यावासा वाटेना. म्हणून माझी बॅग उचलून त्या वैभव विश्रांतीगृहाच्या पायऱ्या मोठ्या जड अंतःकरणानं उतरलो आणि तांगा करून माझे मित्र श्री. विनायक लक्ष्मण जोशी यांच्याकडे म्हणजे पंचवटीत चालण्याविषयी मी तांगेवाल्याला सांगितलं. घोडा चालू लागताच त्याच्या खुरांचा टॉप् टॉप् टॉप् टॉप् असा लयबद्ध आवाज ऐकू येऊ लागला. आणि माझ्या मनात जहागीरदाराच्या गतायुष्याचं विचारचक्र सुरू झालं.

काही वर्षापूर्वी वैभव विश्रांतीगृहाचा उद्‌घाटन-समारंभ साजरा झाला होता. त्यावेळी मी मुद्दाम उज्जैनहून येऊन हजर राहिलो होतो. माझ्या सांगण्यावरूनच जहागीरदारानं त्याच्या हॉटेलचं नाव 'वैभव विश्रांतीगृह' असं ठेवलं होतं. त्या दिवशी तो फार प्रसन्न होता. त्याची पत्नीही मोठ्या खुशीत होती. कारण वैभव विश्रांतीगृह अगदी मोक्याच्या ठिकाणी सुरू झालं होतं. स्टेशनवरून आलेले प्रवासी खाली उतरताच त्यांना समोरच वैभव विश्रांती गृहाची पाटी दिसायची ! त्यामुळं हॉटेल अष्टौप्रहर गिऱ्हाईकांनी गजबजलेलं असायचं. म्हणूनच उत्पन्नाला काही कमी नव्हतं. अगदी पहिल्या दिवसापासूनच जहागीरदाराला चांगला नफा होऊ लागला. त्यामुळं त्याच्या हातात अधिकच पैसे खुळखुळू लागले.

परंतु आज ऐकलेली जहागीरदाराची हकीकत मोठी करुण कहाणी होती. त्यामुळं माझं मन फार विषण्ण झालं होतं. नाशिक शहरातल्या त्या पूर्वपरिचित अशा काही इमारती, काही नवीन नवीन आधुनिक पद्धतीच्या टोलेजंग बिल्डिंग्ज, ते लहान मुलामुलींनी आणि स्त्री-पुरुषांनी गजबजलेले रस्ते अन् त्या ओळखीच्या अनेक खाणाखुणा पुन्हा दिसत असूनही माझं कशाकडेच लक्ष नव्हतं. उलट जहागीरदाराचंच आयुष्य मला पुन्हापुन्हा आठवत होतं. माझ्या मनात आलं की, मनुष्याचं आयुष्य किती विचित्र असतं ! समुद्रातल्या लाटांच्या हेलकाव्यामुळं दूरदूरचे दोन ओंडके एकत्र येतात, क्षणभर भेटतात आणि पुन्हा दूर कुठंतरी निघून

जातात. इतके दूर जातात की त्यांचा पुन्हा पत्ता लागत नाही. तसंच माणसाचंही आहे. इथं योगायोगानं माणसांच्या गाठी–भेटी होतात, काही दिवस आपण एकत्र राहतो आणि मग अदृश्य होतो, ते कायमचेच !

आता या जहागीरदाराचंच आयुष्य पहाना ! नुसती वाडवडिलांची संपत्ती त्यानं सांभाळली असती तरी पाच पिढ्यापर्यंत त्याला पुरली असती. म्हणजे तसं पाहिलं तर त्याला हॉटेल काढायचीही काही आवश्यकता नव्हती. पण माणसाची अगोदर जाते बुद्धी आणि नंतर जातं भांडवल हेच खरं ! जहागीरदाराची तिकडे कोल्हापूरच्या जवळ पुष्कळ शेतीवाडी होती. आणि शिवाय पूर्वीच्या ग्वाल्हेर संस्थानात जहागिरीही होती. त्याची राहणी आणि वागणं एखाद्या संस्थानिकापेक्षाही श्रीमंती थाटाचं असल्यानं आसपासचे सर्वजण त्याला ‘ जहागीरदार साहेब ! जहागीरदार साहेब ! ’ असं म्हणायचे. आणि लोक आपल्याला आपल्या जाधव या आडनावाच्या ऐवजी जहागीरदार साहेब म्हणून ओळखतात, याचं त्याला भारी भूषण वाटे.

काही वर्षांनंतर जहागीरदाराचं कोल्हापूरकडच्या शेतीचं उत्पन्न बंद झालं. “ कुळकायद्यामुळं शेतकरी पैसा देत नाहीत. म्हणून आता कोल्हापूरला जाण्यात काही अर्थ नाही ! ” असं जहागीरदार सर्वांना सांगे. पण खरी गोष्ट निराळीच होती.

जहागीरदार कोल्हापूरला न जाण्याचं खरं कारण असं होतं की, काही वर्षांपूर्वी जहागीरदार कोल्हापूर जवळच्या शेतीवाडी असलेल्या कुडित्रे या गावी गेला होता. जहागीरदाराला पाहून बहुतेक सर्व कुळांना आनंद झाला. बहुतेकांनी त्याचे पैसे दिले. आणि ज्यांच्याकडे पैसे घ्यायचे राहिले होते त्यांनी सांगितलं की, आम्ही पुढच्या वर्षी देऊ. यापूर्वी जहागीरदार कुडित्रे या गावी एका रात्रीहून जास्त कधीही थांबला नव्हता. कारण तिथं त्याला करमत नसे. पण या वेळी जहागीरदारानं त्याचा मुक्काम वाढवला. त्याचं कारण मात्र वेगळंच होतं.

जहागीरदार ज्या दिवशी कोल्हापूरजवळच्या कुडित्रे या गावी गेला होता, त्याच दिवशी एका शेतात एका शेतकऱ्याची तरुण सुंदर मुलगी त्याच्या दृष्टीस पडली होती. आणि तिला पाहताच तो तिच्यावर लुब्ध झाला होता. तो शेतकरी आपलं कुळ असल्यानं आणि या वर्षी तो पैशांच्या अडचणीत असल्यानं त्याच्या या मुलीचा हात आपण धरला तर सहज धकून जाईल असं त्याला वाटलं होतं. म्हणून त्या लावण्यवती तरुणीला पुन्हा पहावं, जमल्यास तिच्याशी बोलावं, साधल्यास तिचा हात धरावा आणि जुळलं तर आताच आपल्याबरोबर तिला नाशिकला घेऊन जावं इतका विचार तडकाफडकी जहागीरदाराच्या मनात पक्का झाला.

तशातच सध्या व्यक्तिस्वातंत्र्य, स्वेच्छाचार, स्वैरवृत्ती आणि संभोगलालसा या गोष्टींना ऊत आला आहे. स्त्रीपुरुषांच्या संबंधांना लग्नाचं बंधन असावं, पती-पत्नींना एकमेकांविषयी नितांत निष्ठा, आपुलकी आणि आदर असावा, नवरा-बायकोनं एकमेकांसाठी व घरातल्या इतर सर्वांसाठी त्याग करण्यात खुशी मानावी आणि संसार करता करताच हळूहळू संयमन करून समाजाचं ऋण फेडता फेडता मनुष्यदेहाचं सार्थक करून दाखवावं, ही विचारसरणी संपुष्टात आलेली आहे. याच्या उलट सध्या स्त्री-पुरुषांचे लैंगिक संबंध जास्तीत जास्त जाहीर रीतीनं आणि अघळपघळ भाषेत उघड करून दाखवणं म्हणजेच ज्ञानाची परिसीमा होय, असं समजणाऱ्यांच्या नगाऱ्याचा ढोल इतक्या जोरानं वाजत आहे की, तिथं एखाद्यानं चारित्र्याचं मोल अनमोल आहे असे शब्द उच्चारले तर त्याच्या टिमकीचा आवाज कुणी ऐकायलाही तयार होणार नाही. एवढंच काय पण ऐकला तरी ऐकला नाही असं म्हणतील. परंतु स्त्रीपुरुष संबंधात संयमनाचा अतिरेक जसा घातुक त्याचप्रमाणं लैंगिक संबंधांना सध्या जे बाजाराचं उघडं स्वरूप देण्यात येत आहे तेही त्याज्यच होय. कारण एखाद्या राष्ट्राचा मोठेपणा तिथल्या चारित्र्यसंपन्न लोकांच्या संख्येवरून ठरतो असं जे म्हणतात ते आपल्याला सध्या जरी पटत नसलं तरी ते सत्य आहे एवढं खरं! म्हणूनच 'नर करणी करे तो नरका नारायण हो जाय' असं म्हणतात. कारण माणसानं नारायण व्हावं अशी अपेक्षा आहे. अधिकाधिक स्वेच्छाचारी, स्वैराचारी आणि विषयलंपट बनून माणसानं पशुकोटी-कडे जावं अशी अपेक्षा नाही. कारण विषयलंपट माणसाचे विचार व आचार याला काही ताळतंत्र नसतो असं जे म्हणतात ते काही खोटं नाही.

जहागीरदाराच्या कल्पनेप्रमाणं ती शेतकऱ्याची सुस्वरूप उपवर मुलगी दुसऱ्या दिवशी त्याच वेळेला त्याला शेतात दिसली. शिदोरी व पाण्याचा घडा घेऊन ती चालली होती. अगदी निर्भय मनानं जंगलातली पाखरं जशी भुर्रकन इकडून तिकडे अन् तिकडून इकडे उडतात, त्याप्रमाणं ती स्वच्छंद मनानं चालली होती. तिच्या चालण्यात कसलाच कृत्रिमपणा नव्हता. ती उसाच्या शेताजवळून जात असताना जहागीरदारानं तिला अडवलं. तिचा त्यानं जबरीनं हात धरला. तेव्हा तिनं मोठ्यानं किंकाळी फोडली. तिचा आक्रोश ऐकून जवळपासचे सर्व लोक धावून आले. लोकांनी लाथाबुक्क्यांनी आणि काठ्यांनी मारून मारून जहा-गीरदाराच्या अंगाचं अक्षरशः धिरडं केलं. त्या तरुण मुलीच्या भावानं तर एक भला मोठा दगड जहागीरदाराच्या डोक्यात मारण्यासाठी उचलला. जहागीरदाराचा त्याच दिवशी अंत व्हायचा; परंतु काळ आला होता पण वेळ आली नव्हती. तो दगड थोडक्यात चुकला म्हणून जहागीरदार वाचला. त्या दिवशी एका वृद्ध शेतकऱ्यानं जहागीरदाराचे प्राण वाचवले. तो जहागीरदाराच्या बापाचा मित्र

होता. त्यानं जहागीरदाराला लहानपणी मांडीवर खेळवलं होतं. म्हणून त्यानं गयावया करून " जाऊ द्या ! एक वेळ यांना माफी द्या ! हा यांचा पहिलाच गुन्हा आहे. कितीही झालं तरी आपले मालक आहेत. " असं अश्रू ओघळता ओघळता सांगितल्यामुळं बाकीच्यांनी गय केली. तो म्हातारा शेतकरी जहागीरदाराला कोल्हापूरच्या हॉस्पिटलमधे घेऊन गेला. तिथं पंधरा-वीस दिवसांत जहागीरदाराची प्रकृती सुधारली. नंतर तोच शेतकरी जहागीरदाराला स्वतः नाशिकला घेऊन गेला, म्हणून त्याचे प्राण वाचले.

जहागीरदार कुडित्रे या गावी पुन्हा का जात नव्हता ? तर त्या तरुण मुलीच्या भावानं केलेली प्रतिज्ञा की आता याला पुन्हा येऊ तर द्या, याचा मुडदाच पाडतो ! ही जहागीरदाराला पुन्हापुन्हा आठवायची म्हणून ! शिवाय ज्या वृद्ध शेतकऱ्यानं जहागीरदाराला वाचवलं होतं तोही आता दिवंगत झाला होता.

ही घटना कुणालाही कळणार नाही असं जहागीरदाराला वाटलं होतं. पण तो हे विसरला की खऱ्या गोष्टी फार काळपर्यंत कुणालाही दडपून टाकता येत नाहीत. कोल्हापूरजवळील कुडित्रे गावचं शेतीचं उत्पन्न अशा तऱ्हेनं बंद पडलं तरी जहागीरदाराजवळ दागदागिने व रोकड मिळून पुष्कळ पैसा होता. शिवाय वैभव विश्रांतीगृहातूनही त्याला बरंच उत्पन्न मिळत होतं.

जहागीरदाराची पत्नी सगुणा खरोखरच सद्‌गुणी होती. अशी सुस्वरूप व सद्‌गुणी पत्नी, एक मुलगा व दोन मुली, घरात अमाप पैसा, समाजात प्रतिष्ठा आणि एखाद्या कल्पवृक्षाप्रमाणं मुबलक पैसा मिळवून देणारं वैभव विश्रांतीगृह, इतक्या गोष्टी जहागीरदाराला सुखी व्हायला पुऱ्या होत्या. म्हणजे एवढ्यात सुख मानायला त्याला काही हरकत नव्हती. पण म्हणतात ना की, पैसा खिशात फार खुळखुळू लागला की निर्बुद्ध माणसाचं मन त्याच्या काबूत रहात नाही. आणि मग तो व्यसनांच्या अधीन होऊन विषयलंपट झाला नाही तरच नवल !

जहागीरदार आता दुसऱ्याच एका मुलीच्या नादी लागला. त्याच्या बंगल्या-शेजारी एक उत्तर हिंदुस्थानी गृहस्थ राहायला आले होते. त्यांच्या एका उपवर मुलीचं लग्न झालेलं होतं. पण तिचा नवरा अजून शिकत असल्यानं ती माहेरीच रहात होती. त्या उत्तर हिंदुस्थानी गृहस्थाला मराठी येत नव्हतं. परंतु जहागीर-दाराला मात्र हिंदी मोठ्या सफाईनं बोलता येत होतं. तेव्हा त्या तरुण लग्न झालेल्या मुलीचा परिचय व्हावा म्हणून तिच्या घरच्या सर्वांना जहारगीदारानं प्रथम चहाला आणि नंतर जेवायला आपल्या घरी बोलवून त्या सर्वांना आपलसं करून टाकलं. त्या उत्तर हिंदुस्थानी गृहस्थाच्या घरी उठल्या-बसल्या गेल्याशिवाय आता जहागीरदाराला करमेनासं झालं. काहीना काही निमित्तानं जहागीरदार भारी भारी किमतीच्या वस्तू त्या तरुणीला भेट म्हणून पाठवू लागला. त्या तरुणीचंही

जहागीरदाराच्या घरी येणंजाणं होऊ लागलं. तिचं अघळपघळ बोलणं, लाडेलाडे वागणं यामुळं जहागीरदाराच्या लग्नाच्या बायकोचे काही दागिने त्या तरुणीच्या अंगावर झळकू लागले.

जहागीरदाराची सुशील पत्नी सगुणा हे सर्व पहात होती. पण तिला काही करता येईना. कारण जहागीरदाराचा स्वभाव फार खुनशी होता. घरातली बंदूक त्यानं आपल्या पत्नीच्या समोर अनेकदा धरली होती. तेव्हा उघडचा डोळचांनी अशी विटंबना पाहण्यापेक्षा परमेश्वरानं आपले डोळे झाकले तर फार बरं होईल, म्हणून सगुणा मनातल्या मनात देवाची करुणा भाकीत असे.

तीन-चार दागिने अशा तऱ्हेनं त्या शेजारच्या तरुण मुलीला मिळताच ‘ मामाच्या गावाला जाते ’ असं निमित्त करून ती विवाहित मुलगी आईबरोबर गावाला निघून गेली. आणि मग ती पुन्हा परत आलीच नाही. अन् ती आता परत येणार तरी कशाला ? कारण ती आता सासरी गेली होती. ‘ माझ्या माहेरच्यांनी हे दागिने दिलेत ’ असं तिनं नवऱ्याला सांगितलं. त्यामुळं तिचा नवरा तिच्यावर खूष झाला. अशा तऱ्हेनं ती तरुणी जहागीरदाराला अगदी उघड उघड लुबाडून गेली होती. परंतु हात चोळीत बसण्यापलीकडे जहागीरदाराला काही करता आलं नाही.

इतकी जहागीरदाराच्या जीवनातली कथा एखाद्या बोलपटाप्रमाणं माझ्या मनासमोरून सरकली. तेव्हा मी माझ्या विनायक मित्राच्या घरी पंचवटीत येऊन पोचलो. अगोदर कळवलं नाही म्हणून त्याला आश्चर्य वाटलं. पण मला पाहून त्याला फार आनंद झाला.

त्या दिवशी आम्ही दोघेजण खूप खूप बोललो. दुपारी जेवतानाही आमच्या गप्पा चालूच होत्या. त्या दिवशी आग्रह करून त्यानं मला रात्रभर ठेवून घेतलं. म्हणून मग संध्याकाळी त्याच्याबरोबर काळाराम मंदिरात व गोराराम मंदिरात जाऊन मी देवाचं दर्शन घेतलं. फार वर्षांनी नाशिकला जायला मिळाल्यामुळं मनातल्या मनात मी बराच खूष होतो. रात्री झोपता झोपता लहानपणच्या कितीतरी आठवणी माझ्या मनात जागृत झाल्या व विस्मय आणि आनंद अशा अनेक विचारांनी माझं अंतःकरण भरून गेलं.

दुसऱ्या दिवशी सकाळीच काशी एक्सप्रेसनं नाशिकहून निघण्यासाठी म्हणून मी स्टेशनवर आलो. मला निरोप देण्यासाठी माझा मित्रही स्टेशनवर आला होता. काशी एक्सप्रेस स्टेशनात येताच माझ्या प्रेमळ मित्राचा निरोप घेऊन मी गाडीत बसलो. थोडचाच वेळात इंजिनानं भोंऽऽऽ अशी मोठ्यानं शिटी वाजवली व लगेच गाडी धकली. आणि जहागीरदाराचं राहिलेलं आयुष्य मला पुन्हा आठवू लागलं.

माझ्या मनात आलं की स्त्रीचा काय किंवा पुरुषाचा काय पाय घसरला म्हणजे तो कुठवर घसरत जाईल याचा काही नेम नसतो. या साठी पाय घसरणारच नाही याची आपण फार खबरदारी घ्यावी. आता या जहागीरदाराचंच पहाना ! त्याचं कोल्हापूरकडील कुडित्रे गावचं शेतीचं उत्पन्न काही कुळकायद्यामुळं पण मुख्यतः त्याच्या विषयलंपटपणामुळं बुडालं. तसंच त्याच्या पत्नीचे काही दागिने जे गेलेत तेही त्याच्या मूर्खपणामुळंच ! पण एवढं होऊनही जहागीरदाराचे डोळे उघडले नाही.

इतकं सांपत्तिक नुकसान झालं तरी जहागीरदाराचं वैभव विश्रांतीगृह मात्र जोरात चालू होतं. त्याला बऱ्यापैकी पैसा मिळत होता. पण जणू काही हे खुद्द जहागीरदारालाच पाहवलं नाही ! हॉटेल शेजारीच राहणारी एक विधवा विश्रांतिगृहात पुन्हा पुन्हा येऊ लागली. आणि तिला पाहून जहागीरदाराची दृष्टी पुन्हा फिरली. त्याचं त्या विधवेच्या घरी जाणं येणं सुरू झालं. एवढंच नव्हे तर तिच्याशिवाय जहागीरदाराला रात्रंदिवस करमेनासं झालं.

जहागीरदाराचं घराकडे किंवा हॉटेलकडे सध्या बिलकूल लक्ष नव्हतं. तो आता उठल्या बसल्या त्या विधवेच्याच घरी जाऊ लागला. हॉटेलचा सर्व कारभार त्यानं मॅनेजरवर सोपवला आणि तोच मॅनेजर पुढं हॉटेलचा मालक बनला. कारण धंदा काय, कारखाना काय किंवा शेती काय किफायतशीर तेव्हाच होते की जेव्हा आपण स्वतः मन घालून उद्योग करतो. असं दुसऱ्याच्या भरवशावर राहून कधीही यश मिळत नाही. वैभव विश्रांतीगृहाचं लौकरच दिवाळं निघालं आणि जहागीरदाराच्या आयुष्याला घरघर लागली.

या सगळ्यावर कळस म्हणूनच की काय जहागीरदार एके दिवशी त्या विधवेला आपल्या घरी रहायलाच घेऊन आला. ती वेळ संध्याकाळची होती. गेल्या कित्येक दिवसापासून जहागीरदाराच्या पत्नीची व मुलांची स्थिती फारच केविलवाणी झाली होती. आणि तशातच ही विधवा बया घरात आलेली पाहून सगुणाला जीव अगदी नकोसा झाला. तिनं रात्री नऊ-दहाच्या सुमाराला बाथरूममधे जाऊन घासलेट अंगावर ओतून लुगडं पेटवून घेतलं. त्यामुळं सगुणा ताबडतोब गतप्राण झाली. हे समजताच ती विधवा पळून गेली.

तिसऱ्या दिवशी सगुणाचा भाऊ भुसावळहून येऊन तिच्या तिन्ही मुलांना आपल्या घरी घेऊन गेला. अशा तऱ्हेनं पत्नी, पैसा आणि प्रतिष्ठा गेल्यामुळं जहागीरदार भ्रमिष्ठ झाला आणि एकाएकी कुठं निघून गेला याचा अजून पत्ता लागला नाही. आणि आता लागेल असं वाटत नाही !

# १७

# देव भावाचा भुकेला

आरती तुकारामा । स्वामी सद्‌गुरु धामा
सच्चिदानंदमूर्ती । पाय दाखवी आम्हा ।। धृ ।।
राघवे सागरात । पाषाण तारीयले ।
तैसे हे तुकोबांचे । अभंग रक्षीयले ।। २ ।।
तुकिता तुलनेसी । ब्रह्म तुकासी आले ।
म्हणोनी रामेश्वरे । चरणी मस्तक ठेवीले ।। ३ ।।

असं म्हणून अनेक हरिभक्तांनी ज्यांच्या चरणावर अनंत लोटांगणं घातलीत त्या संत सद्‌गुरू स्वामी तुकाराम महाराज यांची थोरवी कशी सांगावी ? संत तुकोबांची अभंगवाणी महाराष्ट्र वेदवाणी म्हणून प्रसिद्ध आहे. आजही महाराष्ट्रातल्या गावोगावी आणि शहरोशहरी स्वामींचे अभंग गाणारे हरिभक्त भेटतात. त्यात काही हरिभक्त तर मोठ्या भक्तीभावानं विठ्ठलाचं भजन करताना आढळून येतात. संत तुकोबांच्या अभंगवाणीनं हजारो नव्हे लाखो लोकांना सन्मार्ग दाखवला आहे. समाजातल्या सर्व जातीतल्या आणि सर्व थरातल्या स्त्री-पुरुषांना शारीरिक, मानसिक किंवा दैविक अशा अनेक संकटांनी त्राहीत्राही करून सोडलं असताना याच अभंगवाणीनं त्यांना सात्विक समाधान प्राप्त करून दिलं आहे. कारण ही अभंगवाणी सरळ, सोप्या आणि सुंदर भाषेत लिहिलेली आहे. तसंच या अभंगवाणीत अध्यात्मज्ञानाचा विचार मोठ्या कळकळीनं सांगितलेला आहे. शिवाय हे अभंग म्हणजे तुकोबांचे आत्मानुभव होत. म्हणून ही अभंगवाणी लहानथोर, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, उंच जातीतले आणि खालच्या जातीतले, मराठी जाणणारे आणि मराठी न जाणणारे, महाराष्ट्रातले आणि महाराष्ट्राबाहेरचे अशा आम जनतेला पिढयानपिढया अत्यंत प्रिय झालेली आहे. कारण ही अभंगवाणी पांडुरंगानं आपल्या तोंडून वदविली आहे, असं स्वतः तुकाराम महाराजांनीच सांगितलेलं आहे. स्वामी तुकाराम महाराज म्हणतात की,

गुरुकृपेचा आधार मला मिळाल्यामुळं पांडुरंगानंच माझा सर्व भार घेतलेला आहे. त्यांचा पुढील अभंग पाहा,

**नेणे अर्थ काही, नव्हती माझे बोल । विनवीतो कोपाल संत झणी ॥ १ ॥**
**नव्हती माझे बोल बोले पांडुरंग । असे अंगसंगे व्यापूनीया ॥ २ ॥**
**मज मूढा शक्ती कैचा हा विचार । निगमादिका पार बोलावया ॥ ३ ॥**
**रामकृष्णहरी रामकृष्णहरी । बोबड्या उत्तरी हेची ध्यान ॥ ४ ॥**
**तुका म्हणे गुरुकृपेचा आधार । पांडुरंगे भार घेतला माझा ॥ ५ ॥**

जे ब्रह्मज्ञान वेदांनासुद्धा सांगताना अवघड वाटत आहे, ते मजसारख्या मूढाला कसं सांगता येणार ? म्हणूनच मी म्हणतो की, हे लोकहो ! मी जे बोलत आहे ते मी बोलत नसून प्रत्यक्ष पांडुरंग मजकडून वदवीत आहे. मी हे असं आपल्याला सांगितलं तर आपण राग मानू नका. कारण मी खरंच सांगतो की, विठ्ठलानं माझं सर्व शरीर व्यापून टाकलेलं आहे. तुकाराम महाराज म्हणतात की, मी रामकृष्णहरी रामकृष्णहरी हा मंत्र म्हणण्यात मग्न आहे. मला गुरुकृपेचा आधार मिळाल्यामुळं पांडुरंगानं स्वतःच माझा सर्व भार घेतलेला आहे. म्हणूनच मी म्हणतो की तो विठ्ठलच माझ्या तोंडून सर्व काही वदवीत आहे.

मी बोलत नसून प्रत्यक्ष पांडुरंग बोलत आहे असा भाव सांगणारे तुकोबांचे अनेक अभंग आहेत. संत तुकाराम महाराज यांच्या अभंगवाणीबद्दल बोलताना हरिभक्तपरायण प्रि. शं. वा. दांडेकर यांचे विचार मोठे मार्मिक आहेत. श्री. ग. वि. तुळपुळे यांनी लिहिलेल्या 'तुकाराम भक्तीचा डांगोरा' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत हरिभक्त दांडेकर म्हणतात.

"तुकारामबोवांचा गाथा म्हणजे महाराष्ट्र वेदच. त्यांचे अभंग म्हणजे तुकोपनिषदच आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथही मराठीत आहे. ज्ञानदेवांनी तो 'आबाल सुबोध' अशा ओवी छंदात आपण लिहिल्याचे सांगितले आहे. इतके असूनसुद्धा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ पुष्कळांना मिटलेल्या मुठीसारखा आहे. उलट संत तुकाराम महाराज यांचे अभंग हे उघडलेल्या मुठीसारखे आहेत. यामुळे ज्ञानेश्वरीपेक्षा तुकाराम महाराजांचे अभंग मराठी भाषा बोलणाऱ्यांना अधिक जवळचे वाटतात. म्हणूनच ते लोकांच्या पाठांतरातही ज्ञानेश्वरीपेक्षा अधिकच आहेत. महाराष्ट्रात असा एकही मनुष्य सापडणार नाही की, ज्याला संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे एखादे दुसरे कडवे येत नाही. इतकी लोकप्रियता ज्या ग्रंथाने मिळविली तो इतका मूल्यवान आहे की मराठी भाषा आहे तोपर्यंत हा ग्रंथ राहील असं म्हणण्यापेक्षा हा ग्रंथ राहील तोपर्यंत मराठी भाषा आहे, असं म्हणणंच योग्य ठरेल !"

संत तुकाराम महाराज यांच्या अभंगवाणीविषयी चर्चा करणारे पुष्कळ ग्रंथ मराठीत आहेत. परंतु हरिभक्तपरायण विष्णु नरसिंह जोग यांनी अभंगांचा अर्थ देऊन संपादिलेली गाथा, गुरुदेव रा. द. रानडे यांनी 'तुकाराम वचनामृत' या नावाचं लिहिलेलं पुस्तक आणि हरिभक्तपरायण लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांनी तुकोबांच्याविषयी जे लिहिलं आहे ते आपल्या मनाची पकड घेण्यासारखं आहे.

ही संत तुकोबारायांची अभंगवाणी इतकी मूल्यवान आहे की, तिचं अवलोकन करून पुढच्यापुढच्या काळातही अनेक ग्रंथ लिहिले जातील यात काही शंका नाही. या अभंगवाणीविषयी या ठिकाणी थोडसं लिहिण्यात आमचा हेतू अगदी स्पष्ट आहे. तो सांगण्यापूर्वी आणखी एक लेखक या अभंगवाणीविषयी काय म्हणतात ते पाहा. हरिभक्तपरायण विष्णु नरसिंह जोग यांनी सार्थ श्री तुकारामांची गाथा भाग एक व दोन हे ग्रंथ जवळ जवळ साठ वर्षांपूर्वी लिहिले. या ग्रंथांची दुसरी आवृत्ती इ. स. १९२६ मध्ये प्रकाशित झाली. या दुसऱ्या आवृत्तीला ज. र. आजगावकर यांनी 'दोन शब्द' जोडले आहेत. त्या ठिकाणी ते म्हणतात,

"संत शिरोमणी तुकारामबुवांचा गाथा म्हणजे महाराष्ट्र शारदा सुंदरीच्या मुकुटातला एक अत्यंत देदिप्यमान हिरा आहे. त्याच्या प्रकाशाने गेल्या अडीचशे वर्षांत सहस्रावधी मुमुक्षूंना परमार्थाचा सुलभ मार्ग दाखवून दिला आहे. ज्ञानोबारायासारख्या महान अवतारी पुरुषांच्या काव्यतेजाने किंवा वामनासारख्या पंडितप्रवरांच्या पांडित्य प्रकर्षाने सामान्य संसारी जनांचे डोळे जसे दिपून जातात तसा प्रकार तुकोबांच्या अभंगवाणीने होत नाही. कारण स्वतः तुकोबा हे संसारातील सगळी सुखदुःखे भोगून आणि संसारी जनांचे निंदाघात सोसून पायरीपायरीने संतपदास पोचले होते. त्यामुळे त्यांचा उपदेश मनावर ताबडतोब ठसतो. आणि त्यांच्या उद्गारांनी आपल्या अनुभवाचा मेळ पडून त्यांनी उपदेशिलेल्या आणि स्वतः आक्रमिलेल्या मार्गांचे जर आपण अवलंबन केले तर आपलाही उद्धार खचित होईल अशी आपल्याला खात्री वाटते. संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीचा सर्व महाराष्ट्रभर जो इतका प्रसार झाला आहे त्याचे कारण हेच होय!"

या अभंगवाणीचं महत्त्व इतकं असूनही काही टीकाकारांनी संत तुकाराम महाराजांना शूद्र म्हणून त्यांचा उपहास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची आणि रामदासस्वामींची तुलना करून तुकोबांना कमी लेखण्याचा खटाटोप केला आहे. खरं पाहिलं तर या दोघा थोर पुरुषांची तुलना करायची आवश्यकताच नाही. गुलाबाचं फूल अधिक महत्त्वाचं, का मोगऱ्याचं फूल अधिक महत्त्वाचं असं ठरवि-

ण्यासारखाच हा प्रकार आहे. या टीकाकारांनी कधी उघडउघड तर कधी आडून आडून लिहून संत तुकाराम महाराजांचा दर्जा कमी प्रतीचा आहे असं सांगितलं आहे. या अक्षराभिमानी पंडितांना आमची नम्र विनंती आहे की, तुम्ही हा असला खटाटोप निदान या पुढं तरी करू नका. यापासून कुणाचंही भलं झालं नाही आणि होणारही नाही. या पंडितांना आम्हाला एवढंच सांगायचं आहे की,

" तुका म्हणे अंगे व्हावे जै आपण । तरीच महीमान कळो येई "

ही उक्ती त्यांनी लक्षात ठेवावी. या संतांचं महीमान समजण्यासाठी त्यांच्या-प्रमाणंच काही गुण आपल्या अंगी असल्याशिवाय बोलण्यात काही अर्थ नाही. एवढंच नव्हे तर अहंभावानं बोलल्यानं हे टीकाकार स्वतःचं तर अहित करून घेतातच घेतात, पण अपरिपक्वबुद्धीच्या वाचकांचीही दिशाभूल करतात. कारण मनुष्य एकदा अहंभावाच्या आहारी गेला की, त्याच्या लेखणीला लगाम राहात नाही. आणि मग साहजिकच त्याच्या हातून समाजाचं अहित होतं असं आम्हाला वाटतं. असो.

या पुस्तकातलं ' देव भावाचा भुकेला ! ' हे सतरावं प्रकरण वाचून काही वाचक म्हणतील,

" काय हो दाभाडे ! सध्या समाजाला आर्थिक उद्धाराची तळमळ लागली असताना तुम्ही भाव, भक्ती आणि ईश्वर अशा गोष्टींबद्दल काय बोलता आहात ? तुम्हाला समाजसत्तावादाबद्दल काही माहिती आहे की नाही ? साऱ्या जगात आर्थिक, सामाजिक अन् राजकीय क्रांती घडवून आणणाऱ्या कार्ल मार्क्ससारख्या थोर लेखकाच्या कॅपिटल ग्रंथाचं नाव तरी तुम्ही ऐकलं आहे की नाही ? धर्म म्हणजे निव्वळ अफूची गोळी, हे तुम्हाला ठाऊकच नाही वाटतं ? सर्व जगात समाजसत्तावाद स्थापन व्हावा, म्हणून लाखो दुःखी, कष्टी मजूर अहोरात्र प्रयत्न करीत आहेत हे काय तुम्हाला दिसत नाही ? आधी पोटोबा आणि मग विठोबा ही म्हण तुम्हाला ठाऊक नाही ? आधी अन्न, वस्त्र आणि घरदार या प्राथमिक अत्यावश्यक गोष्टीच मनुष्याला मिळाल्या नाहीत तर तो विठ्ठलाविषयी काय विचार करणार ? तुमचं कपाळ ! आधी आर्थिक उन्नती झाली पाहिजे, ही साधी गोष्टही तुमच्या लक्षात येत नाही का ? आपल्या देशात समाजसत्तावाद स्थापन झालेला नसल्यानं श्रीमंत लोक अधिक श्रीमंत होत आहेत आणि गरीबांचे हाल मात्र कुणी कुत्रा खात नाही, हे खोटं आहे का ? म्हणून हिंदुस्थानातल्या लोकांनी स्वर्गातल्या काल्पनिक गोष्टींचा विचार करायचं सोडून, या जगातलं आपलं जीवन जास्तीतजास्त सुखी करायचा प्रयत्न केला तर ती गोष्ट त्यांच्याच हिताची होईल, हे तुम्हाला समजत नाही का ? आजच्या या अणुयुगात अन् या विज्ञानाच्या

युगात तुम्ही त्या दगडाच्या विठ्ठलाची पूजा करायला काय म्हणून सांगता ? आणि हे भावभक्तीचं स्तोम तुम्ही कशासाठी माजवीत आहात ? लोकांची दिशाभूल करायचा काय अधिकार आहे तुम्हाला ? हरिभक्तीचं स्तोम माजवून निव्वळ टाळ कुटणारे हरिभक्त तुम्हाला निर्माण करायचे आहेत की काय ?"

आपण आम्हाला इतके प्रश्न विचारलेत. आता आम्ही आपल्याला काही प्रश्न विचारायची परवानगी मागतो. ते प्रश्न आपण शांतचित्तानं ऐकून घ्या, अन् त्यावर अंतःकरणापासून विचार करा.

"सध्या पुष्कळ शिकलेसवरलेले लोकसुद्धा दुसऱ्यांच्या नरडीला नख लावायला मागंपुढं पहात नाहीत हे खोटं आहे का ? स्वातंत्र्याच्या नावाखाली बेछुटपणानं, स्वैराचारानं आणि मला मिळेल का कुत्र्याला मिळेल अशा वागण्यातच पुष्कळसे लोक भूषण मानतात की नाही ? वैयक्तिक स्वातंत्र्याच्या नावाखाली शिकल्यासवरलेल्या लोकांनासुद्धा प्रत्येक बाबतीत संयमानं वागायच्याऐवजी हावरटपणानं वागण्यातच सुख आहे असं वाटतं ना ? पुष्कळ सुशिक्षित लोकांचे खायचे दात वेगळे नि दाखवायचे दात वेगळे असतात की नाही ? समाजसत्तावाद समाजसत्तावाद, या तत्त्वाच्या नावाखाली हैदोसधुल्ला घालायला मिळावा आणि त्यासाठी रक्तरंजित क्रांती घडवून आणावी असं काहींना वाटतं की नाही ? धनवान लोक काळचाबाजारानं अधिकाधिक धन मिळवून गबर होत आहेत आणि लाखो लोकांना खायला अन्न मिळत नाही, ही किती लज्जास्पद गोष्ट आहे ? यास्तव या धनिकांच्या मुसक्या बांधून त्यांना चौकाचौकातून फाशी दिलं पाहिजे, असं समजणं कितपत बरोबर आहे ? कारण ज्याप्रमाणं राजेरजवाडयांना कायद्याच्या चौकटीत बसवून सामान्य नागरिकाप्रमाणं राह्यला आपण भाग पाडलं आहे, त्याप्रमाणं या धनिकांना आणि काळाबाजार करणारांना आपण वठणीवर आणू शकणार नाही का ? सारेच्यासारे श्रीमंत लोक माणुसकीला मुकले आहेत असं समजणं हेही अज्ञानाचंच लक्षण नाही का ?

सध्या आपलं बहुतेकांचं जीवन उसाचा रस गाळून काढलेल्या चिपाडाप्रमाणं झालं आहे की नाही ? तशातच राष्ट्रीय चारित्र्याचा बहुसंख्य लोकांत अभाव असल्यानं कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही हे खोटं का आहे ? त्यामुळं आपल्यापैकी प्रत्येकजण दुसऱ्याला दोष देऊन आपण मात्र नामानिराळा राहतो की नाही ? याचा परिणाम असा झालेला आहे की, आपल्या विचारात व वागण्यात माणुसकीचा मागमूसही उरलेला नाही. आणि हे सगळं समजून उमजूनही 'आपल्याला काय करायचं आहे ? आपल्याला काय करायचं आहे ?' असं म्हणून आपण डोळ्यावर पांघरूण ओढून घेत आहोत हे खोटं आहे का ?"

अशा तऱ्हेनं मी आपल्याला प्रश्न विचारू लागलो किंवा आपण मला प्रश्न विचारू लागलात तर त्यातून काही निष्पन्न होणार नाही. सध्याचं आपलं बहुतेकांचं जिणं भकास झालेलं आहे, एवढी गोष्ट खरी. कारण आपल्या जीवनात काही राम राहिलेला नाही. म्हणून सध्या जीवन जगण्यात मौज वाटेनाशी झाली आहे. अतिशयोक्ति सोडून दिली तर 'सध्या आम्ही का जगत आहोत ? तर मरत नाही म्हणून !' असं म्हणायचा बाका प्रसंग आपल्यापैकी पुष्कळांच्यावर आलेला आहे.

अशी दयनीय स्थिती सध्या असली तरी आम्ही मात्र पक्के आशावादी आहोत. समाजसत्तावाद स्थापन करण्यासाठी रक्तरंजित क्रांतीच घडवून आणली पाहिजे असं आम्हाला वाटत नाही. एका हातात समाजसत्तावाद आणि दुसऱ्या हातात तलवार घेण्याची आवश्यकता नाही. परंतु आता समाजसत्तावादाशिवाय गत्यंतर नाही हेही तितकंच खरं आहे. हे जर आपण वेळीच ओळखलं नाही तर मात्र आपण रक्तरंजित क्रांतीला आमंत्रण दिल्यासारखंच होईल. कारण गोरगरीबांना आपण किती दिवस उपाशी ठेवणार आहोत ? त्यासाठी पुढील तीन गोष्टींची फार आवश्यकता आहे असं आम्हाला वाटतं.

त्यातली पहिली गोष्ट ही की, आपल्या देशातलं मध्यवर्ती व प्रांतीय सरकार समाजसत्तावाद स्थापण्यासाठी कटीबद्ध असलं पाहिजे. तसे कायदे करण्यात आणि त्यांची अंमलबजावणी करण्यात सरकारनं खंबीरवृत्ती दाखवली पाहिजे. गरीबांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सरकारनं ताबडतोब आणि खंबीरपणानं पावलं उचलली पाहिजेत. तसंच धनवंतांच्या श्रीमंतीला लौकरात लौकर आळा घालून ठरवून दिलेल्या धनापेक्षा बाकीची सर्व संपत्ती ही राष्ट्राची संपत्ती झाली पाहिजे. या बाबतीत पक्षपात न घडला पाहिजे. परंतु असं सरकार कसं स्थापन करायचं हे राजकीय पक्षांनी ठरवायचं आहे.

दुसरी गोष्ट अशी की, सरकारी नोकर, खाजगी नोकर, डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, अध्यापक, कारकून आणि इतर सर्व लहानमोठे नोकर, इमानदारीनं, तत्परतेनं आणि वेळेवर काम करतात किंवा नाही हे पाहाणारी काहीतरी यंत्रणा असली पाहिजे. यासाठी डॉक्टर चिंतामणराव देशमुख यांनी पूर्वी एकदा म्हटल्याप्रमाणं प्रथम झाडून सारे मंत्री आणि उपमंत्री व त्यांचे लहानमोठे चिटणीस हे सच्चे समाजसेवक असले पाहिजेत. त्या शिवाय लहानलहान नोकरांकडून सचोटीची काय अपेक्षा करणार ?

आणि तिसरी गोष्ट अशी की, समाजसत्तावादाचं शिक्षण समाजातल्या सर्व थरांतल्या लोकांना पण मुख्यत्वेकरून विद्यार्थ्यांना योजनाबद्ध रीतीनं देण्याची व्यवस्था झाली पाहिजे. यासाठी शिक्षकाचं सहकार्य सरकारनं घेतलं पाहिजे.

तसंच राष्ट्रीय चारित्र्याची जोपासना कशी होईल, याचा विचार केला पाहिजे. मुख्य म्हणजे आपल्या देशात अजूनही सत्तर टक्के लोक अशिक्षित आहेत. म्हणून समाजातल्या सर्व थरांत शिक्षणाची गोडी निर्माण झाली पाहिजे. या ध्येयानं प्रेरित होऊन या पुस्तकाच्या रूपानं हा अल्पसा प्रयत्न आम्ही करीत आहोत. या शिक्षणाबरोबरच समाजात एकमेकांच्या विषयी सद्भावना वाढली पाहिजे.

समाजातल्या सर्व थरांतल्या लोकांची अंतःकरणं जिंकण्यासाठी एका हातात समाजसत्तावाद आणि दुसऱ्या हातात संत तुकाराम महाराज यांची अभंगगाथा घेऊन कार्य करणारे हरिभक्त सर्व दूर पसरले पाहिजेत. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत रामदास व संत तुकाराम यांनी महाराष्ट्राची भूमी अगोदरच पावन करून ठेवलेली आहे. त्या भूमीवर त्यांच्यावरील नितांत श्रद्धा-भक्तीनं कार्य करणारे कार्यकर्ते निर्माण झाले तर हरिभक्तीचं पीक अमाप येईल, असं आम्हाला वाटतं. पुन्हा एकदा हरिभक्तीची गंगा ओसंडून वाहू लागली तर त्या समतेच्या पुरात जातीयता, द्वेष, मत्सर, हेवेदावे, एकानं दुसऱ्याला कस्पटासमान समजणं आणि इतर वाईट गोष्टी आपोआपच वाहून जातील. इलेक्ट्रिकचं बटण लावताच खोलीतला अंधार आपोआपच जातो. तसंच समाजातला अज्ञानरूपी अंधार अगोदर दूर झाला पाहिजे. कारण जातीयता आली की द्वेष आलाच, हेव-दावे आलेच आणि एकमेकांना पाण्यात पाहणं हेही आलंच. याच्या उलट हरि-भक्तीचा झुळ् झुळ् झुळ् झुळ् वाहणारा झरा जर पुन्हा वाहू लागला तर सद्-भावना, प्रेम, अनुकंपा, एकमेकांविषयी आदर, एकमेकांना साहाय्य करायची तळ-मळ आणि सात्त्विकवृत्तीची वाढ या गोष्टी आल्याच म्हणून समजा. आणि याच गोष्टी नसल्या तर समाजसत्तावादातल्या 'समतेला' काही अर्थ राहणार नाही.

संत तुकाराम महाराज यांचे अनेक अभंग असे आहेत की देवाविषयी आपला भाव शुद्ध असावा असं त्यांनी पुन्हा पुन्हा सांगितलं आहे. कारण जसा भाव तसा देव. म्हणजे देवावर दृढभाव ठेवून जर आपण वागू लागलो तर आपणच आपला उद्धार करू शकतो. असं आपल्या हातून व्हावं अशीच ईश्वराची इच्छा आहे. म्हणून आपणच आपला उद्धार करू शकतो असं म्हणतात ते सर्वस्वी खरं आहे. संत तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात—

**विश्वास तो देव । म्हणूनी धरीयेला भाव ॥ १ ॥**
**माझी वदवीतो वाणी । ज्याने धरीली धरणी ॥ २ ॥**
**जोडीली अक्षरे । नव्हती बुद्धीची उत्तरे ॥ ३ ॥**
**नाही केली आटी । काही मान दंभासाठी ॥ ४ ॥**
**कोणी भाग्यवंत । तया कळेल उचित ॥ ५ ॥**
**तुका म्हणे झरा । आहे मुळींचाची खरा ॥ ६ ॥**

देवावर माझा विश्वास होता म्हणूनच तसा दृढभाव मी धरला. त्यामुळं पांडुरंग प्रसन्न झाला आहे. जो देव ही पृथ्वी आणि हे विश्व यांचं नियंत्रण करतो, तोच देव माझ्याकडून हे अभंग वदवीत आहे. म्हणूनच मी तुम्हाला सांगतो की, हे अभंग म्हणजे माझ्या बुद्धीची कसरत नव्हे. खरोखर हे अभंग म्हणजे भाव-भक्तीचं पीक आहे. मला काही मान मिळावा, मला कोणी मोठं म्हणावं किंवा मला काही मिळावं म्हणून मी खटपट केली नाही. जो कुणी भाग्यवान भक्त असेल त्याला माझ्या या म्हणण्यातला मथितार्थ समजेल. कारण हा भावभक्तीचा झरा देवाच्या कृपेनं मूळचाच असून तो सतत वाहतो आहे. आपण आपल्या भावभक्तीनं तो झरा पाहिला पाहिजे. कारण त्यातलं पाणी आपण प्यालो तर संसारताप आपल्याला त्रास देणार नाही. उलट आपल्याला अपरंपार सुखच होईल असं तुकाराम महाराज म्हणतात.

**भाव धरील तया तारील पाषाण । दुर्जना सज्जन काय करी ।। १ ।।**
**करीता नव्हे नीट श्वानाचे हे पुस । खापरा परीस काय करी ।। २ ।।**
**निंबाचीया झाडा साखरेचे आळे । बीज तैसी फळे येती तया ।। ३ ।।**
**तुका म्हणे वज्र भंगे एक वेळ । कठिण हा खळ तयाहूनी ।। ४ ।।**

आपला देवावरचा भाव जर शुद्ध असला तर दगडसुद्धा आपला उद्धार करू शकतो. उलट जो दुर्जन आहे त्याला सज्जन मनुष्य तरी काय करणार ? कुत्र्याचं शेपूट कितीदाही नीट केलं तरी ते वाकडं ते वाकडंच. परिस खापराला काय करणार ? म्हणजे परिसाचा स्पर्श होऊनही खापराचं सोनं होऊ शकत नाही. तसंच निंबाचं झाड मूळचं कडूच असतं. तेव्हा त्या झाडाच्या आळचात आपण कितीही साखर घातली तरी काय होणार ? त्या झाडाच्या निंबोळचा कडू त्या कडूच. इंद्राचं हत्यार जे वज्र ते फारच कठीण असतं. एक वेळ ते सुद्धा भंगून जाईल. म्हणजे त्याचे सुद्धा तुकडे होतील. परंतु दुष्ट मनुष्याला आवरून धरणं हे फार कठीण काम आहे असं तुकाराम महाराज म्हणतात. बरोबरच आहे, कडू कारलं तुपात तळलं काय नि साखरेत घोळलं काय कडू ते कडूच.

संत तुकाराम महाराज यांच्या अभंगगाथेचं आम्ही अनेकदा पारायणं केली. त्या साडेचार पाच हजार अभंगांपैकी जवळजवळ चारशे साडेचारशे अभंग आम्ही निवडले आहेत. त्यांची विषयवार मांडणी करून अर्थासहित त्यांना पुस्तकरूपानं आपल्यासमोर ठेवायचा विचार आहे.

या ठिकाणी दिलेल्या अभंगांचा अर्थ सांगताना हरिभक्तपरायण विष्णु नरसिंह जोग यांनी संपादिलेल्या आणि अर्थ दिलेल्या अभंगगाथेचा आम्हाला फार उपयोग झाला. त्याबद्दल आम्ही त्यांचे सदैव ऋणी आहोत. त्यांनी सांगित-लेल्या अर्थात आम्ही पुष्कळ ठिकाणी भर घातली आहे. तरीही अभंगांचा आम्ही

सांगितलेला अर्थच बरोबर आहे असं आम्ही म्हणत नाही. परंतु या अर्थामुळं संत तुकाराम महाराज यांचं अंतरंग ओळखायला मदत व्हावी हाच यातला हेतू आहे.

पुढं विषयावर मांडणी करून काही अभंग देत आहोत. त्यावरून संत तुकाराम महाराज यांचं अंत:करण आपण सर्वांनी ओळखावं आणि आपणा सर्वांच्या अंत:करणात भावभक्तीचा मळा पिकावा. असा आशीर्वाद संत, सद्‌गुरु आणि स्वामी तुकाराम महाराज यांनी आपणा सर्वांना द्यावा म्हणून त्यांच्या चरणी अंत:करणापासून अनंत लोटांगण घालीत आहोत.

संत तुकाराम महाराज यांनी केलेली पांडुरंगाची प्रार्थना

**अभंग पहिला**

**सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ती । रखुमाईच्या पती सोईरीया ।। १ ।।**
**गोड तुझे रूप गोड तुझे नाम । देई मज प्रेम सर्वकाळ ।। २ ।।**
**विठो माऊलीये हाची वर देई । संचरोनी राही हृदयामाजी ।। ३ ।।**
**तुका म्हणे काही न मागे आणिक । तुझे पायी सुख सर्वकाही ।। ४ ।।**

हे रखुमाईच्या वरा पांडुरंगा ! सदासर्वकाळ माझ्या डोळ्यांना तुझी मूर्ती पहावीशी वाटेल असं कर. हे विठ्ठला ! तुझं रूप गोड आहे म्हणून मला नेहमी पाहावं असं वाटतं. तसंच तुझं नामही गोड आहे. म्हणून हे विठामाई ! मी तुझं सतत स्मरण करीन असा आशीर्वाद मला द्या. तुकाराम महाराज म्हणतात की, हे देवा ! या शिवाय आणखी काहीही आशीर्वाद मला नको. कारण माझं सर्व सुख तुमच्या पायाच्याजवळच आहे.

**अभंग दुसरा**

**देवा आता ऐसा करी उपकार । देहाचा विसर पाडी मज ।। १ ।।**
**तरीच हा जीव सुख पावे माझा । बरे केशीराजा कळो आले ।। २ ।।**
**ठाव देई चित्ता राखे पायापाशी । सकळ वृत्तीसी अखंडित ।। ३ ।।**
**आस भय चिंता लाज काम क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा ।। ४ ।।**
**मागणे ते एक हेची आहे आता । नाम मुखी संतसंग देई ।। ५ ।।**
**तुका म्हणे नको वरपंग देवा । घेई माझी सेवा भाव शुद्ध ।। ६ ।।**

हे देवा ! माझ्यावर तुम्ही असा उपकार करा की मला देहाचा विसर पडेल. हे केशीराजा ! असं घडलं तरच माझा जीव सुखी होईल ही गोष्ट मला पुरतेपणी कळलेली आहे. म्हणून माझ्या चित्ताला तुमच्या चरणांचा आश्रय द्या. माझं अंत:करण सदासर्वदा तुमचंच चिंतन करील असं घडवून आणा. तसंच आशा, भीती, चिंता, लाज, काम व क्रोध यांचा आणि माझा कायमचा संबंध तोडून टाका. म्हणजे मी या वृत्तींच्या ताब्यात जाणार नाही असं करा. मी आपल्याजवळ

आता एकच गोष्ट मागत आहे आणि ती ही की माझ्या मुखात तुमचं नाम सदा-सर्वदा असू द्या आणि मला सतत संतांचा सहवास घडू द्या. तुकाराम महाराज म्हणतात की, हे देवा ! मी तुमची वरवरची सेवा करावी अशी माझी इच्छा नाही. तुमची सेवा मी शुद्ध भावनेनं करावी अशीच माझी फार इच्छा आहे.

अभंग तिसरा

आता होई माझे बुद्धीचा जनीता । आवरावे चित्ता पांडुरंगा ॥ १ ॥
येथूनीया कोठे न वजे बाहेरी । ऐसे मज धरी सत्ताबळे ॥ २ ॥
अनावर गुण बहुत जातीचे । न बोलावे वाचे ऐसे करी ॥ ३ ॥
तुका म्हणे हित कोणीये जातीचे । तुज ठावे साचे मायबापा ॥ ४ ॥

तुकाराम महाराज म्हणतात की, हे पांडुरंगा ! तुम्ही माझ्यावर दया करा ! तुम्ही माझ्या बुद्धीचे चालक होऊन मला वाईट विचारापासून आवरून धरा. आपल्या चरणांना सोडून कुठंही दूर जाऊ नये अशी माझी फार इच्छा आहे. परंतु ही गोष्ट केवळ आपल्या कृपेमुळं होऊ शकेल. माझ्या मनात नको नको ते विचार येतात. त्या विचारांना मी कधीही उच्चारणार नाही असं तुम्ही करा. हे मायबापा ! माझं हित कशात आहे आणि माझं अहित कशात आहे, हे खरोखर तुम्हालाच ठाऊक आहे. म्हणूनच तुम्ही माझ्या मनाचे चालक व्हा, अशी मी तुमच्या चरणी विनंती करीत आहे.

अभंग चौथा

नरस्तुती आणि कथेचा विकरा । हे नको दातारा घडो देऊ ॥ १ ॥
ऐसीये कृपेची भाकीतो करुणा । आहेसी तू राणा उदारांचा ॥ २ ॥
परावीया नारी आणि परधना । नको देऊ मनावरी येऊ ॥ ३ ॥
भूतांचा मत्सर आणि संतनिंदा । हे नको गोविंदा घडो देऊ ॥ ४ ॥
देह अभिमान नको देऊ शरीरी । चढो काही परी एक देऊ ॥ ५ ॥
तुका म्हणे तुझ्या पायांचा विसर । नको वारंवार पडो देऊ ॥ ६ ॥

हे दातारा ! हे पांडुरंगा ! मी कुणाची स्तुती करीन किंवा कथाकीर्तन करून पैसे घेईन, या गोष्टी मजकडून कधीही घडू देऊ नका. अशा तऱ्हेची कृपा आपण मजवर करावी म्हणून मी आपली करुणा भाकतो आहे. कारण आपण उदारांचे स्वामी आहात. तेव्हा आपण मला हे दान द्याल असा भरवसा वाटतो. तसंच हे गोविंदा ! परक्या स्त्रीची इच्छा आणि दुसऱ्याच्या धनाची इच्छा माझ्या मनात कधीही येऊ देऊ नका. तुकाराम महाराज म्हणतात की, हे विठ्ठला ! तुमच्या पायांचा विसर मला पुन्हा पुन्हा होणार नाही अशी कृपा तुम्ही मजवर करा.

अभंग पाचवा

नाही बळ योग अभ्यास कराया । न कळे ती क्रिया साधनाची ॥ १ ॥
तुझीये भेटीचे प्रेम अंतरंगी । नाही बळ अंगा भजनाचे ॥ २ ॥
काय पांडुरंगा करू बा विचार । झुरते अंतर भेटावया ॥ ३ ॥
तुका म्हणे सांगा वडीलपणे बुद्धी । तुजविण दयानिधी पुसा कोणा ॥ ४ ॥

तुकाराम महाराज म्हणतात की, हे पांडुरंगा ! हे दयानिधे ! अभ्यास करायला किंवा योगसाधना करायला माझ्या अंगात शक्ती नाही. तसंच तुझ्या भेटीसाठी कोणकोणत्या साधनांनी कोणकोणती क्रिया करावी हेही मला माहीत नाही. परंतु तुझ्या भेटीचं प्रेम मात्र माझ्या अंतःकरणात आहे. आणि तरीही माझ्या ठिकाणी भजन करायची शक्ती नाही. हा विचार मनात येऊन काय करावं अन् काय नाही असं मला होऊन जातं आणि मला दुःख होतं. म्हणून हे पांडुरंगा ! वडील ज्याप्रमाणं मुलाला सन्मार्ग दाखवतात, त्याप्रमाणं तुम्ही मला चांगल्या मार्गानं जायची बुद्धी द्या. आता तुम्हीच सांगा की तुमच्याशिवाय मी हे विचारणार तरी कुणाला ?

संत तुकोबांचे साधकावस्थेतील अभंग

अभंग सहावा

किती विवंचना करीतसे जीवी । मन धावंडवी दाही दिशा ॥ १ ॥
कोणा एका भावे तुम्ही अंगीकार । करावा विचार याचसाठी ॥ २ ॥
इतर ते आता लाभ तुच्छ झाले । अनुभवा आले गुणागुण ॥ ३ ॥
तुका म्हणे लागो अखंड समाधी । जावे या बोधी बुडोनीया ॥ ४ ॥

तुकाराम महाराज म्हणतात की, हे पांडुरंगा ! माझं मन दाही दिशांना सारखं भटकत असतं. माझ्या मनात अनेक तऱ्हेचे अनेक विचार सदोदित येत असतात. यामुळं तुम्ही माझा स्वीकार कसा कराल या विषयी मला काळजी वाटते. इतर सर्व लाभ मला आता तुच्छ वाटू लागले आहेत. कारण त्यांचे गुण व अवगुण मी ओळखले आहेत. म्हणून माझी अशी इच्छा आहे की, आपल्या विषयींच्या प्रेमात मी सदोदित बुडून जावं. आपल्याविषयी विचार करताकरताच मला समाधी लागावी हीच माझी उत्कट इच्छा आहे.

अभंग सातवा

धरीतो वासना परी नये फळ । प्राप्तीचा तो काळ नाही आला ॥ १ ॥
तळमळी चित्त घातले खापरी । फुटतसे परी लाहीचीया ॥ २ ॥
प्रकार ते काही नावडती जीवा । नाही पुढे ठावा काळ हाती ॥ ३ ॥

जातो तळा येतो मागुतला वरी । वोळशाचे फेरी सापडलो ॥ ४ ॥
तुका म्हणे बहु करीतो विचार । उतरे डोंगर एक चढे ॥ ५ ॥

तुकाराम महाराज म्हणतात की, हे देवा ! तुमची प्राप्ती व्हावी हेच फळ मला मिळावं अशी माझी फार इच्छा आहे. पण ही इच्छा पूर्ण होण्याची वेळ अजून आलेली नाही असं वाटतं. खापरामध्ये भाजल्या जाताना लाह्या जशा तड्तड् तड्तड् फुटतात, त्याप्रमाणं माझं मन तुमच्या भेटीसाठी तिळ्तिळ् तिळ्तिळ् तुटत आहे. तुमच्या भेटीशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट मला आवडत नाही. आणि पुढं काय होणार आहे हे एका त्या काळालाच ठाऊक ! पाण्यातल्या भोवऱ्यात सापडलेला मनुष्य जसा खालून वर येतो आणि पुन्हा खाली जातो, तसा मी विचारांच्या चक्रात सापडलो आहे. प्रवास करता करता एक डोंगर उतरावा तोच दुसरा डोंगर चढायचा समोर दिसतो. त्याप्रमाणं तुमच्या भेटीचा विचार करता करता मी पुरता गोंधळून गेलो आहे.

अभंग आठवा

संतांचा पढीयावो कैशापरी लाहो । नामाचा आठवो कैसा राहे ॥ १ ॥
हेची थोर चिंता लागली मनासी । निजता निद्रेसी नलगे डोळा ॥ २ ॥
जेवीता जेवण नलगे गोडधड । वाटते काबाड विषय सुख ॥ ३ ॥
ऐसीया संकटी पाव कृपानिधी । लावी संतपदी प्रेमभावे ॥ ४ ॥
तुका म्हणे आम्ही नेणो काही हित । तुजविण अनाथ पांडुरंगा ॥ ५ ॥

तुकाराम महाराज म्हणतात की, हे विठ्ठला ! मला तुमच्या नामाची आठवण कशी राहील आणि मी संतांचा पढीयावो म्हणजे आवडता कसा होईन याची फार चिंता वाटत आहे. मला या गोष्टीची इतकी काळजी वाटते की, त्यामुळे माझ्या डोळ्याला डोळा लागत नाही. मी जेवायला बसलो तर मला जेवणही आवडत नाही. तसंच विषयसुखसुद्धा मला कष्टदायक वाटत आहे. अशा वेळी हे कृपानिधी ! तुम्हीच माझी या संकटातून सुटका करा आणि संतांच्या चरणी प्रेमानं लीन होण्याचा भाव माझ्या मनात निर्माण करा. हे पांडुरंगा ! आमचं हित कशात आहे, हे खरोखर आम्हाला समजत नाही. म्हणून तुम्हीच आम्हाला ते सांगा. तुमच्या कृपेशिवाय आम्ही अनाथ आहोत असं आम्हाला वाटतं.

अभंग नववा

साधकाची दशा उदास असावी । उपाधी नसावी अंतर्बाही ॥ १ ॥
लोलुप्यता काय निद्रेसी जिकावे । भोजन करावे परीमित ॥ २ ॥
एकांती लोकांती स्त्रीयाशी भाषण । प्राण गेल्या जाण बोलो नये ॥ ३ ॥
संग सज्जनांचा उच्चार नामाचा । घोष कीर्तनाचा अहर्निशी ॥ ४ ॥
तुका म्हणे ऐशा साधनी जो राहे । तोची ज्ञान लाहे गुरुकृपा ॥ ५ ॥

अध्यात्मज्ञानाची साधना करणाऱ्या साधकानं कसं वागावं हे या अभंगात सांगितलेलं आहे. परंतु हीच गोष्ट विद्यार्थ्यांनाही तंतोतंत लागू पडते. तुकाराम महाराज म्हणतात की, साधकाची स्थिती उदास असावी. म्हणजे त्याचं मन कशातही गुंतून पडणारं नसावं. आपल्याला हे पाहिजे आणि ते पाहिजे अशा तऱ्हेची हाव त्याला नसावी. म्हणजे त्याचं मन बंधनरहित असावं. त्यानं झोपेला जिंकलं पाहिजे. तसंच त्यानं भोजन थोडसंच केलं पाहिजे. त्यानं एकांत ठिकाणी किंवा सर्वांच्या समोर स्त्रियांच्याबरोबर बोललं न पाहिजे. हा नियम त्यानं पाळलाच पाहिजे. म्हणजे हा नियम विद्यार्थी आणि विद्यार्थिनी या सर्वांनी पाळला पाहिजे. तसंच विद्यार्थ्यानं नेहमी सज्जनांचा सहवास करावा. 'नाम' साधना करावी आणि कीर्तन ऐकावं. अशा नियमानं जो वागेल त्याच्यावर गुरुकृपा होईल आणि त्याला ज्ञानही प्राप्त होईल.

**अभंग दहावा**

**जैसा तैसा आता । मज प्रमाण अनंता ।। १ ।।**
**पाया पडणे न सोडी । पोटी तेची वर तोंडी ।। २ ।।**
**एका भावे चाड । आदी अंती तेची गोड ।। ३ ।।**
**तुका म्हणे आम्हा । टळणेची नाही नेमा ।। ४ ।।**

तुकाराम महाराज म्हणतात की हे अनंता! तू जसा असशील तसाच मला मान्य आहेस. तुझ्या पायावर मस्तक ठेवायचं मी ठरवलं आहे. ते मी मुळीच सोडणार नाही. हीच गोष्ट माझ्या मनात आहे आणि तीच मी तोंडानं सांगत आहे. तुझ्या प्राप्तीसाठी एका शुद्ध भावनेचीच आवश्यकता असते. तो शुद्ध भाव आता सुरुवातीला जसा आहे तसाच शेवटपर्यंत असला तर शेवटही गोड होईल. तुमच्या ध्यानाचा मी जो नियम केलेला आहे, तो मी कधीही सोडणार नाही.

संत तुकाराम महाराज यांनी मनाला उद्देशून केलेले अभंग.

---

**अभंग अकरावा**

**दुर्बुद्धी ते मना । कदा नुपजो नारायणा ।। १ ।।**
**आता मज ऐसे करी । तुझे पाय चित्ती धरी ।। २ ।।**
**उपजला भावो । तुझ्या कृपे सिद्धी जावो ।। ३ ।।**
**तुका म्हणे आता । लाभ नाही या परता ।। ४ ।।**

तुकाराम महाराज म्हणतात की हे देवा! तू माझ्या मनात वाईट विचार येऊ देऊ नकोस. मी तुझे पाय माझ्या चित्तात धरीन, अशी बुद्धी तू मला दे. ही भावना माझ्या मनात निर्माण झाली आहे तर ती तुझ्या कृपेनंच

सिद्धीला जाऊ दे. कारण या शिवाय दुसरा कोणताही लाभ मला श्रेष्ठ वाटत नाही.

**अभंग बारावा**

**होऊ नको काही या मना आधीन । नाईके वचन याचे काही ॥ १ ॥**
**हटीयाची गोष्टी मोडून टाकावी । सोयी ही धरावी विठोबाची ॥ २ ॥**
**आपुले आधिन करुनीया ठेवा । नाहीतरी जीवा घातक हे ॥ ३ ॥**
**तुका म्हणे झाले जे मना आधिन । तयासी बंधन यम करी ॥ ४ ॥**

तुकाराम महाराज म्हणतात की आपण आपल्या मनाला आपल्या ताब्यात ठेवावं. त्याच्या म्हणण्याप्रमाणं वागू नये. कारण मन फार हट्टी असतं. म्हणून त्याला ईश्वर भजनात लावावं. तसंच त्याचं म्हणणं खोडून काढावं. नाहीतर आपलं मनच आपल्या नाशास कारण होतं. जे लोक आपल्या मनाच्या अधीन झाले त्यांना यम शिक्षा करतो.

**अभंग तेरावा**

**मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण**
**मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ॥ १ ॥**
**मने प्रतिमा स्थापिली । मने मन पूजा केली**
**तरी इच्छा पुरविली । मन माऊली सकळांची ॥ २ ॥**
**मन गुरु आणि शिष्य । करी आपुलेची दास्य**
**प्रसन्न आपआपणास । गती अथवा अधोगती ॥ ३ ॥**
**साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात**
**नाही नाही आन दैवत । तुका म्हणे दुसरे ॥ ४ ॥**

तुकाराम महाराज म्हणतात की, हे लोकहो ! तुम्ही आपल्या मनाला आनंदित करा. कारण आपलं मन हेच आपल्या यशाचं कारण असतं. मोक्ष मिळवायचा म्हणजे आपली उन्नती करून घ्यायची किंवा आपण बंधनात अडकून पडायचं हे आपल्यावरच अवलंबून आहे. आपण मनानं जे ध्येय ठरवलं असेल त्याची आपण पूजा करावी. म्हणजे त्यासाठी आपण तपश्चर्या करावी. अशानं आपली मन माउली आपली इच्छा पूर्ण करील. आपलं मनच आपला गुरु आणि शिष्य आहे. त्याला ताब्यात ठेवून त्याच्याकडून कार्य करवून घेतलं पाहिजे. म्हणजे आपण आपल्याशीच प्रसन्न राहू. आपण असं वागलो तरच आपली उन्नती होते, नाहीतर आपली अधोगती होते. म्हणून हे विद्यार्थ्यांनो ! वाचकांनो ! पंडितांनो ! वक्त्यांनो ! आणि श्रोत्यांनो! तुम्ही माझं म्हणणं ऐका. आपल्या मनाहून दुसरं कोणतंही आणखी दैवत नाही हे लक्षात ठेवा.

संत तुकाराम महाराज म्हणतात की, 'नाम' आवडीनं घ्या

**अभंग चौदावा**

नामाची आवडी तोची जाणा देव । न धरी संदेह काही मनी ।। १ ।।
ऐसे मी हे नाही बोलत नेणता । आणोनी संमता संतांचीया ।। २ ।।
नाम म्हणे तया आणिक साधन । ऐसे हे वचन बोलो नये ।। ३ ।।
तुका म्हणे सुख पावे या वचनी । ज्याची शुद्ध दोन्ही मायबापे ।। ४ ।।

तुकाराम महाराज म्हणतात की देवाच्या नावाची आवड असणं म्हणजेच देवावर विश्वास ठेवण्यासारखं आहे. हे मी आपल्याला उगीचच सांगत आहे असं समजू नका. तर सर्व संतांची संमती घेऊनच हे मी तुम्हाला सांगत आहे. जो नाम म्हणतो त्याला आणखी दुसऱ्या साधनाची आवश्यकता नसते. ज्यांचे आईबाप शुद्ध चारित्र्याचे असतील त्यांचा या माझ्या बोलण्यावर विश्वास बसेल असं मला वाटतं.

**अभंग पंधरावा**

नाम संकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची ।। १ ।।
न लगे सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ।। २ ।।
ठायीच बैसोनी करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ।। ३ ।।
रामकृष्णहरी रामकृष्णहरी । मंत्र हा जपावा सर्वकाळ ।। ४ ।।
यावीण असता आणिक साधन । वहातसे आण विठोबाची ।। ५ ।।
तुका म्हणे सोपे आहे सर्वाहूनी । शहाणा तो धनी घेई येथे ।। ६ ।।

तुकाराम महाराज म्हणतात की, रामकृष्णहरी हा नाममंत्र म्हणणं, कीर्तन करणं किंवा ऐकणं ही साधनं सोपी असली तरी त्यांच्यामुळं जन्मोजन्मींची पापं जळून जातील. यासाठी अरण्यात जायची आवश्यकता नाही. आपलं मन एकाग्र करून भगवंताला आळवल्यास तो आपल्या अंतःकरणरूपी घरात सुखानं राहू लागतो. म्हणून रामकृष्णहरी या मंत्राचा तुम्ही अखंड जप करा. या शिवाय अन्य साधन नाही. असं मी आपल्याला विठ्ठलाची शपथ घेऊन सांगत आहे. हे साधन फारच सोपं आहे. जो शहाणा मनुष्य आहे, तो या वचनाप्रमाणं वागतो.

**अभंग सोळावा**

न कळे ते कळो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचीया ।। १ ।।
न दिसे ते दिसो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचीया ।। २ ।।
न भेटे ते भेटो येईल उगले । नामे या विठ्ठले एकाचीया ।। ३ ।।

अलभ्य तो लाभ होईल अपार । नाम निरंतर म्हणता वाचे ।। ४ ।।
तुका म्हणे जीव आसक्त सर्वभावे । तरतील नामे विठोबाच्या ।। ५ ।।

तुकाराम महाराज म्हणतात की, विठोबाचं नामस्मरण केल्यानं न कळणाऱ्या गोष्टी कळू लागतील. नामस्मरणानं न दिसणाऱ्या गोष्टी दिसू लागतील. नामस्मरणानं जे अजून भेटलं नाही ते भेटेल. नामस्मरणानं असे अनेक अलभ्य लाभ होतील. नामस्मरणामुळं आपण सर्वजण संसारातून तरून जाऊ.

संत, सद्गुरु स्वामी तुकाराम महाराज सांगतात की, नामामुळं वाचा पिकली.

---

अभंग सतरावा

दसरा दिवाळी तोची माझा सण । सखे हरीजन भेटतील ।। १ ।।
अमाप जोडल्या पुण्याचीया राशी । पार त्या सुखासी नाही लेखा ।। २ ।।
धन्य दिवस आजी झाला सोनीयाचा । पिकली हे वाचा रामनामे ।। ३ ।।
तुका म्हणे काय होऊ उतराई । जीव ठेवू पायी संतांचीया ।। ४ ।।

आज माझे सखे हरिजन म्हणजे हरिभक्त मला भेटले आहेत. त्यामुळं दसरा-दिवाळी आली म्हणजे जसा आनंद होतो तसा मला हर्ष झाला आहे. अगणित पुण्याच्या राशी झाल्यानं हे सुख मला प्राप्त झालं आहे. खरोखर या सुखाची महती सांगता येणार नाही. आजचा हा दिवस सोन्याचा झाला आहे. कारण वाचेला रामनामाचं पीक आलं आहे. तुकाराम महाराज म्हणतात की, या संतांचा मी कसा उतराई होऊ म्हणजे त्यांचे उपकार मी कसे फेडू हे मला समजत नाही. म्हणून मी त्यांच्या चरणावर माझं मस्तक ठेवलं आहे.

अभंग अठरावा

नव्हती माझे बोल जाणा हा निर्धार । मी आहे मजुर विठोबाचा ।। १ ।।
निर्धारा वचने सोडविले माझ्या । कृपाळू वे लज्जा राखीयेली ।। २ ।।
निर्भय मानसी झालो आनंदाचा । गोडावली वाचा नामघोषे ।। ३ ।।
आता माझे भय नासले संसारी । जाहलो यावरी गगनाचा ।। ४ ।।
तुका म्हणे हा तो संतांचा प्रसाद । लाधलो आनंद प्रेमसुख ।। ५ ।।

तुकाराम महाराज म्हणतात की हे लोकहो ! मी, जे काही बोलत आहे ते माझे शब्द नाहीत असं तुम्ही समजा. मी तर विठोबाचा दास आहे. जो विठ्ठल प्राप्तीचा निश्चय मी केला होता त्याची लाज या देवानं राखली. म्हणूनच माझं मन निर्भय झालं आहे आणि माझ्या मनात फक्त आनंद भरलेला आहे. आता माझी वाणी नामघोषामुळं गोडावली आहे. माझं संसारामधलं भय नाहीसं झालं आहे. मी या आकाशाचा झालो आहे. म्हणजे ईश्वर जसा सर्व

आकाश व्यापून आहे. तसाच मी झालो आहे. हे लोकहो ! या संतांचा प्रसाद मिळाल्यामुळं या सुखाची मला प्राप्ती झाली आहे.

संत, सद्गुरु स्वामी तुकाराम महाराज यांचा आपणा सर्वांना उपदेश.

---

अभंग एकोणिसावा

भावे गावे गीत । शुद्ध करुनीया चित्त ।। १ ।।
तुज व्हावा आहे देव । तरी हा सुलभ उपाव ।। २ ।।
आणिकांचे कानी । गुणदोष मना नाणी ।। ३ ।।
करी मस्तक ठेंगणा । लागे संताच्या चरणा ।। ४ ।।
तुका म्हणे फार ... । करी थोडा तरी उपकार ।। ५ ।।

तुकाराम महाराज म्हणतात की, हे लोकहो ! तुम्हाला देवाला भेटायचं आहे ना ? मग तुम्ही चित्त शुद्ध करून भक्तिभावानं भगवंताचं गीत गा. हा सर्वांत सोपा मार्ग आहे. दुसऱ्याचे दोष कानांनं ऐकू नका आणि मनानंही त्यावर विचार करू नका. उलट संतांच्या चरणावर मस्तक ठेवा. आणि दुसऱ्यांच्या जेवढं उपयोगी पडता येईल तेवढं पडा. हाच ईश्वराला भेटायचा सोपा मार्ग आहे.

अभंग विसावा

साधने तरी हेची दोन्ही । जरी कोणी साधील ।। १ ।।
परद्रव्य परनारी । यांचा धरी विटाळ ।। २ ।।
देव भाग्ये येती घरा । संपत्ती त्या सकळा ।। ३ ।।
तुका म्हणे ते शरीर । घर भांडार देवाचे ।। ४ ।।

तुकाराम महाराज म्हणतात की, हे लोकहो ! तुम्ही कमीत कमी दोन गोष्टींचं तरी पालन करा. त्या ह्या की दुसऱ्याचं धन आणि स्त्री यांची इच्छा धरू नका. म्हणजे मग तुम्ही भाग्यवान होऊन देव तुमच्या घरी येईल. तसंच सर्व तऱ्हेची संपत्ती तुम्हाला प्राप्त होईल. तुमचा देह हेच ईश्वराचं घर होईल. आणि तुमच्या ठिकाणी देव वास्तव्य करू लागेल. देवाच्या प्राप्तीचा हा मार्ग आहे.

अभंग एकविसावा

वेद आनंद बोलला । अर्थ इतुकाची साधला ।। १ ।।
विठोबासी शरण जावे । निज निष्ठे नाम गावे ।। २ ।।
सकळ शास्त्रांचा विचार । अंती इतुकाची निर्धार ।। ३ ।।
अठरा पुराणी सिद्धांत । तुका म्हणे हाची हेत ।। ४ ।।

चारही वेदांनी पुष्कळ वर्णन करून सांगितलं आहे. त्या सर्व सांगण्याचा अर्थ इतकाच की, आपण विठ्ठलाला भक्तीभावानं शरण जावं. आणि निष्ठापूर्वक भगवंताचं नाम घ्यावं. सर्व शास्त्रांनीही हाच विचार मांडलेला आहे. आणि हे

सर्व त्यांनी निश्चयपूर्वक सांगितलेलं आहे. अठरा पुराणांनी सुद्धा हाच सिद्धांत मांडलेला आहे. तुकाराम महाराज म्हणतात की, हे सर्व लक्षात घेऊन आपण देवाला शरण जाण्यात आपलंच हिच आहे.

अभंग बाविसावा

देव सखा जरी । जग अवघे कृपा करी ।। १ ।।
ऐसा असोनी अनुभव । कासावीस होती जीव ।। २ ।।
देवासी जतन । त्यासी बाधू न शके अग्न ।। ३ ।।
तुका म्हणे हरी । प्रल्हादासी यत्न करी ।। ४ ।।

ईश्वर आपला सखा असला तर सर्वजण आपल्यावर कृपा करतात. असा अनुभव येऊनही लोक उगीचच दुःखी होतात. देव ज्याला सांभाळतो त्याला अग्नीही जाळू शकत नाही. म्हणूनच तर देव तारी त्याला कोण मारी असं म्हणतात. तुकाराम महाराज म्हणतात की, देवानं प्रल्हाद भक्ताचा सांभाळ केला की नाही ?

अभंग तेविसावा

परावीया नारी माऊली समान । मानीलीया काय वेचे सांगा ।। १ ।।
न करिता पर निंदा परद्रव्य अभिलाषा । काय तुमचे यास वेचे सांगा ।। २ ।।
बैसलीये ठायी म्हणता रामराम । काय होय श्रम ऐसे सांगा ।। ३ ।।
संतांचे वचनी मानिता विश्वास । काय तुमचे यास वेचे सांगा ।। ४ ।।
खरे बोलता कोण लागती सायास । काय वेचे यास ऐसे सांगा ।। ५ ।।
तुका म्हणे देव जोडे याचसाठी । आणिक ते आटी न लगे काही ।। ६ ।।

दुसऱ्याच्या स्त्रीला माउली समान समजल्यास तुमचा काय खर्च होणार आहे ? दुसऱ्यांची निंदा न केल्यास आणि दुसऱ्यांच्या धनाची हाव न धरल्यास तुमचा काय खर्च होणार आहे ? शांत चित्तानं एका ठिकाणी बसून रामराम म्हटल्यास तुम्हाला काय कष्ट पडणार आहेत ? संतांच्या सांगण्यावर विश्वास ठेवल्यास तुमचं काय नुकसान होणार आहे ? खरं बोलल्यास तुम्हाला काय कष्ट पडणार आहेत ? तुकाराम महाराज म्हणतात की, या सर्व गोष्टी करणं म्हणजेच देवाला जोडणं होय. या शिवाय दुसरी कोणतीही खटपट करायला नको.

अभंग चोविसावा

उंच निंच भेद नेणे भगवंत । तिष्ठे भाव भक्त देखोनीया ।। १ ।।
दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्याघरी रक्षी प्रल्हादासी ।। २ ।।
येकोबाचे रुण फेडी हृषीकेशी । अंब ऋषीचे सोशी गर्भवास ।। ३ ।।
गौळीयांचे घरी गायी अंगे वळी । द्वारपाल बळी द्वारी झाला ।। ४ ।।
अर्जुनाचे रथी होय हा सारथी । भक्षी पोहे प्रीती सुदाम्याचे ।। ५ ।।

चर्म रंगू लागे रोहीदासा संगे । कबीराच्या मागे विणी शेले ॥ ६ ॥
सजन कसाया विकू लागे मास । सावत्या माळ्या संगे खुरपू लागे ॥ ७ ॥
नरहरी सोनारा घडू फुंकू लागे । चोख्या मेळ्या संगे ढोरे ओढी ॥ ८ ॥
नाम्यासवे जेवी नव्हे संकोचित । ज्ञानीयाची भिंत अंगे ओढी ॥ ९ ॥
नामयाची जनी सवे वेची शेणी । धर्माघरी पाणी वाहे झाडी ॥१०॥
मिराबाई साठी घेतो विषप्याला । दामाजीचा झाला पाडेवार ॥११॥
घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी मेहत्याची अंगे भरी ॥१२॥
पुंडलिकासाठी अजुनी तिष्ठत । तुका म्हणे मात धन्य त्याची ॥१३॥

देव भावाचा भुकेला असतो. तो भक्ताची जात पहात नाही. भक्त उंच जातीत जन्मला आहे का नीच जातीत जन्मला आहे हे देव पहात नाही. देवानं दासीपुत्र विदुराच्या कण्या खाल्ल्या आणि दैत्यकुळात जन्मलेल्या प्रल्हादाचं रक्षण केलं. देवानं एकनाथाचं कर्ज फेडलं आणि अंबऋषीचा गर्भवास सहन केला. गवळयांच्या घरी देवानं गायी राखल्या आणि बळीराजाचं द्वारपालाचं काम केलं. देव अर्जुनाच्या रथाचा सारथी झाला आणि त्यानं सुदाम्याचे पोहे प्रेमानं खाल्ले. रोहीदासाबरोबर देव चामडं रंगवू लागला आणि कबीराच्या बरोबर देवानं शेले विणले. देवानं सजन कसायाबरोबर मांस विकलं आणि सावत्या माळयाबरोबर शेत निंदण्याचं काम केलं. नरहरी सोनाराला दागिने बनविण्यासाठी भाता फुंकायचं आणि दागिने घडवण्याचं काम देवानं केलं. तसंच देव चोखामेळ्याला मेलेली ढोरं ओढू लागला. देवानं नामदेवाबरोबर जेवण केलं आणि ज्ञानोबाची भिंत स्वतः ओढली. नामदेवाच्या जनीबरोबर देव शेण वेचू लागला आणि धर्मराजाच्या घरी देवानं पाणी वाहण्याचं व झाडून काढायचं काम केलं. मिराबाईचा विषाचा प्याला देवानं घेतला आणि दामाजीसाठी देव महार बनला. देवानं गोऱ्या कुंभाराची माती स्वतः वाहिली आणि देव त्याला मडकी घडू लागला. नरसी मेहत्याची हुंडी देवानं स्वतः भरली. भक्त पुंडलीकासाठी देव अजून वाट पहात विटेवर उभा आहे. तुकराम महाराज म्हणतात की, भक्तासाठी त्या विठ्ठलाचं असं वागणं खरोखर धन्य होय.

### अभंग पंचविसावा

देही असोनीया देव । वृथा फिरतो निर्दैव ॥ १ ॥
देव आहे अंतर्यामी । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामी । २ ॥
नाभी मृगाचे कस्तुरी । व्यर्थ हिंडे वनांतरी ॥ ३ ॥
साखरेचे ऊस मूळ । तैसा देही दिसे देव ॥ ४ ॥

दुधी असता नवनीत । नेणे तयाचे मथीत ॥ ५ ॥
तुका सांगे मूढ जना । देही देव का पहाना ॥ ६ ॥

खरं पाहिलं तर देव आपल्या देहातच असतो. त्याच्या शोधासाठी आपण इकडेतिकडे भटकू नये. कारण देव हा आपल्या अंत:करणात असतो. आपण देवाला शोधण्यासाठी तीर्थाच्या गावाला उगीचच जातो. कस्तुरी ही मृगाच्या नाभीत असते. तसाच देव हा आपल्या अंत:करणात असतो. उसापासून साखर बनते. तसाच देवही आपण आपल्या मनात पाहिला पाहिजे. दुधापासूनच लोणी बनतं. हे आपण लक्षात ठेवावं. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात की, हे अज्ञ लोकहो ! तुम्ही देवाला आपल्या अंत:करणातच शोधा आणि उगीच इकडेतिकडे जाऊ नका.

अभंग सव्विसावा

अग्नी हा पाचारी कोणासी साक्षेपे । हिवे तोची तापे जाऊनीया ॥ १ ॥
उदक काय म्हणे याहो मज प्यावे । तहानेला धावे सेवावया ॥ २ ॥
वस्त्र काय म्हणे या हो मज नेसा । आपुली स्वइच्छा जग ओढी ॥ ३ ॥
तुकया स्वामी म्हणे काय मज स्मरा । आपुल्या उद्धारा लागूनीया ॥ ४ ॥

अग्नी हा हाक मारून कुणाला बोलावतो का ? परंतु ज्याला थंडी वाजते तो स्वत:हूनच अग्नीजवळ जातो. तसंच पाणी मला प्या म्हणून कुणाला म्हणते का ? पण ज्याला तहान लागते तो स्वत:च पाणी प्यायला जातो. त्याच प्रमाणं मला नेसा असं वस्त्र म्हणतं का ? आपणच लज्जा रक्षणासाठी कपडे घालतो. तुकाराम महाराज म्हणतात की माझं स्मरण करा असं देव कधीतरी म्हणतो का ? पण आपल्या उद्धारासाठी आपण स्वत:च भगवंताचं भजन केलं पाहिजे.

संत तुकाराम महाराज यांची राष्ट्राच्या उद्धारासाठी तळमळ

अभंग सत्ताविसावा

एकमेका साह्य करू । अवघे धरू सुपंथ ॥ १ ॥
कोण जाणे कैसी परी । पुढे उरी ठेवीता ॥ २ ॥
अवघे धन्य होऊ आता । स्मरवीता स्मरण ॥ ३ ॥
तुका म्हणे अवघी जोड । ते आवडी चरणांचा ॥ ४ ॥

आपण सर्वजण एकमेकांना मदत करू या आणि आपण सर्वजण योग्य मार्गानं जाऊ या ! आपण जर असं केलं नाही तर पुढं कोणतं संकट ओढवेल याचा नेम नाही. म्हणून आपण एकमेकांना चांगल्या गोष्टींचं स्मरण करून देऊ या आणि आपण धन्य होऊ या ! तुकाराम महाराज म्हणतात की, ईश्वराच्या चरणांची प्राप्ती आपल्याला व्हावी या विषयी आपल्याला अंत:करणापासून आवड असली पाहिजे.

अभंग अठ्ठाविसावा

धर्म रक्षावयासाठी । करणे आटी आम्हासी ॥ १ ॥
वाचा बोलू वेदनीती । करू संती केले ते ॥ २ ॥
न बाणता स्थिती अंगी । कर्म त्यागी मूर्ख तो ॥ ३ ॥
तुका म्हणे अधम त्यासी । भक्ती दूषी हरीची ॥ ४ ॥

तुकाराम महाराज म्हणतात की, धर्माचं रक्षण करण्यासाठीच आम्ही हा एवढा खटाटोप करीत आहोत. वेदांनी जे सांगितलं आहे तेच आम्ही सांगत आहोत. तसंच पूर्वीच्या संतांनी जे केलं तेच आम्ही करीत आहोत. आपल्या अंगी ब्रह्म-स्थिती जोपर्यंत आलेली नाही तोपर्यंत आपण आपलं कर्तव्य केलं पाहिजे. जो मनुष्य हरिभक्तीला दूषण देतो तो अधम होय.

अभंग एकोणतिसावा

धर्माचे पाळण । करणे पाखांड खंडण ॥ १ ॥
हेची आम्हा करणे काम । बीज वाढवावे नाम ॥ २ ॥
तीक्ष्ण उत्तरे । हाती घेऊनी बाण फिरे ॥ ३ ॥
नाही भीडभाड । तुका म्हणे सानाथोर ॥ ४ ॥

पाखांड मताचं खंडण करणं म्हणजे ईश्वर नाही असं म्हणणाऱ्यांचं मत खोडून काढणं आणि भगवंताचं नाम वाढवणं हेच कार्य आम्ही करीत आहोत. हे करणं म्हणजे धर्माचं पालन करणं होय. यासाठी शब्दरूपी तीक्ष्ण बाण हातात घेऊन आम्ही फिरत आहोत. या कामी आम्ही कुणाचीही पर्वा करीत नाही. असं तुकाराम महाराज म्हणतात.

अभंग तिसावा

उपकारासाठी केले हे उपाय । येणेवीण काय चाड आम्हा ॥ १ ॥
बुडता हे जन न देखवे डोळा । येतो कळवळा म्हणवूनी ॥ २ ॥
तुका म्हणे माझे देखतील डोळे । भोग देत वेळे येईल कळो ॥ ३ ॥

लोकहो ! आम्ही आपल्याला परमार्थाविषयी जे उपाय सांगितले आहेत ते तुमच्यावर उपकार करण्यासाठीच होय. नाहीतर आम्हाला याची काय गरज होती ? तुम्ही अज्ञानी लोक कसे त्राही त्राही होत आहात हे पाहून आम्हाला तुमचा कळवळा येतो. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात की, या संसारी जीवांना जेव्हा केलेल्या कर्माचं फळ भोगावं लागेल तेव्हा आम्ही सांगितलेल्या गोष्टी यांना कळून येतील.

अभंग एकतिसावा

आम्ही वैकुंठवासी । आलो याची कारणासी
बोलीले जे ऋषी । साच भावे वर्ताया ॥ १ ॥

झाडु संतांचे मारग । आडरानी भरले जग
उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवू ।। २ ।।
अर्थे लोपली पुराणे । नाश केला शब्दज्ञाने
विषय लोभी मने । साधन हे बुडविले ।। ३ ।।
पिटू भक्तीचा डांगोरा । कळी काळासी दरारा
तुका म्हण करा । जयजयकार आनंदे ।। ४ ।।

तुकाराम महाराज म्हणतात की आम्ही वैकुंठात राहणारे आहोत. आणि ऋषीमुनी व संत यांनी जे सांगितलं आहे त्या प्रमाणं प्रत्यक्ष आचरण करून दाखवण्यासाठी इथं या भूतलावर आलो आहोत. साधुसंतांनी अध्यात्मज्ञानाचा जो मार्ग सांगितला आहे तो सोडून लोक आडरानात भटकत आहेत. म्हणून साधुसंत ज्या मार्गानं गेले त्याच मार्गानं आम्ही जात आहोत. सध्या पुराणातला खरा अर्थ लुप्त झाला आहे. कारण शाब्दिक अर्थ करणाऱ्यांनी भलताच अर्थ सांगून सर्वनाश केला आहे. लोकांची मनं विषयलोभी झाल्यामुळं पारमार्थिक ज्ञानाचं साधन नाहीसं झालं आहे. म्हणूनच आम्ही हरिभक्तीचा डांगोरा पिटीत आहोत. म्हणजे ईश्वरभक्ती वाढवीत आहोत. यामुळं कळीकाळालाही भय उत्पन्न झालं आहे. म्हणूनच मी म्हणतो की, हे लोकहो ! तुम्ही हरिनामाचा जयजयकार करा.

संत, सद्‌गुरु स्वामी तुकाराम महाराज यांचे सिद्धावस्थेतील अभंग

अभंग बत्तिसावा

आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदची अंग आनंदाचे ।। १ ।।
काय सांगू झाले काहीचीया बाही । पुढे चाली नाही आवडीने ।। २ ।।
गर्भाचे आवडी मातेचा डोहळा । तिथला जिव्हाळा तिथे बिंबे ।। ३ ।।
तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा । अनुभवा सरिसा मुखा आला ।। ४ ।।

तुकाराम महाराज म्हणतात की, आनंदाचा डोह आनंदानं भरला आहे, त्यामुळं त्या डोहातले तरंगही आनंदाचेच झाले आहेत. म्हणून सध्या मला इतका आनंद होत आहे की, मी काही सांगू शकत नाही. मला आता पुढं जावसंही वाटत नाही. मातेच्या मनात गर्भाची आवड असल्यानं तिचा जिव्हाळा गर्भातल्या बालकाच्या ठिकाणी आपोआपच उमटतो. त्या प्रमाणं माझ्या अंतःकरणातला आनंदाचा ठसा माझ्या बोलण्यातून व्यक्त होत आहे.

अभंग तेहतिसावा

स्थिरावली वृत्ती पांगुळला प्राण । अंतरींची खूण पावूनीया ।। १ ।।
पुंजाळले नेत्र झाले अर्धोन्मिलित । कंठ सदगदित रोमांच आले ।। २ ।।

चित्त चाकाटले स्वरूपामाझारी । न निघे बाहेरी सुखावलो ।। ३ ।।
सुनील प्रकाश उदैजला दिन । अमृताचे पान जीवनकळा ।। ४ ।।
शशी सूर्या झाली जीवे ओवाळणी । आनंदा दाटणी आनंदाची ।। ५ ।।
तुका म्हणे सुखे प्रेमेसी डुल्लत । विरालो निश्चित निश्चितीने ।। ६ ।

तुकाराम महाराज म्हणतात की, माझी वृत्ती सध्या स्थिर झालेली आहे. अंतःकरणातल्या भगवंताचं रूप पावन झाल्यामुळं माझा प्राण पांगुळला आहे. म्हणजे मला फार आनंद झाला आहे. माझे डोळे तेजस्वी झाले असून ते सध्या अर्धोन्मिलित आहेत. आनंदामुळं माझा कंठ दाटून आला आहे. माझ्या अंगावर रोमांच आले आहेत. माझं अंतःकरण आतल्याआत इतकं सुखावलं आहे की, ते बाहेर यायलाच तयार नाही. सर्व दूर प्रकाशच प्रकाश दिसत आहे. म्हणून आताच दिवस उगवला आहे असं मला वाटतं. जणू काही अमृताचंच भोजन झालं आहे आणि त्यामुळं माझं जीवन फारच आनंदित झालं आहे. या सुखावरून चंद्रसूर्य ओवाळून टाकावेत असं मला वाटतं. कारण आनंदच आनंद ओसंडून वहात आहे. मी सध्या सुखामुळं सारखा डुलतो आहे आणि अंतःकरणातल्या अंतःकरणात आनंदातिशयानं अगदी निश्चित झालो आहे.

अभंग चौतिसावा

धन्य दिवस आजी डोळीया लाधला । आनंद देखीला धरणीवरी ।। १ ।।
धन्य झाले मुख निवाली रसना । नाम नारायणा घोष करू ।। २ ।।
धन्य हे मस्तक सर्वांग शोभले । संतांची पाऊले लागताती ।। ३ ।।
धन्य आजी पंथे चालती पाऊले । टाळीया शोभती कर दोन्ही ।। ४ ।।
धन्य तुका म्हणे आम्हासी फावले । पावलो पाऊले विठोबाची ।। ५ ।।

तुकाराम महाराज म्हणतात की आज या पृथ्वीवर मी आनंदच आनंद अनुभवत आहे. म्हणून मी धन्य झालो असं मला वाटतं. माझ्या मुखात हरीच्या नामाचा जयघोष सतत होत असल्यानं माझं मुख धन्य झालं आहे. संतांचे चरण माझ्या मस्तकाला लागल्यामुळं माझं मस्तक शोभून दिसत आहे. तसंच माझं सर्व शरीर सुशोभित झालं आहे. हरिनामाचा गजर सतत होत असल्यानं रस्त्यानं चालताना पायांना धन्यता वाटत आहे. त्याचप्रमाणं मी हातानं टाळी वाजवीत असल्यानं तेही शोभून दिसतात. आणि मला विठ्ठलाच्या पाऊलांचा लाभ झाल्यामुळं मी खरोखरच अगदी धन्य धन्य झालो आहे.

१८

# अभ्यास कसा करावा?

उज्जैनच्या माधव महाविद्यालयातले काही विद्यार्थी आणि काही विद्यार्थिनी दसऱ्याच्या सणानिमित्तानं गुरुवार दिनांक १२ ऑक्टोबर, १९६७ रोजी मला भेटायला घरी आल्या होत्या. त्यांच्याबरोबर फराळाचा आणि चहापानाचा कार्यक्रम झाला. बोलता बोलता 'अभ्यास कसा करावा ?' या पुस्तकाविषयीच आमची चर्चा सुरू झाली. या पूर्वीची प्रकरणं विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना ठाऊक असल्यानं त्यांनी मनमोकळेपणानं अनेक प्रश्न मला विचारले. ती झालेली चर्चा उद्‌बोधक असल्यानं इथं सादर करीत आहे. ऐका.

"अभ्यास कसा करावा ? हे अठराव्या लेखाचं नाव आहे. मग आतापर्यंत काय सांगितलं ?"

"गुलाब, मोगरा, जाईजुई अशा तऱ्हेतऱ्हेच्या ताज्या टवटवीत सुगंधित फुलांचा हार आपल्या आराध्य दैवताला अर्पण करण्यापूर्वी कोणकोणती फुलं कुठंकुठं गुंफायची म्हणजे हार शोभून दिसेल हे आपण अगोदर थोडातरी विचार करून ठरवितो. तसंच हाराच्या मध्यभागी किंवा दोन्ही बाजूला कोणकोणती टपोरी फुलं गुंफायची म्हणजे हार शोभून दिसेल हेही आपण हार गुंफतागुंफताच निश्चित करतो. आणि मग गुलाब, मोगरा, जाईजुई यांची एक एक फुल घेऊन त्यांना सुईच्या सहाय्यानं दोऱ्यात गुंफायचं आपलं काम सुरू होतं. नंतर हार पूर्ण झाला असं आपण केव्हा समजतो ? तर फुलं ओवून झाल्यावर हाराचे दोन्ही पदर जवळजवळ आणून त्यांची गाठ बांधल्यावर. नाही का ? आणि मग तो सुगंधित पुष्पांचा हार आपल्या आवडत्या दैवताला आपण भक्तिभावानं अर्पण करतो. त्यामुळं आपल्याला फार आनंद होतो.

हा समोर संत तुकाराम महाराज यांचा फोटो आहे. या फोटोला हा सुगंधित फुलांचा हार मी अर्पण केलेला आहे. तेव्हा मी आपल्याला विचारलं की, फुलांचा हार म्हणजे काय ? तर आपण म्हणाल की, फुलांची केलेली मोहक

गुंफणं म्हणजे हार होय. त्याचप्रमाणं या पुस्तकातल्या आतापर्यंतच्या सतरा लेखानंतर हा अठरावा लेख लिहून हा हाररूपी ग्रंथ मी पूर्ण करीत आहे. या पुस्तकातली आतापर्यंतची चर्चा बारकाईनं वाचणाऱ्या वाचकांच्या एक गोष्ट लक्षात आली असेल की सुरुवातीपासून तर आतापर्यंत अभ्यास कसा करावा ? या विषयीच आम्ही बोलत आहोत. याच एका ध्येयानं प्रेरित होऊन हे पुस्तक आम्ही लिहिलं आहे. केवळ सोयीसाठी वेगवेगळे मथळे देऊन वेगवेगळी प्रकरणं लिहिली आहेत. आणि त्या त्या लेखातला तो तो मथळा सजवण्यासाठी लेखनाचं तंत्र उपयोगात आणलं आहे. आमच्या आतापर्यंत चाळीस लघुकथा प्रकाशित झाल्या आहेत. त्यामुळं लेखनाचं तंत्र अल्प प्रमाणात का होईना पण आम्हाला अवगत झालेलं आहे असं आम्ही म्हणतो. वास्तव प्रत्येक लेख सजवताना त्या लेखातला मुख्य मुद्दा वाचकांच्या मनावर बिंबविण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न केला आहे. याचसाठी त्या त्या लेखातले बारके बारके कप्पेही आम्ही सजविले आहेत. हेतू एवढाच की त्या मुद्द्यानं वाचकाच्या अंतःकरणाची पकड घ्यावी आणि वाचक त्या लेखाशी एकरूप होऊन जावा. म्हणून आतापर्यंत लिहिलेले सतरा लेख अभ्यास कसा करावा या विषयीच आहेत असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही."

"अभ्यास कसा करावा ? या प्रश्नाचं उत्तर देताना आपण सांगितलं आहे की, विद्यार्थ्यांनी दृढनिश्चयी असावं, सतत प्रयत्नावर भर द्यावा, मिळालेल्या संधीचा फायदा करून घ्यावा, नेहमी चांगल्यांचीच संगत धरावी म्हणजे हे करावं आणि ते करू नये असं आपण पुष्कळ सांगितलं आहे. हे सर्व मथळे वाचून असं वाटतं की अभ्यास करण्याची कला काही साधीसुधी गोष्ट नाही, सर्कशीतल्या तारेवरून चालण्यासारखीच ही कठिण गोष्ट आहे किंवा चंद्रावर जाण्यासारखीच अवघड गोष्ट आहे. म्हणजे अभ्यास कसा करावा ? ही गोष्ट फारच अवघड आहे असंच नाही का ?"

"नाही, आम्हाला असं वाटत नाही. शिक्षणाचा मार्ग थोडासा अवघड असतो, हे खरं आहे. परंतु तसं पाहिलं तर सुरुवातीला प्रत्येक गोष्ट अवघडच नसते का ? पण एकदा हिय्या करून आपण उद्योगाला लागलो तर अभ्यास करणं ही गोष्ट फार सोपी आहे, असंच आपल्याला आढळून येतं. आपल्याला तारेवरून चालायची सवय नसते. म्हणून सर्कशीतल्या त्या तारेवरून चालणाऱ्या स्त्री-पुरुषांकडे पाहून 'अरे बापरे ! इतक्या उंचीवरून ही बाई पडली तर ? अन् या तारेवरून सरकणाऱ्या या पुरुषाचा तोल गेला तर ?' असं म्हणून आपण भीतीनं आणि आश्चर्यानं तोंडात बोट घालतो. परंतु त्या सर्कशीतल्या स्त्री-पुरुषांना तारेवरून चालायची सवय असल्यानं त्यांना तारेवरून सरकताना काही वाटत नाही. उंच

तारेवरून चालताना आपण पडू की काय, अशी भीती त्यांना भेडसावीत नाही. सर्कशीतले स्त्री-पुरुष ते ' अवघड ' काम लीलेनं करीत असतात. तसंच जोपर्यंत मनुष्य चंद्रावर पोचत नाही तोपर्यंत ते काम 'अवघड' असंच वाटणार. परंतु मनुष्य चंद्रावर पोचून पृथ्वीचं आणि चंद्राचं दळणवळण एकदाचं सुरू झालं की माणसं चंद्रावर जा व ये करू लागतील. मग कुणालाही चंद्रावर जाणं ही गोष्ट अवघड वाटणार नाही. उलट त्यात काय मोठसं असंच आपण म्हणू !

अगदी हीच गोष्ट अभ्यासाबाबतीतही आहे. सर्व मुलांच्या आणि सर्व मुलींच्या ठिकाणी शिक्षणाची गोडी प्रथम निर्माण झाली पाहिजे. शिक्षण घेतल्याशिवाय आपल्या ठिकाणी असणाऱ्या सुप्त शक्तींना धार येत नाही. उलट त्या सर्व शक्ती हळूहळू गंजून जातात. आणि मग मोठेपणी परिस्थिती पदोपदी आपल्या आड येते. त्या वेळी पस्तावा करण्यापलीकडे आपल्याला काही करता येत नाही. कारण कोणत्या परिस्थितीत कोणती युक्ती योजायची हे बुद्धी धारदार असल्याशिवाय आपण कसं ठरवणार ? आणि बुद्धीला धार लावायची तर आपण शिक्षण नको का घ्यायला ?

यास्तव शिक्षण घेणं हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि ते मी घेणारच; असा मनोमनी प्रत्येक मुलानं आणि मुलीनं लहानपणीच दृढ निश्चय केला पाहिजे. असा संकल्प करून विद्यार्थी आणि विद्यार्थिनी लहानपणापासूनच प्रामाणिकपणानं उद्योगाला लागतील तर त्या शिक्षण घेऊन मोठ्या होऊ शकतील. त्यामुळं त्यांना जातीयतेची, परिस्थितीची, अपमानाचं जीवन जगण्याची आणि सांपत्तिक अडचणींची अशी सर्व बंधनं झुगारून देता येतील. त्यांच्या जीवनाला एक प्रकारची आगळीच चमक येईल. त्यामुळं त्यांचं जीवन सुखी होऊन त्यांना आपल्या आईबापांचं आणि बहीणभावंडांचं जीवन सुखी करता येईल. तसंच त्यांच्याकडे पाहून त्यांच्या जातीतल्या इतर बंधुभगिनींना शिक्षणाची स्फूर्ती मिळेल. असं झालं तर आर्थिक आणि सामाजिक समता स्थापन व्हायला पुष्कळच सहाय्य होणार आहे.

ज्याप्रमाणं नदी पहाडातून वाहताना तो पहाड आडवा आला तर त्याला फोडून बाहेर पडते त्याप्रमाणं हे गरीब शेतकरी, त्या शेतावर काम करणारे मजूर, गिरणीतून काम करणारे हजारो मजूर, डोंगर कपारीतून राहणारे भिल्ल, कातकरी आणि इतर गिरिजन यांच्या मुलामुलींनी दृढ निश्चय करून अंतःकरणापासून शिक्षण घेतलं तर त्यांच्या सर्वांगीण उन्नतीच्या आड येणारा पहाड त्यांना फोडून टाकता येईल. त्यामुळं त्यांचं जीवन सुखी होईल. त्यांनाही सुखानं सुग्रास अन्नाचे दोन घास खाता येतील. त्यांनाही चांगले चांगले कपडे घालता येतील. त्यांनाही टुमदार बंगल्यातून राहता येईल. त्यांनाही त्यांच्या घरासमोर गुलाब, मोगऱ्याची बाग सजवता येईल. त्यांनाही त्या गुलाब, मोगऱ्याच्या फुलांचा सुगंध

अनुभवता येईल. थोडक्यात म्हणजे त्यांनाही माणुसकीचं जिणं जगता येईल. यासाठी प्रथम त्यांच्या ठिकाणी शिक्षणाची गोडी मात्र निर्माण झाली पाहिजे. कारण शिक्षण हे एक असं अमोघ अस्त्र आहे की, त्यामुळं बाकीच्या सर्व अडीअडचणींचा धुव्वा उडवता येतो. म्हणून या अज्ञ बंधुभगिनींच्या मुलामुलींच्या ठिकाणी शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी याची आम्हाला फार फार तळमळ वाटते. त्या तळमळीच्या पोटीच या पुस्तकाचा जन्म झाला आहे.

अहो ! ज्यानं पोहायला शिकायचा निश्चय केला आहे तो पाण्यात उतरल्याशिवाय राहील का ? पाण्यात उतरल्यावर हातपाय हलवल्याशिवाय राहील का ? पोहायला शिकायची हररोज धडपड करता करता काही दिवसातच त्याला थोडं फार तरी पोहायला येईल की नाही ? तसंच या शिक्षणाचंही आहे. एकदा निश्चय करून हे विद्यार्थी शिक्षणाच्या आखाड्यात उतरतील तर अज्ञानरूपी शत्रूला चारही मुंड्या चीत केल्याशिवाय राहणार नाहीत. त्यामुळं त्यांच्या जीवनाचं तर चीज होईलच होईल पण त्यांच्या घराण्याचाही उद्धार होईल. त्यांनी त्यांचा व त्यांच्या घराण्याचा उद्धार करावा हीच तर आमची फार इच्छा आहे.

म्हणून परमेश्वराच्या चरणाची शपथ घेऊन आम्ही पुन्हा एकदा सांगतो की, शिक्षण घेणं ही फार सोपी गोष्ट आहे. आपला निश्चय दृढ असेल, आपण रात्रंदिवस तसा प्रामाणिकपणानं प्रयत्न करीत असू आणि आपल्या अंगी शालीनता असेल तर आपण शिक्षण घेऊन मोठं होऊच होऊ हे आपण सर्वांनी पक्कं लक्षात ठेवावं. कारण हे अज्ञ विद्यार्थी आणि ह्या विद्यार्थिनी शिक्षण घेऊन मोठ्या होतील तर त्यांच्या पुढच्या सर्व पिढ्या शिक्षण घेतल्याशिवाय राहणार नाहीत. कारण पुढं पुढं हे शिक्षणच त्यांना सोडणार नाही. एकदा विद्या संपादन करायची चटक लागली तर ती विद्येची गोडी सारखी वाढतच जाते. म्हणून एवढं जीव तोडून सांगावसं वाटतं की, या लहान लहान मुलांमुलींनी लहानपणीच शिक्षण घेण्याचा दृढसंकल्प करावा."

> "पुढंमागं आपल्या देशात समाजसत्तावाद स्थापन होईलच. मग तेव्हा प्राथमिक शाळेपासून तर पदवी परीक्षेपर्यंत व पुढचंही सर्व शिक्षण सर्व सुखसोयींनी युक्त पण सर्वस्वी मोफत असं सुरू होईल. कारण मुलं-मुली ही राष्ट्राची संपत्ती आहे असं समजलं जाईल. मग तुमच्या या पुस्तकाचा काय उपयोग होईल?"

"आपल्या या खंडप्राय देशात जेव्हा सच्चा समाजवाद स्थापन होईल तेव्हा आम्हाला फार आनंद होईल. कारण त्यावेळी समाजातल्या सर्वच्या सर्व मुलामुलींना शिक्षण घ्यायची संधी मिळेल. तसं झालं आणि या आमच्या पुस्तकाकडे

कुणी ढुंकूनही पाहिलं नाही तरी आम्हाला आनंदच होईल. समाजातले शंभर टक्के लोक सुशिक्षित आणि सुसंस्कृत व्हावेत अशी आमची फार इच्छा आहे. ही गोष्ट सरकारनं आणि समाजानं घडवून आणायची आहे. पण त्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थी यांनीही आपला वाटा उचलला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या ठिकाणी खरी शिक्षणलालसा असेल तर त्यांना अभ्यास करताना खचित आनंद होईल. जसं तहान लागलेल्या माणसाला पाणी प्यायला मिळालं तर आनंद होतो त्याप्रमाणं विद्यार्थ्यांना ज्ञानाची तहान लागली पाहिजे असं आम्हाला वाटतं. कारण ज्ञानाची तहान त्यांना लागलेली नसेल तर शिक्षकांचे, पालकांचे आणि बाकीच्या सर्वांचेच सर्व प्रयत्न पालथ्या घागरीवर पाणी घालण्यासारखेच व्यर्थ जातील. वास्तव विद्यार्थ्यांच्या आणि विद्यार्थिनींच्या ठिकाणी ज्ञानाची जिज्ञासा असली पाहिजे. अर्जुनाच्या ठिकाणी खऱ्या ज्ञानाची जिज्ञासा नसती तर भगवान श्रीकृष्णानं भगवद्गीता त्याला कशाला सांगितली असती ? म्हणून विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाबद्दल उत्सुकता, जिज्ञासा आणि तळमळ निर्माण कशी होईल याची खबरदारी सर्वांनी घेतली पाहिजे.

अभ्यास कसा करावा ? या पुस्तकाचा खटाटोप विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाची जिज्ञासा निर्माण करण्यासाठीच आहे. समाजसत्तावाद स्थापन झाल्यावरही समाजातल्या सर्व थरांतल्या सर्व मुलामुलींच्या ठिकाणी ज्ञानलालसा निर्माण करण्याची आवश्यकता राहीलच. पण समजा पुढं मागं या पुस्तकाची आवश्यकता वाटली नाही आणि या पुस्तकाची जागा दुसऱ्या कोणत्यातरी पुस्तकानं घेतली तरी आम्हाला आनंदच होईल. कारण रचनेचं कौशल्य ही फार महत्त्वाची बाब असते असं आम्ही मानतो. आणि दुसरा कुणी लेखक याहूनही सरस पुस्तक लिहिणार नाही असं आम्ही म्हणत नाही. शिक्षण महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी आपल्या आत्मचरित्रात असं लिहिलं आहे की आमच्या आत्मचरित्राचा उपयोग पुस्त्या काढण्यासाठी एकदा जरी झाला म्हणजे आमचं आत्मचरित्र कुणाला नुसतं एकदा जरी वाचावसं वाटलं तरी आम्ही स्वतःला धन्य समजू. त्याप्रमाणं हे प्रस्तुतचं पुस्तक वाचकांना वाचावसं वाटलं आणि त्यांच्यापैकी शेकडा एकाला जरी स्फूर्ती मिळाली आणि तो कार्यप्रवृत्त झाला तरी हा आमचा प्रयत्न फुकट गेला असं आम्ही समजणार नाही. ”

“ श्रीमंत आईबापांच्या मुलामुलींना या तुमच्या पुस्तकाचा काय उपयोग आहे ? ”

गरीब मुलामुलींच्या मार्गात ज्याप्रमाणं गरिबीचा आणि परिस्थितीचा भस्मासुर आडवा येतो व त्यांना शैक्षणिक उन्नती करता येत नाही, त्याप्रमाणं श्रीमंत मुलामुलींच्या मार्गातही आज एक सैतान उभा ठाकला आहे. आणि तो म्हणजे दुर्बुद्धी होणं हा होय.

तारुण्याचा उन्माद चढलेला असताना आणि खिशात पैसेच पैसे खुळखुळत असताना तरुणतरुणींच्या मनावर सुशिक्षणाचं व सुसंस्काराचं बीज पेरलेलं नसेल तर ती बिघडणार नाहीत असं होणंच शक्य नाही. मग हरतऱ्हेची फॅशन करणं, सिगारेट ओढणं, दारू पिणं, हररोज सिनेमाला जाणं आणि अशा अनेक मार्गांनी आयुष्याची राखरांगोळी करून घेणारी मुलं बघितली की, राष्ट्राची ही केवढी मोठी हानी होत आहे असं वाटून आम्हाला दुःख होतं. आपल्याजवळ पैसा नाही म्हणून आपण आपल्या मुलामुलींना पाहिजे ते शिक्षण देऊ शकत नाही हे पाहून गरीब आईबापांना जशा यातना होतात; तशाच यातना श्रीमंत आई-बापांनाही होतात. कारण आपल्या मुलांना वाईट व्यसनं लागत आहेत आणि आपली मुलं वाईट मार्गानं जात आहेत हे उघड्या डोळ्यांनी पाहाताना श्रीमंत आईबापांची अंतःकरणंही तिळतिळ तुटतात. पण काय करणार ? त्यांच्या भोवता-लच्या उद्योगात ते इतके गुरफटलेले असतात आणि त्यांची मुलं त्यांच्या इतकी आवाक्याबाहेर गेलेली असतात की, त्यांना त्यांच्या मुलामुलींच्या भल्यासाठी काही करता येत नाही.

आजची सुशिक्षणाची आणि सुसंस्कारांची उणीव श्रीमंतांनाही भरडून काढीत आहे. जसं आभाळ फाटलं म्हणजे त्याला आपण कुठंकुठं ठिगळ लावणार ? त्याप्रमाणं काळाबाजार, लाचलुचपत, जातीयता, प्रांतीयता अन् भाषीयता यांचा पगडा समाजातल्या बहुसंख्य लोकांवर बसल्यामुळं समाजातले बहुसंख्य लोक आपापल्या जबाबदाऱ्या पार पाडीत नाहीत. म्हणून द्वेष, मत्सर, आणि एकमेकांना पाण्यात पाहणं या गोष्टींचाच नंगानाच सुरू झाला आहे. त्यामुळं आपण सर्वजण भरडून निघत आहोत. श्रीमंतांना अधिकाधिक धन प्राप्त होत असल्यामुळं ते मग्रूर बनत चालले आहेत आणि गरीबांचे हाल कुणी कुत्रा खाईनासा झाला आहे. यावर उपाय हाच की सुशिक्षणाचं व सुसंस्काराचं बीज जाणत्या लोकांनी पेरलं पाहिजे. या बाबत सरकारनं पुढाकार घेऊन आर्थिक समता प्रथम स्थापन केली पाहिजे. नाहीतर हिंदुस्थानातही रेडगार्डस् स्थापन होऊन सरकारला वठणी-वर आणल्याशिवाय राहणार नाहीत. परंतु अशी झोटिंगशाही नको असेल आणि लोकशाहीच्याच मार्गानं आर्थिक समता स्थापन व्हावी असं सर्व राजकीय पक्षांना वाटत असेल तर त्यांनी तसा जोरदार प्रयत्न केला पाहिजे. कारण तुम्ही गरीबांना फार दिवस अन्नाशिवाय, वस्त्राशिवाय अन् घरदाराशिवाय तडफडून मारू शकत नाही. त्यांचे शाप तुम्हालाच भस्मसात केल्याशिवाय राहणार नाहीत.

हे सुशिक्षणाचं कार्य शिक्षकांनी करायला पाहिजे. कारण तेच खरे राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत असं आम्हाला वाटतं हे आम्ही एका ठिकाणी म्हटलेलंच आहे.

तेव्हा श्रीमंतांच्या मुलामुलींनाही या पुस्तकापासून काही शिकण्यासारखं आहे असं आम्हाला वाटतं."

"या पुस्तकात एका लेखातून आपण शिक्षकांच्यावरही ठपका ठेवला आहे, तो काय म्हणून ?"

"समाजाचे आम्ही चार घटक मानले आहेत. पहिला घटक विद्यार्थी-विद्यार्थिनींचा, दुसरा घटक शिक्षकांचा, तिसरा सरकारचा आणि चवथा समाजाचा. संपूर्ण समाजाची उन्नती या चारही घटकांवर अवलंबून असते. या चार खांबी तंबूतल्या प्रत्येक खांबावर जबाबदारी आहे. तेव्हा त्या प्रत्येकानं आपलं काम इमानानं, तळमळीनं आणि वक्तशीरपणानं करावं असं आमचं म्हणणं आहे. यापैकी समाजाला नीट वळण लावायची सर्वांत जास्त जबाबदारी शिक्षकांची आहे असं आम्हाला वाटतं. म्हणून ज्यांना सत्तेचा, संपत्तीचा आणि सोंगाढोंगांचा तिरस्कार आहे आणि जे फक्त विद्यादेवीची उपासना करण्यातच धन्यता मानतात त्यांनीच या क्षेत्रात उतरलं पाहिजे. त्यांनी आपलं पोट पाठीशी बांधावं असं आमचं म्हणणं नाही. परंतु विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना आपल्याला उत्तम तऱ्हेचं शिक्षण द्यायचं आहे याच ध्येयानं ते प्रेरित झालेले असले पाहिजेत. असं असल्याशिवाय त्यांच्या हातून आदर्श असं आचरण घडणार नाही. असं असलं तरच हे शिक्षक सरकारला, समाजाला आणि विद्यार्थ्यांनाही वठणीवर आणू शकतील. निष्ठावंत शिक्षकांचा, विद्यार्थी आजही आदर करतात असं दिसून येतं. म्हणून अशा शिक्षकांनी पुढं सरसावलं पाहिजे. शिक्षकांनी आणि प्राध्यापकांनी त्यांचं कर्तव्य इमानानं आणि निस्पृहतेनं पार पाडावं अशी त्यांना आमची विनंती आहे. आपण म्हणता की, आम्ही त्यांच्यावर ठपका ठेवला आहे; पण आम्हाला तसं वाटत नाही. शिक्षकांच्या ठिकाणी दोष दिसतात; ते आम्ही सांगितले तर त्याचा राईचा पर्वत करू नका. आम्ही स्वतः प्राध्यापक असताना आम्ही एवढंही केलं नाही तर ज्या उद्देशानं आम्ही हे पुस्तक लिहीत आहोत तो सफल होणार नाही. म्हणून आम्हाला हे करावं लागलं. आपण आमच्या उद्देशाकडे लक्ष ठेवून बारकाईनं वाचलंत तर तुम्ही आम्हाला दोष देणार नाही असं आम्हाला वाटतं !"

"अभ्यास कसा करावा ? या पुस्तकात आपण कोणतं शास्त्र सांगितलं आहे ?"

"शास्त्र या शब्दातला अवघडपणा सोडून दिला तर अभ्यास कसा करावा याचं तंत्र आणि मंत्र आम्ही यात सांगितलं आहे असं आम्हाला वाटतं. त्यालाच तुम्हाला शास्त्र म्हणायचं असेल तर तसं म्हणायला आमची हरकत नाही. अभ्यासूवृत्ती अंगी बाणण्यासाठी विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थिनींनी काही नियमांचं

पालन अगदी काटेकोरपणानं करायला हवं असं आम्हाला वाटतं. कारण हे नियम सदासर्वकाळ मान्य झालेले आहेत. विद्यार्थीदशा म्हणजे भावी आयुष्याच्या तयारीचा काळ होय. भावी आयुष्याची इमारत याच विद्यार्थीदशेवर अवलंबून असते.)

शेतात उत्तम पीक यावं अशी शेतकऱ्याची इच्छा असते. म्हणून तो शेत नांगरून काढतो. नंतर तो शेत वखरून काढतो. तिथल्या काट्याकुट्या तो काढून टाकतो. नंतर शेतात खत घालतो. मध्येच काही भाग उंचसखल असेल तर त्याला बरोबर करतो. शेताच्या चारही बाजूनं कुंपण घालतो. नंतर पाऊस पडल्यावर उत्तम बी पेरतो. पुढं पीक वाढू लागल्यावर तो शेतकरी शेतातलं तण काढून टाकतो. उत्तम पीक येण्यासाठी अशा एक ना दोन हजारो गोष्टी त्या शेतकऱ्याला कराव्या लागतात. हे खरं की खोटं ? शेतकऱ्यानं इतकी काळजी घेतली तरच त्याला उत्तम पीक प्राप्त होतं हे जसं खरं आहे तसंच विद्यार्थ्यांनी विद्याभ्यासासाठी तपश्चर्या केली पाहिजे हेही तितकंच खरं आहे. आम्ही तपश्चर्या शब्द मुद्दाम वापरला आहे. तपश्चर्या याचा अर्थ साधना करणं होय. तेव्हा साधना करायची तर काही नियमांचं पालन अगदी काटेकोरपणानं केलंच पाहिजे. आणि अशी साधना करायची तर कोणकोणत्या नियमांचं पालन करावं आणि कोणकोणत्या गोष्टी करू नयेत हेच आम्ही सांगितलं आहे.

हे सांगताना वाचकांना कंटाळा येऊ नये म्हणून आम्ही दक्षता घेतली आहे. त्यासाठी निवेदनाचं टेक्निक् म्हणजे तंत्र आम्ही शक्य तितक्या चोखंदळपणानं हाताळलं आहे. प्रत्येक गोष्टीत निवेदनाचा वेगळेपणा आणण्याचा प्रयत्न केला आहे. हे आम्ही एवढ्यासाठी सांगत आहोत की, हे असं रचनेचं कौशल्य जर साधलं नसेल तर वाचणाऱ्यांना पुढंपुढं वाचावसं वाटणार नाही. म्हणून रचनेच्या बाबतीत काही कौशल्य असावं असा कटाक्ष आम्ही सुरुवातीपासूनच ठेवलेला आहे. हे झालं रचनेच्या बाबतीत.

आणि दुसरी गोष्ट अशी की, अथपासून तर इतीपर्यंत म्हणजे सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत आम्ही सोपी शब्दरचना उपयोगात आणली आहे, असं आम्हाला वाटतं. हे सर्व पुस्तक आम्ही सोप्या भाषेत लिहिलं आहे, असं प्रमाणपत्र वाचकांच्याजवळून आम्हाला मिळावं अशी आमची फार इच्छा आहे. म्हणजे प्राथमिक शाळेतल्या अगदी चवथी पाचवीतल्या मुलामुलींनी जरी हे पुस्तक वाचलं तरी त्यांनाही सर्व काही समजावं असा प्रयत्न आम्ही प्रत्येक पानापानातून केलेला आहे. तेव्हा या दोन्ही गोष्टी म्हणजे सोपी शब्दरचना आणि वाचणाऱ्यांच्या मनात 'पुढं काय झालं' अशी जिज्ञासा कायम ठेवण्याच्या बाबतीत आम्ही कितपत सफल झालो आहोत हे आपण वाचकांनीच ठरवायचं आहे."

अ. क. क. १४/२

"अभ्यास कसा करावा ? हे पुस्तक
आपण कुणासाठी लिहिलं आहे ? "

"आम्ही या पुस्तकाचं नाव अभ्यास कसा करावा ? असं न ठेवता दुसरं काहीतरी ठेवावं अशी सूचना आमच्या काही मित्रांनी आम्हाला केली होती. त्यांचं म्हणणं असं की अभ्यास कसा करावा? या नावावरून हे पुस्तक फक्त विद्यार्थ्यांच्या-साठीच आहे, असा सर्वांचा ग्रह होईल. त्यामुळं सर्वसामान्य वाचक हे पुस्तक वाचणार नाहीत. तेव्हा मी त्यांना सांगितलं की हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी आणि विद्यार्थिनींसाठी आहे यात तर बिलकूल शंका नाही. म्हणून हेच नाव पुस्तकाला द्यावं असं आम्ही प्रथमपासूनच ठरवलेलं होतं. दुसरं कोणतंही नाव देऊन हे पुस्तक विद्यार्थ्यांनी वाचलं नाही तर ते आम्हाला नको होतं.

आता या नावामुळं हे पुस्तक सामान्य वाचक वाचतील किंवा नाही असा तुमचा प्रश्न आहे. तेव्हा आम्ही आपल्याला असं सांगू इच्छितो की, विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना हे पुस्तक वाचावसं वाटलं आणि त्यांनी वाचून झाल्यावर त्यांचं या पुस्तकाविषयी अनुकूल मत पडलं तर सामान्य वाचकही हे पुस्तक वाचतील असं आम्हाला वाटतं. सध्याचा जमाना जाहिरातींचा आहे. तेव्हा या आमच्या पुस्तकाची जाहिरात होवो किंवा न होवो सामान्य वाचकही हे पुस्तक वाचतील असंच आमचं मन आम्हाला सांगत आहे. हे सांगताना आम्ही सर्व लेख लघुकथे-सारखे चित्ताकर्षक केलेले आहेत, म्हणजे सजवलेले आहेत असं नम्रतेनं सांगू इच्छितो-पण ही गोष्टही अखेरीस आम्ही वाचकांच्यावरच सोपवितो. कारण याचंही उत्तर शेवटी वाचकच देणार आहेत."

"हे पुस्तक लिहिताना आलेले काही अनुभव
सांगू शकाल का ? "

"होय ! का नाही सांगणार ? पण सर्वच अनुभव मात्र सांगण्यासारखे नाहीत. कारण नाकापेक्षा मोती जड असून चालणार नाही. म्हणून फक्त एकच अनुभव मुद्दाम सांगतो.

अभ्यास कसा करावा ? हे पुस्तक लिहून प्रकाशित व्हावं अशी आमची फार वर्षांपासूनची इच्छा होती. म्हणून आम्ही काही प्रकाशकांना तशी विनंतीपत्रं पाठ-विली. परंतु बऱ्याचशा प्रकाशकांनी आम्हाला कळवलं की या विषयावर सर्व काही सांगून झालेलंच आहे. तेव्हा आपण नवीन ते काय सांगणार ? आणि पुस्तकाचा खप कसा होणार ?

परंतु आम्ही मात्र याबाबत निराश झालो नाही. इतर सटरफटर पुस्तकं प्रकाशित होत असताना ज्या पुस्तकासाठी आम्ही इतक्या वर्षांपासून जुळवाजुळव करीत आहोत ते प्रकाशित होऊ नये म्हणून आम्हाला खंत मात्र वाटत होती. म्हणूनच

पुस्तक प्रकाशनाची जिद्द आम्ही सोडली नव्हती. कारण कोणत्याही गोष्टीबाबत रचनेत सारे कौशल्य आहे ही गोष्ट कधीही नजरेआड करून चालण्यासारखी नसते. विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थिनींनी काय काय करावं आणि काय काय करू नये याविषयी काही गोष्टी ठरलेल्याच आहेत. त्या त्रिकालाबाधित आहेत. परंतु त्याच नाविन्यपूर्ण पद्धतीनं सांगितल्या तर विद्यार्थ्यांना हव्या आहेत. या विषयी आमचा आत्मविश्वास होता. आणि म्हणूनच हे पुस्तक प्रकाशित करण्याचा आम्ही निदिध्यास धरला होता. त्यामुळं विरोधी परिस्थितीतच हे पुस्तक प्रकाशित होत आहे. या बाबत आम्ही हेही सांगतो की हेच मुद्दे आणखी कुणी दुसऱ्या पद्धतीनं सांगू शकणार नाही असं आम्ही म्हणत नाही. परंतु आमच्या वाचण्यात आलेल्या सर्व पुस्तकाहून हे पुस्तक वेगळं आहे, कारण वेगळ्या पद्धतीनं आम्ही मुद्दे सजवले आहेत हे मात्र आम्ही सांगितलंच पाहिजे. विषय, मांडणी आणि भाषा या बाबतीत नाविन्याबरोबरच सुलभता आणण्याचीही आम्ही पराकाष्ठा केली आहे, ही गोष्ट वाचकांनाही मान्य होईल असा आम्हाला भरवसा वाटतो. ''

" शिक्षकांनी किंवा आईवापांनी दिलेली शिदोरी आयुष्यभर पुरत नाही असं म्हणतात. तेव्हा तुमच्या या पुस्तकानं तरी असं काय होणार आहे ? ''

" काही फार होणार आहे अशी अपेक्षा पूर्वीही नव्हती आणि आजही नाही. परंतु काही वाचकांना तरी याचा उपयोग होईल असं वाटतं. वाचकांच्यापैकी थोड्यांना जरी स्फूर्ती मिळाली आणि त्यांनी शिक्षणाची कास धरली तरी हा आमचा प्रयत्न सफल झाला असं आम्ही समजू. कुणाचाही प्रयत्न कितीही अल्प प्रमाणात असला तरीही तो फुकट जात नाही. समुद्रकिनाऱ्यावरील अफाट वाळूच्या कणांच्यापैकी एका अगदी अल्प कणाइतकंही काम झालं तरी आमचे प्रयत्न सफल झालेत असं म्हणायला काही हरकत नाही. ''

" देव भावाचा भुकेला ! हा लेख पुस्तकात नसता घातला तर चाललं नसतं का ? ''

" चाललं असतं. परंतु हा लेख असावा असा आमचा कटाक्ष होता. कारण आपलं मन हाच आपला देव आहे असं संत तुकाराम महाराजांनी सांगितलेलं आहे. आम्हीही हेच मानतो. देवळातच देव आहे असं मानणारे आम्ही नाही. काही दिवसापूर्वी आम्ही नर्मदा नदीच्या किनाऱ्यावरील ओंकारेश्वर या तीर्थस्थानाच्या दर्शनाला गेलो होतो. तिथंही 'इथं पैसे ठेवा नि इथं पैसे ठेवा ' असंच सांगणारें पुजारी आम्हाला भेटले. सगळ्या तीर्थांच्या आणि देवदेवस्थानांच्या ठिकाणी असणारे पुजारी हेच सांगतात. देवाच्या नावावर लोकांना लुबाडावं हाच धंदा चालू आहे. ही गोष्ट सर्वस्वी त्याज्य आहे. म्हणून देव देवळात नाही तर आपल्या मनात आहे हे कुणीतरी टाहो फोडून पुन्हा पुन्हा

सांगितलं पाहिजे. ही गोष्ट विद्यार्थ्यांच्या मनावर लहानपणीच बिंबवावी असं आम्हाला वाटतं. देवळात गेल्यानं मनाचं पावित्र्य वाढत असेल तर उत्तमच आहे. परंतु तसं होत नसेल तर देवळात जाण्यात अर्थ नाही हेही मुद्दाम सांगायला पाहिजे.

कुणाही जोवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें ।।

कारण असं जे संत तुकाराम महाराज यांनी सांगितलं आहे तें सर्वांना पुन्हा पुन्हा कळलं पाहिजे. विद्यार्थ्यांनी निव्वळ टाळ कुटणारे न होता विद्याव्यासंगी व्हावं असं आम्हाला वाटतं. परंतु भक्तिभावानं जे भजन करतात, मृदंग वाजवतात, टाळ वाजवतात, देवाला आळवतात अन् गोरगरीबांच्या उपयोगी पडतात त्या सच्चा हरिभक्तांच्या चरणी आम्ही आमचं मस्तक सतत ठेवलेलं आहे हेही आम्ही इथं स्पष्ट सांगू इच्छितो. पण सध्या भोंदू भक्तांचाच सुळ-सुळाट झालेला आहे. त्यामुळं खरं ज्ञान लुप्त होत आहे.

वास्तविक पाहिलं तर अध्यात्मज्ञान हे उच्चतर ज्ञान आहे. सात्त्विक भावने-शिवाय ते साध्य होण्यासारखं नाही. ज्ञानाहून दुसरं काहीही पवित्र या जगात नाही हे श्रीकृष्णानं अर्जुनाला सांगितलं आहे. तेच वाचकांच्या मनावर ठसावं अशी आमची अपेक्षा आहे. म्हणून खरा हरिभक्त कसा असतो हे आम्ही संत तुकाराम महाराज यांच्याच शब्दात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आणि म्हणूनच देव भावाचा भुकेला हे प्रकरण आम्ही या पुस्तकात मुद्दाम घातलं आहे."

"अभ्यास कसा करावा या पुस्तकाचा सारांश
थोडक्यात सांगता का ?"

"सारांशच सांगायचा म्हटला तर मी असं म्हणेन की तुम्ही प्रत्येक लेखाचा नुसता मथळा वाचा म्हणजे झाला सारांश वाचून! परंतु तेवढ्यानं लेखकाचं अंतरंग तुम्हाला समजेल असं वाटत नाही. कोणत्याही पुस्तकाचं अंतरंग समजण्या-साठी त्या पुस्तकाच्या लेखकाशी आपण एकरूप झालं पाहिजे. हे जोपर्यंत आपण करणार नाही तोपर्यंत त्या पुस्तकातलं मर्म आपल्या लक्षात येत नाही. म्हणून मी आपल्याला असं सांगतो की, आपण हे पुस्तक निदान एकदा तरी वाचा.

आमचे एक मित्र डॉक्टर विष्णु दत्तात्रय मुंगी यांचा स्वतंत्र दवाखाना माधव-नगरमध्ये आहे. त्यांना साहित्याचीही गोडी आहे. पण त्यांना वाचायला फारसा वेळ मिळत नाही. दर दिवशी जवळजवळ आठ नऊ तास त्यांचे दवाखान्यातच जातात. आणि दोनतीन तास घरी आलेल्या आजाऱ्यांना तपासण्यात जातात. जसा वेळ मिळेल तसा मी त्यांच्याजवळ जाऊन बसतो. तेव्हा एकदा या पुस्तकाविषयी मी त्यांच्याजवळ बोललो. तेव्हा ते म्हणाले,

"दाभाडे साहेब ! आम्हाला तुमचा एकेक लेख दाखवा ! आम्ही सर्व लेख

सवडीसवडीप्रमाणं ऐकायला तयार आहोत. पण यासाठी एक अट मात्र आहे!"
हे ऐकून मी म्हटलं,

"कोणती?"

"ती अशी की एक जरी लेख ऐकताना आम्हाला कंटाळा आला तर तुमचं पुस्तक आम्ही विकत घेणार नाही. परंतु तुम्हाला मात्र पुस्तकाची एक प्रत तशीच द्यावी लागेल!"

आणि आता तुम्हाला सांगायला मला आनंद होतो की त्या डॉक्टर मित्रांना आतापर्यंतचे सर्व लेख आवडले आहेत. सबंध पुस्तक घेऊन स्वतःशीच वाचण्यासाठी ते उत्सुक आहेत. प्रकाशित झाल्यावर पुस्तक विकत घ्यायला ते एका पायावर तयार आहेत.

म्हणून आपल्याला असं सांगावसं वाटतं की या पुस्तकाचा सारांश माझ्या तोंडून वदवून घेण्यापेक्षा आपण हे पुस्तक वाचायला घ्या. तुम्हालाही खात्रीनं आवडेल असं वाटतं. मग तुम्ही 'सारांश सांगा!' असं मला म्हणणार नाही. कारण हे पुस्तक वाचून सारांश काढायचं काम खरोखर वाचकांनीच करायचं आहे. नाही का?"

"या पुस्तकात सांगितलेल्या घटना खऱ्या आहेत की काल्पनिक?"

"ललित साहित्यात सत्य आणि काल्पनिक यांचा योग्य संगम घडवून आणलेला असतो. तेव्हा त्याच सिद्धांताप्रमाणं या घटना आम्ही रंगविलेल्या आहेत. परंतु ज्या ज्या व्यक्तींच्याविषयी आम्ही लिहिलं आहे त्यांची त्यांची नावंच तेवढी आम्ही बदलली आहेत. बाकीचं जवळजवळ सर्वच वर्णन खरं आहे असं म्हणायला हरकत नाही.

म्हणूनच आम्ही असं म्हणतो की त्या त्या व्यक्तीची आम्ही आपल्याला पुस्तकात तर भेट घडविलीच आहे पण आपण आम्हाला भेटून विचारलंत की, "अहो! कुठं आहे ती व्यक्ती?" तर आम्ही आपल्याला त्या व्यक्तीच्या जवळ घेऊन जाऊ आणि आपली त्या व्यक्तीशी प्रत्यक्ष ओळख करून देऊ. कारण तशा त्या व्यक्ती स्पष्टपणानं आमच्यासमोर नसत्या तर त्यांचं चित्र इतक्या एकरूपतेनं आम्हाला रंगवता आलं नसतं आणि त्या व्यक्तीचं रेखाटलेलं चित्रही इतकं ठसठशीतपणानं तुमच्या अंतःकरणात उमटू शकलं नसतं. म्हणून त्या त्या लेखातल्या त्या त्या व्यक्ती प्रत्यक्षात आहेत असं आम्ही आपल्याला सांगतो. तुम्ही आमच्यावर विश्वास ठेवा. म्हणजे तुम्हीही त्या व्यक्तीच्याप्रमाणं एखाद्या गुणात तरी तरबेज होऊन जीवनाचं सार्थक करू शकाल!"

"विद्यार्थ्याजवळ हा गुण पाहिजे अन् तो गुण पाहिजे असं आपण पुष्कळ

सांगितलं आहे. तेव्हा असा एक गुण सांगू शकाल का की, तो असला म्हणजे बाकीचे सर्व आपोआपच येतील ? "

(" सर्वांत मुख्य म्हणजे आपल्याला शिक्षण घ्यायचंच आहे आणि आयुष्यात अमुक अमुक व्हायचंच आहे अशी जबरदस्त महत्त्वाकांक्षा विद्यार्थ्यांच्या ठिकाणी असली पाहिजे. जबरदस्त महत्त्वाकांक्षा हा जोडशब्द आम्ही मुद्दाम वापरला आहे. कारण जबरदस्त महत्त्वाकांक्षा असल्याशिवाय अभ्यासाची तळमळ आपल्याला लागणार नाही. यालाच अभ्यासाचा निदिध्यास लागणं असं म्हणतात. कारण निदिध्यास लागला म्हणजे मग तुम्ही खाण्यापिण्यात, वागण्यात, बोलण्याचालण्यात, वर्गात आणि वर्गाच्या बाहेर वर्तन करण्यात आणि एकूण दिवसाचा कार्यक्रम ठरविण्यात तारतम्य बाळगल्याशिवाय राहणार नाही. आणि मग तुम्ही स्वतःहूनच अभ्यास करायचा प्रयत्न कराल. |

पुष्कळशा विद्यार्थ्यांच्या ठिकाणी महत्त्वाकांक्षा असते. कारण महत्त्वाकांक्षा म्हणजे मोठं होण्याची इच्छा. पण नुसती इच्छा असून काय उपयोग ? आपल्याला आपल्या ध्येयाची तळमळ लागली पाहिजे. दिवसातर दिवसा पण रात्री झोपताना किंवा मध्येच जाग आली तरी आपल्या मनात आपल्या ध्येयाचाच विचार आला पाहिजे. आपल्या ध्येयानं आपल्या मनाला इतकं गुरफटून टाकलं पाहिजे की मनात दुसरे विचार आलेच न पाहिजेत. याचसाठी मी जबरदस्त महत्त्वाकांक्षा हा शब्द वापरला आहे. ही एक गोष्ट जर तुमच्याजवळ असली तर तुम्ही रात्रंदिवस तपश्चर्या कराल आणि यशस्वी व्हाल. कारण अभ्यासातलं यशसुद्धा भीक मागून, लाचारीनं किंवा नशिबावर हवाला ठेवून मिळत नाही. त्यासाठी अंतःकरणापासून पुन्हा पुन्हा प्रयत्न करणं हा एकच एक मार्ग आहे.

पण हाच गुण नसला तर बाकीच्या गुणांची मातब्बरी चालणार नाही. म्हणून आपल्या स्वभावानुसार पुढं आपल्याला काय होता येईल हे हेरून आपण जबरदस्त महत्त्वाकांक्षी बनावं असं मी म्हणेन. "

" तुम्ही म्हणता त्याप्रमाणं पुढच्या काही वर्षांतच आपल्या देशातले शंभर टक्के लोक सुशिक्षित झालेत आणि समाजात आर्थिक व सामाजिक समता स्थापन झाली तर मग काय करायचं ? "

" अहो ! अगोदर हे तर होऊन जाऊ द्या ! हे झालं तर आम्हाला खरोखरच फार आनंद होईल. कारण त्यामुळं समाजातल्या जातीजातींच्या कृत्रिम विभागणीला आपोआपच मूठमाती मिळेल. त्यामुळं धर्मा-धर्मांतली तेढही कमी होईल. अनेक नद्यांचं पाणी जसं गंगेला मिळून पवित्र होऊन जातं आणि शेवटी सागराला मिळतं; त्याप्रमाणं हा ह्या धर्माचा आणि तो त्या धर्माचा असा कृत्रिम भेदही

बोथट होऊन जाईल. आपल्या खिशातला हातरुमाल आपण सहजासहजी खिशातून काढतो व तोंड पुसून पुन्हा खिशात ठेवून देतो. त्यात काहीही कृत्रिमपणा नसतो. त्याप्रमाणं सर्व लोक आपापल्या धर्माचं पालन करतील किंवा करणारही नाहीत पण त्यामुळं ते धर्माचा बडेजाव मात्र करणार नाहीत. आपलाच धर्म मोठा म्हटलं की दुसऱ्या धर्माचा द्वेष आलाच म्हणून समजावं. तेव्हा पुढं पुढं धर्मा-धर्मांचा हा आड येणारा कृत्रिमपणा लुप्त होईल. सर्व लोक आपल्याला भारतीय म्हणून म्हणतील. सर्व धर्मांतल्या नि सर्व प्रांतांतल्या लोकांत रोटीबेटी व्यवहार सर्रास होतील आणि सर्वजण खऱ्या अर्थानं एकाच देशाचे रहिवाशी बनतील असा आम्हाला विश्वास वाटतो.

इतक्या उदारवृत्तीनं प्रत्येक देशातला नागरिक वागल्याशिवाय सर्व जगाचं आणि सर्व विश्वाचं एक सरकार स्थापन होऊ शकणार नाही. परंतु सर्व जगातल्या लोकांत विश्वबंधुत्वाची भावना वाढेल आणि सर्वजण भाऊ भाऊ म्हणून राहतील असंच आम्हाला वाटतं.

आता तुम्ही म्हणता त्याप्रमाणं आपल्या देशातले सर्वच्या सर्व लोक सुशिक्षित झाले आणि आपल्या देशाची आर्थिक उन्नती झाली तर आपण जगातल्या दुसऱ्या मागासलेल्या राष्ट्रांच्या उन्नतीसाठी धावून गेलं पाहिजे. आणि संत ज्ञानेश्वरांच्या शब्दात सांगायचं तर,

**सारे विश्वची माझे घर । ऐसी बुद्धी जयाची स्थिर ।**
**किंबहुना चराचर । आपणची झाला ॥**

ही भावना आपण साऱ्या विश्वात वाढवली पाहिजे. "

" शाळेत जाणारे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी शिक्षण घेऊन सुशिक्षित आणि सुसंस्कृत होऊ शकतील. परंतु ज्यांना लिहिता-वाचता येत नाही अशा प्रौढ स्त्री-पुरुषांनी काय करावं ? "

" अशिक्षित प्रौढ स्त्री-पुरुषांच्या शिक्षणासाठी सरकारनं जेवढं काही करायला हवं होतं तेवढं केलं नाही म्हणून मोठा खेद होतो. स्वातंत्र्य मिळून एवढा वीस वर्षांचा काळ लोटला. पण याबाबत विशेष प्रगती झाली नाही म्हणूनच कधी कधी असं वाटतं की, समाजसत्तावाद सक्तीनंच लादला पाहिजे की काय ? कारण त्याशिवाय काही इलाज दिसत नाही. परंतु एकदा सक्ती सुरू झाली की तीमुळं संघर्ष सुरू होण्याची शक्यता असते. म्हणून रशिया व चीन यांनी केलेल्या समाजसत्तावादाच्या प्रसारापासून काही बोध घेऊन आपल्या देशाला अनुरूप असं समाजसत्तावादाचं रोपटं आपण इथं लावावं. यात कुणीही कुचराई करू नये. परंतु समाजसत्तावाद आपण शक्य तितक्या लौकर आणला पाहिजे. म्हणजे

मग अज्ञानामुळं आज जे पुष्कळ लोक मुरगळून पडले आहेत त्यांच्यांत नवचैतन्य निर्माण होईल; आणि इतर अनेक समस्या सुटायलाही मदत होईल.

आपल्या देशातले राजकीय पक्ष कशा तऱ्हेनं आणि किती लौकरात लौकर सच्चा समाजवाद आपल्या देशात स्थापन करतात यावरच हे अवलंबून आहे. तोवर या अशिक्षित प्रौढ स्त्री-पुरुषांची पिढी बिना लिहिता-वाचताच राहून जाईल असं वाटतं ही एक मोठी लाजीरवाणी अशी गोष्ट आहे. आपल्या देशात अजूनही शेकडा सत्तर टक्के लोक अशिक्षित आहेत. आपल्या देशाला लागलेला हा मोठा कलंक होय. हा आपण पुसून टाकला पाहिजे. यासाठी गरिबीतून वर आलेल्या सुशिक्षित तरुण-तरुणींनी कंबर बांधली पाहिजे. कारण त्यांना गरिबीची जाणीव आहे. म्हणून आपल्या गरीब अज्ञ बंधु-भगिनींच्या पायातल्या या अज्ञानरूपी शृंखला तोडून टाकण्यासाठी आपण सर्वांनी आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. यासाठी ज्या ज्या संस्था शिक्षणाचा प्रसार खेडोपाडी करीत आहेत त्यांना त्यांना आपण सर्वतोपरी सहाय्य केलं पाहिजे. प्रत्येकानं आपल्या घरातून तर अज्ञानाला गचांडी दिलीच पाहिजे परंतु इतरांनाही होईल तेवढी मदत केली पाहिजे. हे सगळं सांगूनही सच्चा समाजसत्तावाद स्थापन झाला तर पाच दहा वर्षांतच हे प्रौढ शिक्षणाचं कार्य पूर्ण होईल असं आम्हाला वाटतं. म्हणूनच खराखुरा समाजसत्तावाद स्थापन होण्याची मोठ्या उत्सुकतेनं आम्ही वाट पहात आहोत."

"विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना आपल्याला आणखी काही सांगायचं आहे का ?"

"तसं आम्हाला आणखी काही सांगायचं नाही. तरी पण आता तुम्ही हा प्रश्न विचारलाच आहे तर एक गोष्ट मुद्दाम सांगतो. ती ही की, (स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही ही म्हण विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवावी. या म्हणीचा अर्थ असा की आपण स्वतःच काही प्रयत्न केल्याशिवाय कोणत्याही गोष्टीचं फळ आपल्याला चाखायला मिळत नाही.) ही गोष्ट आपण सर्वांनी नीट लक्षात ठेवावी. हे आम्ही एका लेखात सविस्तर सांगितलं आहे. गरिबीत आणि लाचारीत अडकून पडलेल्या मुलांमुलींना आम्ही हे मुद्दाम सांगत आहोत की, तुम्ही असं समजा की आपला उद्धार आपण स्वतःच करायचा आहे, असा दृढसंकल्प तुम्ही करा. त्यासाठी शिक्षणाची कास धरा. म्हणजे मग तुम्हाला असाध्य गोष्टीही साध्य होतील. आपल्या उद्धारासाठी दुसऱ्या जातीच्या लोकांच्याकडे पाहू नका. बाकीच्या शिकल्यासवरलेल्या लोकांनी त्यांचं कर्तव्य म्हणून तुमचा उद्धार करायला हवा. त्यात उपकाराचा भाग असू नये. पण ते तसं करीत नाहीत; आणि तुम्ही तर दैवावर अन् नशिबावर अवलंबून राहता आणि शिक्षण घेत नाही ही सर्वांत वाईट गोष्ट आहे. त्यामुळं तुम्हीच तुमच्या पायावर धोंडा मारून घेत आहात. यास्तव

तुम्हाला आमचं अंतःकरणापासून असं सांगणं आहे की, तुम्ही आपल्या मनातून अडीअडचणींचा बाऊ काढून टाका. हुशार मुलांमुलींच्या शिक्षणासाठी सरकारतर्फे पुष्कळ शिष्यवृत्त्या सध्या उपलब्ध आहेत. त्या शिष्यवृत्त्यांचा तुम्ही फायदा करून घ्या. तुम्ही दृढनिश्चय कराल तर तुम्हीच तुमचा उद्धार करू शकाल. तसा तो तुम्ही करावा असं आम्ही आपल्याला पुन्हापुन्हा सांगत आहोत ते तुम्ही नीट लक्षात घ्या. घ्याल का ? "

" देव आहे किंवा नाही या विषयी तुमचं काय मत आहे ? असल्यास तुम्ही त्याची आराधना कशी करता ? "

" आपण हा मोठा पेचात टाकणारा प्रश्न आम्हाला विचारला आहे. आपली आतापर्यंतची चर्चा मोठी खेळीमेळीच्या स्वरूपात चालली आहे. ती तशीच चालावी अशीच आमची इच्छा आहे. म्हणून आम्ही आमच्यापरीनं या प्रश्नाचं उत्तर देतो. तसं पाहिलं तर भाव तसा देव या सतराव्या लेखात याचं उत्तर आलेलंच आहे. आणि हा प्रश्नही सतरावाच आहे. हा योगायोगच म्हणायचा ! म्हणून थोडसं बोलतो. आम्ही संत तुकाराम महाराज यांचे अनन्य भक्त आहोत. त्यांच्या अभंगांना भक्तिभावानं गाताना आम्हाला जो अवर्णनीय आनंद होतो, तो आम्ही आपल्याला सांगू शकत नाही.

म्हणून स्वामी, सद्गुरू आणि संत तुकाराम महाराज यांच्याच शब्दात बोलायचं तर देव भावनेनंच ओळखायचा असतो. कारण देव भावनामय आहे. म्हणूनच देव आहे यावर आमचा विश्वास आहे. त्या राजराजेश्वराला बघायचं तर ते भावनेनंच पाह्यचं आहे. त्यासाठी आपलं मन प्रथम पवित्र झालं पाहिजे. सध्याच्या मतामतांच्या गलबल्यात सात्त्विक वृत्तीच्या ऐवजी लोकांच्या मनात राजस आणि तामस वृत्तीच वाढत आहे. त्यामुळं आम्ही अधिकाधिक राक्षसीवृत्तीचे बनत आहोत. म्हणून पहिली गोष्ट अशी की, आपण आपलं मन सात्त्विक विचारांनी भरून टाकलं पाहिजे. आणि असं करायचं तर कुठंतरी आपली जबरदस्त श्रद्धा असली पाहिजे. त्या श्रद्धेप्रमाणं आपण वर्तन केलं पाहिजे. दुसऱ्याचा द्वेष मनातून काढून टाकला पाहिजे. त्याऐवजी आपलं मन दुसऱ्याच्या प्रेमानं उचंबळून आलं पाहिजे. आणि आपण भावनेनं, भक्तीनं आणि भजनानं भगवंताला ओळखण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

आता तुम्ही विचारलेल्या प्रश्नातला उरलेला अर्धा भाग असा की, मी दररोज कोणती आराधना करतो ? रोजच्या रोज संत तुकाराम महाराज यांचे निदान सहा तरी अभंग गाऊन म्हणावेत असं मी मनातल्या मनात हजारदा ठरवलं. परंतु हा नियम मला नियमितपणानं पाळता आला नाही. तरीही माझा प्रयत्न चालूच आहे. या अशा दररोजच्या माझ्या अभंग म्हणण्यामुळं माझे जवळजवळ शंभर

अभंग पाठ झालेले आहेत. तसंच दररोजची आराधना म्हणून मी आणखी एक गोष्ट नियमानं करतो. परंतु ती आता सांगत नाही. पुढं मागं योग्य वेळी अवश्य सांगेन. असो. परंतु तुम्ही मात्र जो नियम ठरवाल त्याचं रोजच्या रोज नियमानं पालन करा. त्यात अडथळा आला आणि काही दिवस नियमाचं पालन करता आलं नाही तरी नियम सोडू नका. त्याचा तुम्हाला पुष्कळ फायदा होईल असा विश्वास बाळगा. कारण श्रद्धापूर्वक केलेले प्रयत्न कधीही फुकट जात नाहीत असा सिद्धांत आहे. म्हणून तुम्ही ठरविलेल्या नियमाचं जरी काही कारणामुळं पालन झालं नाही तरी पुन्हा पुन्हा प्रयत्न करण्यात कसूर करू नका असं तुम्हाला मुद्दाम सांगावसं वाटतं."

"आता आम्हीच प्रश्न विचारतो की आम्हाला अखेरीस काय सांगायचं आहे ?"

"तेव्हा आम्हाला शेवटी एवढंच सांगायचं आहे की सांपत्तिक, शारीरिक, मानसिक आणि दैविक अशा अनेक अडचणींतूनही ही अल्पशी साहित्यसेवा जनता-जनार्दनाच्या चरणी रुजू करण्याची शक्ती आणि बुद्धी संत तुकाराम महाराज यांनी आम्हाला दिली म्हणून त्यांच्या चरणावर आम्ही अनंत लोटांगण घालीत आहोत. आणि त्यांचाच एक अभंग देऊन हे पुस्तक पूर्ण करीत आहोत. त्या अभंगात संत तुकाराम महाराज यांनी शिष्य कसा मिळावा म्हणून भगवंताजवळ प्रार्थना केली आहे. तेव्हा त्यांच्या इच्छेप्रमाणं तसा ब्रह्मज्ञानी शिष्य निर्माण व्हावा आणि सर्व समाजातला अज्ञानरूपी अंधार नष्ट होऊन सर्वजण ज्ञानरूपी अमृताचं मोठ्या आवडीनं प्राशन करोत अशी त्यांच्या चरणावर डोकं ठेवून आम्ही भक्तिभावानं प्रार्थना करीत आहोत. तो अभंग असा–

**कृपा करावी भगवंते । ऐसा शिष्य द्यावा माते ।। १ ।।**
**माझे व्रत जो चालवी । त्यासी द्यावे त्वां पालवी ।। २ ।।**
**ब्रह्मज्ञानी व्हावा गुंडा । ज्याचा तिन्ही लोकी झेंडा ।। ३ ।।**
**तुका तुका हाका मारी । माझ्या विठोबाच्या द्वारी ।। ४ ।।**

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर निबंध
८८४६४ दि. ... नों दि. 23/6/6
१६५५
दा. क्र. १६६०९
ठाणे

REFBK-0016609